# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१७

## अंतरंग


अंतरंगात शिरताना - मिनाक्षी जयकर

**अभिवादन**

**रावबहादूर एम्. बी. धुरंधराची १५०वी जयंती**

सुहासिनी कीर्तिकर

धुरंधर महादेव विश्वनाथ - सुहास बहुळकर

रा. ब. महादेवराव धुरंधर - शिवनंदन आगासकर

महादेवराव - प्रो. एम. एम. विजयकर

महादेवरावांचा वंशवृक्ष

अंबिका धुरंधर - एम्. एम्. विजयकर

---

गंधर्व फॅशन्स - प्रताप वेलकर (लेख)

बाबा भांडं - नंदकुमार विजयकर (कथा)

एक अविस्मरणीय आठवण - मृदुला जोशी (लेख)

हिंदी फिल्मसंगीत आणि शास्त्रीय संगीत - पं. सुजन राणे (लेख)

अगतिक - उज्ज्वला ब्रम्हांडकर (कथा)

ठोकताळे - सुमन नवलकर(कथा)

---

**छंद आगळा**

बागेश्री परीख

राजन जयकर

विश्वास अजिंक्य

अचला देसाई

दीपक धैर्यवान

उज्ज्वला आगासकर

मीनाक्षी देसाई

प्रणिता प्रभाकर

खरा तो प्रेमा - जयमती तळपदे (कथा)

---

**छोट्यांसाठी-मोठ्यांसाठी -**

कल्लाप - सुमन नवलकर (कथा)

आरती कोठारे - (कविता)

A Glass of Milk - आभा देसाई (गोष्ट)

Riddles - अदिती देसाई

ओळखा पाहू - कल्पना कोठारे

मधुरा आणि मयुरा - सुमन नवलकर (कथा)

The Morning Star-चैतन्या कीर्तिकर (कविता)

---

हात बघणारा डॉक्टर - सुरेश नवलकर (कथा)

डू यू लव्ह युवरसेल्फ? - केतकी जयकर (लेख)

महालक्ष्मी अहं... - हेमंत तळपदे (लेख)

पानगळ - सुहासिनी कीर्तिकर (कथा)

**भटकंती**

आधुनिक क्षेत्रे - अपर्णा उदय कीर्तिकर

स्पिती व्हॅली - पूर्णिमा धैर्यवान

---

सफर स्वादाची - शुभदा आगासकर (लेख)

---

त्वरित निर्णय कसे घ्यावेत? - रसिक विजयकर (लेख)

ती - कल्पना कोठारे (कथा)

हे काय भलतेच - सुरेखा नवलकर (कथा)

**कविता**

नलिनी तळपदे, उज्ज्वल ब्रम्हांडकर, कल्पना कोठारे, सुहासिनी कीर्तिकर, सुरेखा नवलकर, हेमंत तळपदे, विजयश्री नवलकर, आनंद देशमुख, स्वागता विजयकर,

**वात्रटिका:-** डॉ. सुमन नवलकर

**चारोळ्या**:- आनंद देशमुख

**व्यंग्य / हास्यचित्रे -**

प्रदीप कोठारे, सुहासिनी कीर्तिकर

प्रभुतरुणासाठी देणग्या, प्रभुतरुणाची डायरी, भाऊबीज, ज्ञाती संस्थावृत्त इ.


**मुखपृष्ठ: वऱ्हाडणी - एम्. बी. धुरंधर**

संदर्भ:- सांगली पुरातत्त्व विभाग, सांगली

सौजन्य:- सुहास बहुळकर

सहाय्य:- किशोर जयकर

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

# प्रभुतरुण

**दिवाळी अंक**

**मूल्य रुपये दहा**

**( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )**

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

कार्यकारी संपादक मंडळ:
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

सहाय्यक संपादक:
**त्वरिता दळवी, भक्ती शेटये, राजेश नवलकर**

**www.prabhutarun.com**

**वर्ष ५१ वे)** **ऑक्टोबर २०१७** **(अंक ४**

# अंतरंगात शिरताना

**- मिनाक्षी जयकर**

दिवाळी अंक आणि मराठी माणूस हे समीकरण सुमारे शंभर वर्षांहून अधिक कालापासून चालत आलेलं आहे. आपला 'प्रभुतरुण' ही याला कसा अपवाद असणार? दरवर्षी नित्यनेमाने सरस, दर्जेदार, दिवाळी अंकाची सुकडी आम्ही आपल्यासाठी घेऊन येतो. याच परंपरेला अनुसरून ऐन दिवाळीत वसुबारसेच्या दिवशी यंदाचा दिवाळी अंक आम्ही आपल्या हाती देऊन वाचनाची दिवाळी साजरी करत आहोत.

''प्रभुतरुणा''च्या दिवाळी अंकाची आणखी एक खास परंपरा आहे. ह्या अंकात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा सहभाग असतो. त्यात सहभागी व्हायला वयाचं बंधन नसतं. कारण 'प्रभुतरुण' सर्वांनीच आपला मानला आहे. अर्थातच ही परंपरा यावर्षीही पाळली गेली आहे हे सांगणे न लगे.

यंदाच्या अंकाचं खास वैशिष्ट्य म्हणजे रावबहादूर महादेव विश्वनाथ धुरंधर यांच्या दीडशेव्या जयंती वर्षानिमित्त खास विभाग. ''अभिवादन'' या विभागामुळे यंदाच्या अंकाला एक वेगळं दस्तावेजी स्वरूप प्राप्त झालं आहे. याव्यतिरिक्त या अंकात नेहमीप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे लेख, कथा, कविता, आगळी-वेगळी प्रवासवर्णनं, वात्रटिका, चारोळ्या, व्यंगचित्र आहेतच. आपल्या छंदावर आधारित 'छंद माझा वेगळा' हे सदर, 'छोट्या-मोठ्यांसाठी' हे सदरही आहे.

असा हा विविधरंगी, विविध ढंगी 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक उठावदार करणाऱ्या सर्व लेखक, कवी, चित्रकार, जाहिरातदार, दरवर्षी नेमाने भाऊबीज जमा करणाऱ्या सौ. प्रतिमा विनोद प्रधान आणि भाऊबीज देणारे दाते, हितचिंतक आणि अर्थातच वाचक यांचे आभार. आपणा सर्वांना दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा. येणारं नववर्ष तुम्हा-आम्हा सर्वांना सुख, शांती, समाधानासह समृद्धीचे जावो आणि आपली अशीच सातत्याने भेट होत राहो ही सदिच्छा!

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अभिवादन

## ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

नमस्कार मित्रांनो. दरवर्षी दिवाळी अंकात माझे संपादकीय असते. मग कार्यकारी संपादक त्याला 'मम' म्हणतात. पण यावर्षी जरा वेगळे! कारण या वर्षीचा दिवाळी अंकही जरा हटके, वेगळा आहे. झालं काय की सौ. प्रतिभा सुरेन्द्र विजयकरांचा मला एके दिवशी फोन आला- ''त्यांची झावबांकडे दिलेली बहीण मनिषा. मनिषाचे स्नेही श्री. राम भेण्डे. या राम भेण्डेंना रावबहादूर धुरंधरांवर पुस्तक काढायचे आहे. त्यासाठी त्यांना मदतनीस हवा आहे. तुम्ही मदत कराल का?''- मी आनंदाने तयार झाले. त्याआधी अंबिका धुरंधरांनी लिहिलेल्या त्यांच्या आठवणींच्या पुस्तकनिर्मितीत माझा सहभाग होताच. म्हणजे मी अंबूताईंकडे त्यांच्या सांगण्यावरून गेले. त्यांच्या लिखाणाचे बाड आणले. आवश्यक तेथे सुधारले. मग 'मॅजेस्टिक प्रकाशन'कडे त्याची शिफारस केली. ते पुस्तक प्रसिद्ध झाले. तर असो. मी राम भेण्डेंशी फोनवर बोलले. भेटण्याचा दिवस ठरला. मी गेले त्याप्रमाणे. तेव्हा कळले की १८ मार्च २०१७ पासून रावबहादूर धुरंधरांच्या दीडशेव्या जयंतीचे हे वर्ष आहे. पण भेण्डे पडले संशोधकवल्ली. त्यांनी माझ्याकडून नेमके काय अपेक्षित आहे हे स्पष्टपणे सांगीतलेच नाही. मला मं.गो. राजाध्यक्ष यांचा 'सृजनगंध' मधील धुरंधरांवरील लेख माहीत होता. श्री. सुहास बहुळकरांनी भरविलेल्या भव्य चित्रप्रदर्शनात मी धुरंधरांची सुवर्णपदकविजेती चित्रं पाहिली होती. मग ठरवले की मीच पुढाकार घेऊन 'प्रभुतरुण' दिवाळी अंकात त्यांची दीडशेवी जयंती साजरी करायची. संदर्भ गोळा करणं सुरू झालं त्यातून. १९९० साली 'ललित'मध्ये प्रसिद्ध झालेला ज्ञानेश्वर नाडकर्णींचा लेख वाचला. 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षं' (जानेवारी ८, १८९० ते जानेवारी ३१, १९३१) हे खुद्द रावबहादूर धुरंधरांचे कलाजीवन संदर्भातील आत्मकथन वाचले. २९ जानेवारी ते ३० जानेवारी १९६८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या हॉलमध्ये रांगोळी प्रदर्शन भरले होते शताब्दी निमित्ताने. मात्र रंगावलीकारांचा तपशील मला उपलब्ध झाला नाही. असे कळले की त्यात धुरंधरांचा सहभाग होता. 'दृश्यकला' खंडात सुहास बहुळकरांचा लेख आहे; ही माहिती मला मृदुला प्रभुराम जोशींनी दिली. बोलता बोलता ही सगळी धडपड आणि त्यामागचे प्रयोजन सुहासिनीवहिनींच्या (सुहासिनी सुहास कोठारे) कानावर घातले. मग त्यांनीही आपणहून 'प्रभुतरुणा'चे जुने बाड हाताळले. त्यात तर रावबहादूरांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने लिहिलेल्या लेखांचे घबाडच हाती लागले. त्या आणि मी याविषयी बोलत असताना श्री. अजित विजयकरांच्या ते कानावर गेले. त्यांनी मला त्याबद्दल विचारले. नुसते नाही विचारले तर, श्री. कनु धुरंधरांच्या मुलीचा; प्रसन्ना गोखलेंचा फोन नंबर देऊ केला. प्रसन्नाताईंनीही तत्परतेने त्यांच्याकडचा तपशील पाठवला. माझ्या योजनेत आणि धडपडीत असा रंग भरत गेला. रंगांच्या काही छटा आपसूक गडद, सुंदर झाल्या. कशा? तर एकदा किशोर जयकरचा फोन आला. त्याच्या मुलाच्या कार्यक्रमासाठी 'प्रभुतरुण' मधून त्याला जाहिरात द्यायची आहे. सहज बोलताना त्याच्या क्षेत्रातली ही माझी योजना मी त्याच्या कानी घातली तर; तो म्हणाला, ''सुहास बहुळकर ३-४ वर्षे माझ्या मागे होता शिकायला. मी बोलू का त्याच्याशी?'' मला तर चित्रात सुवर्णरंगच भरल्यासारखे (प्रकाशमान झाल्यासारखे) वाटले. धुरंधरांची ही दीडशेवी जयंती आहे या माहितीमुळे श्री. सुहास बहुळकर चकीत. एका सच्च्या कलाकाराने कलाकाराला दाद द्यावी हे ओघाने मग घडत गेले. त्यांनी किशोरजवळ 'दृश्यकला' मधला त्यांचा लेख, धुरंधरांची चित्रे कोणतीही व्यवहारी अपेक्षा न ठेवता पाठवून दिली. गंमत म्हणजे त्या लेखात 'प्रभुतरुण' १९४४चा संदर्भ आहे. कारण १९४४ हे धुरंधरांचे मृत्यूवर्ष. मी मग १९४४च्या प्रभुतरुण अंकाचा आग्रह धरला नाही. किशोरने स्वयंप्रेरणेने आणि बहुळकरांशी बोलून त्या

चित्रातील एक सुवर्णपदकविजेते चित्र (मॅटपेपरवर) छान 'डेव्हलप' करून प्रभुतरुणाचे मुखपृष्ठ तयार केले. हे मुखपृष्ठावरील चित्र सांगली म्युझियममध्ये संग्रहीत आहे. रंग भरायचेच ठरले तेव्हा कलाकाराचे पुण्यच कामी येत गेले. 'रावबहादूर' या पदवीची प्रतही छायांकीत करता आली तर? ही पदवी त्यांना १९२७ साली मिळाली. तर तिची प्रत?... या विचाराने मी आपल्या ज्ञातीतील संग्राहक श्री. राजन जयकरांना विचारले. तर ते म्हणाले, ''माझ्याकडे नाही ती प्रत. पण रावबहादूर धुरंधरांची पोस्टकार्ड आकाराची जवळजवळ ५०० ते ६०० चित्रे आहेत माझ्याकडे. मी त्यांचे स्वतंत्र प्रदर्शन भरवू शकेन.'' त्यांनी 'माझा छंद' या लेखात मग मुद्दाम धुरंधरांवर अधिकचा परिच्छेद टाकला. त्यांच्या लेखातील मुद्दा क्र. ४ पहावा. (माझ्या कारकीर्दीतील 'प्रभुतरुण'च्या एका दिवाळी अंकात श्री. प्रदीप कोठारेंच्या संग्रहातील धुरंधरांनी काढलेली 'गुड बॉय बॅड बॉय'ची दोन पोस्टकार्ड साइज चित्रे छापलेली मला आठवली.) ते पुढे म्हणाले, ''त्याकाळी होणाऱ्या रंगभूमीवरील (नाटकातील) पुरुषपात्र, स्त्रीपात्र यांची वेशभूषा रावबहादूर रेखाटने काढून ठरवीत. त्यावर ते सुरुवातीला 'एम.व्ही.डी.' अशी सही करीत. पुढे एम. व्ही. धुरंधर म्हणून ते आपली नाममुद्रा उमटवू लागले.'' रावबहादूर धुरंधरांच्या चित्रशैलीचे वैशिष्ट्य काय? - तर त्यांच्या अवतीभवती असलेला समाजच त्यांनी चित्रात रेखाटला. हा समाज अर्थातच पाठारे प्रभु या ज्ञातीचा प्रामुख्याने होता. त्यामुळे १८९५ मध्ये भारतातले पहिले सुवर्णपदकविजेते त्यांचे चित्र हे 'बाय, बाय; आलीस' (लक्ष्मी, डू यू कम?) असे आपल्या परभी गौरीचे (समारंभाचे) आहे. या अंकाच्या मुखपृष्ठावर असलेले वऱ्हाडणींचे चित्रही परभी लग्नानंतरच्या वठाणातील विश्रांतीचेच आहे. त्याकाळचा मुंबईतील कोळीसमाजही त्यांच्या काही चित्रात येतो, तर शाहिस्तेखानाची बोटे कापण्याचा प्रसंग, राज्याभिषेक आदी ऐतिहासिक संदर्भही चित्रांकीत झाले आहेत. संदर्भ गोळा करताना योगायोग होताच साथीला. त्यातून एक आणखी समाजविशेष सांगणारी गंमत लक्षात आली. 'लोकवाङ्मय'च्या जानेवारी २०१७ च्या मुखपृष्ठावर डॉ. सुधाकर यादव यांनी रावबहादूर गणपतराव म्हात्रे आणि रावबहादूर धुरंधर यांच्या शिल्प आणि चित्रमाध्यमातील काही साम्यदर्शक शैलीविशेष अधोरेखित केलेत. म्हणजे आत्ता आपल्या मुखपृष्ठावरील चित्राचेच घ्या. त्यात नऊवारी नेसण्याच्या निऱ्यांचा डौल, हेलकावत विसावलेला वऱ्हाडणीचा हात, उभं रहाण्याची पद्धत आदी तपशील 'लोकवाङ्मय' वृत्तच्या मुखपृष्ठावर म्हात्रेंच्या शिल्पाकृतीतील साधर्म्य दाखवत (वर्तुळातून) अधोरेखित केला आहे. श्री. सुधाकर यादव यांचा त्याच अंकात याविषयीचा लेख आहे. त्यात त्यांनी त्याकाळची ही संस्कृती चित्रित झाली आहे असे अभ्यासपूर्ण विवेचन केलेय. त्यांच्याशीही मी बोलले. त्यासाठी श्री. सतीश काळसेकरांचे मैत्र कामी आले. त्यांचा माझ्या 'परभी सणसमारंभाचे चित्रण' या विधानावर रास्त आक्षेप होता. (त्याला जातीय वास आल्यासारखे वाटले त्यांना). मग त्यांनी म्हटले की ती एकेकाळची संस्कृती होती. त्या संस्कृतीचित्रणातील तो सारखेपणा आहे. अर्थात् मला ते मान्यच आहे. कारण फक्त परभू चित्रण नाहीच धुरंधरांच्या चित्रशैलीत. रंकाळा टँकवरील शिकारही त्यांनी आपल्या रंगांनी 'टिपली'य्.

तर मित्रांनो, रावबहादूर ही ब्रिटीशकालीन सन्मानपदवी मिळवणाऱ्या महादेव धुरंधरांची १५० वी जयंती साजरी करताना मला अनेक व्यक्ती भेटल्या, त्यांनी मनापासून सहकार्य केले. माझ्या संपादन संशोधनात त्यामुळे अनेक रंग भरले गेले. मी इथे त्याविषयीच लिहीले आहे. कार्यकारी संपादक मिनाक्षी जयकर आणि वैजयंती सक्सेना यांचे हे तपशील जुळवताना सहाय्य झाले. आमचे विश्वस्त श्री. दीपक कोठारे यांनी प्रभुतरुणातील जुन्या अंकातील लेखांच्या छायांकीत प्रती पाठवल्या. श्री. सुहास बहुळकर, श्री. किशोर जयकर, सौ. प्रसन्ना गोखले, श्री. राजन जयकर, श्री. सुधाकर यादव यांचे मी त्यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल मनापासून आभार मानते.

चित्रकार रावबहादूर धुरंधर मार्ग खारमध्ये आहे. त्या मार्गावरून जा न जा. मात्र त्यांच्या दीडशेव्या जयंती निमित्ताने, मी मात्र संपादनाच्या वेगळ्या वाटेवरून चालले. त्यातून 'अभिवादन' विभाग तयार झाला. या 'अभिवादना'ला ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून संदर्भमूल्य निश्चितच आहे. म्हणूनच म्हटले की यावर्षीचा दिवाळी अंक 'जरा हटके' आहे. खात्री आहे की नेहमीप्रमाणेच तुम्ही दिवाळी अंकाचे स्वागत कराल. हो! दिवाळी अंक प्रकाशनादिवशीच यावर्षी दिवाळी आहे. दिवाळी आणि नूतन वर्षाच्या तुम्हा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**अभिवादन**

# धुरंधर, महादेव विश्वनाथ

## चित्रकार व कलाशिक्षक

## १८६७ ते १ जून १९४४

**✶ सुहास बहुळकर ✶**

राजा रविवर्मा यांच्यानंतर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आपल्या वास्तववादी कलाशैलीत तत्कालीन समाजजीवन व्यक्त करणारी चित्रे, तसेच पौराणिक व ऐतिहासिक प्रसंगांवर आधारित चित्रांद्वारे लोकप्रिय झालेले यशस्वी चित्रकार म्हणून धुरंधर यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांची विविध विषयांवरील चित्रे ओलिओग्राफ, पुस्तके, दिनदर्शिका एवढेच नव्हे, तर जाहिरातींसाठी छापल्या गेलेल्या पोस्टर्सद्वारे देशभर पोहोचली व त्यांच्या या कर्तृत्वाला जनमान्यतेसोबतच इंग्रज सरकारने दिलेल्या 'रावबहादूर' या पदवीमुळे राजमान्यताही मिळाली.

महादेव विश्वनाथ धुरंधर यांचा जन्म मुंबईस, आजोळी झाला. त्यांच्या आई नर्मदाबाई व वडील विश्वनाथ कृष्णनाथ ऊर्फ भाईसाहेब धुरंधर हे कोल्हापुरात आदरणीय व्यक्ती म्हणून गणले जात. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातील राजाराम हायस्कूलमध्ये झाले. त्या काळात रविवर्मा यांच्या घरोघरी लागलेल्या चित्रांची मोहिनी त्यांच्यावर पडली.

शालेय जीवनात त्यांची चित्रकलेची आवड वाढू लागली. त्यांना वेळोवेळी प्रदर्शनात बक्षिसेही मिळाली. याच काळात कोल्हापुरातील प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहिमान यांच्या प्रेरणेने त्यांना जलरंगाची आवड निर्माण झाली. आबालाल यांच्या निसर्गचित्रांचे प्रात्यक्षिकही पाहण्यास मिळाले. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते मुंबईला गेले असताना त्यांना सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही कलाशाळा पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रेरित होऊन त्यांनी १८९० ते १८९६ या काळात तेथे कलाशिक्षण घेतले. १८९५ मध्ये त्यांचा विवाह बापूबाई यांच्याशी झाला. परंतु १८९७ मध्ये बापूबाईंचे निधन झाल्यावर १८९९ मध्ये धुरंधरांनी गंगूबाई यांच्याशी पुनर्विवाह केला.

हे शिक्षण सुरू असतानाच १८९३ मध्ये त्यांच्या वडिलांचे अचानक निधन झाले. अपार मेहनत व जिद्द ठेवून प्रत्येक परीक्षेत प्रथम क्रमांक व शिष्यवृत्तीही मिळवणाऱ्या धुरंधरांनी त्यांच्या बंधूंवर आपल्या शिक्षणाचा आर्थिक भार पडू दिला नाही. शिक्षणाच्या काळात त्यांना 'वॉडिंग्टन' पुरस्कार (१८९१), 'बॉम्बे आर्ट सोसायटी' (१८९२), 'मेयो' पदक (१८९४) अशी पारितोषिके मिळाली. जे. जे. चे प्रिन्सिपल ग्रिफिथ्स यांनी १८९५ मध्ये धुरंधरांकडून विविध प्रकारच्या भांड्यांची सुमारे शंभर चित्रे काढून घेतली. ही सर्व चित्रे लंडनमध्ये, सरकारतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडियन आर्ट जर्नल' मध्ये छापली गेली.

आर्ट स्कूलमध्ये उत्तम गुण मिळवून शिक्षण पूर्ण केल्यामुळे धुरंधरांची नेमणूक १८९६ मध्ये कलाशिक्षक म्हणून सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये झाली. आपल्या कर्तव्यतत्परतेमुळे ते हेडमास्टर (विभागप्रमुख) झाले. त्यानंतर १९३० मध्ये प्रि. सॉलोमन यांच्या रजेच्या वेळी वर्षभर डायरेक्टर ऑफ आर्ट या पदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यानंतर त्यांची नेमणूक इन्स्पेक्टर ऑफ ड्रॉइंग या पदावर करण्यात आली व १९३१ डिसेंबर मध्ये अखेर ते निवृत्त झाले.

जे. जे. मधील शिस्तबद्ध अभ्यासक्रमामुळे पाश्चात्य पद्धतीच्या अकॅडमिक म्हणजेच वास्तववादी शैलीत धुरंधरांनी प्राविण्य मिळविले. रेखाटन,

व्यक्तिचित्रण व निसर्गचित्रण या तीनही विषयांत ते दर्जेदार चित्रे काढत. त्यांप्रमाणेच धुरंधरांनी ऐतिहासिक व पौराणिक विषयांवर वास्तववादी व मानवाकृतिप्रधान चित्रे रंगविली.

त्यांच्या 'म्यूझिक लेसन' या चित्राला १८९४ मधील बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात रोख रकमेचे पारितोषिक लाभले. विशेष म्हणजे चित्रकार राजा रविवर्मा यांना हे चित्र आवडून त्यांनी ते विकत घेतले. धुरंधरांच्या 'गौरबाई तू आलीस' या चित्राला १८९५ मध्ये बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात सुवर्णपदक लाभल्यामुळे ते एकदम प्रसिद्धीच्या झोतात आले. कारण प्रथमच एका भारतीय चित्रकाराला 'बॉम्बे आर्ट सोसायटी'च्या प्रदर्शनात सुवर्णपदक लाभले होते. धुरंधरांनी आपल्या कारकिर्दीत एकूण पाच सुवर्णपदके मिळवली. त्यांना १९०४ मध्ये मुंबईस भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनाच्या वेळी दुसरे सुवर्णपदक मिळाले. पंढरपूर येथे १९०७ मध्ये भरलेल्या फाइन आर्ट इंडस्ट्रियल एक्झिबिशनमध्ये धुरंधरांच्या 'नैवेद्य' या चित्राला तिसरे सुवर्णपदक मिळाले. त्यांना १९१० मध्ये जळगावच्या औद्योगिक प्रदर्शनात 'वऱ्हाडणी' या चित्रासाठी चौथे सुवर्णपदक मिळाले. या चित्रात पाठारे प्रभूंच्या विवाहप्रसंगी नववधू व कुटुंबातील इतर स्त्रियांची लगबग दाखविली आहे. हे चित्र सांगलीच्या संग्रहालयात आहे. ग्वाल्हेर येथे १९१२ मध्ये भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात 'होमेज टू देअर मॅजेस्टीज किंग अॅण्ड क्वीन' या चित्रासाठी धुरंधरांना पाचवे सुवर्णपदक मिळाले. यात ब्रिटिश सम्राट व सम्राज्ञी यांच्या भारतभेटीच्या प्रसंगी भारताच्या विविध प्रांतांतील स्त्री-पुरुष त्यांना नजराणे देताना दाखविले होते. याखेरीज १९२३ मध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या लंडनच्या वेम्बले येथील प्रदर्शनातील उत्कृष्ट जलरंगासाठी पारितोषिक मिळालेले त्यांचे 'ग्लोरी ऑफ पंढरपूर' हे चित्र गाजले. या चित्राची प्रशंसा 'द ब्रिटिश एम्पायर रिव्ह्यू' या वृत्तपत्रात आली होती.

धुरंधरांनी व्यक्तिचित्रांसोबतच भारतीय सण, उत्सव, परंपरा या विषयांवरही चित्रे रंगविली. उच्च मध्यमवर्गीयांच्या चालीरीती, विशेषत: त्यांच्या स्वत:च्या पाठारे प्रभू ज्ञातीतील रीतिरिवाज त्यांनी या चित्रांतून दाखविले. या सर्वात तत्कालीन समाजजीवनाचे पुरेपूर प्रतिबिंब असल्याने इतिहासाच्या व सामाजिक जीवनाच्या अभ्यासकांच्या दृष्टीनेही या चित्रांचे महत्त्व आहे.

त्यांच्या चित्रांत नऊवारी साडी चोळी ल्यालेल्या, सुंदर केशरचना केलेल्या, दागदागिने परिधान केलेल्या प्रतिष्ठित घरातील स्त्रिया अथवा राजस्त्रियाही दिसतात. कथेनुरूप वनश्रीने नटलेली पार्श्वभूमी अथवा भव्य प्रासाद अशा पार्श्वभूमीचा ते वापर करीत. लग्नप्रसंग रंगविताना वेगवेगळ्या तऱ्हेची उंची वस्त्रे परिधान केलेल्या स्त्रिया व रुबाबदार पेहरावाचे पुरुष ते रंगवत. यात वस्त्रांच्या सुंदर चुण्या, तलम पोत, तजेलदार रंगसंगती व जलरंगाची सुंदर हाताळणी यामुळे ही चित्रे लोकप्रिय ठरली.

**धुरंधरांची रेखाचित्रे :**

धुरंधरांनी विद्यार्थीदशेपासूनच नियमित रेखाटनाची सवय लावून घेतली होती. ती त्यांनी आयुष्यभर जोपासली. लहानमोठ्या आकाराची त्यांची जवळजवळ ८० ते ८५ स्केचबुक्स त्यांच्या कन्या अंबिका धुरंधरांनी जपून ठेवली होती. त्यांच्या रेखाटनात मुंबई व देशभरातील अठरापगड जातीचे लोक, त्यांच्या वेशभूषा, रस्त्यावरील तऱ्हेतऱ्हेची वाहने, स्थळवैशिष्ट्ये या सर्वांची रेखाटने आढळतात. या स्केचबुक्समधील पाने सुट्या स्वरूपात अनेक संग्रहालये व कलारसिकांच्या संग्रहात आहेत.

त्यांची ही स्केचबुक्स वेगवेगळ्या आकारांची असत. प्रवासात ते ३'' बाय ६'' किंवा ४'' बाय ६'' आकारांची, खिशात राहतील अशी स्केचबुक्स वापरत. या सोबतच त्यांनी १०'' बाय १२'' किंवा १२'' बाय १५'' या आकाराची स्केचबुक्सही वापरली. अशा सर्वच स्केचबुकांमधील चित्रांखाली ते सहीच्या सोबत तारीख, स्थळ व शीर्षकही सुंदर अक्षरात नोंदवीत असत. अशा प्रकारचे रेखाटन करताना ते पेन्सिल किंवा शाईने रेखाटन करून त्यातील काही भागात जलरंगाचा वापर करून त्याचे सौंदर्य वाढवीत. अशी त्यांची विविध प्रांतांतील स्त्रियांची रेखाटने निवडून 'विमेन ऑफ इंडिया' हा अल्बम (चित्रसंग्रह) प्रसिद्ध झाला. ऑटो रॉथफिल्ड या अलिबागच्या कलाप्रेमी इंग्रज जिल्हाधिकाऱ्याने यासाठी लेखन व संपादन केले होते. हा चित्रसंग्रह कमालीचा गाजला.

अशाच प्रकारचा अप्रकाशित राहिलेला त्यांचा महत्त्वाचा चित्रसंग्रह म्हणजे 'माय वाइफ इन आर्ट' हा होय. यात त्यांनी आपली दिवंगत प्रथम पत्नी बापूबाई व

द्वितीय पत्नी गंगूबाई यांची विविध अविर्भावातील अनेक रेखाटने केलेली असून तो या दोघींना प्रेमपूर्वक अर्पण केला आहे. या चित्रसंग्रहाच्या सुरुवातीलाच धुरंधरांनी अतिशय हृद्य अशी अर्पणपत्रिकाही स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिली होती. हा संपूर्ण संग्रहच धुरंधरांचा आपल्या दोन्ही पत्नींबद्दल जिव्हाळा व प्रेमभावना व्यक्त करणारा आहे. विशेषत: त्यातील प्रथम पत्नीच्या निधनानंतर केलेले मृतदेहाचे चित्र व खाली लिहिलेले 'बापू इज डेड' हे शीर्षक अनुभवताना प्रेक्षक हेलावून जातो. आचार्य अत्रे यांनी या चित्रसंग्रहाचा गौरव 'भावकाव्य' म्हणून केला होता. धुरंधरांच्या काळात भारतात फाइन आर्ट व कमर्शिअल आर्ट असा भेद नव्हता. या दोन विभागांचे स्वतंत्र शिक्षणही १९३६ नंतर देण्यात येऊ लागले व जाहिरातकला त्यानंतरच्या काळात स्वतंत्र शाखा म्हणून विकसित झाली. परंतु धुरंधर यांनी या कलाशाखेच्या विविध अंगांसाठी भरपूर काम केले. त्या काळात जाहिरातकलेसाठी त्यांच्याएवढे काम केलेला कलावंत क्वचितच आढळून येतो.

**पुस्तक सजावटीचे काम :**

धुरंधरांनी त्या काळात पुस्तक सजावटीसाठी भरपूर काम केले. त्यांनी इतिहासतज्ज्ञ व सातार्‍याचे जिल्हाधिकारी सी. ए. किंकेड यांच्या 'टेल्स ऑफ विक्रमादित्य' व 'डेक्कन नर्सरी टेल्स' या पुस्तकांची इलस्ट्रेशन्स केली. मुंबईचे पोलीस आयुक्त एस. एम. एडवर्ड यांचे 'बाय द वेज ऑफ बॉम्बे', 'जॉर्ज फ्रान्सिस एनॉक यांचे 'डिझायर ऑफ ऑल नेशन्स' (बायबल), पी. सी. स्ट्रीप यांचे 'पीपल्स ऑफ बॉम्बे', ऑलिव्हिया स्ट्रीप यांचे 'कॉल ऑफ ब्लड' आणि फ्रिटझेराल्ड यांनी इंग्रजीत भाषांतरीत केलेले 'उमरखय्याम' ही पुस्तके धुरंधरांच्या चित्रांनी सजली होती.

१९०१ ते १९१४ या काळात श्रीमान शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी यांच्या 'सुवर्णमाला' या मासिकासाठी 'रामायण', 'महाभारत', 'भागवत', 'भगवद्गीता', 'गणेश पुराण', 'शिव पुराण', 'विष्णू पुराण' व जयदेवाचे 'गीतगोविंद' या विषयांवर त्यांनी इलस्ट्रेशन्स केली. यात संबंधित विषयाची कथा व त्या सोबतच धुरंधरांचे एक रंगीत व सात-आठ कृष्णधवल चित्रे असत. विशेष म्हणजे हे मासिक अगदी छोट्या पॉकेटबुकपासून ते मोठ्या पुस्तकाच्या आकारापर्यंत काढले जाई. त्यामुळे ते सर्वसामान्यांपासून श्रीमंत कुटुंबापर्यंत समाजाच्या सर्वच स्तरांत पोहोचत असे. धुरंधरांचे कौशल्य असे, की अगदी छोट्या आकाराच्या चित्रांतूनही ते चित्रवषय अत्यंत चांगल्या प्रकारे खुलवत.

श्रीमान शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी यांच्या 'शिवछत्रपती चरित्र' व 'मेन ॲण्ड विमेन इन इंडियन हिस्टरी' या प्रेरणादायक पुस्तकांची कृष्णधवल चित्रे धुरंधरांचीच होती. सध्या यातील काही चित्रे सांगलीच्या चित्रसंग्रहात पाहावयास मिळतात. अशीच चित्रे त्यांनी हाजी मुहंमद शिवजी अल्लारखिया यांच्या 'वीसमी सदी' या गुजराती मासिकासाठी, तसेच चापसी उदेसी यांच्या 'नवचेतन' व मराठी 'नवयुग'साठी काढली. विजय प्रेसतर्फे प्रकाशित झालेले 'गीतगोविंद' हे जयदेवाचे काव्य धुरंधरांच्या २४ चित्रांनी सजले होते. 'शारदा' या मासिकासाठीही त्यांनी ४ बाय ३ फूट आकाराची सहा चित्रे खास रंगवली होती. अ. का. प्रियोळकरांचे 'नल-दमयंती आख्यान' औंधचे संस्थानिक बाळासाहेब पंत-प्रतिनिधींनी छापले. त्यातील रंगीत चित्रे धुरंधर यांनीच रंगविली होती. याशिवाय महाकवी कालिदासाच्या शाकुंतल, ऋतुसंहार, मेघदूत, पुरुरवा-उर्वशी या महाकाव्यांची तत्कालीन प्रकाशित पुस्तके धुरंधरांच्या चित्रांनी सजली होती. या सोबतच भास, भवभूती यांच्या नाटकांची व 'रत्नावली' या पुस्तकांतूनही धुरंधरांची चित्रे होती.

धुरंधरांनी अनेक हिंदी, इंग्लिश, मराठी, गुजराती, तेलुगू, उर्दू मासिके व दिवाळी अंकांसाठी चित्रे काढली. लॉगमन्स ग्रीन ॲण्ड कंपनी व मॅकमिलन ॲण्ड कंपनीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या चित्रांतून धुरंधर घराघरात पोहोचले होते.

**धुरंधरांची कॅलेंडर्स व पोस्टर्स :**

रविवर्मा यांच्या नंतरच्या काळात धुरंधर हेच सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचलेले कलावंत होते. धुरंधरांची पौराणिक, ऐतिहासिक विषयांवरील चित्रे रविवर्मा प्रेम, चित्रशाळा प्रेस व रवि उदय प्रेस अशा तत्कालीन प्रसिद्ध छापखान्यांनी छापली. यात राम, लक्ष्मण, सीता, देवदेवता, विश्वामित्र - मेनकेसारख्या पौराणिक कथांसोबत महाराष्ट्रातील व भारतातील संतांची चित्रे होती. ब्रिटिश सम्राट सातवे एडवर्ड व क्वीन मेरी १९०७ मध्ये आणि पंचम जॉर्ज १९११ मध्ये भारतभेटीवर आले तेव्हा त्यांची धुरंधरांनी रंगविलेली

अर्ध व पूर्णाकृती व्यक्तिचित्रे दिनदर्शिकांवर छापली गेली. जनतेने ती चित्रे फ्रेम करून घरात, दुकानात किंवा कार्यालयांत लावून राजनिष्ठा व्यक्त केली. गंमत म्हणजे धुरंधरांकडून तत्कालीन नेते व स्वातंत्र्याची प्रेरणा देणाऱ्या स्वातंत्र्ययोद्ध्यांचीही चित्रे काढून घेतली गेली व विविध छापखान्यांत ती छापली जाऊन तीदेखील घरे, मंदिरे व सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आली.

धुरंधरांनी भारतातील रेल्वे कंपन्यांसाठी बनविलेल्या पोस्टर्समुळे धुरंधर हे नाव देशात सर्वत्र पोहोचले. रेल्वेच्या जाहिरातींसाठी त्यांनी रंगविलेल्या या चित्रांतून भारतातील प्रसिद्ध स्थळे, पवित्र तीर्थक्षेत्रे, तसेच शहरे यांचे महत्त्व व्यक्त केले होते व त्यातून पर्यटकांना आकर्षित करण्याचे उद्दिष्ट होते. या चित्रांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात मंदिर, मशीद किंवा इतर वास्तूंसोबतच त्या भागातील पारंपरिक वेषभूषा परिधान केलेल्या स्त्री-पुरुष प्रतिमांचाही समावेश असे. याशिवाय सुबक अक्षरातील मजकूर हेदेखील त्यांचे वैशिष्ट्य होते. अशी एकूण चौदा जाहिरातचित्रे धुरंधरांनी रेल्वेसाठी रंगविली. शिवाय त्या काळातील ट्राम व बस कंपन्यांनीही धुरंधरांच्या चित्रकौशल्याचा त्यांची जाहिरात व नियम समजावून सांगण्यासाठी वापर केला.

मुंबई इलाख्याच्या शिक्षणखात्याने धुरंधरांकडून लोहार, सुतार, चांभार, पोस्टमन अशा विविध पेशांच्या मंडळींची त्यांच्या पोशाख व व्यावसायिक वैशिष्ट्यांसह चित्रे काढून घेतली होती व पोस्टकार्डाच्या आकारात छापून मुलांना दाखविण्यासाठी सर्व शाळांना वाटली होती.

**धुरंधरांची व्यावसायिक चित्रे :**

एखादा विषय खुलविणे व त्याचे वास्तववादी शैलीत, नाट्यमय चित्र काढणे हे धुरंधरांचे वैशिष्ट्य होते. प्रमाणबद्ध मानवाकृती व छाया-प्रकाशाचा नाट्यपूर्ण वापर यामुळे त्यांचे चित्र सर्वसामान्य जनमानसाला आकर्षित करत असे. या त्यांच्या गुणांमुळे त्यांच्याकडून अनेक संस्थानिकांनी विविध विषयांवरील चित्रे रंगवून घेतली. यात त्या संस्थानिकांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग (उदा. राज्याभिषेक, मिरवणूक इ.) किंवा त्यांच्या राजवाड्याच्या सजावटीसाठी त्यांना आवडणाऱ्या विषयांवरील चित्रे असत. त्यांनी १९३४ मध्ये छोटा उदयपूर-गुजरातच्या संस्थानिकांसाठी पौराणिक विषयांवरील सोळा भित्तिचित्रे रंगविली होती. धुरंधरांना १९३६ मध्ये बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या हीरक महोत्सवी समारंभाचे चित्र काढण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या पॅरिस येथील बडोदा पॅलेससाठी व बडोद्याच्या लक्ष्मीविलास पॅलेससाठी धुरंधरांनी ४ बाय ७ फूट आकाराची दोन चित्रे रंगविली. अशा संस्थानिकांपैकी औंधचे महाराज भवानराव पंत प्रतिनिधी यांच्याकडून त्यांना विशेष आदर व प्रेम मिळाले. औंधच्या महाराजांनी धुरंधरांकडून व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रे यासोबत भगवद्‌गीता, नल-दमयंती आख्यान व शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अशी अनेक चित्रे रंगवून घेतली.

दिल्लीच्या इंपीरिअल सेक्रेटरिएटमधील लॉ मेंबर्स रूममधील चार चित्रे रंगविण्यासाठी भारतातील सहा चित्रकारांची निवड करण्यात आली. त्यात धुरंधरांचा समावेश होता. ही चित्रे १९२८-२९ मध्ये तयार झाली. ‘स्त्रीधनम्’, ‘दत्तकविधान’, ‘मृत्युसमयाचे दान’ व ‘कोर्टाचा देखावा’ हे ते चार विषय होते.

धुरंधरांची स्वत:ची अशी एक वैशिष्ट्यपूर्ण शैली होती व त्यांची ही शैली रेखाटनप्रधान असल्यामुळे ते तैलरंगापेक्षा जलरंगात अधिक सहजतेने व प्रभुत्वाने काम करीत. परंतु त्यांच्या या सर्वच चित्रांत स्त्री असो की पुरुष, मानवाकृतींची प्रमाणबद्धता सांभाळत ती मानवाकृती आकर्षक करण्याकडे त्यांचा कल असे. त्यामुळे त्यांच्या चित्रांत लयपूर्ण मानवाकृतींची लयलूट दिसून येते व स्त्रियांप्रमाणेच पुरुषांचे अविर्भावही काही प्रसंगी नाजूक व लाडिवाळ होतात. चित्रवषय प्रभावीपणे सांगण्याच्या अट्टाहासात फक्त मानवी शरीर व त्याच्या दृश्य अविर्भावाचाच विचार केल्यामुळे त्यांच्या अशा चित्रांतून चित्रविषय प्रभावीरित्या समजत असला व ते चित्र आकर्षक वाटले तरी एखाद्या थोर कलाकृतीप्रमाणे त्यांच्या चित्रांचा मनावर चिरस्थायी गंभीर परिणाम होत नाही. कदाचित त्यांनी प्रकाशन व्यवसायासाठी व जाहिरात जगतासाठी केलेल्या कामाचा तो अप्रत्यक्ष परिणाम असावा. धुरंधरांचे समकालीन कलाकार त्रिंदाद व तासकर यांच्या चित्रांमधून मिळणारा आनंद व कलामूल्यांचा शोध धुरंधरांच्या चित्रात क्वचितच आढळतो. परंतु सातत्याने केलेले रेखाटन, अफाट

चित्रनिर्मिती, कलाशिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना केलेले उत्कृष्ट मार्गदर्शन व वरिष्ठांना आपल्या कामामुळे मिळवून दिलेले पूर्ण समाधान हे धुरंधरांचे वैशिष्ट्य होते.

त्यामुळेच जे. जे. मधील एक शिक्षक म्हणून १८९६ मध्ये सुरुवात केलेल्या धुरंधरांची सॉलोमन यांच्या अनुपस्थितीत जे. जे. स्कूलचे हंगामी संचालक म्हणून नेमणूक झाली. निवृत्तीनंतरही त्यांना सहा वेळा मुदतवाढ देऊन त्यांची इन्स्पेक्टर ऑफ ड्रॉइंग या मानाच्या जागेवर नेमणूक झाली. अशा प्रकारे नेमणुका होणारे व रावबहादूर ही पदवी मिळवणारे ते पहिलेच भारतीय चित्रकार ठरले. धुरंधर १९३१ मध्ये जे. जे. मधून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतरही ते नियमितपणे आपल्या खार येथील बंगल्यात चित्रनिर्मितीचे काम करीत राहिले. त्यांनी १९३७ मध्ये चित्रकार कन्या अंबिका व कुटुंबासह युरोपचा प्रवास करून पाश्चात्य देशातील प्रसिद्ध कलाकारांच्या उत्तमोत्तम कलाकृती पाहिल्या. तेथून परतल्यानंतर चित्रनिर्मितीबरोबरच त्यांनी सर जे. जे. स्कूलमध्ये प्रवेश घेतल्यापासून निवृत्तीपर्यंतच्या तेथील घडामोडींच्या आठवणी लिहून काढल्या. हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक १९४० मध्ये 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' या नावाने प्रकाशित झाले. या काळातील बॉम्बे स्कूलच्या इतिहासाच्या दृष्टीने हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तत्पूर्वी १९३० ते १९३५ या काळात धुरंधरांनी त्यांच्या समकालीन अशा अनेक चित्रकारांवर 'वसुंधरा', 'चित्रा' अशा नियतकालिकांतून लेखमाला लिहून जनसामान्यांस त्यांच्या कलेचा परिचय करून दिला होता. आज त्यांचे हे लेखन दस्तऐवजीकरण व नोंद या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्या अनेक शिष्यांनी भारतभर काढलेल्या कलाशाळांच्या रूपाने त्यांचे कलाशिक्षणदानाचे व्रत जिवंत ठेवले आहे. धुरंधरांच्या कार्याबद्दल अनेक लेख लिहिले गेले. त्यातील १९३६ व १९४४ मध्ये कोल्हापूरच्या माधवराव बागलांनी लिहिलेले अनुक्रमे 'मनोहर' व 'प्रभुतरुण' या दिवाळी अंकांतील लेख उल्लेखनीय आहेत. यात धुरंधरांबद्दल ते लिहितात, 'अंगात काळ्या अल्पाकचा लांबडा कोट, त्याहून काळे व नुकतेच पॉलिश केलेले पायांतील बूट, त्या बूट-कोटाला विरोध दर्शविणारी भट्टीची शुभ्र पाटलूण...कोटावर ताठ्यात बसविलेली कडक इस्त्रीची चकचकीत कॉलर व त्यावर जुन्या संस्कृतीचे द्योतक असणारी तांबडी रेशमी पगडी... स्थूल देह, वाटोळा चेहरा, भव्य कपाळ, जाड भरदार मिशा व या गोष्टींचे गांभीर्य वाढविणारा सोनेरी काड्यांचा चष्मा असलेले आणि आपल्या कलेच्या आणि स्वभावसौजन्याच्या गुणावर मान्यतेला चढलेले, अधिकार, पदवी व संपत्ती संपादन केलेले हे महाराष्ट्राचे पहिलेच चित्रकार होत. प्रतिभा, विद्वत्ता व कल्पकता अशा सर्व गुणांचा उत्कृष्ट मिलाफ म्हणजे चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर!''

अत्यंत धार्मिक वृत्तीच्या धुरंधरांची वास्तववादी शैलीवर नितांत श्रद्धा होती. परिणामी, त्यांच्या तरुणपणी विकसित झालेली बंगाल-रिव्हायव्हलिस्ट व १९२० च्या सुमारास मुंबईत विकसित झालेली बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट ही भारतीयत्व जपणारी कला चळवळ त्यांना आकर्षित करू शकली नाही. १९३५ नंतर मुंबईत व भारतात सुरू झालेल्या आधुनिक कला चळवळीत त्यांना स्वारस्य नव्हते. अशा कला चळवळींचा ना त्यांनी निषेध केला, ना पुरस्कार. किंबहुना, अशा वादग्रस्त विषयांबाबत ते कायमच तटस्थ राहिले. रविवर्मानंतरचे एक लोकप्रिय चित्रकार व त्या काळात अभिजात चित्रकलेचा वापर पुस्तक सजावट व जाहिरातकलेसाठी करणारे कलावंत म्हणून धुरंधर यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

संदर्भ : १. रावबहादूर धुरंधर, महादेव विश्वनाथ; 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे; १९४०.

२. धुरंधर जन्मशताब्दी, १९६७ - या वेळी प्रेसला देण्यासाठी टाइम करण्यात आलेला मजकूर.

३. मित्तर, पार्था; 'आर्ट अण्ड नॅशनॅलिझम इन क्लोनिअल इंडिया' - १८५०-१९२२; केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.

४. बागल, माधवराव; 'कला आणि कलावंत'.

५. अंबिकाताई धुरंधर, प्रा. पी. ए. धोंड, प्रा. बी. डी. शिरगावकर, चित्रकार व्ही. ए. माळी यांच्या मुलाखती.

**आभार** : लेख - 'दृश्यकला', हिंदुस्थान प्रकाशन संस्था, विवेक साप्ताहिक

चित्रे : मा. संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालये म्हाराष्ट्र शासन शासकीय संग्रहालय, सांगली

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई.

*

**अभिवादन**

## सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे पहिले भारतीय डायरेक्टर

# रा. ब. महादेवराव वि. धुरंधर

**★ शिवनंदन आगासकर ★**

*(प्रभुतरुण १६ जून १९८३ च्या अंकातून-)*

भारतातील खाजगी किंवा सरकारी इमारतींची सजावट हा भारतीय कलाकारांच्या कलेचा मानबिंदू! याचा अर्थ परदेशीय कलाकारांच्या कलागुणांचा अवमान करणं असा नाही, तर आम्हा भारतीयांना परकीयांच्या कोणत्याही कृतीने मन मानेल तितके किंवा वास्तवापेक्षा जास्त गुणगान करण्याची व आपल्या कलाकारांना कमी लेखण्याची लागलेली खोड, ही अवास्तव असते; असे सुचविणे आहे.

रावबहादूर महादेराव विश्वनाथ धुरंधर यांचा जन्म १८ मार्च १८६७ साली झाला. रावबहादूर धुरंधर हे केवळ आपल्या ज्ञातीतील थोर कलाकार म्हणून आम्ही ज्ञातीयांनी त्यांचे गुणगान गावे; असे नसून अखिल भारतीयांनीच काय; तर परदेशीयांनीही त्यांच्या कलेचे मूल्यमापन करून त्यांना थोर कलाकार म्हणून मानले आहे. रावबहादूर धुरंधर यांचे गुणगान करताना माननीय बॅ. मुकुंदराव जयकर एके ठिकाणी म्हणतात, `I congratulate Rao Bahadur Dhurandhar on his masterpiece in the field of art. This is not only his success in the field of art, but the entire city of Bombay can boast of its wonderful achievement in the particular field of art. This success is the begining prosperity for us in Bombay.

रा. ब. धुरंधर हे एक असामान्य जागतिक कीर्तीचे प्रतिथयश, अष्टपैलू चित्रकार होऊन गेले. चित्रकार धुरंधर यांचा मूळ रहिवास कोल्हापूरचा जरी असला तरी त्यांचा जन्म मुंबईत झाला. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलचे ते विद्यार्थी होते. या शाळेतून योग्य ते शिक्षण पूर्ण झाल्यावर चित्रकलेकडे ओढा असल्यामुळे ते साहजिकच चित्रकलेकडे वळले. अर्थात त्याकरिता त्यांना मुंबईतील सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये नाव नोंदणे प्राप्त झाले. येथून त्यांनी चित्रकलेची सर्वोच्च पदवी मिळविली. पुढे त्यांनी याच स्कूल ऑफ आर्टमध्ये बरीच वर्षे अध्यापक म्हणून काम केले. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता.

विद्यार्थ्यांना स्वत: प्रात्यक्षिक देणे आणि त्यांच्या चित्रामध्ये सुधारणा सुचविणे, यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयी नितांत आदर वाटे. अनेक वेळा विद्यार्थ्यांना शिक्षकाच्या पक्षपातीपणाचा अनुभव येतो. हा विद्यार्थ्यांशी पक्षपातीपणा रावबहादुरांनी कधीच केला नाही. सर्वांशी ते सारख्याच प्रेमळपणाने वागत असत. कुणाशी वैरभाव ठेवू नये हा त्यांच्या रक्तातील गुण.

रावबहादुरांच्या या गुणाविषयी त्यांचे सह-अध्यापक श्री. के. भ. चुडेकर आपला अनुभव सांगतात तो लक्षणीय आहे. श्री. चुडेकर यांचा एका सह-अध्यापकाने अपमान केला. अपमान सहन न झाल्यामुळे चुडेकर त्या वेळचे डायरेक्टर (संचालक) मि. सालोमन यांच्याकडे तक्रार करू मागत होते. तत्पूर्वी सहाध्यापक धुरंधर यांचा सल्ला घ्यावा म्हणून चुडेकर यांनी धुरंधरांना घडलेला प्रसंग विदीत केला. अजातशत्रू धुरंधर किंचित काळ स्तब्ध राहिले. नंतर शांत आणि तितक्याच गांभीर्याने चुडेकरांना त्यांनी सुचविले, 'हे पहा चुडेकर, तुम्ही आपलं काम करा आणि असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा' चुडेकर या सल्ल्यावर अस्वस्थ झाले होते; पण या सल्ल्यामागील तत्त्वज्ञान लवकरच त्यांच्या लक्षात आले ते असे -

निष्कारण एका संघर्षातून दुसरा संघर्ष जन्मास येतो आणि त्यातून तिसरा. आणि या संघर्षात एकाने पडते न घेतल्यास चिंता सतत त्यांच्या मनास व जीवास जीवंतपणे जाळू लागते ! -

पवित्र आचरण, आपल्या कार्याबद्दल आत्मविश्वास, भक्तिपूर्ण कलोपासना या त्यांच्या गुणांमुळे त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तींचे ते मोठे श्रद्धास्थान होऊन राहिले होते. त्यांचा स्वाभिमान, राष्ट्राभिमान व धर्माभिमान त्यांच्या अनेकविध कलाकृतीतून स्पष्ट होतो. रचनात्मक चित्रांमध्ये रा. ब. धुरंधर हे त्याकाळी अग्रगण्य समजले जात. या कलावंताच्या ठिकाणी अपवादात्मक गुण होता शुद्ध चारित्र्य. त्यामुळे ते सात्विक कलात्मक जीवन जगू शकले.

ईश्वरभक्तीसारखीच त्यांची चित्रकलेवर अढळ निष्ठा होती. त्यांच्या हातचा प्रचंड चित्रसंग्रह याची बिनतोड साक्ष देतो. मराठी, हिंदी, गुजराती, तेलगू, इंग्रजी इत्यादी पुस्तकांतून धुरंधरनिर्मित असंख्य चित्रकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यांनी तयार केलेली पुराणांतील अनेक चित्रे अनेक रंगात छापलेली भारतभर पसरलेली आहेत. इंग्लंड व अमेरिका या देशातही त्यांच्या चित्रांचा गौरव केला गेला. इंग्लंडच्या बकिंगहॅम राजवाड्यात धुरंधरांचे चित्र लावण्यात आलेले आहे. धुरंधरांना भारतातील सर्व प्रदर्शनातून इ. स. १८९२ ते १९२५ या काळात अनेक सुवर्णपदके, रौप्यपदके, व पारितोषिके मिळाली होती.

चित्रकलेला समाजाभिमुख करणारे चित्रकार म्हणून रा. ब. धुरंधर यांचे नाव घेणे अपरिहार्य आहे. मासिकात येणाऱ्या गोष्टी सचित्र करून चित्रकलेच्याद्वारे समाजाची विविध प्रकारे सेवा करणारे धुरंधर हेच आद्य चित्रकार म्हटले जातात. किर्लोस्करांची जी प्रसिद्ध मासिके आहेत त्या मासिकांसाठी धुरंधर दर खेपेस कव्हरवर निरनिराळी चित्र देत; शिवाय आतील लेखांना अनुरूप अशी चित्रेही देत. साहित्य आणि चित्रकला यांचा हा संबंध अशा प्रकारे जोडून म्हणजेच चित्रकला समाजाभिमुख बनविण्याचे कार्य रावसाहेब धुरंधरांनी केले असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. मनोरंजन, विविधवृत्त, आदी मासिकांसाठी व तसेच कुमार या गुजराथी मासिकासाठीही त्यांनी चित्रे रेखाटली आहेत.

(हा लेख अपूर्ण स्वरूपातच प्राप्त झाला. -संपादक)

*




**महादेवराव कुटुंबासह सफरीस निघताना**

**अभिवादन**


## मी एकदाच आणि शेवटचे पाहिलेले

# महादेवराव

**✶ प्रो. एम. एम. विजयकर ✶**

*(प्रभुतरुण १६ एप्रिल १९९३ मधून-)*

१५ व्या आणि १६ व्या शतकातील निरनिराळ्या कलांचे पुनरुज्जीवन करणारे लिओनार्दो आणि मॉयकेल ॲनजेलो दोघेही युगप्रवर्तक. सहाजिकच त्यांच्या चित्रकलेचा १९ व्या व २० व्या शतकातील भारतीय चित्रकारांवर जरूर प्रभाव पडला. त्यात रवी वर्मा, मुल्लर आदी चित्रकार नावारुपाला आले. पण पाश्चात्य शैलीचं अभ्यासूवृत्तीने आत्मग्रहण करून Architecture, त्रिमिती Perspective स्कल्पचर, रचनात्मक मांडणी, रंगसंगती अनुरूप रेखीव बांधणी ह्याचा आपल्या प्रत्येक जल वा तैलचित्र, स्केचिसमध्ये वाजवी तांत्रिकदृष्ट्या वापर करणारे आणि स्वत:च्या शैलीची छाप प्रत्येक चित्रावर ठसविणारे एकमेव चित्रकार म्हणून महादेवराव धुरंधराचे (१८६७-१९४४) स्थान अग्रगण्य आहे. १८६७ मध्ये त्यांचा जन्म झाला आणि उभी कारकीर्द त्यांनी संपूर्ण 'कला आणि कला' व कलेच्या अविष्काराने समृद्ध केली.




त्यांचे आत्मचरित्र 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' (१८९० पासून १९३१ पर्यंत) त्यांच्या ह्या समृद्ध जीवनाची साक्ष देते. हे आत्मचरित्र त्यांची सुविद्य कन्यका अंबूताईंनी १९८७ मध्ये मला भेट म्हणून दिले. या पुस्तकाचे परीक्षण करणे सोपे काम नाही. पण एक एक पान महादेवरावाच्या जीवनाचे पैलू उलगडून, कला ही जीवनासाठी की, कलेसाठी जीवन ह्याचा संभ्रम मनात उत्पन्न होतो. शेवटी कलेसाठी जीवन ह्याचा प्रभाव प्रकर्षाने पुस्तक वाचताना अनुभवास येतो. ज्यांनी कलाकाराचे समृद्ध जीवन उपभोगले असा हा थोर चित्रकलेचा द्रोणाचार्य १९४४ मध्ये पंचमहाभूतात विलीन पावला. पण जाता जाता हजारो उद्‌बोधक, कलात्मक, अमूल्य चित्रांचा ठेवा मागे ठेऊन, अंबूताईंनी यशस्वीरीत्या आजपर्यंत जीवापलिकडे जोपासून भावी पिढीला एक प्रकारचे वरदान मिळाले आहे. त्या संग्रहाची मांडणी यथायोग्य, खार येथे अंबासदनाच्या नव्या वास्तूमध्ये विसावलेली आहे.

अशा कित्येक व्यक्ती असतात की, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव त्यांना एकदाच पहाणाऱ्याला आयुष्यभर भारावून टाकतो. त्यांच्या संबंध आयुष्यभर कार्याची, त्यांनी जोपासलेली कलात्मक उपासना कलाकारांना मार्गदर्शक ठरते. नेमकी हीच भूमिका मला आयुष्यभर पोषक आणि अनुभवसमृद्ध करणारी ठरली.

१९४४ मध्ये महादेवरावांच्या मृत्यूनंतर शोकसभेत त्यांचे यथायोग्य स्मारक आणि त्यांच्या चित्रकलेचे भव्य प्रदर्शन भरविण्यासाठी एका समितीची स्थापना होऊन लगेच युनिव्हर्सिटी कॉनवोकेशनच्या दालनात त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर H. E. Sir John Colville ह्यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.


त्यानंतर दिनांक १ जून १९६६ मध्ये महाराष्ट्राचे मंत्रीमहोदय बोराळे ह्यांच्या हस्ते मुंबई युनिव्हर्सिटीच्या भव्य दालनात मोठ्या कलात्मक रचनेने महादेवरावांनी हाताळलेले सर्व चित्रप्रकार मांडले गेले. अंबूताईंनी जोपासलेली वडिलांची सर्व चित्रकला रसिकांना पहावयास मिळाली.

दिनांक १ जून १९८७ रोजी श्री. प्रमोद नवलकर यांच्या अध्यक्षतेखाली डीन सर. जे. से. स्कूल ऑफ आर्ट, श्री. प्र. अ. धोंड यांच्या हस्ते, महादेवरावांच्या ४३ व्या पुण्यतिथीला त्यांच्या अप्रकाशित तैल व जल चित्रांचे प्रदर्शन, खार येथे दीपदान आर्ट गॅलरीत भरवले गेले. प्रदर्शन सतत तीन महिने चालू होते. एक गोष्ट मोठ्या प्रकर्षाने जाणवली आणि ती म्हणजे महादेवरावांची विविध चित्रे परत परत पहाण्यासाठी, त्यांचा अभ्यास करण्यासाठी कलारसिकांची कमालीची उत्सुकता.

निरनिराळे समीक्षक त्यामध्ये ज्ञानेश्वर नाडकर्णी, माधव गडकरी, सडवेलकर यांची उपस्थिती, तसेच मुंबईचे मेयर डॉ. रमेश प्रभू आणि माधवरावांचे शिष्यगण, तसेच कलारसिक आवर्जून हजर राहिले.

त्यावेळी १९२५ मध्ये महादेवरावांनी चितारलेले प्रसिद्ध लक्ष्मीचे ५१/२' X ३१/२' भव्य तैलचित्र मोठ्या प्रामुख्याने भिंतीवर विराजमान झाले होते. हे चित्र मुकुंद आयर्न वर्कसचे राजेश शहा यांनी रुपये ५०,००० ला विकत घेतले, तसेच महादेवरावांनी जेवणाच्या खोलीत छतावर चितारलेले अतिभव्य १० बाय १० स्वर्गातील अप्सराचे देव-देवतांचे पौराणिक चित्र आज जुहू येथे शहा हाऊसमध्ये विसावले आहे. त्याची किंमत रुपये १,५०,००० झाली. दिलीप डे ने रुपये ८०,००० देवून दोन चित्रे विकत घेतली. महादेवरावांच्या चित्राचा हा अमूल्य ठेवा आज भारताच्या निरनिराळ्या आर्ट गॅलरीमध्ये विखुरला आहे. ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि त्याचे जतन हे राष्ट्राचे कर्तव्य आहे.

महादेवरावांच्या असंख्य चित्रांचा रसिकतेने



आढावा घेणे, चित्रांची मूल्ये, बारकावे, त्यातून दृष्टीस पडणारे चित्रकाराचे मनोगत, त्याचे शुद्ध चारित्र्य आणि सात्विक कलात्मक जीवन एकत्रित करून कला रसिकापुढे मांडणे फार जरूरीचे आहे.

१९२४ मध्ये माझ्या वडिलांचे देहावसान झाले आणि आई, भावंडे आम्ही सर्व आजोळी नौरोजी स्ट्रीटमधील 'स्टार हाऊस'वर रहावयास आलो. समोर कमळाबाईची प्रसिद्ध शाळा, शाळेशेजारी वैद्य ब्रदर्सचा छापखाना आणि त्याचे चालक सुंदरराव भास्कर वैद्य, स्वतः उत्कृष्ट चित्रकार. सभोवार कलात्मक वातावरण. आजोळी "Theosophy" चा प्रभाव. अधून मधून ॲनी बेझंट, जिनराजदास, एरुणडेल, रुक्मिणी देवी ह्यांची भेट. सर्व कलामय वातावरण. महादेवरावांचे 'लक्ष्मी'चे तैलचित्र १९२६ मध्ये पहिल्यांदा विविध वृत्तांच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले. त्याची प्रतिकृती मी जलरंगात तयार केली आणि माझे आजोबा मोठ्या कौतुकाने घरी येणाऱ्या रसिकांना ती अभिमानाने दाखवत असत.

✶

## "हुंडा"

भाई जीवनजी लेनमध्ये जेथे आता कोपऱ्यावर शिवसेनेचे ऑफिस आहे; त्याच वाड्यात रुपाजींचे ड्रॉईंग सामानाचे प्रसिद्ध दुकान होते. तात्यांनी मला



''WINDSOR & NEWTON बनावटीची तैलरंगाची पेटी व ''REEVES'' बनावटीची जलरंगाची पेटी आणि इतर साहित्य खरेदी करून दिले. त्या पेट्या अजून माझ्या संग्रही आहेत. त्यातील तैलरंगाच्या कुप्या आता रिकाम्या झाल्या आहेत. पण ''WINSOR BLUE'' ह्या रंगाची कुपी अगदी १९८७ पर्यंत माझ्या 'अश्वारुढ शिवाजी ५' X ४' ह्या तैलचित्रात पार्श्वभूमीच्या आकाशाला वापरली गेली आणि त्या रंगाचा तजेला ६५ वर्षानंतर अजूनही तसाच आहे.

१९२६ मध्ये पाठारे प्रभु कला कौशल्याचे प्रदर्शन तेव्हाचे गव्हर्नर सर लेल्सी विल्सन ह्यांच्या हस्ते ''प्रभुप्रभात'' या मासिकाच्या विद्यमाने चंदारामजी गर्लस्कूलच्या हॉलमध्ये भरले गेले. माझी चार रेखाचित्रे, ''नाना फडणवीस, माधवराव पेशवे, रामायणातील अश्वमेघ व एक रांगेत पाठारे प्रभु कन्यकेचा पारशी धारणीचा मखमली पायातील जोडा, एका फ्रेममध्ये सामावून प्रदर्शनात मांडली गेली. हे माझे कलाजगतातले पहिले पाऊल.

१९२७-२८-२९-३०-३१ हा काळ संक्रमणाचा, गांधीजीच्या स्वराज्य चळवळीचा. ह्याच संक्रमणावस्थेत पाठारे प्रभु समाजातील एकत्र कुटुंब व्यवस्था कोलमडायला लागली होती. नवीवाडी, पालवरोड, एकूण गिरगावातील प्रभु कुटुंबे विभक्त होऊ पहात होती. आणि ह्याच सुमाराला खारला स्वत:चे प्लॉटस् खरेदी करून स्वतंत्र बंगल्याचे व संसाराचे स्वप्न साकार होऊ लागले. १९३२ मध्ये तात्यांनी खारला स्वत:चा बंगला बांधून नौरोजी स्ट्रीट येथील ''स्टार हाऊस'' मधून आम्ही सर्व १४ व्या रस्त्यावर रहावयास आलो.

सुंदरराव भास्कर वैद्य काय; किंवा महादेवराव विश्वनाथ धुरंधर इतके प्रतिभाशाली चित्रकार. पण त्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करण्याचे माझे वय नव्हते. सुंदरराव तर एक एका तांदुळावर मोठ्या कौशल्याने देवादिकांची रंगीत चित्रे काढीत असत. फावल्या वेळात आमच्या ओटीवर आम्हा मुलांची पेन्सिलने ''TIME SKETCHES'' काढून परत समोर आपल्या प्रेसमध्ये जाऊन ''संध्याकाळची 'ताजी बातमी' पत्रक प्रसिद्ध करत. त्यासाठी लागणारे चित्राचे व जाहिरातीचे ब्लॉक्स स्वत: शिशाच्या तुकड्यावर डॉईंग काढून सोनाराच्या चिणीने कोरीव काम करताना मी तासनतास त्यांच्या बोटाची करामत पहात असे. त्यावेळेस 'हापटीन प्रोसेस' अस्तित्वात नव्हती.

महादेवरावांच्या शैलीची छाप असलेली अनेक रंगीत चित्रे निरनिराळ्या नियतकालिकांतून पहावयास मिळायची. पण त्यामागील कलाकार कोण हे जाणण्याची कुवत त्यावेळेस नव्हती. पण महादेवरावांची चित्राखालील वळणदार सही आस्ते आस्ते परिचयाची आणि मोह पाडणारी झाली.

स्टार हाऊसमधील सामानाची आवराआवर करताना वठाणामध्ये एका मोठ्या लाकडी पेटाऱ्यामध्ये माझ्या आजोबांच्या ''हुंडा'' नाटकाच्या १९०४ मधल्या पहिल्या आवृत्तीच्या काही प्रती माझ्या पाहण्यात आल्या. त्यातील चित्रे महादेवरावांनी रेखाटली होती. नाटकातील जवळ जवळ आठ प्रसंग ''SEPIA COLOUR'' मध्ये छापले होते. त्या पुस्तकांच्या गठ्ठ्याखाली नाटकातील काही प्रसंगाची ''ORGINALS'' महादेवरावांच्या सुबक सहीची चायनीज ब्लॅक शाईने चितारलेली रेखाचित्रे मला सापडली. ती रेखाचित्रे पाहून मी स्तंभितच झालो. हा

सबंध दुर्मीळ ठेवा अजून माझ्या संग्रही आहे. १९६६ मध्ये जन्मशताब्दी उत्सवाला कॉनव्होकेशन हॉलमध्ये प्रदर्शित करण्यासाठी ती चित्रे अंबुताईंना दिली. अंबुताईंनी ही तीन "ORIGINALS" माझी मला परत केली.

''हुंडा'' नाटकातील महादेवरावांची ही रेखाचित्रे म्हणजे पाठारे प्रभु समाज, त्याची आचारसंहिता आणि संस्कृतीचा हृदयगंम असा स्फूर्तिदायक चित्रपट आहे. १८९५ मध्ये मुंबईत गेइटी थिएटरात ''धी प्रभु अमेच्युअर्स'' नामक मंडळींनी ''हुंडा'' नाटकाचा पहिला प्रयोग केला. त्यावेळेस पुस्तकरुपाने 'हुंडा' नाटक छापले नव्हते. महादेवरावांनी चितारलेले नाटकातील प्रसंग, त्यांनी अगोदर नाटकाचे प्रयोग पाहिले असावेत. व मग नाटककाराने सांगितल्यावर १९०२ च्या सुमारास कौशल्याने रचनात्मक ''व्यंगचित्रे वजा रेखाचित्रे'' तयार केली असावीत. माझी आई नेहमी मला सांगत असे की विश्वासरावाची भूमिका आपल्या नानाजींनी (डॉ. विनायक सोकर बापुजी त्रिलोकेकर) केली होती. मला सापडलेल्या एका चित्रात रेखाटलेली विश्वासरावाची प्रतिमा माझ्या सिद्धांताला पुष्टी देते. त्यातील शेवटच्या प्रसंगाचे गांभीर्य, नाटकातील तीनही पिढ्यांची चित्रामध्ये उपस्थिती, मागीलदार, मागच्या घराचे वठाण, मध्ये चौक, मग पुढे रामागड्याचे वेडे, पाण्याची विहीर, तुळशी वृंदावन महादेवरावांच्या कलाविष्काराचे दर्शन देते. स्वतः 'दादाजी' आणि 'दादीबाय' ही व्यक्तिचित्रे म्हणजे महादेवरावांचे हस्तकौशल्य. मला वाटते आर. के. लक्ष्मणने जो भारतीय माणूस उभा केला त्याचे स्फूर्तिस्थान माधवरावांचे 'दादाजी' असले पाहिजेत. 'दादाजी' तर समाजाचा माणूस. उच्चभ्रू, वेळी लोभी, कधी कठोर, कधी दयाळू, कधी कुटुंबवत्सल, तर कधी धनलोभी, अंगावरची चौकडीदार बाजूबंद बंडी, विशिष्ट धोतराचा सोगा आणि पायघोळ मिऱ्यांचे रुंद लाल किनापीचे धोतर आणि बंडीला मोठा जगवा. काय हे मूर्तिमंत ध्यान महादेवरावच उभे करू शकले!

महादेवरावांची विद्यार्थीदशा १८९० पासून १८९५ पर्यंत संपुष्टात आली आणि मग त्याच शाळेत वयाच्या ३० व्या वर्षी पेन्टींग क्लासमध्ये मास्तर म्हणून नेमणूक झाली. आधीच गुरुवर्य ग्रिनवुड साहेबांचे कलेतील मार्गदर्शन, त्यांच्या निरनिराळ्या चित्रात येत चाललेली प्रगल्भता, प्रत्येक चित्र विकले गेले पाहिजे इतका



आत्मविश्वास, चित्राचा विषय बहुधा पौराणिक, दैवताच्या वर्णनानुसार, धार्मिक परंपरेवर आधारित, ह्या पार्श्वभूमीवर १८९५ साली 'गौरबाय; गौरबाय आलीस ये ये'' हे जलचित्र (३'.६'' X २'.०.'') बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक पटकावून गेले. प्रभुसंस्कृती, प्रभुधाटणी, घरगुती वातावरण अशा कलामय चित्राचे मानकरी महादेवराव हे पहिले हिंदी चित्रकार होत. त्यावेळेस त्यांचे वय अवघे २८ वर्षांचे होते. या चित्राची रचना किती मोहक. भिंतीवर काढलेला रंगीबेरंगी आखणीबद्ध लोककलेचा पौराणिक पट. ह्या पार्श्वभूमीवर प्रभुगृहिणी गौरीचे दारात आगमन होताच पंचारती घेऊन तिचा स्वीकार करण्यात उत्सुक. बाजुला लहान दोन बालिका नुकताच भातुकलीचा खेळ संपवून साश्चर्याने जणू आपल्या घरातील निकटवर्ती व्यक्तीचे एक वर्षाने झालेले आगमन समजून गौरीचे स्वागत करताहेत. जमिनीवर रांगोळीचा सडा आणि गौरीची हाताच्या मुठी चंदनात बुडवून सबंध घरभर उमटविलेली पाऊले तिच्या पवित्र अस्तित्वाची साक्ष देते. महादेवरावांच्या चित्राच्या



**'हुंडा' नाटकातील धुरंधरांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे**

रचनात्मक आखणीची हीच तर कमाल.

त्यांचे १९२४ च्या सुमारास गाजलेले ''लक्ष्मीसंभव'' (५'.६'' x ३'.६'') हे पौराणिक तैलचित्र. महादेवरावांच्या ह्या चित्रामध्ये तत्काळ सौंदर्य आणण्याची त्यांना लाभलेली अलौकिक देणगी ह्याचा पहाणाऱ्याच्या मनावर दैविक आनंद झाल्याचा प्रत्यय येतो. कविवर्य खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांनी चित्रकार माधवराव धुरंधरास ''लक्ष्मीसंभव'' चित्र पाहून वाहिलेली काव्यसुमने - '।। तव चित्रकला मन मोही।। ''माधवा'' माधवी नित ही।।' महादेवरावांच्या काव्यमय रंगचातुर्याचे यथार्थ वर्णन करतात.

या चित्रात महादेवरावांनी रुद्र समुद्र आणि आकाश यांचे गूढ, अथांग अवकाशाचे गहन दृश्य दाखविले आहे आणि सुर व असुर यांची क्षितिजावरील संघर्ष दाखवून त्यातून मानवतेचे स्वरूप, चतुर्भुज लक्ष्मीच्या शांत निर्व्याज कमलाधिष्ठीत आगमनाने चिरशांतीचा संदेश देते. इतके मोहमय चित्र परत परत पहावेसे वाटते. माधवरावांनी केलेली रंगसंगती, मुख्यत्वे ब्राऊन, निळा आणि थोडा पिंगट रंग, ''धुरंधर ब्रॉऊन''च जणू ओळखला जावा.

त्यानंतर महादेवरावांनी हजारो चित्रे तयार केली. त्यांची अवीट गोडी निरनिराळ्या चित्रसंग्रहालयातून पहावयास मिळते. हा सर्व ठेवा अंबुताईच्या निर्व्याज पितृभक्तीमुळे ''कालेद्यतस्मायन'' होता. तो भावी कलारसिकांना पहावयास मिळतो. हे केवढे भाग्य समजावे.

१९३३ मध्ये माझे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर तात्या मला अंबासदनात महादेवरावांचा सल्ला घेण्यासाठी रविवारी घेऊन गेले. महादेवरावांना त्यादिवशी मी पहिल्यांदा आणि शेवटचे पाहिले. महादेवराव आसन मांडून पुढे मांडलेल्या चित्रांची आवराआवर करीत होते. मी मनामध्ये फार आनंदी झालो. गुरुसमान मानलेल्या कलाकाराकडून आपल्या आवडीच्या विषयाचे मार्गदर्शन होणार ही कल्पनाच सुखावह होती. त्यावेळेस मी काही चित्रं व तात्याच्या रहात्या घराचे रंगीत चित्र त्यांना दाखविली. आणि तात्यांना त्यांनी सल्ला दिला की सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्च्या कंम्पाऊंडमध्ये नव्याने आर्किटेक्टचे डिपार्टमेन्ट उघडले आहे. सालोमन हे डायरेक्टर आहेत आणि बॅटले हे प्रोफेसर आहेत. त्या वर्गात ह्या मुलाला दाखल करावे.

त्यानंतर आर्किटेक्चरचा पाच वर्षांचा कोर्स पुरा केला. वर्षांमागून वर्षे निघून गेली. १९४४ मध्ये महादेवराव दिवंगत झाल्याचे वाचले. १९६६ मध्ये अंबासदनात कलाकारांच्या मेळाव्याला मी उपस्थित राहिलो. त्यात व्ही. ए. माळी ह्या विख्यात चित्रकाराची अंबूताईंनी ओळख करून दिली. नंतर वरचेवर आम्हा कलाकारांच्या गाठीभेटी व्हायच्या. १९८७ मध्ये 'दीप दान आर्ट गॅलरी''त महादेवरावांच्या चित्रांचे प्रदर्शन भरले गेले. महादेवरावांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर फार सुखद प्रभाव पडला. त्यांच्या कलाकृतीचा अभ्यास चालू ठेवला. आयुष्याचे गुरू मानून त्यांचे व्यक्तिगत प्रदर्शन भरविण्याची अंबूताईंनी संधी दिली आणि अंशत: गुरुदक्षिणा देऊन कृतकृत्य झाल्याचे समाधान लाभले.


(ह्या लेखातील चित्रे आणि अर्कचित्रे छापण्यायोग्य करण्यासाठी श्री. किशोर जयकर यांची मोलाची मदत झाली. -संपादक)

*

अभिवादन


# धुरंधर यांचा वंशवृक्ष

*(सौ.प्रसन्ना गोखले या कनयालाल यांच्या सुकन्या. त्यांनी धुरंधर घराण्याचा वंशवृक्ष पाठविला. हा वंशवृक्ष राव बहादूर धुरंधरांनी स्वत: तयार केला आहे. अर्थातच त्यात फक्त नामावली नसून धुरंधरांनी मुखचित्रेही रेखाटली आहेत हे उचितच. म्हणूनच त्याचे महत्त्व. -संपादक)*





**रावबहादूर महादेवराव यांचे कुटुंब**



**महादेवरावांच्या जीवनातील कौटुंबिक सुखक्षण**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अंबिकाबाई धुरंधर

## एक विलक्षण व्यक्तिमत्त्व
## (त्यांच्या जीवनाचे चार कालखंड)
## १९१२-३२, ५२, ७२, ९२

# सुवर्णपर्व

**✶ प्रो. एम. एम. विजयकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

**(महादेवराव धुरंधरांच्या कन्या अंबिकाताईंबद्दलचा 'प्रभुतरुण'मधील लेखही इथे औचित्य राखून प्रकाशित करीत आहोत - संपादक)**

१९८६ मध्ये प्रभुप्रभातद्वारा, हल्लीच्या चित्रकारांच्या दोन पिढ्यांनी कलाक्षेत्रात भरीव अशी कामगिरी बजावली नाही ही माझी 'खंत' आणि प्रभुयुवकलाकाराला एक 'आव्हान' प्रसिद्ध केले होते. त्याबरोबरच 'दिपदान आर्ट गॅलरी'ची स्थापना प्रभुयुवकलाकाराच्या चित्रप्रदर्शनाने करणार असा संकल्प केला. त्याप्रमाणे २७-३-१९८७ मध्ये सुहास कोठारे, कै. केशवराव कोठारे, पुरुषोत्तम किर्तीकर, रामदत्त नायक, डॉ. विजयकर, माधवराव प्रभाकर, जयंत देसाई, माझी स्वकीय मंडळी अशा अनेक मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत, प्रमोद नवलकरांच्या शुभहस्ते 'दिपदान आर्ट गॅलरी'ची स्थापना झाली. पूनम कुर्डेकर (पूर्वाश्रमीची देसाई) प्रभुयुव चित्रकर्ती पहिल्या चित्रप्रदर्शनाची मानकरी ठरली.

जुन्या पिढीतील चित्रकार महादेवराव, सुंदरराव वैद्य, शामराव जयकर, आगासकर, गोरक्षकर तसेच नंतरच्या पिढीतील अंबुताई, कृष्णराव धैर्यवान, सुभद्रा आनंदकर आदी अनेक चित्रकारांनी कलाक्षेत्रात चित्रमय वातावरण निर्माण केले. ह्या व्यक्ती अनेक तरूण उदयोन्मुख चित्रकारांचे स्फूर्तिस्थान होत्या. हे वातावरण आता का अनुभवास येत नाही? कोणताही समाज त्यातील विविध कलांच्या अविष्कारानेच जीवंत राहतो. समाज जीवंत ठेवण्याची जबाबदारी जशी विचारवंतांची आहे तितकीच शासनाचीही आहे. शासन जर भ्रष्ट झाले तर समाज जरूर निष्प्रभ होईल. पण समाजाला वाचवण्यासाठी काही व्यक्ती निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत असतात.

कलाक्षेत्रात निश्चित अंबुताईचे स्थान आगळेच आहे. फ्रेंच ब्रिजजवळ हाजी कासमवाडीत अंबुताईच्या वडिलांनी आपल्या चित्रकलेची सेवा मोठ्या उत्साहाने अविरत चालू ठेवली. त्यांनी मानसन्मानही मिळविला आणि शाळेच्या वरिष्ठांनी दिलेल्या व इतर रचनात्मक चित्रे काढून आपल्या व्यवसायात प्रतिष्ठा आणि प्राविण्य मिळविले. त्यात ४ जानेवारी १९१२ मध्ये चिरंजिवी अंबिकेचा जन्म झाला. महादेवरावांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांनी जणू मनाशी ठरवून टाकले की, ह्या मुलीचे भवितव्य चित्रकलेशी निगडीत आहे. आपल्या व्यवसायात ती खरोखरच नाव काढील. अशा श्रद्धाळू आणि भाविक वृत्तीच्या महान कलाकाराने 'श्री जगदंबेचा प्रसाद'' असे कल्पून मुलीला ''अंबिका'' हेच नाव दिले. आपल्या मुलीने चित्रकलेत प्राविण्य संपादन करावे म्हणून महादेवरावांनी अंबिकेला शालेय शिक्षणापासून अगदी खार येथे १९२६ मध्ये बांधलेल्या 'अंबासदना'त प्रवेश करेपर्यंत एखाद्या गुरुशिष्याच्या भावनेने मुलीच्या पुढील

कलाशिक्षणाचा भक्कम पाया तयार केला.

ज्या रस्त्यावर अंबासदन उभे आहे तो रस्ता वांद्रे स्टेशन रोडपर्यंत अस्तित्वात नव्हता. आजुबाजूला भाजीपाल्याचे मळे, सभोवार झाडेझुडपे आणि पश्चिमेला पाली हिल. त्यावरील एक चर्च आणि आजुबाजुला 'आम्बराई'' अति रम्य निसर्गरम्य वातावरण, आकाशात वरचेवर बदलणारे ढगांचे रंग, माणसांची ना धावपळ, वाहनांची ना येजा आणि आता सारखे 'काँक्रीट' जंगल नव्हते. अशा पवित्र वातावरणात दोन कलेचे उपासक 'पिता पुत्री' निसर्ग देवतेचे चित्र तयार करण्यात दंग. कधी कुंचल्याच्या सहाय्याने रंगीत तर; कधी पेन्सिलने दर्जेदार चित्रे तयार व्हायची.

१४ वर्षांपर्यंत अबुंताईंनी प्राथमिक आणि नंतर एस.एन.डी.टी. शाळेत इयत्ता सहावीपर्यंत शिक्षणक्रम पूर्ण केला. घरचे वातावरण कलामय आणि महादेवरावांच्या अखंड कलानिर्मितीचा



First Gold Medal in 1895

(आभार: श्री. सुहास बहुळकर)

अंबुताईवर योग्य तो परिणाम झाला. महादेवरावांनी कन्येचा कल, तिने केलेली चित्रकलेतील प्रगती पाहून ज्या शाळेत ते कला शिक्षणाचे काम करीत आले त्या प्रसिद्ध सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये अंबुताईला दाखल केले.

अंबुताईचा १९२७ मध्ये कलामंदिरात प्रवेश म्हणजे वडिलांच्या शिस्तबद्ध कला शिकवणुकीचा आखणी पुढील पद्धतशीर टप्पा.

परवा बोलता बोलता मी अंबुताईंना कलामंदिरातील पहिल्या दिवसाचा अनुभव काय होता म्हणून प्रश्न केला. आणि किती मुली त्यांच्याबरोबर दाखल झाल्या होत्या? त्यावर त्यांनी जो अनुभव सांगितला तो कलार्थ्याला मोठा उद्बोधक ठरावा. पहिल्या वर्गात त्या स्वत: आणि न्या. तेलंगाची कन्यका व इतर आठ विद्यार्थी. फर्नांडीस सर पहिल्या वर्गाचे कला शिक्षक. "OBJECT DRAWING" शिकविताना विद्यार्थ्यांना एक १०''x १०'' चौरस लाकडी ठोकळा चारकोलने पद्धतशीर योग्य छाया पडछायाचा वापर करून समोरील मोठ्या कागदावर जसा दिसेल तसा तयार करावयास लावून महिनाभर पूर्णावस्थेस पोहोचल्याशिवाय कलाशिक्षक चित्राला मान्यता देत नसे. अंबुताईंना हे चाकोरीतील कला शिक्षण नवीनच आणि जिकीरीचे होते. पहिले दहा बारा दिवस त्यांच्या सहनशक्तीची पराकाष्टा झाली. एकदा त्यांच्या मनात आले की हा अभ्यासक्रम अर्ध्यावरच सोडावा. पण वडिलांच्या तपश्चर्येचे काय? शेवटी स्वत:ला सावरून शालेय शिक्षणाच्या "BASIC" मूल्याचे महत्त्व पटले. नंतर १९३१ पर्यंत शिक्षणक्रम पूर्ण करून महाराष्ट्रीय महिलेमध्ये पहिली कलार्थी म्हणून मान मिळविला.

त्यावर्षी त्यांना "DOLLY CURSETH" हे उच्च पदक त्यांच्या उत्कृष्ट रचनात्मक चित्राला मिळाले.

१९३२ पर्यंतचे हे शालेय जीवनातील सुवर्ण पर्व म्हणून अंबुताईंच्या कलात्मक जीवनाच्या पुढील पर्वाला आरंभ झाला.

*

प्रत्येक उत्स्फूर्त चित्रकाराचे उद्दिष्टीत चित्र त्याच्या स्वत:ची उत्कट प्रेरणा, त्याची अभ्यासू वृत्ती आणि त्याच्या मनाला भिडलेल्या संवेदनेतूनच साकार होत असते. स्वत: माधवराव धुरंधरांनी अभ्यासपूर्वक तयार केलेली शिवाजीच्या जीवनावरील राज्यरोहण

दरबाराचे चित्र त्यावेळी औंध संस्थानाधिपती श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी पुरविलेल्या वर्णनानुसार तयार केले. त्यात अष्टकोनी मंडपीत लोडतक्यासहित गादीवर वीरासन घातलेली छत्रपतीची तेज:पुंज प्रतिमा चितारलेली आहे. गागाभट्टने शिरी छत्र धरिले आहे. 'व्यक्तिसमुच्चक रचनात्मक' चित्र असून जवळ जवळ ६० निरनिराळ्या व्यक्ती भावपूर्ण चितारल्या आहेत. साहजिकच अंबूताईंना हा शिवरायाच्या संघर्षपूर्वक जीवनाचा विषय अगदी जिव्हाळ्याचा वाटल्यास नवल नाही. अंबुताईंनी पौराणिक चित्रे तर तयार केलीच; पण ऐतिहासिक चित्रेसुद्धा त्यांनी हाताळली आणि १९७२ साली 'शिवछत्रपती यांचा राज्यारोहण समारंभ' हे आव्हानात्मक, क्लासिक तैलचित्र तयार करण्यासाठी त्यांनी तौलनिक अभ्यासू आराखडा रचला व त्यासाठी जी मेहनत घेतली तितकी त्यांच्या समकालीन चित्रकारांनी शिवरायाच्या जीवनावरील हाताळलेल्या इतर चित्रासाठी केलेली आढळत नाही.


आराखडा तयार करण्यास तीन महिने लागले. त्यानंतर १९७२ मध्ये त्यांचे मित्र चित्रकार माळी, उभयता नेनेद्वय, नलिनी भागवत ह्यांच्यासमवेत रायगडावर जाऊन प्रत्यक्ष सिंहासनाची जागा पाहिली आणि त्या शिवमय वातावरणात विविध रेखाचित्रे तयार केली. नंतर पेन्सिलच्या सहाय्याने (२'६''x १'३'') आराखड्याची रचना करण्यात, ह्या सर्व रेखाचित्रांचा उपयोग झाला. शिवाय यथार्थ मांडणी करण्यासाठी ऐतिहासिक ग्रंथाचे परिशीलन करणे आवश्यक होते. त्यासाठी अंबुताईंनी नामवंत इतिहासतज्ज्ञ महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार ह्यांना एक पत्र पाठवून त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा केली. त्यांनी उलटटपाली आशीर्वादपूर्ण पत्रात लिहिले, ''सिंहासन ३२ मण सोन्याचे वगैरे माहिती बखरीतून आहे. पण आम्ही बखर ही गाभा-प्रमाण मानतो. अक्षरश: प्रमाण मानीत नाही. ह्या विषयावर मूळ कागपत्रही उपलब्ध नाहीत.

पण राज्यारोहण प्रसंग समक्ष पाहणारा आणि पाहून आपल्या दैनंदिन रोजनिशीत वर्ण लिहिणारा एकच पुरुष होता. तो ईस्ट इंडिया कंपनीचा वकील हेन्री ऑक्झेडन.''

त्याने शिवाजीचे वर्णन करताना लिहिले : - "The raja was short but well built, his eyes sharp-shining like diamonds. ह्रदयाचा ठाव घेणारे आणि he was very very very fair."

अंबुताईंनी आचार्य अत्रे ह्यांच्या संग्रहातून, तसेच वांद्रे नॅशनल लायब्ररीतून संदर्भ ग्रंथ मिळविले व इतर नामवंत इतिहासतज्ञाशी पत्रव्यवहार करून त्यात वा. सी. बेंद्रे, रणजित देसाई, डी. जी. गोंधळेकर ह्यांचा अमूल्य सल्ला व श्री. बाबासाहेब पुरंदरे आणि डॉ. रविंद्र रामदास ह्यांची प्रत्यक्ष भेट होऊन कलावंत ह्या दृष्टीने सौंदर्यपूर्ण, भावनाप्रधान आणि वास्तववादी चित्र तयार करण्याचा निष्कर्ष काढून १९७३ सालच्या ''श्री शिवजयंतीच्या मुहूर्तावर श्री शिवछत्रपतीच्या राज्यारोहण दरबाराचे ५'६'' x ३'६'' आकाराचे तैलचित्र तयार करण्यास प्रारंभ केला.

हे उत्कृष्ट तैलचित्र म्हणजे अंबुताईच्या प्रदीर्घ कलोपासनेचे मूर्त स्वरूप आहे. ह्यातील दाखविलेल्या एकूण आकृत्या १०० असून प्रत्येक व्यक्ती त्यांच्या निरनिराळ्या व्यक्तिमत्वाने कार्यान्वित होऊन दरबारामध्ये आपले अस्तित्व


LATE
RAOBAHADUR M. V. DHURANDHAR A. M. F. R. C. A.
CENTENARY CELEBRATIONS
1967–1968
MEMORIAL EXHIBITION
At Convocation Hall of the University of Bombay
Time:-9 A.M. To 8 P.M.
Organised By
Dhurandhar Kala-Mandir
INAUGURATION
BY

जाणवून देते. चित्राचा जवळ जवळ १/३ भाग अष्टस्तंभी मेघडंबरीने व्यापला असून गागाभट्टाने शिरी छत्र धरले आहे. अशा ह्या पार्श्वभूमीवर शिवरायाची तेज:पुंज प्रतिमा समोर पसरलेल्या प्रजाजनांना निर्भयतेचा मंत्र देत आहे. प्रजाजनात पार्श्वभागी मंत्रघोष करणारा इतर सरदार मानकरी. कवी भूषण इंग्रज वकील, आणि चित्राच्या डाव्या १/३ भागात सोळा सुवासिनी हातात मंगलदीप घेऊन आतुरतेने शिवरायाच्या रोखाने पुढे पुढे सरकत आहेत. १९८० मध्ये त्रिशताब्दी पुण्यतिथीनिमित्त, महाराष्ट्र शासनातर्फे शिवाजीच्या चैतन्यमय जीवनाचे अखिल भारतीय दर्शन घडविण्यासाठी प्रचंड मेळावा रायगड येथे आयोजिला होता. भारताचे पंतप्रधान इंदिरा गांधी खास हेलिकॉप्टरने त्या सोहळ्याच्या उद्घाटनासाठी रायगडावर उतरल्या. महाराष्ट्र शासनाच्या आर्कियालॉजीकल डिपार्टमेन्टचे श्री. आर. जी. पांडे अंबुताईंना भेटून त्यांनी चितारलेले 'राज्यारोहणाचे तैलचित्र मुद्दाम मागवून घेतले आणि अंबुताईंना रायगडावर सोहळ्यासाठी निमंत्रित केले.

मोठ्या प्रशस्त मंडपात, शिवरायाच्या जीवनावर चितारलेले विविध प्रसंग, त्यांच्या महाराष्ट्रभर विखुरलेल्या अजिंक्य गडांची भव्य छायाचित्रे आणि मध्यभागी अंबुताईंनी चितारलेले 'राज्यारोहणा'चे तैलचित्र अशा रचनात्मक प्रदर्शनाचे उद्घाटन इंदिरा गांधीच्या हस्ते झाले. इंदिरा गांधींची अंबुताईशी ओळख करून देताना भारत सरकारचे त्यावेळचे कॅबिनेट मिनिस्टर वसंतराव साठे उद्गारले, ''पंतप्रधानजी, भारताचे महशूर स्वर्गस्थ कलाकार धुरंधरजी की सुपुत्री जिनोने यह पेन्एटींग बना हुवा है'' रायगडावर जमलेल्या ४० हजार जमावाने हे प्रदर्शन पाहिले.

माझ्या चित्रसंग्रहातील चिरस्मरणीय दुसरे चित्र 'योगिनी'. अंबुताईंनी विद्यार्थीदशेत फायनल वर्षाच्या सुरवातीला म्हणजे १९३१ मध्ये तयार केले. हे तैलचित्र (५'६'' X १'९'') रचनात्मक असून ६४ व्यक्तींचा समुच्चय आखला आहे. मध्यभागी श्री. जगदंबेची प्रतिमा सिंहासनारूढ असून योगिनींच्या जल्लघोषात, कोणी गायन वादन करीत आहेत, तर कोणी नृत्यात सामील झाल्या आहेत, तर कोणी भावनाविवश होऊन श्री जगदंबेला विनम्र प्रणाम करताहेत.

रचनात्मक चित्र काढणे हे फार अवघड काम असते. त्यात प्रत्येक व्यक्तीचे हावभाव आणि कॅनव्हासच्या चौकटीत आल्हाददायक, देखणे असे स्वरूप बसविणे सोपे काम नाही. ह्यासाठी अंबुताईच्या चोखंदळ, अभ्यासू आणि हस्तकौशल्याचे जितके कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

अंबुताईंना मी प्रश्न केला की, ह्या चित्राची मध्यवर्ती कल्पना त्यांना सुचली कशी? त्यावर अंबुताईंनी १९२९ मधली एक घटना सांगितली.

स्कूल ऑफ आर्टचे डायरेक्टर ग्लॉडस्टन सालोमन एक वर्षाच्या रजेवर मायदेशी गेले. त्याच्या जागी रावबहादूर माधवराव धुरंधराची पहिले हिंदी डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. साहजिकच धुरंधर कुटुंब शाळेच्या डायरेक्टर साहेबाच्या बंगल्यावर रहावयास गेले. बंगला मोठा ऐसपैस होता. पण मुख्य स्वयंपाकघर सौ. गंगुबाईंना पसंत नव्हते. मग रहात्या स्वयंपाकघरात थोडेफार फेरफार करून माधवरावांनी मोठ्या कॅनव्हासचे फलाट आणून स्वयंपाकघरात आडोशे तयार केले. नंतर त्यांनी अंबुताईंना रंग, कुंचले व इतर साहित्य देऊन रेखाचित्र काढण्याचे आव्हान केले. झाले! अंबुताईंनी पौराणिक विषय अति जिव्हाळ्याचा म्हणून 'योगिनी'च्या चित्राची आखणी केली व विविध रंग भरले.

नेहमी चित्रकार मोठ्या चित्रासाठी लहान नमुना तयार करतो. पण 'योगिनी' चित्र स्वयंपाकघरातल्या मोठ्या कॅनव्हासच्या फलाटातून निर्माण झाले. ह्या चित्राला अंबुताईंना पारितोषिकही मिळाले व सध्या पतियाळाच्या म्युझियममध्ये ते विसावलेले आहे.

आज हिंदुस्थानामध्ये कोणतीही आर्ट गॅलरी किंवा श्रीमंत कला रसिकाच्या संग्रही महादेवरावांचे वा अंबुताईचे चित्र नाही असे नाही. त्यांच्याशिवाय आर्ट गॅलऱ्या पूर्णावस्थेस पोहोचूच शकत नाहीत.

अंबुताईंना पुष्कळ पारितोषिके मिळाली. त्यात जपून ठेवलेले प्रभुप्रभातद्वारे देण्यात आलेले १९८४ मधले कलोपासनेचे 'विद्येश्वरी ॲवार्ड' पहाण्यास मिळाले. अंबुताईंनी आज ८३ वर्षात पदार्पण केले आहे. त्यांची जिद्द, कुलोपासना आजही तशीच आहे. त्यांच्या हातून उत्तरोत्तर चित्रनिर्मिती होण्यासाठी दीर्घायुष्य द्यावे हीच ईश्वराजवळ प्रार्थना!

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# जमाना गंधर्व फॅशन्सचा. बालगंधर्वांनी साड्यांची फॅशन महाराष्ट्रात प्रथम रुजविली (गंधर्व फॅशन्स) - १९१४

**✶ प्रताप वेलकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

*(माननीय श्री. प्रताप वेलकर यांनी खालील लेख गेल्या वर्षीच्या 'प्रभुतरुण' दिवाळी अंकासाठी पाठविला होता. मात्र तो उशीरा आल्याने आम्ही समाविष्ट करू शकलो नाही; याची खंत वाटली. म्हणून तो यावर्षी प्रकाशित करीत आहोत. त्यांनी पत्रात असे म्हटले होते की, 'प्रस्तुत लेख माझ्या पुस्तकातलाच आहे. तथापि तो कोणत्याही अंकात प्रकाशित झालेला नाही. यास्तव आपल्या ज्ञातीच्या माहितीसाठी तो कृपया आपल्या दिवाळी अंकात प्रसिद्ध करावा.' -त्यांची विनंती म्हणजे आम्हाला प्रेमस्वरूप आज्ञाच. -संपादक)*

मराठी रंगभूमीच्या सुवर्णकाळात 'गंधर्व फॅशन्स' हा शब्दप्रयोग सर्वत्र रूढ होता. गंधर्व साड्यांनी महाराष्ट्रीय महिलांना त्या काळी अक्षरश: वेड लावले होते. महाराष्ट्रातील सुशिक्षित स्त्रिया तसेच मुंबईतील खानदानी गुर्जर स्त्रिया बालगंधर्वांच्या पेहेरावाचे सर्रास अनुकरण करीत. 'ती बाई थेट गंधर्वांचा थाट करते,' 'कृत्तिकेचा पुतळ्याचा शालू मी या दिवाळीला घेणार आहे.', 'रेवतीची जॉर्जेट साडी मला फारच आवडली', अशा अनेक गोष्टी बायका बोलताना कानावर येत. बालगंधर्वांनी अंगच्या अनेक गुणांनी रंगदेवतेला सुसंपन्न केले. गायन, वादन, अभिनय, केशभूषा, वेशभूषा व प्रयोग पद्धती यांचे संमिश्रीकरण पूर्वीच्या नाटकांत दिसून येत नसे. त्याला बालगंधर्वांनी प्रथम चालना दिली.

सुसंस्कृत पदवीधर व गिरणी कामगार एकाच दराची तिकीटे काढून नाटक बघत असत. समयी नाट्याचा आस्वाद घेताना, अशिक्षित माणसाचा वन्समोअर घेण्यापेक्षा सुशिक्षित माणसाने नाटकाची पसंती दाखविणे, ही जास्त अभिमानाची गोष्ट आहे. तमाशावजा नाटक झाले तर सुसंस्कृत जनसमूह नाटकी माणसांपासून दूरच राहाणार, हे नाट्यावर अपार प्रेम करणाऱ्या बालगंधर्वांनी तेव्हाच ओळखले. शृंगारादी रसांचे आविष्करण नाजुकपणे हाताळताना गायन अभिनयाबरोबर उंची पोशाखांनी त्या रसांची शान वाढावी म्हणून गंधर्वांनी रंगदेवतेवर भरजरी शालू चढविला. स्वत:ला व आपल्या सर्व नटांना दिमाखदार वस्त्रभूषणे दिली. मखमालीचा पडदा उभारला, भारी किंमतीचे गालिचे पसरले व उंची अत्तरांनी रंगमंच सुगंधित केला. त्यामुळे पहिल्या पाच सहा रांगेतल्या राजे-नरेश, प्रतिष्ठित उद्योगपतींपासून मागील रांगेतल्या सामान्य सुशिक्षित समाजापर्यंत सर्वच्या सर्वजण गंधर्वांच्या नाटकांनी बेहोष झाले. सुशिक्षित स्त्रिया आपल्या सुनालेकींसह गंधर्वगायनाबरोबरच गंधर्वांचे जरतारी शालू, पैठणी, लेटेस्ट प्रिन्टच्या जॉर्जेट, सिल्कच्या साड्या बघण्यासाठी गंधर्वांच्या नाटकांना गर्दी करू लागल्या. 'मी त्यांना पाहिलं' म्हणणारी स्वयंवरातली रुक्मिणी चंदेरी शालूत कशी खुलून दिसते, वसंतसेनेची जॉर्जेट काय रंगाची आहे, किनारकाठ कोणत्या डिझाईनचे आहेत यापासून 'कशी या त्यजू पदाला' म्हणणारी सिंधू घरात नेसायला कॉटन प्रिन्टेड काय घालते, याकडे स्त्रियांचे विशेष लक्ष असे. सुरुवातीच्या

वैभवकाळात बालगंधर्व इंदुरी लुगडी, चंदेरी शालू इंदुराहून मुद्दाम खरेदी करीत. तसेच बनारसहून उत्तम पैठणी मागवीत. पुढे पुढे स्त्रियांचा वेशभूषेकडे पाहाण्याचा विशेष ओढा ओळखून वेशभूषेमध्ये काही नाविन्य आणावे, असे बालगंधर्वांना वाटू लागले. साड्यांची नवीन फॅशन बाजारात येण्यापूर्वीच आपण ती रंगमंचावर प्रदर्शित केली तर खेळाला जास्त रंगत येईल. धनिक गणिकांचे कुटुंबीय जास्त गर्दी करतील व त्यामुळे खेळांचे उत्पन्न वाढेल, हे हेरून त्यांनी आजकालच्या सिनेनट्यांप्रमाणे प्रत्येक वेळी नवनवीन फॅशन रंगमंचावर आणण्याचे ठरविले. ते बुहधा १९१४ साल असावे. त्या वर्षी बालगंधर्वांचा मुक्काम मुंबईत होता, त्या वेळी त्यांना डोळ्यांचा त्रास होऊ लागला. गंधर्वांचे फॅमिली डॉक्टर डॉ. त्रिलोकेकर की ज्यांना पाहून देवलांनी आपल्या 'संशयकल्लोळ' नाटकात पाठारे प्रभु फाल्गुनराव निर्माण केला, ते डॉ. विनायक सोकर बापूजी त्रिलोकेकर यांचेकडे गंधर्वांनी डोळ्यांसाठी इलाज सुरू केला. अशाच एकदा गप्पा मारताना त्रिलोकेकरांना गंधर्वांनी विचारले, 'डॉक्टर, मुंबईतली जर्मनिया कंपनी कोणाची आहे? तेथे छपाईचे व डिझाईनचे नक्षीकाम कोण करते?' तेव्हा डॉक्टरांनी 'आपल्या भाच्याचाच तो कारखाना आहे' असे सांगितले व त्यानंतर ताबडतोब कंपनीचे मालक शामरावशेठ यांची गाठ घालून दिली. जर्मनिया कंपनीचा विशेष म्हणजे जॉर्जेट व सिल्क कापडांवर स्वत:चे नक्षीकाम (हल्लीचे डिझाईन ऑफ अप्लाईड आर्ट) व कारागिरांडून स्वत:चे डिझाईन ब्लॉक बनवून त्यांची सुंदर छपाई पक्क्या रंगात (फास्ट कलर) देण्यात शामरावशेठ त्या काळी कापड बाजारात विशेष प्रसिद्ध होते. एका मराठी माणसाने भुलेश्वरजवळची बाजारपेठ या विशेष कलेमध्ये राखली होती. त्याकाळी बडोदा, ग्वाल्हेर, सुरत व पुणे येथील सार्वजनिक प्रदर्शनात शामरावशेठना सुवर्णपदकेही मिळाली होती. बालगंधर्वांनी नवनवीन डिझाईनची, पक्क्या रंगाची, मोठ्या जरतारी काठांची सिल्क पातळे शामरावशेठकडून बनवून घेतली व बाजारात येण्यापूर्वीच ती रंगमंचावर प्रथम प्रदर्शित केली. तेव्हापासून बालगंधर्वांचे शामरावशेठशी संबंध अगदी जिव्हाळ्याचे झाले. इतके की शामरावशेठनी आपल्या लग्नात प्रिय पत्नीचे नाव 'वसंतसेना' ठेवले. दोघेही समवयस्क. एक १८८८ सालचे व दुसरे १८८६ चे. ही माहिती शामरावशेठच्या सुकन्या सौ. केशरबाई मधुकर जयकर यांनी मला पुरविली. केशरबाई माझ्या पत्नीची चुलती. सध्या यांचे वय ८० आहे. तथापि त्या चांगल्या हिंडत्या फिरत्या आहेत. गंधर्वकंपनीसाठी छापलेले डिझाईनचे काही सँपल कापडाचे तुकडे त्यांच्या घरी वडाळा येथे पाहाण्यास मिळाले.

ज्या 'द्रौपदी' नाटकामुळे बालगंधर्वांना जबर कर्ज झाले, त्याच 'द्रौपदी' नाटकाने कर्ज फेडण्यास पुढे मदत केली. द्रौपदी नाटकामध्ये वस्त्रहरण सीनच्या वेळी दु:शासन द्रौपदीचे वस्त्रहरण करतो, त्या वेळी बालगंधर्वांनी नेसलेली सुंदर तलम जॉर्जेटची एकाखालोखाल सहा नेसणी शामरावशेठच्या जर्मानिया कंपनीतून घेतली होती. प्रसंगी उत्तम छपाईच्या व पक्क्या रंगाच्या (जर्मन फास्ट कलर्सच्या) सिल्क साड्याही बालगंधर्व ह्या सीनच्या वेळी नेसत असत. तलम सहा पातळे एकावर एक नेसूनदेखील ते वस्त्रहरण सीनचे वेळी प्रेक्षकांना कधीही वेडेवाकडे दिसले नाहीत. यातच बालगंधर्वांचे कौशल्य व नीटनेटकेपणा दिसून येत असे. कधी काळी 'स्वयंवर' नाटकाला बालगंधर्व एकाच रंगाच्या जॉर्जेट साड्या वापरीत; परंतु त्यात गंधर्वांचे खास वैशिष्ट्य असे. पहिल्या प्रवेशाला नेसलेल्या साडीची शेड नाटक जसजसे पुढे सरकत असे, तसतशी प्रत्येक प्रवेशाला (लाईट टू डार्क) फिक्क्या रंगाची साडीची शेड हळूहळू गडद बनत असे. माझ्या मातोश्री यांनी वर्णन केले ते असे : पहिल्या प्रवेशात नेसलेली बिस्कीट रंगाची साडी शेवटच्या प्रवेशात ती हरणी रंगाची होत असे. त्यामुळे प्रेक्षकगृहातल्या स्त्रियांमध्ये कोणती शेड चांगली, दुसऱ्या प्रवेशातली की तिसऱ्या की शेवटच्या प्रवेशातली; यावर चर्चा होत असे.

### गंधर्वसाडी - गंधर्व वेणी.

प्रत्यक्ष स्त्री नसूनही, स्त्रियांना लाजवेल असे स्त्रीपण गंधर्वांच्या रोमारोमात भिनले होते. लुगडी नेसताना कोणत्या रंगाचे व किनारीचे झंपर घालावेत, आतील जरीकाठाच्या तलम चोळीवर बिनबाह्यांची, किनखापाची गडद रंगाची बंडी कशी घालावी, तसेच जरतारी शालू, साड्या कितीही सुंदर प्रिन्टच्या असल्या तरी त्या नेसाव्या कशा, हे बालगंधर्वांनी

स्त्रियांना शिकविले. हल्ली टीव्हीवर पातळांचे, पदरांचे प्रदर्शन नित्य होत असते. बालगंधर्व त्या काळी पदर सावरताना नवीन फॅशनची नकळत जाहिरात करीत असत. नऊवारी साडी पायघोळ नेसायला बालगंधर्वांनीच स्त्रियांना शिकविले. त्यांची साडी इतकी पायघोळ असायची की, त्यांनी काढलेल्या निऱ्या त्यांच्या दोन्ही पायांमधून मागील बाजूस चांगल्या एक फूट लांबीपर्यंत सरकताना दिसत असत आणि गंधर्व आपला अभिनय करीत असताना पायघोळ पायात न येता रंगमंचावर ते अगदी सहजपणे वावरत असत. बालगंधर्वांची ही कला एखाद्या राजघराण्यातील स्त्रियांप्रमाणे त्यांना शोभून दिसत असे. प्रतिष्ठित खानदानी स्त्रिया बालगंधर्वांना पाहून लग्नसमारंभात अथवा इतर उत्सव प्रसंगी अशाच प्रकारे साड्या नेसू लागल्या होत्या. काही वर्षांपूर्वी श्रीमती दुर्गाबाई खोटे भाऊबंदकीमध्ये आनंदीबाईंची भूमिका करीत असताना गंधर्वांप्रमाणेच त्या पायघोळ नेसल्याचे आठवते. केशभूषेमध्ये 'गंधर्व वेणी' त्या काळी प्रसिद्ध पावली होती. बालगंधर्व रंगमंचावर काम करीत असताना अंबाड्यावर हमखास फुलांची वेणी घालायचे. मोगऱ्याच्या वेणीमध्ये मध्यभागी एक गुलाबाचे फूल विणलेले असायचे. गंधर्व वेणी त्या काळी इतकी प्रसिद्ध पावली होती की, सुशिक्षित स्त्रिया लग्न समारंभास जातेवेळी, माळ्याकडून मुद्दाम गंधर्व वेणी विकत घेत असत. बालगंधर्व चारित्र्यसंपन्न होते; त्यामुळे त्यांचा नटवेपणा, मिरवणं खानदानी घरंदाज स्त्रीप्रमाणे शोभून दिसत असे.

बालगंधर्वांच्या स्त्रीवेषातल्या भूमिका महाराष्ट्राबाहेर इतर प्रांतीही प्रसिद्धी पावल्या होत्या. हिंदी राष्ट्रीय पुढारी टिळकांचे समकालीन मद्रासचे डॉ. सत्यमूर्ती हे मुद्दाम स्वरूपसुंदरी बालगंधर्वांना पाहण्यासाठी मुंबईमध्ये १९२२ साली बालिवाला थिएटरात आले होते, हे मला माहीत आहे. कारण त्यांचा मुंबईतला मुक्काम माझे पिताजी टिळकभक्त डॉ. मो. बा. वेलकर यांचेच घरी गिरगावात होता. त्याचप्रमाणे वी. के. एफ्. नरीमन, जमनादास द्वारकादाससारखी थोर मंडळीही गंधर्वांच्या नाटकांना येत असत. १९६४ चा अमृतमहोत्सव मला चांगला आठवतो. शिवाजी उद्यानावर झालेल्या सोहळ्याला सुप्रसिद्ध हिंदी नट पृथ्वीराज कपूर व तामिळ नट शिवाजी गणेशन यांनीही हजेरी लावली होती. पृथ्वीराज भाषणात म्हणाले, ''मी बालगंधर्वांची नाटके पाहिली आहेत. एकदा त्यांच्या नायकाला वन्समोअर झाल्यानंतर पडदा पडला, टाळ्यांच्या गडगडाटानंतर पडदा परत वर गेला व परत खाली आला. खाली कायमचा आल्यानंतर मी ताबडतोब विंगमध्ये गंधर्वांना मोठ्या आनंदाने भेटण्यास गेलो, तर मला काय दिसले माहीत आहे? पडदा पडला आहे, बाहेर टाळ्यांचा कडकडाट होतो आहे आणि पडद्यामागे बालगंधर्वांनी प्रेक्षकांच्याकडे तोंड करून लोटांगण घातले आहे. प्रेक्षकांना परमेश्वर समजून 'मी कसा उतराई होईन देवा' असे स्वत:शी म्हणत आहेत. मी त्यांच्या पायाला स्पर्श केला.''

आता दिवस पार बदलले आहेत. मॉडर्न अप्लाईड आर्टमुळे सनसनाटी डिझाईनची रंगीबेरंगी पूर्वीपेक्षाही तलम पातळे रोज बाजारात येत आहेत. नवीन तंत्र, नवीन यंत्र व नवीन शोध यामुळे जुना जमाना संपुष्टात आला. सुप्रसिद्ध साहित्यिक प्राध्यापक वसंत बापट यांच्या शब्दांत (त्यांच्या परवानगीने) थोडासा फरक करून सांगायचे झाले तर 'आता कोणी आजकालच्या थिल्लर उठतील आणि फिदीफिदी हसत विचारतील, तुम्हाला कशी हो आवडायची ती रुक्ष डिझाईनची पातळे, ते जाडजूड शालू आणि तेपण पुरुष स्त्रीपार्टीने नेसलेले.' ज्या भाग्यवंतांनी रंगभूमीचा राजहंस पाहिला आहे त्यांना माहिती आहे की, आजकालच्या (नाटक न म्हणता) फार्सच्या जमान्यात दोन अडीच तपे अनभिषिक्त राज्य केले तो नटसम्राट आज काळाच्या पडद्याआड इतिहासजमा झाला आहे.

*

## वात्रटिका

### १. सेल्फी

सेल्फी काढता-काढता, तिचा गेला तोल,
दरीमध्ये जाऊन पडली, ती खोल-खोल
दरीमध्ये काढत होता, तो देखील सेल्फी
यमाने मग दोघांनाही दिली एकेक ट्रॉफी

**डॉ. सुमन नवलकर**

विनोदी कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# बाबा भांडं

## ✶ नंदकुमार कृष्णाराव विजयकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

*(कथेतील समर्पक चित्र नंदकुमार विजयकर यांनीच रेखाटले आहे. -संपादक)*

'भांड्याला भांडे लागणे', 'ताकाला जाऊन भांडे लपवणे', 'उपड्या घड्यावर (भांड्यावर) पाणी'

असले वाक्प्रचार घरी उच्चारायची मी सक्त मनाई केली आहे, खास करून जेवणाच्या वेळी तर नाहीच नाही. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल; काय हा विचित्र माणूस आहे, एकदम भांड्यांवर घसरला. त्याला तसेच कारण आहे. म्हणजे काय झालं पाहा. आम्ही नवीन जागेत आलो तेव्हा मी आणि माझी पत्नी आम्ही दोघेच होतो. नंतर मनोज आणि मोनिकाचा जन्म झाला. पाचसहा वर्षे कशी निघून गेली कळलंच नाही. नवीन जागा तशी ठीक होती. पण २/३ वर्षातच सिपेज, लीकेजच्या तक्रारी उद्भवू लागल्या. आमच्या टॉयलेटमधून खालच्या फ्लॅटमध्ये पाणी गळती सुरू झाली. दुरुस्तीचा खर्च अर्धा-अर्धा वाटून घ्यायचा असा नियम होता; पण मुलं लहान होती म्हणून आम्ही हे काम पुढे ढकलत होतो. पण शेवटी हे काम हाती घ्यावं लागलं. एक दिवस एका ओळखीच्या माणसाला बोलावून घेतलं.

ओळखीचा माणूस आळोखेपिळोखे देत चार दिवसांनी उगवला. ''साहेब काय काम होतं?''

''अरे दत्ता आलास, हे बघ टॉयलेटचं काम आहे. खर्चाचा अंदाज सांग, काम चोख आणि वेळेत व्हायला हवं.''

''साहेब त्याची चिंता नको, ही इंडियन टाईप बदलून इंग्लिश टाईप करायची आहे ना? झालीच बघा. एक दिवस फोडायला आणि दुसऱ्या दिवशी भांडं उभं राहिलं की तुम्ही बसायला मोकळे.''

''भांडं?''

''ते आपलं, हे ते तुमचं कोमड.''

''हां, कळलं कमोड, ठीक आहे.''



मी त्याला थोडे पैसे ॲडव्हान्स दिले आणि दुसऱ्या दिवसापासून कामाला सुरुवात करायला सांगितली. दुसऱ्या दिवशी तोडफोड मंडळी आली आणि अर्ध्या तासात आमची टॉयलेट भुईसपाट झाली. पाडापाड करून सगळं शांत झालं; पण ही शांतता चांगली दोन दिवस लांबली. मी दत्ताला फोन केला तर त्याचा निरोप आला- 'कढीया गावाला गेलाय, उद्या आला की कामाला सुरवात करू.'

दोन दिवसांनी कढीयासाहेब उगवले, त्यांनी सामानाची यादी दिली.

दत्ता म्हणाला, ''साहेब, चला परळला जाऊन सगळं सामान आणू.''

मी म्हणालो, ''दत्ता, तूच जाऊन घेऊन ये सगळं सामान.''

''असं कसं साहेब, भांड्यावर तुम्ही बसणार तेव्हा भांडं सिलेक्ट करायला तुम्हीच यायला हवं.''

मी गेलो. भली मोठी शोरूम होती. अनेक भांडी

हारीने मांडली होती. सर्वजण एकमेकांना खेटून अगदी गुण्यागोविंदाने नांदत होते. लोक उगाचच बोलतात, 'भांड्याला भांडे लागले की आवाज होणारच.'

''साहेब, ते बघा नंबर १ भांडं.'' मी दरवाजा-जवळच्या पहिल्या कमोडसमोर उभा राहिलो.

''साहेब हे नाही,ते पलीकडचं.'' आता दत्ताचं नंबर १ पार शेवटच्या टोकाला होता . मी तेथपर्यंत पोहोचलो.

''साहेब, हे अॅटोमॅटिक आहे.''

''म्हणजे?''

''तुम्ही बोटाने झाकण उचला.''

मी बोटाने झाकण उचलू लागलो.

''साहेब, तसा नाय. टच नाय करायचं, नुसता हवेत बोट उचलत न्यायचं.''

मी तसं करू लागलो आणि काय आश्चर्य,झाकण हळूहळू वर उघडू लागलं.

''साहेब, काम झालं की असंच बंद होते, हात लावायची गरज नाय.''

''वा:छान आहे की.''

मी त्याची किंमत पाहू लागलो. रु. २५०००/- फक्त.बापरे! ती किंमत पाहून माझ्या पोटात अॅटोमॅटिक कळ सुरू झाली. मग मी वेगवेगळ्या आकाराच्या, रंगाच्या आणि किंमतीच्या भांड्यांना चाळून काढलं आणि शेवटी माझ्या टॉयलेटमध्ये बसेल व माझ्या खिशाला झेपेल अशा भांड्यावर शिक्कामोर्तब करून मोकळा झालो.

''अरे दत्ता, उद्याच्या दिवसात होईल ना रे?''

''हो साहेब, पण जरा प्रोब्लेम आहे.''

''आता काय?''

''तो अप्पा, आमचा पलंबर एका कामावर अडकलाय. उद्या दुपारपर्यंत येईल.''

''अरे दत्ता, दोन दिवसाचे पाच दिवस झाले.''

''होय साहेब, पण थोडी कळ सोसा.''

याचं काय जातं 'थोडी कळ सोसा' म्हणून बोलायला. तरी बरं घरच्या सगळ्यांना मामाकडे पाठवून दिलं होतं. हो, त्यांची गैरसोय झाली असती पण सर्वात मोठी डोकेदुखी म्हणजे आमचे मोनुम्हाराज. कोठे काय करेल त्याचा नेम नाही. त्यादिवशी दत्ताच्या बोलण्यातील 'भांडं' हा एकच शब्द लक्षात ठेवला. ''बाबा भांडं म्हणजे काय?''

''बाळा दुधाचं भांडं ठाऊक आहे?''

''ते नाही दत्ताचं भांडं.''

''चूप बस.'' उगाच डोक्याला भुणभुण लावत असतो.

मी सकाळी शेजारी जाऊ लागलो की तो 'स्वच्छ अभियान'चा अमिताभ माझ्याकडे बघून हसतोय असा भास होई. जणू काही मी उघड्यावर शौच करायला निघालोय. आमचे शेजारी चांगले होते; पण एकंदरीत अवघडल्यासारखे वाटायचं. दत्ताने घरी आल्यावर भांडं सोफ्यावर ठेवलं.

''अरे दत्ता इकडे?''

''साहेब, खाली नरम असलेलं बरं, तडा गेला तर आफत यायची.''

''हो हो, उगाच भांडं तडकायला नको.''

ते भांडं सफेद रंगाच्या वेष्टनात गुंडाळलं होतं. समोरचे वसंतराव येऊन गेले. भांड्याला बघून 'काय राव एवढ्या लवकर गणपती?' आता त्याला एक वक्राकार पाईप होता म्हणून काय गणपती? मनात म्हटलं, भल्या गृहस्था रोज भांड्यावर बसतोस, खाली वाकून सोंड आहे का पाईप आहे ते जरा बघत जा. त्यात दोन पोरं सत्यनारायणाची वर्गणी मागायला आली. मी त्यांना सोफ्यावर बसायला सांगितलं. एकाने सोफ्यावर काय आहे म्हणून विचारलं. मी त्याला भांड्याविषयी सांगितलं तशी ती पोरं वर्गणी न घेताच निघून गेली. कधी नव्हे ते मला त्या भांड्याप्रती आदर वाटू लागला. ते भांडं दोनतीन दिवस तसंच सोफ्यावर बसून होतं. सार्वजनिक चौकात एखाद्या थोर व्यक्तीचा पुतळा असाच गुंडाळून ठेवलेला बरेच दिवस आढळतो. एखाद्या आमदार मंत्री यांच्या हातून कधी अनावरण होईल याची वाट पाहात गुदमरलेल्या अवस्थेत उभे असतात असे पुतळे. आमच्या भांड्याचं अनावरण करण्यासाठी खासदार नाही तर; कारागिराची आवश्यकता होती.

आठवडा उलटला. एका संध्याकाळी 'ही' मुलांना घेऊन परतली.

''अगं, इतक्या लवकर आलीस, काम अजून व्हायचं आहे.''

''म्हणजे अजून काम झालं नाही?''

झालं, म्हणजे भांडं लागलं नाही; पण त्या भांड्यापायी आमच्यात मात्र भांडण लागलं.

''काय हो, ओळखीचा आहे ना तो? दोन दिवसात काम संपेल म्हणाला आणि अजून पत्ता नाही?

## कविता

### जाग

**सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

कुणास ठाऊक कधी कशी पण
निद्रा पळून गेली
तारुण्याच्या स्वप्नांमधुनी
पूर्ण जाग आली।।धृ.।।
तरुणपणाचे ऊन सुखाचे
ऊबदार सोनेरी
वार्धक्याचे मऊ मुलायम
चांदणे चंदेरी
भल्याबुऱ्या घटनांनी भरली
खांद्यावरची झोळी।।१।।
आयुष्याची चित्रं उघड्या
डोळ्यांपुढून सरकली
रात्रीच्या तमात लपली
सुरकुत्यांची जाळी
काही स्वप्ने विरून गेली
काही खरी जहाली।।२।।
छान स्मृतींनी मन तरारे
घेई उंच भरारी
भविष्यातल्या प्रवासाची
तीच खरी शिदोरी
काय गमविले काय मिळविले
अचूक गणिते केली।।३।।

दुसरा कोणी सापडला नाही?''

''अगं, हा दत्ता. मागच्या वेळी आपली मोरी तुंबली होती तेव्हा यालाच बोलावलं होतं.''

''काही सांगू नका. मोरीचं काम केलं पण खालचा फ्लॅटवाला बोंबलत आला, त्याच्याकडे लिकेज सुरू झालं म्हणून. नसता भुर्दंड पडला.''

रात्री जेवायला बसलो. अचानक मनु किंचाळत आला, ''बाबा भांडं, बाबा भांडं.''

''मन्या, गप्प बस. जेवायच्या वेळी भांड्याच्या नावाने कशाला शंख करतोयस?''

मनु लोकसत्ता घेऊन काहीतरी दाखवत होता. तसा इंग्रजी तिसरीत शिकत होता. पण चुकून थोडंफार मराठी वाचायचा. आत 'बाबा भांड ' यांच्या सत्कारा-संबंधीची बातमी ठळकपणे छापून आली होती. पण नेमकं हेच त्याच्या नजरेस पडावं हे अजबच होतं. मग मी त्याला जवळ घेऊन समजावू लागलो.

''मन्या, 'भांडं' आणि 'भांड' यात फरक आहे. आता हे बघ, हे भाताचं भांडं , हे ताकाचं भांडं आणि 'बाबा भांड' हे थोर साहित्यिक आहेत. त्यांचं नाव आहे 'बाबा भांड'.

'बाबा सार्तिक म्हणजे काय?''

आता या पोराला 'साहित्यिक' धड बोलता येत नाही तिकडे त्याचा अर्थ काय समजावणार कपाळ? पण मुलांची जिज्ञासा मारू नये असं म्हणतात म्हणून ''मनु बाळा, साहित्यिक म्हणजे ...आता...हां.. हे बघ मी दोनचार ओळी लिहितो-कविता होते, चार पाच पानांचा लेख होतो. तो कधीतरी कोठेतरी छपून येतो...'' पुढे मीच स्वप्नरंजनात गुरफटलो...मग कवितासंग्रह, कथासंग्रह. पुढे कादंबरी, नाटक, आत्मचरित्र... अशी ग्रंथसंपदा ...

''बाबा, संपदा वाईट आहे. तिने माझी वही फाडली.'' या मन्याने माझ्या स्वप्नांची पार चिरफाड केली.

''मन्या एकदम चूप.'' सौ. आतून ओरडली, ''अहो, त्याच्या नादाला काय लागता? मनु इकडे बस बघू जेवायला.''

सकाळी दत्ता लगबगीने आला.

''साहेब, भांड्यावर पाखरू लावायचं का?''

''पाखरू?'' या दत्ताचं काय अजबच. त्या कमोडवर कसलं नक्षीकाम करायचं, ''कशाला ते?''

''नाही, साहेब म्हणजे पाठीमागे ....पिचकारी.''

''हां , आलं लक्षात. वॉटरजेट, बटरफ्लाय. हो हो लाव लाव. जरुरी आहे ते.''

मी मनात साकडे घालू लागलो 'पाखरू लावतो, जेट लावतो, सर्व कारागिरांना चांगली बिदागी देतो,वर खाऊ पिऊ घालतो पण आमचं भांडं लवकर उभं राहू दे रे दत्तारामा !!!' त्या दिवशी एकमेकांशी लपंडाव खेळणारे सर्व भिडू गवंडी, सुतार, इलेक्ट्रीशिअन, प्लंबर, पेंटर एकाचवेळी प्रकट झाले. रात्री उशिरापर्यंत काम चालू होतं. सरतेशेवटी, दोन दिवसांचा हवाला देऊन तब्बल दोन आठवड्यांनी आमचं भांडं उभं राहिलं आणि आम्ही त्यावर सुखाने विसावलो.!

('लोकप्रभा' मधून साभार)

*

लेख

# एक अविस्मरणीय आठवण

**✶ मृदुला प्रभुराम जोशी ✶**

बरोबर २५ वर्षं झाली या घटनेला. त्यावेळी आम्ही दादरच्या हिंदू कॉलनीत 'श्रीप्रकाश' नावाच्या एका टुमदार इमारतीत राहत होतो. खारेघाट रस्त्याच्या मागच्या बाजूला, हिंदू कॉलनी पोस्ट ऑफिसच्या मागे ही बंगलीवजा दुमजली इमारत होती आणि तिच्या पहिल्या मजल्यावरच्या एका सदनिकेत आम्हाला जागा मिळाली होती. हिंदू कॉलनीच्या जुन्या रहिवाशांकडून मला एवढं कळलेलं होतं की ही इमारत १९५०च्या सुमारास सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अनिल बिश्वास यांच्या मालकीची होती आणि त्यावेळेला त्यांनी त्या बंगल्याचं नाव 'आशा-प्रदीप' असं ठेवलं होतं. आशा म्हणजे त्यांच्या (प्रथम) पत्नी आणि प्रदीप म्हणजे त्यांचा मुलगा. अनिल बिश्वास इथे बरीच वर्षं राहत होते, पण पुढे त्यांच्या लाडक्या मुलाचं- प्रदीपचं- विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्यामुळे त्यांना त्या घरात राहवेना म्हणून त्यांनी हा बंगला विकून टाकला आणि ते दुसरीकडे राहायला गेले असंही ऐकलं होतं.

सिनेसंगीतावर आधारित आठवणींच्या एका पुस्तकात मी असंही वाचलं होतं की त्यावेळी त्यांचं संगीतदिग्दर्शन असलेल्या चित्रपटांच्या गाण्यांच्या तालमी करण्यासाठी लतादीदी रेल्वेच्या दादर स्टेशनवर उतरून तिथून चालतचालत हिंदू कॉलनीच्या या घरात येत असत आणि तिथे त्यांच्या रात्ररात्र तालमी चालत असत. किती भाग्यवान असले पाहिजेत तेव्हाचे त्यांचे शेजारीपाजारी! प्रत्यक्ष लतादीदी गाताना ऐकायला मिळालं असेल ना त्यांना! मी मनानंच कल्पना करीत असे त्या दिव्य कालखंडाची आणि मला सतत असं वाटायचं की आमच्या त्या जागेच्या भिंतीही चोवीस तास त्यांनी ऐकलेल्या त्या सुरांनी झंकारत असाव्यात. नुसत्या या विचारानंच मी भारावून जायची.



**'यादोंकी बारात' या पुस्तकावरून घेतलेले छायाचित्र**

असंच एकदा केव्हातरी मी आमच्या बेडरूममध्ये बसून शिरीष कणेकरांचं 'यादोंकी बारात' हे पुस्तक वाचत होते. अनिल बिश्वासांच्या लेखाबरोबर जो फोटो छापला होता त्याच्याकडे लक्ष गेल्याबरोबर मी चमकले. त्या फोटोत अनिल बिश्वास रबाबसारखं एक वाद्य वाजवताना दिसत होते आणि त्यांच्या शेजारच्या भिंतीवर सतार, पखवाज अशा वाद्यांच्या छोट्या प्रतिकृती ठेवलेल्या दिसत होत्या. वरती त्या खोलीच्या सीलिंगचा एक कोपराही दिसत होता. सीलिंग नक्षीदार होतं आणि फोटोत ते स्पष्ट दिसत होतं. माझी नजर तडक आमच्या बेडरूमच्या सीलिंगकडे गेली आणि माझी खात्रीच झाली की ही

## कविता

### तू गेलास तेव्हा...

**- सुहासिनी कीर्तिकर**

तू उडून गेलास तेव्हा
दिशाहीन झाले पक्षी
काळावर मी कोरीत बसले
तुझ्या स्मृतींच्या हजार नक्षी....
तू गेलास अन् तेव्हा
घर झाले उदास उदास
माझं जगणं झालं अन्
अस्तित्वशून्य भकास भकास
तू गेलास...
तू गेलास तेव्हा
निसर्गालाही साहले नाही
पानगळ करीत करीत
तो रडला धाईधाई
तू गेलास? छे!!
तू गेलासच नाही बरे;
आठवणींतून माझ्या तूच पाझरे
गायीजवळ उरली आता
हंबरणारी वासरे

तीच खोली असणार. पण याचा पुरावा कसा मिळणार? मी हा विचार केवळ माझ्या मनात झाकून ठेवला आणि पुढे वाचायला लागले.

काय योगायोग पाहा. अक्षरशः अभूतपूर्व योगायोग! माझे पती प्रभुराम जोशी हे एक हौशी गायक होते आणि ते पंकज मलिक, के. एल. सहगल, जगमोहन, धनंजय भट्टाचार्य, किशोरकुमार यांची गाणी अप्रतिम गात असत. मुंबईतल्या निरनिराळ्या संगीतप्रेमींच्या गटांशी त्यांचा खूप जवळून संबंध येत असे. असाच एक गट होता डॉ. प्रकाश जोशी, अनंतराव सप्रे आणि इतर मित्रांचा. त्यांच्या घरी होणाऱ्या अनौपचारिक मैफलींत प्रभुराम खुल्या गळ्याने गायचे आणि ऐकणारे खुष व्हायचे. अशीच एक घरगुती मैफल डॉ. प्रकाश जोशी यांनी नरीमन पॉइंटवरच्या एका आलिशान निवासस्थानात १० मे १९९२ या दिवशी आयोजित केली होती. हे घर होतं सुलतान अर्शद या पाकिस्तानी संगीतप्रेमीचं. आम्ही पोहोचतो त्याआधीच अनिल बिश्वास, त्यांच्या पत्नी मीना कपूर, गीतकार प्रेम धवन, सुप्रसिद्ध निवेदक अमीन सयानी, पत्रकार अंबरीश मिश्र अशी मंडळी उपस्थित झाली होती. उभरती गायिका संजीवनी भेलांडेसुद्धा होती. मैफलीला सुरुवात संजीवनीने गायलेल्या दोन अप्रतिम गाण्यांनी झाली. प्रभुरामांनीही 'जिद्दी' आणि 'फरेब' मधली दोन गाणी म्हटली आणि अनिल बिश्वासांची शाबासकी घेतली. मैफल रंगतच गेली आणि अल्पोपाहारानंतर गप्पांची मैफल रंगली.

मी 'यादोंकी बारात' सोबत घेऊन गेले होते. त्यातलं अनिल बिश्वासांच्या फोटोचं पान उघडलं आणि त्यांनी त्यावर स्वाक्षरी द्यावी अशी विनंती केली. तो फोटो बघून अनिल बिश्वास एकदम खुलले. मी त्यांना विचारलं, ''हा फोटो 'आशाप्रदीप' मधला आहे का?''

''हो,'' ते म्हणाले, ''हा फोटो काढला त्याच्या आदल्याच दिवशी मी रशियाच्या दौऱ्यावरून परत आलो होतो. तिथे अझरबैजानमध्ये मला तिथल्या लोकांनी त्यांचा राष्ट्रीय पोशाख आणि हे वाद्य भेट दिलं. मी इथे आल्यावर तो पोशाख अंगावर चढवला आणि ते वाद्य हातात घेऊन वाजवायला सुरुवात केली, तेव्हाचा हा फोटो. आणि या भिंतीवर जे दिसतं आहे ते माँ सरस्वतीचं मंदिर. माझ्या एका चाहत्यांनी मला देवी शारदेची हस्तिदंतात कोरलेली वीणावादिनी मूर्ती भेट दिली होती. तिची योग्य प्रतिष्ठापना करण्यासाठी मी एका कलाकाराकडून तबला, पखवाज, सतार आणि रुद्रवीणा या वाद्यांच्या सुबक प्रतिकृती तयार करून घेतल्या आणि या वाद्यांच्या मखरात सरस्वतीची मूर्ती बसवली. तिच्या पायाशीच मी माझी संगीताची आराधना करत असे.''

मी पुन्हा एकदा त्यांना विचारलं, ''ही तीच पहिल्या मजल्यावरची खोली आहे का?''

ते म्हणाले, ''हो!''

हे कळल्याबरोबर माझं अंग शहारून आलं! कुठल्या जन्मीचं भाग्य हे की ज्या खोलीत अनिल बिश्वासांनी त्यांच्या अगणित अप्रतिम चाली बांधल्या, जिथे लतादीदींनी आपल्या स्वर्गीय सुरात त्या गळ्यातून उमटवल्या त्याच खोलीत आत्ता मी राहत आहे! मी तरंगतच बाहेर पडले. आज २५ वर्षांनंतरही ही आठवण मला मोहरून टाकते!

*

लेख

# हिंदी फिल्मी संगीताची शास्त्रीय संगीतावर कुरघोडी

★ पं. सुजन राणे (न्यू जर्सी) ★

हिंदी फिल्मी संगीताची हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावर कुरघोडी किती भक्कम किंवा किती कमजोर आहे हे जाणून घेण्यासाठी आपल्याला हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या इतिहासाकडे वळावं लागेल; असं मला वाटतं. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वेदांपासून चालत आलं आहे हे सर्वश्रुत आहे. त्याच्या प्रवासाला साम आणि अथर्व वेदांपासून सुरवात झाली असं नमूद केलं गेलं आहे. संगीत हे त्या वेळी बाल्यावस्थेत व मर्यादित होतं. कारण त्याचा उपयोग घरामध्ये व मंदिरांत काही धार्मिक कार्यासाठी होत असे. पुजारी मंत्रांच्या साह्याने ही कार्ये करत असत. अर्थात त्या मंत्रांचा अर्थ आणि परिणाम ऐकणाऱ्याच्या मनावर व्हावा हाच मुख्य उद्देश असायचा. म्हणजे लोकांच्या सर्वसाधारण मनोरंजनासाठी त्याचा उपयोग होत नसे. त्या अनुषंगाने सा, रे. ग, म प, सारख्या सुरांना धार्मिक रूप होतं, ते केवळ ऐकण्यासाठीच होते, ते गाण्यासाठी नव्हते , म्हणूनच त्या सुरांना श्रुती असं संबोधलं गेलं आहे असं मानायला हरकत नाही. काळाच्या प्रवासात ह्या सुरांचा पद्धतशीर उल्लेख होऊ लागला व पहिल्यांदाच त्याचा उल्लेख भरताच्या ‘नाट्यशास्त्र’ ह्या ग्रंथात सापडतो. हा ग्रंथ अंदाजे (ख्रिस्तपूर्व) दुसऱ्या ते (ख्रिस्तनंतर) दुसऱ्या शतकाच्या काळात लिहिला गेला. ‘नाट्यशास्त्र’ हे मुख्यतः नाट्यकलेशी जास्त संबंधित आहे. परंतु मातंग मुनींच्या ई. स. ५व्या ते ७व्या शतकात लिहिलेल्या ‘ब्रिहद्देशी’ या ग्रंथात ‘राग’ ही एक सांगीतिक कल्पना प्रथमच मांडली गेली आहे. नंतरच्या काळांत शास्त्रीय संगीताची प्रगती कशी झाली हे कळत नाही, कारण कागदोपत्री तसा पुरावा सापडत नाही. तरीसुद्धा शारंङ्देवांच्या ई.स. १३ व्या शतकात लिहिलेल्या ‘संगीत रत्नाकर’ या ग्रंथात शास्त्रीय संगीताबद्दल भरपूर माहिती उपलब्ध आहे. कोमल सुरांचा व मंद्र, मध्य आणि तार सप्तकांचं अस्तित्व ह्या ग्रंथाच्या अगोदर असेल, पण त्याचा पहिल्यांदाच उल्लेख या ग्रंथात सापडतो. या संदर्भात पं. भातखंडे ( १८६० ते १९३६ ) यांनी अपूर्व कार्य केलं आहे यात वाद नाही. पेशाने वकील असूनसुद्धा त्यांनी सर्व हिंदुस्तानात प्रवास करून अनेक गवयांशी चर्चा करून, अनेक रागांच्या चीजा व त्यांचे सरगम पद्धतशीर लिहून ‘हिंदुस्तानी संगीत पद्धती’ या ग्रंथात छापून हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या इतिहासात अमूल्य कार्य केलं आहे.

गेल्या शंभर वर्षात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावर तज्ज्ञांनी अनेक ग्रंथ व लेख लिहिले आहेत, तेव्हा Research Scholar नी त्यावर निर्णयात्मक लिखाण करणं हा त्यांचा प्रांत आहे. मला त्या बाबतीत काही लिहिणं योग्य होणार नाही. फिल्मी संगीताची शास्त्रीय संगीतावर कशी कुरघोडी झाली व संगीताच्या दृष्टीने त्याला माझ्या मते किती महत्त्व आहे हाच माझ्या लेखाचा आशय आहे. कारण हिंदी फिल्म संगीत व त्याचे दिग्दर्शक यांच्याशी लहानपणापासून जवळचा परिचय असल्यामुळे मला माझे विचार मांडणं उचित होईल असं वाटते. हिंदी फिल्म संगीताने शास्त्रीय संगीतावर हळुहळू आक्रमण कसं केलं हे लिहिण्यासाठी माझ्यावर हिंदी फिल्मी संगीताचे

## चारोळी

**-आनंद देशमुख**

**ऑटो ड्रायव्हरच्या लग्नानंतर**
**शेजारी बसली नवरीबाई**
**म्हटला, 'थोडं सरकून घ्या ना**
**आणखी एक सीट बसेल ताई'**

संस्कार माझ्या लहानपणी कसे झाले हे लिहीणं अपरिहार्य आहे. माझे काका सूर्यकांत राणे हे कलकत्त्याच्या सागर मुव्हिटोनचे संगीत दिग्दर्शक होते आणि त्यांनी १९३१ साली 'वीर अभिमन्यू' ह्या बोलपटाचं संगीत दिग्दर्शन केलं होतं (म्हणजे आर्देशीर इराणींच्या १९३१च्या 'आलम आरा' या पहिल्या हिंदी बोलपटानंतर). त्यानंतर माझ्या काकाने १९ हिंदी बोलपटांना संगीत दिलं. ( संदर्भ - 75 Glorious Years of Hindi Cinema By Oza of Screen Publications, Bombay and Harmandir Singh Hamraaz, a scholar from Kanpur U.P. ) बंगाली लोकांचा संबंध आल्यामुळे, त्यांनी 'सुजन' हे माझं बंगाली नाव ठेवलं. १९४७ साली मी माझे दुसरे काका सुंदरराव राणे हे दादरच्या श्री साऊंड स्टुडिओमध्ये रेकॉर्डिस्ट यांच्याकडे राहत होतो. त्यांच्या मुली कविता आणि गांधारी ह्या कोरसमध्ये पार्श्वगायिका होत्या. त्यामुळे आमच्या घरी सुरवातीला शमशाद बेगम, अमीरबाई कर्नाटकी, मन्ना डे व हळुहळू लता मंगेशकर व आशा भोसले यायला लागल्या. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अनिल बिश्वास हे आमचे शेजारी होते व त्यांचा मुलगा प्रदीप माझा मित्र असल्यामुळे मी त्यांच्या घरी वारंवार जात असे. एकदा त्यांच्या घरी प्रसिद्ध पार्श्वगायक तलत मेहमूद 'ऐ दिल मुझे ऐसी जगा ले चल जहां कोई भी न हो' या गाण्याची तालीम करत होते. या गाण्याची चाल अनिलजीने बांधली होती आणि त्यामुळे तलत हे एका रात्रीत प्रसिद्धीच्या झोतात आले. तलतना मुंबईतल्या इतर संगीत दिग्दर्शकांनी नापास केलं होतं कारण त्यांच्या आवाजात कंप होता. तसंच मी माझ्या चुलत बहिणींबरोबर त्यांच्या गाण्याच्या तालमीसाठी संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र व वसंत देसाई यांच्या शिवाजी पार्कजवळच्या घरी जात असे. हळुहळू मी माझ्या बहिणींबरोबर फिल्मिस्तान, मोहन व एच. एम. व्ही. अशा स्टुडिओत जाऊ लागलो. त्याचप्रमाणे माझ्या किशोर राणे ह्या चुलत भावाबरोबर मी दादरच्या श्री साउंड स्टुडिओत जात असे , कारण तो तिथला साऊंड रेकॉर्डिस्ट होता व त्याने अनेक ट्रॉफीझ मिळवल्या होत्या. अमिताभ बच्चनचा गाजलेला बोलपट 'जंजीर'चे डायलॉग त्याने रेकॉर्ड केले होते व त्याचं नाव बोलपट सुरू व्हायच्या अगोदर पडद्यावर दाखवण्यात येते. अशाच प्रकारे माझ्यावर हिंदी फिल्म संगीताच्या संस्काराची भर पडत गेली. माझ्या बहिणींच्या गाण्याच्या तालमींमुळे मला अनेक संगीत दिग्दर्शकांचं संगीत चाली बांधताना जवळून अनुभवायला मिळालं. त्यापैकी अनिल बिश्वास, नौशाद, गुलाम हैदर, गुलाम मोहंमद, खेमचंद प्रकाश, ज्ञान दत्त व चित्रगुप्त हे नावाजलेले दिग्दर्शक होते. पुण्याला एकदा सुधीर फडक्यांच्या घरी 'वाहिनीच्या बांगड्या' ह्या श्री आठवले दिग्दर्शित बोलपटाच्या चाली ऐकण्याचं भाग्य लाभलं होतं. मुंबईला एच. एम. व्ही. स्टुडिओत सी. रामचंद्रांच्या गाण्याच्या तालमी अनेक वेळा ऐकायची संधी येऊन गेली. एका गाण्याच्या तालमीला लता मंगेशकर व सरस्वतीबाई राणे यांना ऐकायला मिळालं (सरस्वतीबाई राणे ह्या मशहूर शास्त्रीय संगीत गवई खांसाहेब अब्दुल करीम खानच्या कन्या होत्या.) माझ्या आठवणीप्रमाणे प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे वडील अल्लारखां हे अंधेरीच्या मोहन स्टुडिओत ए. आर. कुरेशी या नावाने नोकरी करत होते. अनेकदा ऑर्केष्ट्रामधले इतर कलाकार त्यांना तालमींच्या मध्यंतरात तबला वाजवायला सांगायचे आणि अल्लारखांसाहेब तबला सोलो मोठ्या दिमाखात पेश करायचे.

खालील हिंदी फिल्मस्ची गाणी आणि अशी कित्येक फिल्मी गाणी शास्त्रीय संगीतावर आधारलेली आहेत, म्हणून ती लोकांना अजूनसुद्धा आवडतात.

हरी ओम हरी ओम - बैजू बावरा १९५२- राग मालकौंस - संगीत नौशाद.

ओ दुनिया के रखवाले - बैजू बावरा १९५२ --राग दरबारी - संगीत नौशाद.

ये जिंदगी उसी की है - अनारकली १९५३- राग भीमपलास - संगीत सी. रामचंद्र

## वात्रटिका
### रांग

दुकान उघडायची वाट पाहत पब्लिक होतं दारात,

दुकान उघडताच रांगेत सगळे पैसे घेऊन हातात.

गुटखा, तंबाखू, सिगरेट, विडी-व्यसनांचा बाजार,

यम म्हणाला, ''तिथल्या देखील रांगेत राहा तयार

**डॉ. सुमन नवलकर**

जो तुम तोडो पिया- झनक झनक पायल बाजे १९५५- राग भैरवी - संगीत वसंत देसाई.

नैनसो नैन नही मिलाओ - झनक झनक पायल बाजे १९५५-- राग बागेश्री- संगीत वसंत देसाई

तेरे सूर और मेरे गीत - गुंज उठी शहनाई १९५९- राग बिहाग -संगीत वसंत देसाई

कहदो कोई ना करे प्यार - गुंज उठी शेहनाई १९५९- राग जोगिया - संगीत वसंत देसाई.

१९४० ते १९७० काळात हिंदी फिल्म संगीताने शास्त्रीय संगीतावर बरीच कुरघोडी केली आणि ती गाणी लोकांच्या हृदयाला आजपर्यंत भिडत आली आहेत याचं मुख्य कारण ती शास्त्रीय संगीतावर व जुन्या भोजपुरी रचनांवर आधारलेली होती. शास्त्रीय संगीत हाच त्यांचा आत्मा होता. ती शास्त्रीय संगीतापासून विशेष वेगळी नव्हती. १९७० नंतर हिंदी फिल्म संगीत हळुहळू बदलत चाललं. ते भारतीय राहिलं नाही. पश्चिमी संगीत व त्याचे ताल हिंदी फिल्म संगीतात घुसायला लागले होते. लोकांची जीवनशैली बदलायला लागली. संगीत जलद ऐकण्याची लोकांना सवय लागली. गती हेच आयुष्याचं मुख्य धोरण होऊन बसलं. अशा परिस्थितीत शास्त्रीय संगीताचा केंद्रबिंदू 'लय' ही शर्यत हरू लागली. लोकांना शास्त्रीय संगीत ऐषारामाच्या व सावकाश वातावरणात ऐकायला कठीण होऊन बसलं. छोटा मंच आणि घरगुती व खाजगी वातावरण जिथे शास्त्रीय संगीत फुलत होतं तो प्रांत सिनेमागृहं, टी. व्ही, यु ट्यूब आणि कम्प्युटरसारख्या आधुनिक साधनांमुळे मागे पडायला लागला. परंतु हिंदी फिल्म संगीत शास्त्रीय संगीताला नष्ट करू शकलं नाही.

सर्वसाधारण लोकांच्या मनोरंजनाच्या दृष्टीने त्याची आघाडी गेली काही दशकं पुढे आहे यात वाद नाही. पण पारंपारिक शास्त्रीय संगीताबरोबर त्याची बरोबरी होऊ शकत नाही. याला काही ठोस कारणं आहेत आणि ती म्हणजे हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत वेदकालीन असून त्याला गेल्या जवळजवळ ८०० वर्षात भक्कम पाया लाभला आहे. अमीर खुसरो, स्वामी हरिदास आणि ध्रुपद धमार ते ख्याल गायकीच्या घराण्यापर्यंत त्याला एक प्रकारचं शास्त्रीय रूप प्राप्त झालं आहे. त्यात एक शिस्त दिसून येते. ती शिस्त सूर, ताल व लय ह्या तीन बंधनात बांधली गेली आहे व एखाद्या रचनेत त्याची बढत एकाच वेळी चालू असताना स्पष्ट दिसून येते. ती शिस्त इतर कुठल्याही संगीतशास्त्रात दिसत नाही. ही शिस्त गेली कित्येक शतकं चालत आली आहे. त्याची पाळंमुळं भारतीय संगीतप्रेमींच्या हृदयात खोल रुतून बसली आहेत. ती हिंदी फिल्म संगीतासारखी क्षणिक सुख देणारी नाही. तेंव्हा १९८० नंतरचे हिंदी फिल्म संगीत कितीही पुढे गेलं तरी ते शास्त्रीय संगीताच्या पुढे जाऊ शकत नाही. त्याला भरपूर स्वातंत्र्यात जगण्याची सवय झाली आहे आणि ते ही शिस्त पाळायला तयार नाही. या संदर्भात एक मुद्दा उपस्थित होतो तो म्हणजे १९८० पासून तरुण पिढीच्या कानावर चांगलं शास्त्रीय संगीत पडलं नाही, म्हणजे या बाबतीत त्यांचं जगणं मर्यादित होतं. नोकरीच्या निमित्ताने ते पाश्चिमात्य देशांत फिरल्यामुळे त्यांना तिथल्या संगीताचा सराव असणं साहजिक आहे. ते आपोआप कर्कश आवाजाच्या प्रवाहात वाहत गेले तर तो त्यांचा अपराध नाही. वेळोवेळी त्यांच्या कानावर जर चांगलं शास्त्रीय संगीत पडलं असतं तर ते तिकडे ओढले गेले असते, परंतु वस्तुस्थिती निराळी होती. असो.

लहानपणापासून फिल्म संगीताशी आलेला संबंध व नंतर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताची दीर्घ तालीम व ते संगीत भरपूर ऐकण्याची संधी या दोन गोष्टींच्या संस्कारामुळे मी ह्या लेखाच्या आशयावर विचार करायला प्रवृत्त झालो. गेल्या १५/२० वर्षात खालील नावाजलेल्या संस्थामध्ये मला गाण्याची संधी मिळाली. श्रोतृवर्गात बहुदा जेष्ठ नागरिक असायचे. तरुणांचा अभाव जाणवायचा. पण समाधानाची गोष्ट अशी होती की शास्त्रीय संगीत ऐकण्यासाठी एक ठराविक मर्यादित वर्ग होता, तो जाणकार होता.

आजच्या परिस्थितीतसुद्धा अनेक तरुण आर्थिक लाभाचा विचार न करता शास्त्रीय संगीत आत्मसात करण्याच्या मागे आहेत. ही कितीतरी मोठी गोष्ट आहे. संस्था अशा-

काशी विश्व हिंदू विद्यापीठ, वाराणसी

टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई

आय.टी.सी. संगीत रिसर्च अकादमी, कलकत्ता.

कला अकॅडमी, गोवा.

मडगाव संगीत समारोह, गोवा.

किराणा संगीत अकॅडमी, बंगळूर

इन्स्टिटयूट ऑफ वर्ल्ड कल्चर, बंगळूर.

स्वरसाधना समिती, मुंबई.

उपवन संगीत समारोह, ठाणे, मुंबई .


स्वामी वल्लभ संगीतालय, सायन, मुंबई.

या लेखाचा सारांश एवढाच आहे की सध्याच्या हिंदी फिल्मी संगीताने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताला काही काळासाठी तडा गेला असेल. पण तो तडा कितपत टिकेल हे काळच ठरवेल. कारण पारंपारिक संगीताला महत्त्वाचं स्थान आहे. शास्त्रीय संगीताची परंपरा गेली ८०० वर्षं- अमीर खुसरोपासून ते स्वामी हरिदास, धृपद गवई, ख्याल गाणारे अब्दुल करीम खान, अल्लाहद्दिया खान, फय्याज खान, बडे गुलाम अली खान, पं. पलुस्कर, भास्करबुवा बखले, भीमसेन जोशी, फिरोझ दस्तूर, गंगूबाई हंगल व हिराबाई बडोदेकरपर्यंत चालत आली आहे. मी म्हणेन माणसाच्या जीवनात कुठल्याही क्षेत्रात परंपरेला अढळ स्थान आहे. जर आपण परंपरा विसरलो तर त्याचा अर्थ असा होतो की आपण इतिहास विसरलो, म्हणजे आपण पुढचं जीवन दिशाहीन जगायला लागलो आहोत असा होऊ शकतो .

(Email : panditsujanrane @gmail.com )

*

## अर्थचित्र



कथा

# अगतिक

**✶ उज्ज्वला र. ब्रह्मांडकर ✶**

''आकांक्षा, मी सोसायटीच्या मीटिंगला जातोय''... अभिजीत म्हणाला.

''बरं..''

अभिजीत बाहेर पडला. सेक्रेटरी देसाईंच्या घराच्या दिशेनं तो गेला. देसाईंच्या घरी तो पोहोचला तेव्हा तिथं कुणीच नव्हतं. देसाईंच्या घराचा दरवाजा उघडा होता. अभिजीतनं आत डोकावून बघितलं...

समोरासमोरच्या दोन्ही भिंतींच्या लगत खुर्च्या मांडलेल्या होत्या आणि एका बाजूला खुर्च्यांशी काटकोन साधत एक टेबल होतं..

अभिजीतनं बेल वाजवली. आतल्या खोलीतून देसाई बाहेर आले.

''या या... बसा'' - देसाईंनी अभिजीतचं स्वागत केलं.

''मीच पहिला वाटतं?''

''हो.....'''

''आत्ताच आहे नं मीटिंग?''

''हो ना!''

''मला वाटलं की मी फारच लवकर आलो.'''

''छे! आत्तां दहा मिनिटात मीटिंग सुरू होईल... येतीलच सगळे'' - देसाई म्हणाले आणि टेबलालगतच्या खुर्चीवर बसले.

अभिजीतनं जवळच पडलेला पेपर उचलला आणि त्यावरून तो नजर फिरवू लागला.

तेवढ्यात देशपांडे म्हणाले, ''या... तुम्हाला निरोप मिळाला की नाही हे कळत नव्हतं.''

''थँक्स हं निरोप पाठवल्याबद्दल'' ती बाई म्हणाली.

तिचा आवाज ऐकल्याबरोबर अभिजीत दचकला. चटकन पेपरमधून नजर काढून अभिजीतनं त्या बाईकडं बघितलं...

आणि अभावितपणेच तो म्हणाला -

''अनुपमाऽऽ तू ऽऽ? इथे ऽऽ?''

''हो. मीच... आश्चर्य वाटलं का तुला?''

''अं..''... अभिजीतला काय बोलावं ते सुचेना.

''मीच बोलावलंय त्यांना'' देसाई म्हणाले आणि पुढं त्यांनी अभिजीतकडे बघून खुलासा केला. ''तुमचा फ्लॅट आता त्यांच्याच नावावर आहे.''

''हो बाबांनी माझ्याच नावावर ठेवलाय तो फ्लॅट. मी मनात म्हटलं - राहू द्यावं तुला तिथं. बाबा गेले नी लगेच भावाला हाकललं असं कुणी मला म्हणू नये म्हणून गप्प बसले... पण आता हे बिल्डींग पाडून नवीन बिल्डींग बांधायचं ठरतंय... त्यामुळे या मीटिंगला हजर राहणं मला क्रमप्राप्तच होतं. मला एकटीला येता येत नाही म्हणून मिस्टरांनासुद्धा सोबत घेऊन त्यांच्या आधारानं कशीबशी चालत मोटारीपर्यंत पोहोचले नी आले...''

अभिजीत गप्पच बसला.

थोड्याच वेळात सोसायटीचे सगळे सभासद तिथं जमले. त्यात एक अनोळखी माणूसही होता. देसाईंनी बोलायला सुरुवात केली -

''आजची ही मीटिंग कशासाठी आहे हे तुम्हा सगळ्यांना माहीत आहेच. आपली बिल्डींग जुनी झाल्यामुळे ती पाडून तिथं नवी इमारत उभी करायची आहे.. म्हणून आपल्या मागच्या मीटिंगमध्ये ठरल्याप्रमाणे बिल्डर देशपांडेंना बोलावलं आहे. ते आपल्याला नवीन इमारतीसंबंधी माहिती देतील.''

देशपांडेंनी बोलायला सुरुवात केली...

या नवीन बिल्डींगमध्ये चौदा मजले असतील... आत्ताची ही तुमची बिल्डींग तीन मजल्यांची आहे. तुम्हाला प्रत्येकाला नवीन बिल्डींगमध्ये जागा मिळेल... तुमची आहे त्यापेक्षा थोडी जास्त....''

## चारोळी

**-आनंद देशमुख**

आग लागली घराला पण
तो वाचवू नाही शकला
रात्रभर फायरब्रिगेडला
मिसकॉल करत बसला

''म्हणजे कार्पेट की बिल्टअप की सुपर बिल्टअप?''

''आम्ही ते नंतर सांगू. आपण सगळ्या मुद्यांवर नंतर विस्तारानं चर्चा करूच. तुमचे प्रश्न विचारा... सर्वांना आमची योजना आवडली तरच पुढे बोलू... नाही तर नाही.''

''ही इमारत पाडल्यावर आम्हाला रहायला कोणती जागा मिळेल?

''तुमच्या सगळ्यांच्या राहण्याची व्यवस्था होईल.''

''नवीन इमारत किती दिवसात पुरी करणार?''

''दोन वर्ष लागतील.''

''दोन वर्ष आम्हाला या जागेच्या जवळच पर्यायी जागा हवी...''

''सगळ्यांनाच जवळ देता येणार नाही.''

........सगळ्यांची प्रश्नोत्तरं चालूच होती... थोड्या वेळानं अनुपमानं बोलायला सुरूवात केली.

''मी अनुपमा वैद्य. अभिजीत दळवींची बहीण.... दळवी रहातायत तो फ्लॅट माझ्याच नावावर आहे. पण आत्ता तिथं दळवी आणि त्यांचे कुटुंबीय राहतायत. तुम्ही पर्यायी जागा अभिजीत दळवींना द्याल... हो ना?''

''अर्थातच'' - बिल्डर देशपांडे उत्तरले - ''जे लोक या इमारतीमध्ये राहतायत त्यांनाच पर्यायी जागा आम्ही देऊ.'' दळवी सोडले तर बाकीचे सगळे त्यांच्या त्यांच्या फ्लॅटस्चे मालकच आहेत. लीव्ह अँड लायसन्सवाले असते तर त्यांच्या मालकांच्या परवानगीने काय तो निर्णय घेता आला असता. पण दळवींचा फ्लॅट त्यांच्या वडिलांच्या नावावरचा...''

''पण आता तो माझ्या नावावर आहे. म्हणूनच कायद्यानं पर्यायी जागा मलाच मिळायला हवी...''

''तसं झालं तर आम्ही कुठं रहाणार..?'' अभिजीतनं विचारलं.

''हे बघा मिसेस वैद्य, तुम्हाला पर्यायी जागा हवीच कशाला?'' - देशपांडेंनी विचारलं.

''माझे डॉक्टर ह्याच एरियातले आहेत. मला वारंवार औषधासाठी इथं यावं लागतं. म्हणून मला या फ्लॅटची अत्यंत गरज आहे.''

''तुम्ही नंतर नवीन फ्लॅटची मागणी कराल.''

''अर्थातच. बाबांनी मृत्यूपत्राद्वारे तो मलाच दिलाय. फक्त कायदेशीररीत्या तो माझ्या नावावर होणं बाकी आहे.''

''दळवींचा फ्लॅट पाचशे स्क्वे. फीटचा आहे. त्यांना पर्यायी फ्लॅट तेवढाच व नवीन फ्लॅट थोडा मोठा मिळेल.''

''नाही नाही. ते चालणार नाही. तुम्ही ती जागा आम्हा दोघांना विभागून अर्धी अर्धी द्या.'' - अनुपमा म्हणाली.

''ते मुळीच शक्य नाही. तुम्हाला अशी विभागून जागा दिली तर सोसायटीच्या बाकीच्या सदस्यांना जिथं ती त्यांच्या वडिलांच्या नावावर होती आणि आता त्यांच्या नावावर आहे, त्या सगळ्यांच्या भाऊबंदांनाही द्यावी लागेल. माझ्याकडे जो प्लॉट आहे त्यात एवढ्या छोट्या फ्लॅट्सची तरतूदच नाहीय. तुम्ही आणि तुमचे भाऊ आपापसात काय ते ठरवा.'' बिल्डर म्हणाले.

''एकतर मला फ्लॅट हवा किंवा आहे तो फ्लॅट विकला जाऊन त्याचा अर्धा वाटा मला हवा...''

''ते सुद्धा तुम्ही तुमच्यातच ठरवा...'' बिल्डर म्हणाले.

शहा म्हणाले - ''तुम्ही तुमचा फ्लॅट विकत असलात तर मी घ्यायला तयार आहे...''

''मी विचार करून कळवतो.'' अभिजीतनं शहांना सांगितलं.

बऱ्याच वेळानं बरीच उलटसुलट चर्चा सगळ्याच लोकांबरोबर करून देसाईंनी मीटिंग संपल्याचं जाहीर केलं...

अभिजीत घरी जाण्यासाठी उठला...

अनुपमानं त्याला हाक मारली नी म्हणाली...

''हे बघ दादा, मला या फ्लॅटचा वाटा हवा म्हणजे हवा''

''मी विचार करतो नी तुला कळवतो...''

## वात्रटिका

### व्हॉटस्‌ॲप

व्हॉटस्‌ॲप वर त्याने तिला 'आय लव्ह यू' म्हटलं,

व्हॉटस् ॲप वर तिने त्याला 'लव्ह यू टू' केलं.

विवाहाच्या पत्रिकाही व्हॉटस्‌ॲपवरच गेल्या

पब्लिकनेही अहेर खुशाल व्हॉटस्‌ॲपवरच केला

**डॉ. सुमन नवलकर**

''नाऽऽही.... मला आत्ताच काय तो निर्णय सांग..''

''अगं, आकांक्षाचा विचार घ्यायला नको का?''

''घे ना... पण आत्ताच... आम्ही दोघं तुझ्याबरोबर आत्ताच येतो.''

असं म्हणून अनुपमा नवऱ्याबरोबर देसाईंच्या घरातून निघून अभिजीतच्या घराच्या दिशेनं निघाली सुद्धा!

अभिजीत नाईलाजानं तिच्या मागून स्वत:च्या घरी पोहोचला.

अभिजीतनं बेल वाजवली. आकांक्षानं दरवाजा उघडला. समोर अभिजीतबरोबर अनुपमाला बघून ती जास्तच गोंधळली. अभिजीत घरात शिरला. त्याच्या मागोमाग अनुपमा नवऱ्याबरोबर आत शिरली...

अनुपमा आणि तिचा नवरा कोचावर आरामात स्थानापन्न झाले. लगेच अनुपमानं सुरुवात केली..

''विचार आता तुझ्या बायकोला घराचं काय करायचं ते....''

आकांक्षा बघतच बसली. तिच्या मनात आलं - मामंजी असतानाही नी नंतरही एवढी वर्ष ही भावाला विसरली... साधी विचारपूसही तिनं कधी केली नाही आणि आता बहिणीच्या हक्कानं घरावर हक्क सांगायला आली...

''आकांक्षा'' अभिजीतनं बोलायला सुरुवात केली... बिल्डर नी अनुपमाचं म्हणणं त्यानं आकांक्षाला सांगितलं... आणि तो म्हणाला - '' सांग आता काय करायचं ते? खरं तर हा फ्लॅट विकावा लागणार. आपल्याला दुसरा पर्यायच नाही... कारण बिल्डर दोन फ्लॅट्स देणार नाही...''

''दादा, तुला एक काम करता येईल... ज्यामुळं तू इकडे राहूही शकशील आणि मला पैसेही मिळतील....''

''ते कसे?'' - अभिजीतनं विचारलं.

''तू नवा फ्लॅट ठेव... मला फक्त अर्धी किंमत दे.''

''पण आता बिल्डर आपल्या दोघांना पर्यायी जागा देत नाहीय नं?''

''ते ही खरंच... मग तर तुला ही जागा आधीच विकल्याखेरीज पर्यायच नाही.''

''मला थोडी मुदत दे... गिऱ्हाईक तर मिळू दे...''

''शहा घ्यायला तयार आहेत की! मघाशीच म्हणाले ना ते?''

''पण ते जी किंमत देतायत ती पटायला नको का?''

अभिजीतनं शंका काढली.

''हे बघ, जागेची किंमत सरकारी अधिकाऱ्याकडून मी काढलीय... त्याप्रमाणे ती रक्कम एवढी'' - असं म्हणून तिनं एक कागद अभिजीतच्या हातात सरकवला आणि ती पुढे म्हणाली - 'फ्लॅट माझ्याच नावावर आहे. खरं तर सगळ्याच रकमेवर माझाच हक्क आहे. पण तुझ्यावर दया दाखवून मी सांगते की किंमतीच्या साठ टक्के रक्कम मला मिळायलाच हवी...''

''अगं पण साठ टक्के तुला दिल्यावर उरलेल्या चाळीस टक्के किंमतीत मला कुठे जागा मिळणार?'' - अभिजीतनं विचारलं

''तो तुझा प्रश्न आहे. इतकी वर्ष मी तुला राहू दिलं हे माझे उपकारच आहेत'' - अनुपमा गुर्मीत म्हणाली.

''ठीक आहे.... बघतो काय करायचं ते...''

''अं हं! आत्ताच त्या शहांना बोलाव नी पक्कं कर... नाहीतर तुला मी या फ्लॅटमधून कायदेशीररित्या हुसकावून लावू शकतो.'' अनुपमाचा नवरा अडेलतट्टूपणानं म्हणाला.

मुकाट्यानं त्यांचं म्हणणं मानण्याखेरीज अभिजीतजवळ पर्यायच नव्हता... त्यानं शहांना फोन करून ताबडतोब कळवलं नी येण्याची विनंती केली... शहा लगेचच आले.

''शहा, तुम्ही हा फ्लॅट घ्यायला तयार आहात, तर मग आत्ताच ह्याच बैठकीत ते ठरवा.... मला ही किंमत हवी'' अभिजीतनं त्यांना अनुपमानं दिलेला कागद दाखवला.

''छे! मी एवढे नाही देणार...''

''पण हीच ह्या फ्लॅटची किंमत आहे'' - अनुपमा ठासून म्हणाली -

''अं हं! मी मुळीच एवढे देणार नाही... पटत असेल तर बघा... नाहीतर मी चाललो'' शहा म्हणाले.

''नको... तुम्ही म्हणाल तेवढे चालतील'' अनुपमाच्या नवऱ्यानं परस्पर होकार देऊन टाकला.

त्यांनी कितीही दिले तरी मी सांगितलेल्या किंमतीच्या साठ टक्के रक्कम कला आत्ताच्या आत्ता हवी... तरच मी हा फ्लॅट विकायला लेखी परवानगी देईन.'' अनुपमा म्हणाली.

अभिजीतनं अगतिकतेनं आकांक्षाकडे बघितलं... तिच्या डोळ्यात फक्त अश्रू होते...

''आणि मला सगळे पैसे चेकने हवेत...'' अनुपमा दर सेकंदाला तिच्या अटी घालतच होती -

शहांनी खिशातून चेकबुक काढलं... ''अभिजित, काय करू? या म्हणतायत तेवढ्या रकमेचा चेक त्यांना देतो. उरलेल्या रकमेपैकी मी अर्धे चेकनं देतो नी अर्धे रोख देईन. चेक आत्ता देतो. रोख रक्कम नंतर देईन...''

''तर मग अनुपमा, तुलाही नंतरच चेक मिळेल.''अभिजित म्हणाला.

''नाऽऽही... नाहीतर मी लेखी परवानगी देत नाही जा''..

.... अभिजीतच्या नाईलाजाची व्याप्ती अनुपमा क्षणोक्षणी वाढवतच होती. शहांनी दोघांना चेक्स दिले आणि विचारलं - अभिजित, तुम्ही ही जागा कधी रिकामी करताय? मी फक्त चार दिवस थांबेन. रोख रक्कम तेव्हा देतो.''

''प्लीज मला आठवडा तरी द्या...''

''ठीक आहे. हे सामान तुम्ही विकणार असलात तर तेही मी घ्यायला तयार आहे.'' असं म्हणून शहा निघून गेले. शहांच्या पाठोपाठ अत्यानंदानं अनुपमासुद्धा निघून गेली.. अभिजित आणि आकांक्षा सुन्न झाले होते...

''आकांक्षा, आपला निषाद घर सोडून गेला चार वर्षांपूर्वी तेव्हापासून एकमेकांचा आधार घेत आपण राहिलो. पुन्हा एकदा देवानं हा आघात केला. आता आपण वृद्धाश्रमात राहायला जाऊ. आणि हे सामान विकून टाकू. शहासुद्धा घ्यायला तयार आहेत. ते पैसेही जगायला उपयोगी पडतील...''

आकांक्षाची नजर त्या छोटेखानी संसारावरून फिरू लागली.. ''अहो इकडच्या प्रत्येक वस्तूला इतिहास आहे. या सगळ्या वस्तूंशी निगडीत आठवणींच्या रांगोळ्या आहेत... कधीच न पुसल्या जाणाऱ्या त्या आठवणींमध्ये भावनांचे रंग आहेत.'' बोलता बोलता आकांक्षाच्या डोळ्यातून अश्रूंचा महापूर वाहू लागला...

''आकांक्षा रडू नकोस. भावनांचे रंग वाहू देऊ नकोस. हे रंग, ही रांगोळी आठवतच आपल्याला. आपलं पुढचं आयुष्य जगायचं आहे...''

''आता जगण्यासारखं काय उरलंय अभिजीत? निषाद कधीतरी या घरट्याकडे परतेल या आशेवर कसेतरी दिवस काढले आपण... आता निषाद परतला तरी त्याला सामवून घ्यायला हे घरटं नसेल नी त्याला आपल्या पंखांखाली घेण्याएवढे आपले पंख मजबूत नसतील...'' आकांक्षा ओक्साबोक्शी रडू लागली... अभिजितच्या मनात आलं; बायका निदान रडून तरी आपलं मन हलकं करू शकतात... पण पुरुषांचं मन जडशीळ होतं नी तसंच राहातं.

''आकांक्षा, तुला हवं तर आपण लांब कुठेतरी छोटेखानी घर घ्यायचं का फक्त एक किंवा दोन खोल्यांचं?''

''नको अभिजीत. पुन्हा नव्यानं संसार मांडायची उमेद माझ्यात नाही. आत्ताच मनाला विरक्ती आलीय. वृद्धाश्रमात चार चेहरे दिसतील, जीवंतपणाची खूण दिसेल... तेवढा जीवंतपणा

## चारोळी

**-आनंद देशमुख**

काळ्याकुट्ट ढगालाही  
असते सोनेरी किनार  
घर छोटं असू द्या पण  
मन असावं मिनार

आयुष्य रेटायला पुरेसा होईल...''

''आता नात्यांबद्दलची घृणाच मनात भरून राहिलीय. निषादच्या मनातला नात्यांबद्दलचा तिरस्कार, अलिप्तपणा आत्ता कळतोय. लहान वयात त्यानं ही विरक्ती अनुभवली. पण त्याला ती पेलवली नाही. आणि त्या विरक्तीची जागा रागानं घेतली. माणूस जवळच्या नात्यांवरच राग काढू शकतो. त्यानं आपल्यावर राग काढला कारण फक्त आपणच त्याचे जवळचे होतो. हे आपल्याला उमगलंच नाही गं. आपलाही राग त्याच्यावरच निघाला.

मागे माझा दादा सांगत होता त्याच्या मुलांच्या मनातले विचार. त्यांच्या मते आईवडील नी मुलं त्यांच्या विश्वात आणखी कुणालाही डोकावायचा सुद्धा अधिकार नसतो. आज पटतंय की ते खरंय.. मागची पिढी पुढच्या पिढीला शिकवण्याचा प्रयत्न करते. पण खरं तर पुढची पिढीच मागच्या पिढीला खूप काही शिकवत असते... पण ते कळायला खूप खूप उशीर होतो.'' .... आकांक्षा म्हणाली.

''चला, आवराआवर करूया. आपल्या जवळच्या मित्रांना काय सांगायचं ते ठरवूया... काय मजा आहे बघ... नेहमी खरं बोलायाचा आग्रह धरणारे आपण... आता आयुष्याच्या उतारावर खोटेपणाचं बोट धरून चालणार... लोकांना तसंच वाटणार नं? आपण सांगू ते खरंच असणार. पण त्यामागची परिस्थिती, आपण दुसरीकडे जाण्याचं कारण लोकांना पटणार तर नाहीच, कळणारही नाही. फक्त खोटेपणाचं लेबल लावून लोक मोकळे होतील!

''लोकांचा विचार नका करू अभिजीत. लोकांनी लेबल काहीही लावलं तरी आपलं खरेपणाचं सोनं कधी ना कधी तरी चमकणारच... तेव्हा ते लेबल लावणाऱ्यांनाच पश्चात्ताप होईल....'' आपल्या आयुष्याच्या काळोखाची पहाट होईलच नं?''

दोघंही शून्यात नजर लावून बसले... कधी ती पहाट उगवेल याची न संपणारी वाट पाहात... नी लावल्या जाणाऱ्या लेबलकडे अगतिकतेनं बघत...

*

## व्यंगचित्र



❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# ठोकताळे

**✶ सुमन नवलकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

तो नेहमी म्हणतो तिला, ''पाहिलंस ना? त्या सानेबाई नोकरी करत होत्या, तरी त्यांचा जयदीप कसा नेहमी उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत होत शेवटी डॉक्टर झाला, मग पुढे एम. डी. ही केलं त्याने. नाहीतर तू सतत घरी असायचीस. पण आपल्या अंकितने काय दिवे लावले!'' ती मग अंतर्मुख होऊन दिवस-दिवस विचार करत राहते. 'आपलं चुकलं तरी काय? संगोपनात आपण कुठे कमी पडलो? संस्कारांत कुठे काय राहून गेलं?' एके दिवशी तिला उत्तर सापडलं. अगदी अचानकच. रोहिणी, शाळेतली जुनी मैत्रीण भेटली. लवकर लग्न होऊन पटकन आई झालेली. म्हणाली, ''मी शिकले नाही ना गं जास्ती? तेव्हाच ठरवलं होतं, आपल्या मुलांना खूप खूप शिकवायचं. आणि बघ, माझे दोन्ही मुलगे इंजीनियर झाले आणि मुलगी डॉक्टर झाली.'' मुलाला खूप-खूप शिकवायचं तर तिनेदेखील ठरवलं होतं. अंकित तर खूप हुशारदेखील होता. पण कुठल्या शाखेला जायचं याचा हिशोब चुकला? की घरात अचानक उभ्या राहिलेल्या असंख्य अडचणींना तोंड देता-देता अंकित महत्त्वाच्या वर्षांमध्ये दुर्लक्षिला गेला? मग एकाच शब्दात तिला सर्व प्रश्नांचं उत्तर सापडतं - 'नशीब'.

'माणूस स्वतःच्या भविष्याचा - नशिबाचा शिल्पकार असतो.' तिने शाळेत असताना निबंधाच्या वहीत लिहिलं होतं. 'कर्तृत्व नशिबाहून श्रेष्ठ असतं' हा विचार शाळेत एका चर्चासत्रात तिने पोटतिडकीने मांडला होता. प्रत्यक्षात मात्र ठोकर घेत-घेत भिरभिरलेल्या आयुष्यासाठी ती एकाच गोष्टीला जबाबदार धरत होती - 'नशीब'

छान रंग आलेल्या, अर्काच्या सुगंधाने दरवळलेल्या चहात दूध घातल्यावर नासल्यासारखा तवंग यावा आणि चहा प्यायची इच्छाच मरून जावी - तसं होत राहिलं पुन्हा पुन्हा. मग दोष कुणाला द्यायचा? नासलेल्या दुधाला की अचानक वाढलेल्या उन्हाळ्याला? ''बरोबर भांडं न घासलेल्याला'' असं म्हणूच शकत नाही ती. कारण दुधाची पिशवी कापण्यापूर्वी दुधाचं भांडं ती स्वतः पुन्हा घासून घेते. अशाही वेळी नवरा म्हणतो, 'अती स्वच्छतेचा परिणाम.'

तिला आठवतं, अंकित लहान बाळ असताना ती कायम दुधाच्या बाटल्या, पाण्याच्या बाटल्या उकळून घ्यायची. स्वयंपाकघराच्या खिडक्या बंद ठेवून जेवण बनवायची. अंकितला भरवताना हात साबणाने स्वच्छ धुवून घ्यायची. तरीही अंकित सतत अजारी असायचा. या उलट सतत याच्या त्याच्या कडेवर असणारी, कोणी काही देईल ते मटकावणारी शेजारची मिहिरा कायम गुटगुटीत. अंकितपेक्षा दोन महिन्यांनी लहान, पण दिसायची सहा महिन्यांनी मोठी. तेव्हाही सासूबाई म्हणायच्या, ''अती तिथे माती असते हो सूनबाई''.

एकदा अचानक तिच्या मनात प्रश्न उमटला, ''रोज या - त्या गौळणींच्या शिंक्यांमधलं दूध-दही मटकावणारा कृष्ण आजारी पडला तर यशोदा कोणाला दोष देत असेल? कुठल्या गौळणीच्या अस्वच्छतेवर बोट ठेवत असेल? की आपण त्याला उखळाला नीट बांधू शकलो नाही म्हणून स्वतःला जबाबदार धरत असेल? नशीब की अशा वेळी देवकी पोहोचत नव्हती तिला ऊठसूट दोषी ठरवायला.''

आणि मग अचानकच एके दिवशी तिच्या डोक्यात भिरभिरणारं कोडं सुटलं. तिला दोन भाऊ.

ती स्वत: मिळून तिच्या आईला ही तीन मुलं. आईने तिघांनाही सारखंच वाढवलं. तिघांचं सारखंच संगोपन केलं. तिघांच्याही जेवणाखाण्याच्या आवडी पुरवल्या. शैक्षणिक गरजा भागवल्या. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जीवाचा आटापिटा केला. पण एक भाऊ एक टोक. अती बुद्धिमान निघाला. दुसरा बुद्धिमानही आणि मेहनतीही. आणि ती स्वत: ना अती बुद्धिमान, ना अती मेहनती. हे कसं काय?

तिची चारूमावशी. ती लहानपणी सतत आजारी असायची, ती पंच्याऐंशी वर्ष जगली. याउलट निरोगी असलेली सुलभामावशी बासष्टाव्या वर्षी अचानक गेली. हे कसं काय?

मग तिने मनाला पक्कं समजावलं, ‘हे मानवी जीवनाचं गणित आहे वसुधा. यात कुठलेही ठोकताळे लागू पडू शकत नाहीत. असं केल्याने तसं झालं आणि तसं केलं म्हणून असं झालं, अशी समीकरणं मांडताच येणार नाहीत. अंकितच्या आयुष्यातल्या यशापयशाला स्वत:ला जबाबदार धरणं सोडून दे. तू तुझ्या परीने सर्वकाही केलंस तरीही फासे उलटे पडले. अनेक रसायनांचं मिळून बनलंय हे मानवी आयुष्य. आता त्यातून कुठली-कुठली मूलद्रव्यं वेगळी करत बसणार आहेस?’’

त्या संध्याकाळी तिने स्वच्छ तोंड धुतलं. केस विंचरले. कपडे बदलून ती मोकळ्या हवेत फिरून आली. वाटेत कोणी भेटलं, कोणता वाकडा प्रश्न विचारला, तरी डोळ्यात पाणी न आणता उत्तर द्यायच्या तयारीत.

गॅलरीची सरकती काच उघडून बाहेर सुकत असलेले कपडे काढायला ती डोकावली. कॉलनीत रांगेत उभे असलेले चार वृक्ष कालपरवापर्यंत पानगळीत रोडावले होते. आता मात्र वसंताच्या चाहुलीने हिरव्या झुली लेऊन झुलत होते. त्यांच्यापैकी तीन वृक्षांवर पिवळ्या जर्द फुलांचे झुबके डवरून आले होते. पण चवथा, डावीकडून दुसरा वृक्ष नुसताच हिरवागार. एक म्हणजे एकदेखील फूल अख्ख्या वृक्षावर फुललं नव्हतं. वसंत त्या वृक्षावर रुष्ट झाला होता की त्या वृक्षालाच बहरावसं वाटत नव्हतं कोणास ठाऊक?

तिचं मन पुन्हा त्या डावीकडून दुसऱ्या वृक्षासाठी भरून आलं. ती कारण शोधू लागली त्या वृक्षाच्या बहाराला वंचित होण्याचं. कारण सापडेना. कपडे आत घेऊन तिने गॅलरीची सरकती काच बंद केली. काच दुधी होती हे ठीकच होतं. पारदर्शक असती, तर तो डावीकडून दुसरा वृक्ष पुन्हा-पुन्हा डोकावत राहिला असता तिच्या नजरेच्या टप्प्यात, अंकितच्या प्राक्तनासारखा.

नवऱ्यापुढे संध्याकाळचा चहा ठेवताना खूप वर्षांनी प्रसन्नशी हसली. त्याने चकित होऊन पाहिलं, पण काही विचारलं नाही. तिनेही आपणहून काही सांगितलं नाही. त्यानेही कारणं शोधली नाहीत. तिनेही कारणं शोधायचा प्रयत्न केला नाही. मानवी जीवनाचं गणित त्याने यापूर्वीच खूपसं सोडवलं असावं. तिनेही ते सोडवायचा प्रयत्न न करता खूपसं सुटलं होतं बहुतेक. हो बहुतेकच.

*

## व्यंगचित्र



# छंद माझा आगळा

# माझा छंद

**✶ बागेश्री धुरंधर परीख ✶**

लहानपणापासूनच आपल्याला अनेक छंद असतात. अगदी पोस्टाची तिकीटं, बांगड्यांच्या काचा, शंख शिंपले, सागरगोटे जमविण्यापासून ते गोगलगाई घरी आणण्यापर्यंत स्वत:चा अभ्यास सांभाळून अनेक गोष्टी लहान मुले करीत असतात. पण लहानपणापासूनच जर एखाद्या विषयाची आपण गोडी लावून घेतली तर उतारवयात, मन रमविण्यासाठी ह्या छंदांचा खरा उपयोग होतो. ह्या छंदांमुळे आपलं मन तंदुरुस्त रहातं. मग तो छंद लोकांसाठी उपयोगी असो वा नसो, आपल्या स्वत:ला मात्र डिप्रेशन, डिमेन्शिया अशा आजारापासून तरी दूर ठेवतो. कारण ह्या छंदान आपलं मन, आपला मेंदू आणि आपल्या शरीरातील सर्वच अवयवांचा वापर होत असतो.

मला लहानपणापासूनच अनेक छंद होते. आमच्या वेळी एस.एस.सी. नंतर कॉलेजमध्ये एकतर सायन्स, आर्टस किंवा कॉमर्स, ह्याशिवाय आजच्या सारख्या इतर शाखा नव्हत्या. एस.एस.सी.ला चांगले मार्क मिळाले की सायन्सलाच जायचं, मग इंजिनीयर किंवा डॉक्टर व्हायचं हा शिरस्ताच होता. मीसुद्धा पारले कॉलेजमध्ये सायन्सला प्रवेश घेतला होता आणि महिन्याच्या आतच, ह्या विषयाची आपल्याला गोडी नाही हे कळून चुकले. कारण सायन्स म्हणजे सबंध दिवस अडकून पडायचं. हे सर्व टाळण्यासाठी मी गुपचूप आर्टस्च्या वर्गात जाऊन बसले. त्यामुळे कॉलेज फक्त सकाळीच २ तास. बाकी सर्व वेळ छंद जोपासण्यासाठीचा होता.

त्याचवेळी मी खारला अंबूताईंकडे चित्रकलेचे



धडे घ्यायला सुरुवात केली. अंबुताईंची फार इच्छा होती मी चित्रकलेमध्ये करियर करावे. पण चित्रे काढून आपल्या पायावर उभं रहाता येईल असं वाटत नव्हतं म्हणून मग बी. ए. केलं. बाबांच्या आग्रहास्तव टाटा इन्स्टिट्यूटमधून सोशल वर्क ह्या विषयात एम. ए. केलं व सोशल वर्क करण्याची आवड पूर्ण केली. हे सर्व करतानासुद्धा चित्र काढणं, प्रदर्शनात जाऊन रांगोळ्या काढणं हे सर्व चालूच होतं.

लग्न झाल्यानंतर मात्र ७ वर्ष मी सोशल वर्क शिवाय फारसं बाकी काही केलं नाही. वेळ भरपूर



होता. आपल्या जातीत बरेच लोक, अगदी बायकासुद्धा घरी गणपतीची मूर्ती करतात हे ऐकून होते. विशेष म्हणजे सौ. सुहासताई वेलकर ह्या त्यांच्या घरचा गणपती करतात व त्याला सोनेरी वर्ख देतात; हे माहीत होतं.

एकदा ठाकुरद्वारी मामांकडे गेले असताना जवळच एक मूर्तीकार मूर्ती बनवताना पाहिलं. मादुस्कर किंवा असंच काहीतरी नाव होतं. त्यांना गणपती करताना बघितलं आणि मला वाटलं आपणही गणपती करून बघायला काय हरकत आहे! घरी मुलांची खेळातली चिकणमाती (play dough) होता. त्याचा गणपती करून पाहिला तर तसाच गणपती झाला. मग पुन्हा पुन्हा मूर्तीकारांकडे जाऊन बसायला लागले. त्यांनी विचारलं, ''करणार का गणपती? माती देऊ का?'' तोपर्यंत ह्या कलेबद्दल मला काहीच माहिती नव्हती. खूप आनंदाने व उत्साहाने मूर्तीकारांनी दिलेला मातीचा गोळा घेऊन घरी आले. व समोर एक छोटा गणपती ठेऊन मूर्ती बनवायला सुरुवात केली. आणि पाहिलं तर, खरंच एक गणपती तयार झाला! आपण गणपती बनवू शकतो ह्यावर माझा विश्वासच बसत नव्हता.

ती पहिली मूर्ती तशी ओबड-धोबडच झाली होती. आमच्या घरी, गुजराती असूनही दहा दिवसांसाठी गणपतीची स्थापना होत असे. ह्याची सुरुवात 'ह्यां'च्या खेळातल्या गणपतीपासून झाली होती.

माझ्या सासऱ्यांनी, भाईंनी मी केलेली मूर्ती पाहिली आणि मग त्यांनी आग्रहच धरला की, आपण ह्यावर्षी ह्याच मूर्तीची स्थापना करायची. मला खरं तर हे थोडं विचित्रच वाटलं. पण त्यांच्या आग्रहाखातर मी त्या ओबडधोबड गणपतीची स्थापना केली.

माझे अण्णामामा (शिवनाथ देसाई) तर माझा गणपती पाहून इतके खूष झाले की, त्यांनी सातघर फोटोग्राफरला आमच्या घरी पाठवून त्या गणपतीचे फोटो काढून ठेवले. नंतर बरीच वर्ष ते फोटो त्यांच्या ऑफीसमधल्या टेबलावर काचेखाली त्यांनी ठेवले होते व आल्यागेल्याला कौतुकाने ते फोटो दाखवीत असत.

सगळ्यांकडून खूप प्रोत्साहन मिळालं आणि मग दरवर्षी गणपती करण्याचा पायंडाच पडला. माती कुठे मिळते? ती सुकायला किती दिवस लागतात? रंगवायला कुठले रंग वापरायचे? खंडीत झाल्यास कसे सांधायचे ही माहिती मी गोळा केली. दरवर्षी अलंकार टॉकीजजवळ जाऊन माती आणावी लागे.

बरेच मूर्तीकार साचा वापरायचे. मी मात्र मुक्त हातांनी गणपती करायला लागले कारण हा माझा व्यवसाय नव्हता; पण छंद होता. दरवर्षी वेगवेगळ्या आकारातले गणपती मी करीत होते. कधी कमळातला, तर कधी महाभारत लिहिणारा, कधी दशभुजा गणपती तर कधी नृत्य करणारा, बासरी वाजविणारा, तर कधी पाटी पेन्सील घेऊन शाळेत जाणारा असे वेगवेगळे गणपती केले.

आमच्याकडे गणपतीचं धार्मिक महत्त्व फारच कमी होतं. म्हणजे पूजा, आरती रोज व्हायची, पण





ह्याला सामाजिक (सोशल) स्वरूप जास्त होतं. बरेच नातेवाईक व भरपूर मित्रपरिवार हा गणपती पहायला आवर्जून यायचे. माझ्या सासूबाई रोजच वेगवेगळं खाणं सर्वांसाठी करायच्या. पहिली दहा बारा वर्ष प्रथेप्रमाणे स्थापना करून अनंत चतुर्दशीला चौपाटीवर जाऊन गणपती शिळवायचो. ही प्रथा चालूच होती. मला मात्र हातांनी बनविलेला गणपती शिळवताना दु:ख होत असे.

एका वर्षी मी पुण्याच्या दगडूशेठ हलवाईच्या गणपतीची प्रतिकृती तयार केली होती. सोन्याचा मुगुट, सोन्याचे भरपूर अलंकार, दोन तीन वळणं घेतलेली सोंड, बारीक डोळे हे सर्व हुबेहूब जमलं होतं.

हा गणपती पहायला श्री. प्रमोद नवलकर आले होते. त्यावेळी ते मंत्री होते व आमच्या शेजारीच त्यांचा बंगला होता. ते आले आणि म्हणाले, ''तू हा गणपती शिळवणार का?'' मी म्हटल, ''हो. प्रथेप्रमाणे शिळवणार.'' ते म्हणाले, ''नको शिळवूस, जपून ठेव. एव्हढी सुंदर हातांनी बनविलेली मूर्ती का बरं शिळवायची?'' आणि हे ऐकून मला व आमच्या घरच्यांनासुद्धा हे पटलं.

नोकरी चालू ठेऊन गणपती करण्याचं काम कष्टाचंच होतं. १९८० साली मी सिटी सिव्हील कोर्टामध्ये विवाह समुपदेशकाचं काम करत होते व १९९५ मध्ये कुटुंब न्यायालयात न्यायाधीश झाले होते. पण गणपती करण्यासाठी, दरवर्षी तीन दिवसांची सुटी घ्यायचे व सतत बसून मूर्ती करायचे.

श्री. प्रमोद नवलकरांचा सल्ला मला मनोमन पटला होता आणि त्यानंतर केलेले सर्व गणपती मी जपून ठेवायला लागले. आजही त्या १०, १२ मूर्ती माझ्या घरी काचेच्या कपाटात विराजमान आहेत.

वाढत्या वयाबरोबर तब्येतीच्या कुरबुरीपण वाढल्या होत्या. स्पाईन सर्जरीनंतर तर मोठा गणपती करणं कठीण व्हायला लागलं. मग छोटे गणपती करून मी मित्रपरिवाराला भेट देऊ लागले. आजही मी केलेले गणपती डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. आपटे, मीनल झकारीया, सुचेता वैद्य ह्यांच्या घरी विराजमान आहेत.

एकदा तर माझ्या भाचीने हट्टच केला की ''माझ्या लग्नात गणपतीपूजनासाठी मामींनी हातानी केलेल्या गणपतीचीच स्थापना करावयाची आहे'' मला तिचं मन मोडवेना. मी मातीचा गणपती केला व कापसात गुंडाळून, बडोद्याला तिच्या लग्नात घेऊन गेले.



माझ्या तब्येतीमुळे घरचा गणपती बंद करावा लागला आणि सासऱ्यांच्या निधनानंतर आम्ही दोघं विलेपारल्याला रहावयास आलो.

विलेपार्ले म्हणजे सांस्कृतिक देवाण घेवाण ह्याचं केंद्रच. माझी मुळंसुद्धा येथेच रुजली होती. येथे आल्यानंतर माझा छंद मला गप्प बसू देईना. प्रकृती साथ देत नव्हती. पण सोसायटीतली मुलं 'आम्हाला गणपती शिकवा' म्हणून मागे लागायला लागली आणि मग हा माझा छंद जोपासायची संधीच चालून आली. येथे आल्यावर माझ्या चित्राचं एक व गणपतीचं प्रदर्शनपण भरवलं गेलं. लोकमान्य सेवा संघाने टिळक मंदिरात गणपती करण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. तेथे लहान मुलांना शिकविण्याची प्रथम संधी मिळाली. ह्या कार्यशाळेचा लाभ ८० मुलांनी घेतला होता. त्यानंतर मागल्या वर्षी पारले टिळक विद्यालयाच्या चवथीच्या मुलांसाठी कार्यशाळा घेतली. तेथे दोन सत्रात १४० मुलांनी भाग घेतला होता. अर्थात मला मदतनीस होतेच.

त्यानंतर हा छंद चालूच राहिला. ह्यावर्षी पारल्याच्या शिवानंद सोसायटीमध्ये ही कार्यशाळा घेतली गेली.

गणपती तसा करायला सोपा. त्याची ॲनाटॉमी फार कठीण नाही. त्याचं ओबडधोबड रूपसुद्धा मनाला प्रसन्न करतं व डोळे सुखावतात. पण मुलांना शिकवताना सोप्या आखणीचा विचार करावा लागला. मातीचे सारखे ६ गोळे करून त्याच्यातून गणपतीचा प्रत्येक अवयव, म्हणजे मोठ्ठालं पोट, सुपाएव्हढे कान, वळलेली सोंड, हत्तीचे मुख व मानवाची शरीरयष्टी, ही कशी दाखवता येईल ह्याचा बारकाव्याने अभ्यास करावा लागला. हे सर्व बालकांना समजेल अशा भाषेत लिहून काढावं लागलं.

आता मात्र ह्या कार्यशाळांची सवय झाली आहे. गणपतीउत्सव जवळ आला की, ही छोटी मुले कार्यशाळांची वाटच बघत असतात. गणपती बनवतांना मुलांना एक वेगळाच आनंद मिळतो. त्यांच्यात एक सुंदर कल्पकता दिसून येते. सध्याच्या इंटरनेट, मोबाईल फोन, व टी.व्ही.मध्ये सतत रमणाऱ्या मुलांना एका क्रिएटिव्ह ॲक्टिव्हिटीमध्ये रमविण्याचा आणि ह्या छंदामुळेच सत्कारणी लावण्याचा मला आनंद मिळतो.

*

## विवान श्रीपाद आगासकर या बालकलाकाराने बनविलेला गणपती





छंद माझा आगळा


*(श्री. राजन जयकर यांनी एम्. व्ही. धुरंधरांवर माझ्या विनंतीवरून खास प्रकाश या लेखात टाकला आहे. -संपादक)*

# HOBBIES

## ✶ Rajan Jayakar ✶

1. Hobby is generally considered to be pasttime as compared to main avocation but I believe that every person must have some hobby so that he remains fresh to pursue his avocation. It is something like exercise and diet complement each other while maintaining good health. Collection is a popular hobby worldwide. People collect all kinds of collectibles. My friend collects water from different sea, rivers and lakes from all over the world. There are two types of Collectors. Some collect only because subject of collection fascinates them and are called general collectors and others collect as an investment for future gains who are called specialized collectors. A serious collector must have both qualities, so that he invests in collection judiciously and not recklessly and also enjoys his collection. Incidentally for a collector to fall in any of the two categories, he must have a collector's gene in him.

2. I started collecting matchbox labels and cigarette packets, when I was in school by picking up discarded empty matchboxes and cigarette packets from the road. I used to remove the trays for holding match sticks and cigarettes and collect only the shell. I did not have to purchase them. I was encouraged by my mother to continue the hobby. At that time what fascinated me was variety of designs and the fact that it came free of charge. In law there is a saying that finders are keepers. I had noticed that in the box which my father took out on "Dhanatrayodashi" during Diwali, one silver coin was added every year. I was told that those were pooja coins and are not to be used as coins but every year a silver coin should be added. I realised that those were basically one rupee coins of Queen Victoria, Edward VII, George V and George VI, who was the last Emperor at the time of our independence. I made a mental note









that at some point, I will start collecting British India coins as well as Currency Notes.

3. I was not fond of history as a subject in school. However coming from an orthodox and traditional household, I got interested in finding out the history of Pathare Prabhu Community and also of Bombay. I was told that Pathare Prabhus were the earliest immigrants, who came to Bombay in the 13th Century. I maanaged to get a copy of doctoral thesis of Dr. V.D. Rao on "Pathare Prabhus of Bombay" which was submitted to Bombay University in 1945. I noticed that the history of Pathare Prabhus and that if Bombay ran parallel right from 13th Century. I started searching for the books referred by Dr. Rao in his thesis and also books on history of Bombay. Since by then I was married and also earning from my profession, I started investing in books and artifacts of Pathare Prabhus and have been giving advertisement in our Community periodicals and got good response from the community and Ketaki rightly referred to me as "Jari purana" of Pathare Prabhus. I took it as a compliment although she meant otherwise and I continue to collect Pathare Prabhu memorabilia. As regards history of Bombay, I studied the kind of collectibles that were available, which included



Picture Postcards, photographs, lithographs, engravings, etchings, paintings among paper collectibles. As the Vice President of Asiatic Society of Bombay, I found out books by famous authors on history of Bombay and through dealers of antiquarian books in India and London, I started purchasing them. I also noticed that M.V. Dhurandhar, the foremost artist of our community, being Bombay based, had done lot of work on people of Bombay and their life styles.


4. While collecting prints of Dhurandhar's




paintings, I got fascinated with other subjects handled by him, such as mythological and historical pictures made from his paintings and forming part of illustrations in books of different languages. After title research on Dhurandhar, through the half of his daughter Ms. Ambika Dhurandhar, I realised that in his entire life he had done more than 50,000 art works including oil and water colour paintings and pen, ink and

charcoal drawings. At present I have in my collection about 500 prints of his artwork. If we consider that out of 77 years of his life span, about 60 years were dedicated to art work, he created more than 2 artworks every day. His friendship with Raja Ravi Verma, the most renounced Indian artist, resulted in Dhurandhar's painting being converted into litho prints by Ravi Verma Printing Press at Karle near Lonavala, even after the death of Raja Ravi Verma. I would appeal to all the community members to start collecting the prints of Dhurandhar, which are available in calendar size, lithography, illustrations in books, picture postcards and even in our old community magazine "Prabhu Masik". This is easy way of preserving our community heritage for generations to come.

5. On Bombay, I started expanding my horizon by collecting household articles of bygone era such as telephones, radio, gramophone, wooden and kerosene fans, light fittings and Chandeliers, Victorian furniture, porcelain decorative items, statuary, crockery with words "Bombay" etched on it and pre-independence corporate letterheads, Bills and invoices having Bombay address. I also came across textile labels and cigarette cards which had Bombay theme.





6. After joining Philatelic Society of India, I realised that stamps used for non-postal work such as Court fee stamps, Special Adhesive stamps, Foreign Bill Stamps, Share Transfer Stamps, Revenue and Receipt Stamps were also collectibles. I started collecting those stamps and also started participating in Exhibitions initially at State level and subsequently at National and International level and obtained few Gold Medals for the country. I still continue to participate in the International Exhibitions and will show my collection in ROMPEX 2018 at Denver, Colorado, USA in May 2018 and PRAGA 2018 at Prague. Czechoslovakia in August 2018.

7. By about 2005, my Chor Bazar suppliers told me that there was hardly anything to offer on subject of Bombay as, according to them, I had everything and suggested that I should start collecting film memorabilia. I thought that film memorabilia was not such a bad idea. I decided to follow the cardinal rule while starting a new collection :-

a) The period of the subject should be small
b) What kind of artifacts are available, should be investigated.
c) What is the budget one is looking at to get satisfaction of collecting most of the material on the subject.
d) What is the condition of the material, which is available.
e) How much storage space is required.

8. After considering all the above criteria, I zeroed on my childhood favourite actor Shammi Kapoor, who was alive at that time. The dealers in Chor Bazar told me that there was no demand



for Shammi Kapoor memorabilia and hence it was available at reasonable price. After selecting my subject I found that among his memorabilia there were film posters, song books, lobby cards, photographs and even censor certificates. I decided to collect memorabilia of Shammi Kapoor as hero and not as character artist. Google search told me that he acted in 58 films as hero between 1953 and 1974. After perusing articles from old issues of Filmfare and Filmindia, I found that his first 18 films had flopped at Box Office, prior to "Tumsa Nahin Dekha" in 1957. My Collector's gene again got activated to search for material of those 18 flop films, which was scarce, as most of it was destroyed by the distributors, after disaster at Box Ofice. I started meeting Shammi Kapoor at his residence, and at that time he was in poor health with dialysis thrice a week. He told me that he had thousands of fans but I was the only one who was a collector of his film memorabilia. I decided to do an exhibition of his memorabilia at Prince of Wales Museum, to be inaugurated by him on his 80th birthday on 21st October 2011, to which he had agreed. However his health started deteriorating and he died on 14th August 2011. I however did the exhibition not as birthday gift but as my tribute to his memory.

9. With growing collection on different fronts, I did not forget to augment my childhood hobby of matchbox labels and cigarette packets. Limca book of Records gave me certificate for highest collection of matchbox labels, which stood at 2 lakhs in 2004. I started holding my own exhibitions, sometime sponsored, sometimes at my own expense, to showcase my different collections to citizens of Bombay. I am still hopeful that one day some philanthropist will give me adequate space in Bombay to have my own museum so that my collections remain under one roof. Next step after collecting is exhibiting. I curated many exhibitions including 150 years Bombay High Court which was visited by Prime Minister Manmohan Singh and President Pranab Mukherjee in 2012. My proposal to set up permanent Museum was accepted by the Chief Justice of Bombay High



Court and I set up a museum in the High Court building, which was inaugurated by Prime Minister Narendra Modi in 2014. I also curated exhibition to celebrate 150 years of Bombay University in 2007 which was inaugurated by President Abdul Kalam and was also visited by Prime Minister Manmohan Singh during convocation ceremony and the closing ceremony was at the hand of President Pratibha Patil and I was present to show the exhibits to all the dignitaries.

10. The next step is setting up Museums. While curating the exhibitions to celebrate 50 years of Supreme Court in Delhi in 2000, I had the good fortune of working under the expert guidance of Padmashiri Sadashiv Gorakshakar and that knowledge I utilized in setting up Museum, first in Madras High Court and then in Bombay High Court and work is in progress for setting up Museums in Andhra Pradesh High Court at Hyderabad, Uttar Pradesh High Court at Allahabad and Punjab & Haryana High Court at Chandigarh.

11. At the end of the day, all that a collector does is that he collects artifacts scattered all over the world and brings them under one roof and under single ownership. The unfortunate part is that, when the time comes to depart, he has to leave the collection behind. Ramdas Swami has questioned, who is the happiest person in the world? My answer would be, "whose hobby is his avocation".

*

छंद माझा आगळा

# छंदोपासना

**⋆ विश्वास अजिंक्य ⋆**

एकेकाळी स्वयंपाकघराचा कणा असलेली तांब्या-पितळेची भांडी स्वयंपाकघरातूनच नव्हे तर; अगदी घरातूनच हद्दपार होत आहेत. तांब्याची आणि पितळेची जागा आता स्टीलने घेतली आहे. लग्न समारंभात रुखवतात ठेवलेली तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांची जागादेखील स्टीलच्या भांड्यांनी घेतली आहे. अलिकडच्या काळात तांबे-पितळ अशा धातूंपासून तयार केलेली ताट, वाटी, चमचा, घंगाळ, तपेले, बादली, परात, कळशी, हंडा आदी भांडी कालबाह्य झाली आहेत. अशी जुन्या काळातील जाड धाटणीची तांब्या पितळेची भांडी, समया, दिवे आणि इतर वस्तू जमवून त्याचा संग्रह करणे; तसेच भारतातील छोट्या मोठ्या राजवटींची व इतर देशातील नाणी जमवणे हे माझे छंद. छंद जेव्हा जीवापाड जपला जातो; तेव्हा त्याचं व्यासंगात रुपांतर होतं. रोजच्या धावपळीतदेखील हा व्यासंग मनाला सुखावून जातो. म्हणूनच त्यासाठी वेळ काढला



**रॉकेलवर चालणारे दिवे आणि पितळेच्या मोठ्या समया लेखकासह**



**जर्मन सिल्व्हरचे तांबे, रिद्धी-सिद्धी व इतर वस्तू**

जातो.

साधारणत: १९६०-७० च्या दशकापासून स्टीलचा उपयोग घराघरात होऊ लागला. स्टीलच्या वस्तूंच्या देखभालीसाठी फारसे कष्ट लागत नाहीत. साफ केल्यावर चकाचक दिसतात. त्यामुळे लोकांनीसुद्धा तांब्या-पितळेची भांडी मोडीत काढून त्याजागी स्टीलची भांडी विकत घेतली. सुरवातीला स्टीलची टाकी किंवा हंडा, कळशी, नंतर एक, एक करून सर्वच गोष्टी स्टीलमय झाल्या; आणि जुनी भांडी, पाटा-वरवंटा, जातं, घंगाळ, तांब्या, तपेलं, बंब, उखळ आपल्यातून नाहीशी होऊन एखाद्या संग्रहालयातील शोभा होऊन बसल्या. आजही तांबा, पितळ, बीड, जर्मन सिल्व्हर, चिनी माती यापासून बनवलेली भांडी किंवा वस्तू पहातो; तेव्हा मन त्यात रमून जातं; कारण अनोखं नातं या भांड्यांनी व वस्तुंनी जुन्या पिढीतील लोकांशी प्रस्थापित केले आहे. तांब्या-पितळेची भांडी आणि विविध वस्तूंचं



**शेवारा, फिरकीचा तांब्या, लामण दिवा, समई इ.**

महत्त्व ठाऊक असल्यामुळेच केव्हातरी म्हणजे सणा-सुदीच्या प्रसंगी, कार्यासाठी त्याचा वापर होताना दिसतो.

पितळेची भांडी इतिहासजमा झाली. त्यामुळे घरोघरी येणारे कल्हईवाले देखील गायब झाले. पूर्वी कल्हईवाले दर ८-१५ दिवसांनी येत असत व भांडी घेऊन जाऊन कल्हई करून आणून देत किंवा घराच्या अंगणातच त्यांचा वर्कशॉप मांडून शेजारपाजारच्या अनेक घरातील भांडी कल्हई लावून चकाचक करून देत असत. कल्हई म्हणजे पितळेच्या वा तांब्याच्या भांड्याला आतून 'कथील' या धातूचा पातळ थर देण्याची प्रक्रिया. या थरामुळे भांड्यात ठेवलेले आंबट पदार्थ वा इतरही खाद्यपदार्थ खराब होत नाहीत. कल्हई नसेल तर पदार्थ हिरवट होऊन तो खाण्यायोग्य रहात नाही. हल्ली मात्र 'कल्हई करणे' हा शब्दप्रयोग वेगळ्याच अर्थाने वापरला जातो.

पितळ हा मूळ धातू नाही. सर्वसाधारणपणे ६७ टक्के तांबे आणि ३३ टक्के जस्त मिसळून पितळ बनवलं जातं. पितळ हे कशासाठी वापरणार त्याप्रमाणे त्यातील तांबे आणि जस्ताचे प्रमाण कमी-जास्त केलं जातं. तांब्या-पितळेची भांडी लखलखती ठेवण्यासाठी पूर्वी गृहिणींना बरीच मेहनत करावी लागे. चिंचेने ही भांडी घासली तरच चकचकीत व्हायची. आता चिंचेची जागा 'पितांबरी' पावडरने घेतली आहे. हळुहळू पितळेचा भावही वाढू लागला आणि गरीबांना ही भांडी परवडेनाशी झाली.

तांब्या-पितळेचं एक एक भांड आपल्याला ४०-५० वर्षे मागे घेऊन जातं. पितळी बादली, पितळी घागर, कळशी, तपेली, कोयरी, चपात्यांचा डबा, पानाचे डबे, सुंदर सुबक; झाकणदार नक्षीकाम केलेला पेढेघाटी डबा. या डब्यात दागिने ठेवत. हा डबा कपाटाच्या चोर कप्प्यात ठेवत. कालांतराने बँका निघाल्या; नि डब्यातलं सोनं-नाणं लॉकर नामक डब्यात गेलं. पूर्वी आंघोळीचे पाणी तापवण्यासाठी तांब्याचा बंब असे. सकाळी लवकर उठून एकाला बंब पेटविण्याचे काम करावे लागे. बंबात टाकलेल्या



गोष्टींची राख भांडी घासण्यासाठी वापरत. शिवाय त्याचा जो धूर होत असे त्यामुळे डासांना हाकलण्याचे काम आपोआप होई. तांब्याचे मोदकपात्र आणि पितळेचा शेवारा, वातीची चूल या गोष्टी घराघरात असायच्या.

तर अशा या तांब्यापितळेची भांडी, समया, दिवे, मूर्ती आणि इतर वस्तू छंद म्हणून आम्ही सांभाळून ठेवल्या आहेत आणि त्यात मित्रमंडळी व नातेवाईकांनी दिलेल्या भांड्या-कुंड्यामुळे भरच पडत जाते. हे झालं भांड्यांचं. पण कुठेतरी वाडा पाडताना; खोदकाम करताना अचानक नाण्यांचा हंडा सापडला की लोक आजही पाहण्यासाठी गर्दी का करतात? या प्रश्नातील कुतूहल हे विविध काळातील, विविध राजांची, विविध धातुची व आकाराची नाणी पहाताना खऱ्या अर्थाने शमते. अशीच भारतातील छोट्या-मोठ्या राजवटींची तसेच जगातील विविध देशांची नाणी आणि नोटा जमवणं व त्यांचा अभ्यास करणं हा देखील माझा छंद आहे.

अनेक राजांनी आपल्या देशात राज्य केलं. त्यामुळे असंख्य सत्ता आणि त्यांचा काळ डोळ्यासमोर उभा रहातो. अकबरापासून ते शेवटचा मोगल बादशहा बहादूरशहा जफरपर्यंत घोषित - स्वयंघोषित असे २५ मोगल बादशहा होऊन गेले. त्यातील प्रत्येकाने कमीजास्त प्रमाणात नाणी काढली होती. त्यावेळी मोगलांच्या हिंदुस्थानात सुमारे २०० ठिकाणी टाकसाळी होत्या. इंग्रज भारतातील १/३ सत्ता थेट राबवत होते. तर २/३ सत्ता वेगवेगळ्या राजवटी इंग्रज छताखाली राबवत होत्या. जवळपास १२५ संस्थानांची स्वत:ची नाणी होती.

सुरवातीला माझ्याकडे जी नाणी होती ती सर्व माझ्या बहिणीने व थोडीफार माझ्या वडिलांनी जमवलेली होती. त्यात मोठी भर पडली ती माझ्या आजोबांनी (आईच्या वडिलांनी) जमवलेल्या नाण्यांची. मग मात्र मी नातेवाईक आणि मित्रमंडळींकडून जुनी आणि विविध देशांची नाणी मिळविण्याचा सपाटाच लावला. तेव्हापासून माझा विविध नाण्यांचा संग्रह व त्यांचा पद्धतशीर अभ्यास सुरू झाला.

सर्वप्रथम अडचण आली ती वेगवेगळ्या नाण्यांची ओळख करून घेताना. ही नाणी पहाताना धातू-चलन, लिपी-अक्षरे, छाप-नक्षी, रूप-आकार यांचा गुंता कसा सोडवायचा हा प्रश्नच होता. तेव्हा मी माझ्या एका नाणेसंग्राहक मित्राला बोलावून त्याच्याकडून विविध संस्थानांची व देशांची नाणी वेगवेगळी केली. मोगलकालीन नाण्यांवर पार्शियन आणि अरेबिक भाषेत मजकूर लिहिला आहे. त्यासाठी माझ्या मुस्लीम मित्रांना बोलावून नाण्यांवरील मजकूर वाचून घेतला. त्यानंतर 'साऊथ एशियन कॉईन्स अँड पेपर मनी'' व ''कॉईन्स अँड कॉईन कलेक्टींग'' हे दोन कॅटलॉग विकत घेतले. कॅटलॉगमुळे नाणी जास्त बोलकी झाली. त्यामुळे माझ्याकडे कुठची नाणी आहेत; कुठची नाहीत याचा पत्ता लागला आणि त्यांचा अभ्यास करता आला.

नाण्यांच्या एका बाजूवर 'श्री राजा शिव' आणि दुसऱ्या बाजूला 'छत्रपती' अशी अक्षरे धारण केलेली 'शिवराई' म्हणजे एखाद्या देवाचा टाकच वाटतो. तर पेशवाई आणि मराठा सरदारांची नाणी मध्ययुगातील इतिहास जागा करतात. १८ व्या शतकात मराठा राज्याचा विस्तार भारतभर झाला होता. त्यामुळे लूट, खंडणी, नजराणे, व्यापार इत्यादी मार्गांनी विविध प्रांतातील विशेषत: उत्तरेकडील वैविध्यपूर्ण चलनांची आवक महाराष्ट्रात झाली. मराठे गेले आणि पैसा, आणा, रुपया ही ब्रिटिशांची नाणी आली; तर स्वतंत्र भारताची नाणी १९५० पासून चलनात आली. आज माझ्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांची नाणी, तसेच बडोदा संस्थानचे गायकवाड, इंदूरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, नागपूरचे भोसले या मराठा संस्थानिकांची नाणी, इंग्रजांच्या भारतातील राजवटीतील नाणी, स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध संस्थानांची नाणी, स्वतंत्र भारताची नाणी, जगातील १२५ देशांची नाणी असा सुमारे ३००० नाण्यांचा संग्रह आहे. माझा हा नाण्यांचा आणि आमच्या घरातील तांब्या पितळेच्या भांड्यांचा संग्रह बघून माझ्या एका मित्राने त्याच्या दिवंगत भावाचा ग्रामोफोनच्या १००० रेकॉर्डसचा संग्रह मला भेट म्हणून दिला. तर दुसऱ्या एका मित्राने १०० वर्षांपूर्वीचे जगातील विविध देशांचे तसेच इंग्रजांच्या भारतातील राजवटीतील पोष्टाचे स्टँम्प्स, स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध संस्थानांचे स्टँप्स, स्वतंत्र भारतातील स्टँप्स, आणि ४०० फर्स्ट डे कव्हर्स आणून दिली. माझा हा विविध गोष्टींचा संग्रह मी दिवसेंदिवस वाढवतच नेणार आहे.

*

भटकंती

# सफर स्वादाची

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# FOOD MUSINGS


**✶ Shubhada Suresh Agaskar ✶**

**ñee Vaishali Madhav Jayakar**


❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

*(चित्रे रंगीत येण्यासाठी हा लेख 'छंद आगळा' मध्ये समाविष्ट केला आहे. -संपादक)*

We Pathare Prabhus love food. We love cooking, eating, collecting recipes and trying them out.

So, it was with little wonder that I let out a scream of delight when my hubby mentioned that we would be going to Paris and Switzerland over the summer. Visions of visiting Michelin star earned restaurants and gorging on chocolate and cheese fondue made my mouth drool!

But, we also had to think practically as we were going to travel with our precocious 6 year old, who is quite capable of sniffing suspiciously at strange food and refusing to eat it. So, a major part of our luggage included ready to eat meals and sanjivrya.

As we landed in Paris, the first thing that I wished for was to sit at one of those road side tables outside Parisian cafes, enjoy one of their delicious croissants and watch the fashionable locals. Alas! The 4 days that we spent there were spent trying to rush to catch our train or bus or hiding under the never ending drizzle.

A few hundred metres from our hotel, there was a patisserie. One morning, on spotting my sad face, hubby took us there and upon making our way inside, we had a hard time choosing between flaky, golden croissants, sinfully loaded bruschettas, amazingly decadent pies and assorted pastries, nestled like jewels in the beautifully decorated display cases. Mmmmm!

After our city tour, we had the opportunity to enjoy this amazing supper that started with



seafood bisque, a splendid rack of lamb, moist salmon and to finish off-a simple divine chocolate soufflé.

Right outside the cul-de-sac that housed our hotel, there was a little shop that had an intriguing signboard. The shop sold ice-cream and sorbets. With a macaroon at the centre, the ice-cream scoops were then arranged in the form of petals-giving the appearance of a full blown English rose. Needless to say, we had to try it out and the saleswoman there had a hard time making us leave (we were the last customers and it was 11 on a weekday). She ultimately taught us how to say Good night in French and bidding her a "Bonne Nuit", we all trooped out.

By the end of day 2, we were tired of eating bread for breakfast, lunch and dinner. Thank God for cousin Mihir who stays in Paris, came



to visit us with his delightful family and then treated us to a hitherto totally untried dish-couscous!

France has a lot of refugees and immigrants who have brought with them varied cuisines and one of these include the Moroccan couscous. I was initially sceptical when our waiter brought out this huge, steaming bowl of thick semolina (rawa). Along with that came chickpea gravy and a platter heaped with vegetables and meat.

We were then instructed to take portions of the semolina and cover it with the gravy, vegetables and meat as per our choice. Radhika-our daughter loved the rawa and dived in with great gusto, confiding later that after gorging on pizzas and burgers over the past 2 days, she felt like she was on a forbidden junk-food binge. Mihir even encouraged me to go try out some escargot (snails) but that was where I drew the line. The couscous was tasty and we left the restaurant with our tummies replete and a new dish added to our repertoire.

We left Paris for Switzerland a few days later and immediately experienced culture shock. While Paris has an amazing nightlife with people roaming the streets as late as 1:00 a.m., Luzern shuts down by 7:00 p.m. Another big problem was the language. While I do not speak French, it is easy to decipher since so many French words are used in daily life. But most of Switzerland speaks German. Asking people on the street if they know of any Bäkerei (bakeries) nearby is a formidable task!

Luzern has many chocolate shops, one of which we used to pass daily as we made our way to the railway station. It had the most delightful display windows. We also discovered a piece of heaven-a shop called Lladerach. It sells many varieties of chocolate-loose as well as packaged. Plain milk, dark, pralines, nuts, white -name your pick and they had it! They had these amazing animal, insect and fruit figures made of marzipan, which looked so lifelike; you could swear they had moved if you stood there long enough! But my favourite was this white and milk chocolate fox that was intricately crafted, right down to the last detail. I was sorely tempted to but it until I realised that by the time we would reach home 10 days later, it would have melted into goo!

On our sojourns through Luzern, we came across the Transport Museum and I would highly recommend it for people travelling with kids. While the museum proper is devoted to transportation used throughout the ages, the building also houses a planetarium, a movie theatre and the last exhibit, enticingly labelled as the Chocolate Adventure.

We ventured into a shipping container that was actually a lift that carried us to the basement where the display and ride were housed. As the doors of the lift slid shut, we were in for a surprise. We could hear the cries of seagulls and the waves of the sea and the lift walls started displaying us standing amidst stacks of shipping containers at a sea port. As the lift slowly descended, the display showed us descending into the hold of the ship and then into a cocoa plantation, complete with the sounds of people going about collecting the beans. A truly memorable descent!

The ride proper provided us with some insight into the history of chocolate making and the process of making high quality chocolate. Radhika's favourite moment was at the end





when we were handed a couple of free chocolate samples to enjoy!

On our excursions to Jungfraujoch (Brrr! I now know what it means when someone complains that their hands got burnt in the snow.) and Mt.Titlis, we heard rumours about Maggi being available there but never got to see it personally.

Our trip was reaching its last few days and we made our way to Montreux. Situated near the French and Italian borders, the city is more like the Riviera and everyone speaks French there so it was good to get back to somewhat understandable language for once!

The MacDonalds at Montreux gave us another veg option on our meat free days-the Quinoa burger. It was surprisingly good and I am waiting to see if it ever reaches Indian MacDonald outlets

We visited the Cailler chocolate factory and Gruyere village by the Chocolate train that sets off from Montreux everyday and serves hot chocolate and chocolate filled pastries en route.

At the former, we got to smell, handle and taste cocoa beans and got to see how chocolate was made, right in front of our eyes. The warm, freshly wrapped bars and chocolate pieces rolling down the conveyer belt made me feel like I was in Willie Wonka's factory and the best part was the tasting room where there were about 15 types of pralines set out as free samples to taste so that people could then place their orders. Needless to say, we pigged out!

The cheese factory had an audio-visual display that started with introducing us to the various types of cows and the grasses and herbs (we even got to smell them by using the diffusers that were scattered throughout the display) that they would graze on to create the milk that would be used for the cheese. We moved on to the zone where cheese was actually being made and we saw huge vats of milk being curdled to made the round wheels of cheese that were then carted off to be aged and then packaged and distributed for sale.

We then trooped out to enjoy a delicious lunch comprising of Ratatouille and chocolate fondue (the combination of orange and molten chocolate is sinfully delicious!). After having watched the movie by the same name, we were indeed very excited to finally taste the real thing. But all along the lunch, I kept expecting Radhika to ask whether she could meet the little mouse chef who had cooked it!

We did try Indian food too and had to fall back at times on those ready-to-eat meal packets and sanjivrya (which do not fare well in rapid changes of temperature). But at the end of the vacation, we were glad to get back to our chapatya, kolambicha aatla and varan bhat. After all, home-cooked food has no match!

*

**छंद माझा आगळा**

# MY HOBBY

✶ **Achala S. Desai** ✶

Hobby is defined as a regular activity that is done for enjoyment typically during one's leisure time. It is not one's main occupation. Everyone possesses some kind of liking or disliking for certain things. Some of us do some kind of activity that keeps us occupied in our leisure hours. Amidst compulsory tasks, most of us also do things which we enjoy doing - such activities are called hobbies.

A hobby helps us escape the daily grind of life and work. It gives us pleasure and peace of mind. It improves our personality and character traits, thereby improving our performance at the work level. Hobbies help us to discover talent and ability, which otherwise may remain hidden. pursuing one particular hobby gives us a change to acquire more skill and knowledge about a particular activity. Ofcourse hobbies can change over a period of time as per interests and fashion. Now there is more time for leisure activities because of advanced technology which takes care of daily chores.

Hobbies can be of many kinds like collecting objects, engaging in creative and artistic activity, playing a sport, doing social work or pursuing other anusements. I admire the hobby of gardening. It is a great joy of witnessing blooming flowers and leaves. Its a great feeling to realize that the work of ones our hands is bearing fount. One gets a chance to experiment with mighty nature.

My all time favourite hobby is that of letter writing. This activity is fast fading due to electronic media. I feel letter writing is an art where you can express your feelings in a jugglery of words. I have preserved such artistic letters written to me by my late uncle Mr. Dnyanesh kirtikar and my sister-in-law Mrs. Anar S. Vijaykar some years back. As a collegian I started with fan letters to my then favourite film star Shashi Kapoor. You can imagine my joy when I got a reply!! Next in time came a letter writing spree to my idol Mr Sunil Gavaskar. I've been writting to him since 1971 till date and have a collection of replies to my letters in his own handwriting. This is my prized collections.

A thought flashed my mind - do the less priviledged in our society enjoy this concept of hobby??? We must encourage the less fortunate to develope a hobby as per their ability and capacity. Will the school authorities at various levels look into this matter?

✳

छंद माझा आगळा

# क्लिक क्लिक

**✶ दीपक माधव धैर्यवान ✶**

आपणा सर्वांना कोणता ना कोणता छंद असणे फार आवश्यक आहे असे मला वाटते.

छंद म्हणजे माझ्या दृष्टीने एखाद्या गोष्टीची आवड व ती पूर्ण करण्यासाठी आपआपल्या परीने प्रयत्नांची पराकाष्टा करीत रहाणे. कुणाला कुठल्या प्रकारचा छंद असेल ह्याला काहीही मर्यादा नसते. पूर्वी असलेले छंदांचे प्रकार कालांतराने का होईना; पण बदलत आले आहेत. आज काही नवीन छंदांचे प्रकार जरी आपल्या पहाण्यात व ऐकण्यात येत आहेत तरीही पूर्वीपासून चालत आलेले छंदांचे अगणित प्रकार आपण कधीही कमी लेखू शकत नाही. हेही तितकेच खरे.

छंद हा मनाचा फार मोठा विरंगुळा, शब्दातीत समाधान व आनंद! छंदामुळे आपला वेळ मजेत जातो हे तर खरेच पण त्याद्वारे मिळणारे ज्ञान सर्वांगाने आपली प्रगती करीत असते. छंदासाठी त्या त्या व्यक्ती करीत असलेले विलक्षण प्रयत्न, त्यामागची त्यांची जिद्द व मेहनत आणि ह्या सर्वांमुळे त्यांना मिळत असलेला आनंद व आत्यंतिक समाधान खरोखर वाखाणण्याजोगे असते ह्यात शंकाच नाही.

मलाही काही छंद आहेत. पण त्यातला अत्यंत महत्त्वाचा छंद म्हणजे छायाचित्रण, अर्थात् फोटोग्राफी! अनेक वर्षे मी जोपासत असलेल्या ह्या छंदामुळे माझ्या ज्ञानात व अनुभवात फार मोलाची भर पडत आली आहे.

मला छायाचित्रणाची उपजतच आवड आहे. पण नुसती आवड असून काय उपयोग? त्याची अभ्यासपूर्ण माहिती व आपल्यापुरते का होईना; पण ज्ञान व योग्य मार्गदर्शन मिळणे खूपच महत्त्वाचे व एकप्रकारे भाग्याचे.

सुरुवातीला कॉलेज जीवनात असताना केवळ एक 'बॉक्स कॅमेरा' घेण्याइतके पैसे नसताना, माझ्या पॉकेटमनीतून केलेल्या बचतीतून ते जमा करून मी ज्या प्रकारे माझा स्वत:चा 'बॉक्स कॅमेरा' कसा खरेदी करू शकलो हे सर्व आठवून आजही मनाची करमणूक होते! आजही तो कॅमेरा मी जपून ठेवला आहे व ज्या ज्या वेळी तो माझ्या दृष्टीस पडतो त्या त्यावेळी त्या संबंधीच्या सुखद गतस्मृतींना उजाळा मिळतो. पुढे पुढे मी ऑलिम्पस, निकॉन सारखे कॅमेरे जरी वापरत आलो तरी त्या 'बॉक्स कॅमेऱ्याचे' माझ्या मनातील स्थान ध्रुवस्थानीच राहिले आहे.

माझ्या छायाचित्रणाच्या आजवरच्या वाटचालीत मला अनेक चांगली माणसे भेटली. काही प्रथितयश छायाचित्रकारांचे प्रयत्क्ष व प्रत्यक्षही मार्गदर्शन मिळाले. त्या सर्वांचा नामोल्लेख करणे इथे शक्य नाही. पण त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल व अभ्यासपूर्ण माहितीबद्दल मी त्या सर्वांप्रती कृतज्ञता मात्र जरूर व्यक्त करतो. परंतु असे असले तरी त्यातील तीन प्रमुख व्यक्तींचा विशेष उल्लेख मला करायलाच हवा.

पहिली व्यक्ती म्हणजे १९६३ ते १९६५ साली आमच्या शेजारी रहाणारे कै. श्री लक्ष्मीकांत बाळाराम अजिंक्य. माझा पहिला 'बॉक्स कॅमेरा' घेण्यापासून ते त्या कॅमेऱ्याद्वारे माझ्या छायाचित्रणाचा श्रीगणेशा त्यांनीच केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी काढलेली कृष्णधवल छायाचित्रे पहाताना आजही मनाला एक वेगळाच आनंद व समाधान मिळते!

माझ्या छायाचित्रणाच्या वाटचालीतील दुसरी व्यक्ती म्हणजे कै. कृष्णाराव शामराव विजयकर. 'के. एस. विजयकर' ह्या नावाने एक छायाचित्रकार म्हणून ते खूपच प्रसिद्ध होते. ते माझी बहीण सौ. भारती रसिक विजयकर हिचे श्वशुर म्हणजेच श्री नंदकुमार व श्री रसिक विजयकर ह्यांचे परमपूज्य वडील. त्यांच्या या कलेचा समृद्ध वारसा त्यांचे हे दोन सुपुत्र समर्थपणे चालवीत आहेत.

के. एस. विजयकरांकडे त्या काळी असलेल्या

## चारोळी

**-आनंद देशमुख**

सरकार येवो कोणाचेही
गरीबाला त्याचे काय
एक दिवस मतदार राजा
पाच वर्षे हाय हाय

याशिका - डी ह्या कॅमेऱ्याद्वारे त्यांनी मला अनेक अविस्मरणीय छायाचित्रे घेण्यात फार मोलाचे मार्गदर्शन केले. इतकेच नव्हे तर ही छायाचित्रे कोणत्याही प्रदर्शनाकरिता देताना वा वर्तमानपत्रात, मासिकात वगैरे प्रसिद्धीसाठी देताना कोणती पथ्ये पाळावयाची व जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही याची काळजी कशी घ्यावयाची हे रीतसर शिकविले. माझ्या दुर्दैवाने मला फार काळ त्यांचा सहवास लाभला नाही. पण त्या छोट्या कालखंडात त्यांच्याकडून मिळालेली शिकवण माझ्या छायाचित्रणाच्या पुढील वाटचालीतील अनुभवाची शिदोरी ठरली हे मात्र नक्की!

माझे तिसरे गुरू म्हणजे कै. श्री. शरद गणपतराव प्रधान. माझी मावशी कै. रोशन प्रधान हिचे पती. ते १९६० सालच्या आधीपासूनच एक छायाचित्रकार म्हणून सुप्रसिद्ध तर होतेच; परंतु 'फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया' ह्या ६० वर्षांहून जुन्या संस्थेचे आजीव सदस्य, सेक्रेटरी, खजिनदार व बरेच काही होते. मी काढत असलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शनीय छायाचित्रात रुपांतर कसे करावयाचे हे त्यांनीच मला शिकविले. केवळ त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मी काही छायाचित्र प्रदर्शनांमध्ये व इतरही स्पर्धांमध्ये काही पारितोषिके मिळवू शकलो. छायाचित्र कलेची त्यांची आवड, त्यांचे अगाध ज्ञान व त्याहूनही महत्त्वाचा त्यांचा प्रचंड उत्साह व निस्वार्थी वृत्ती ही माझ्या ह्या कलेच्या वाटचालीतील प्रमुख प्रेरणा.

ह्या तीनही दिवंगत व्यक्तींचा मी सदैव ऋणी राहीन. त्यांच्याप्रती मी कायम कृतज्ञता व्यक्त करतो!

छायाचित्रण मी कोणत्याही संस्थेत शिकू शकलो नाही. मी काढत असलेली माझी छायाचित्रेच माझी मार्गदर्शक ठरली. त्या त्या छायाचित्रांमध्ये माझ्या हातून घडलेल्या चुका पुढील छायाचित्रणावेळी कटाक्षाने टाळून अधिकाधिक सुंदर व प्रगतिशील छायाचित्रे कशी घेता येतील हेच प्रामाणिक विचार, प्रयत्न व वर उल्लेख केलेल्या तीन परमपूज्य व्यक्तींचे योग्य मार्गदर्शन व कोणताही आडपडदा न ठेवता आपल्याकडील ज्ञान पुढील पिढीला देण्याची निगर्वी व निस्वार्थी वृत्ती ह्या सर्वांमुळेच मी माझ्या परीने का होईना पण ही कला जोपासू शकलो. ह्या कलेतील दिग्गजांपुढे आपण कोणीही नाही ही जाणीव असल्यानेच मी छायाचित्रणाच्या ह्या कलेचा कायम अभ्यासक राहून हयात थोडीफार प्रगती करू शकलो.

मला सहसा कंटाळा येत नाही. मला आणखीही काही छंद आहेत हे मी सांगितले आहेच.

माझ्या विरंगुळ्याच्या क्षणी आणि इतरही वेळी हे माझे छंदच मला फार मोलाची साथ देतात. उदाहरणार्थ माझ्या संग्रही असलेली अनेक छायाचित्रे, त्यांचे संग्रह (आल्बम्स) पुन्हा पुन्हा पाहताना व अनेक मित्रमंडळी, नातेवाईक व परिचितांना दाखविताना मन गतस्मृतींना उजाळा देते. त्या त्या छायाचित्रणावेळी आपण पाहिलेली विविध प्रेक्षणीय स्थळे, त्या वेळी घडलेल्या गंमती, काही किस्से हे आठवून मनाला पुन: प्रत्ययाचा एक वेगळाच आनंद मिळतो. माझा उत्साह वाढतो व पुढील वाटचालीकरिता एक नवी उमेद मिळत रहाते. माझ्या अनुभवानुसार सांगतो की बऱ्याच व्यक्ती खूप आवडीने व अभ्यासूपणे माझी ही छायाचित्रे व त्यांचे संग्रह पहातात. ते पहाताना त्यांनी केलेले कौतुक, त्यांनी कुतुहलापोटी विचारलेले प्रश्न, त्यांचे सकारात्मक अभिप्राय व त्यांच्या चेहऱ्यावरील कौतुकमिश्रीत आनंद मला माझ्या परिश्रमांच्या सार्थकतेचे एक वेगळेच समाधान देतात.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपणाला कुठल्याही प्रकारचा का होईना पण छंद असावाच. स्वच्छंद जीवनाचा छंद हाच एक अविभाज्य भाग! छंद हा प्रत्येकाचा स्वत:चाच असतो. त्याला कोणत्याही मर्यादा नसतात. किंबहुना छंद म्हणजे जीवनऊर्जेचा अखंड स्रोत. छंदावाचून जीवनात बरीच मोठी पोकळी राहील. छंदामुळे जीवन आनंदाने भरून राहील. जगण्याची नवी उमेद पावलोपावली मिळत राहील व आपले विरंगुळ्याचे क्षण अविस्मरणीय होत रहातील ह्यात शंकाच नाही.

*

**छंद माझा आगळा**


# सही रे सही

## ✶ आर्कि. उज्ज्वला गोविंद भगवंत आगासकर ✶


मला सांगा, आयुष्य म्हणजे नक्की काय असतं?

वर वर पाहिलं तर अतिशय साधा आणि निरुपद्रवी वाटणारा, पण प्रत्यक्षात अतिशय गुंतागुंतीचा असलेला हा प्रश्न आहे, जो आपल्याला सर्वांना सतत पडलेला असतो. गंमत म्हणजे प्रश्न सतत समोर येतच राहतात, त्याची उत्तरे सापडतातच असेही नाही. कधीकधी एकामधून दुसरा- मग तिसरा असे उपप्रश्नही तयार होतात आणि या सर्वांची उकल करताकरता आयुष्य सरून जाते.

आपली स्वत:बद्दलची कल्पना हादेखील असाच एक प्रश्न आहे. आपले कुटुंब, आपले नातेवाईक, आपला समाज या सर्वांचा आपण एक भाग असतो आणि आपल्याला प्रामाणिकपणे वाटत असते की




वि. वा. शिरवाडकर यांची सही



मंगेश पाडगांवकर यांची सही (सह्या!)


आपण दुर्लक्षित राहू नये, आपण टाकाऊ किंवा नगण्य नाही आहोत हे इतरांना समजले पाहिजे. हे कुणीही मुद्दाम करत नाही, हे आपोआप होत राहते. त्यामुळे चारचौघात आपली प्रतिमा कशी दिसेल हेही आपण पाहत राहतो. आपला पेहराव आणि चेहरा हे तर इतरांना लगेच दिसतात, त्यावरून लोक आपल्याबद्दल काही अंदाज बांधतातच. आपल्या बोलण्याच्या पद्धतीवरूनही काही आडाखे बांधले जातात आणि लोक ठरवितात की, इथे संवाद




**लता मंगेशकर यांची सही**

साधायचा की कट्टी करायची!


प्रत्यक्ष व्यक्तीला न पाहतादेखील तिच्याबद्दल अंदाज करता येऊ शकतो असे सांगितले तर खरे वाटेल का! पण या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. आपण जेव्हा लिहायला शिकतो तेव्हा नकळत आपली प्रकृती आणि आपली मानसिकता यांचे प्रतिबिंब आपल्या अक्षरात पडलेले असते. त्यामुळे कुणाचे अक्षर दिसले की या विषयातले अभ्यासू त्या व्यक्तीबद्दल अंदाज करू शकतात. अर्थात अक्षर चांगले म्हणजे व्यक्ती चांगली, किंवा अक्षर वेडेवाकडे म्हणजे व्यक्तीही तशीच, असे सरळ समीकरण या विषयाला लागू पडत नाही. तो अभ्यास वेगळाच आहे. लिहिण्यावरून आपण




**हेमा मालिनी यांची सही**

अक्षराच्या अभ्यासावर उतरलो. अक्षरातून आपण इतरांनी शिकवलेले लिहू शकतो. परीक्षा असेल तर उत्तर देऊ शकतो. गणित असेल तर उत्तर शोधू शकतो. हिशेब असतील तर आकडेमोड करू शकतो. आपल्याला काही सांगायचे असेल तर इतरांसमोर मांडू शकतो.

आपल्याला जे सांगायचे असेल त्यात गद्य आले, पद्य आले, ज्यावरून इतर आपला अभ्यास करतात. मात्र, यापलीकडे जाऊन आपण जे सांगू पाहतो ते स्वत:बद्दल असते, आपण स्वत:ला इतरांसमोर मांडतो आणि म्हणतो, हे पाहा, हे माझे




**आशा भोसले यांची सही**

व्यक्तिमत्व आहे, बांधा तुमचे अंदाज.

तुमच्या लक्षात आले का? मी हे स्वाक्षरीबद्दल बोलते आहे, स्वाक्षरी म्हणजे साध्या भाषेत सही. आपल्या सहीमध्ये आपल्या प्रकृतीची आणि आपल्या मानसिकतेची सर्व वैशिष्ट्ये पुरेपूर उतरलेली असतात, असे म्हणायला हरकत नाही की आपली सही हा आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्क आहे!

मला समाजात वावरताना साहित्य-कला-समाजकारण आणि राजकारण या क्षेत्रांमधील अनेक दिग्गज व्यक्ती भेटत राहिल्या. भेटल्यावर स्वाक्षरी द्या अशी विनंती केली तर सहसा कुणी नाकारत नाही. त्यामुळे संग्रह होत राहिला. मात्र संग्रहासाठी मी काही पथ्ये पाळली, की स्वत:ची वही नेऊन त्या वहीतच स्वाक्षरी मागायची आणि ती वहीदेखील अशी की १ जानेवारी ते ३१ डिसेंबरपर्यंतच्या प्रत्येक दिवसासाठी एकेक पान



**माधुरी दीक्षित यांची सही**


आणि समोरच्या व्यक्तीची जी जन्मतारीख असेल त्या तारखेच्या पानावर सही. म्हणजे वाढदिवसाला शुभेच्छा देता येतात आणि एकाच तारखेला अनेक व्यक्तींचे वाढदिवस असतील तरी कळतं! शिवाय इतिहासातल्या त्या दिवशीच्या घटना आणि इतर व्यक्तींच्या जन्माची नोंदही केलेली असते.

या स्वाक्षरीसंग्रहामध्ये बऱ्याच गमतीजमती होतात. राजकारण आणि कला क्षेत्रामधल्या काही व्यक्ती मुद्दाम चुकीची तारीख सांगून भलत्याच पानावर सही करतात आणि त्या तरखेला शुभेच्छा दिल्यावर 'आज नाही माझा वाढदिवस, चुकलात तुम्ही!' असं म्हणण्यात त्यांना कुठल्या प्रकारचा आनंद मिळतो हे एखाद्या मानसशास्त्रज्ञाला विचारलं पाहिजे! स्वत:च्या सहीबद्दल प्रत्येक व्यक्तीला आस्था असते, आत्मीयता असते. एकदा सही केल्यावर पुष्कळ वर्षांनी पुन्हा भेट झाली तर मी त्यांना कौतुकाने पुन्हा त्यांची सही दाखवते. तर असं खूप वेळा झालं की, त्यांनी वही घेऊन 'द्या मी पुन्हा करतो' असं म्हणून पुन्हा सही केली! अशापैकी कविश्रेष्ठ मंगेश पाडगांवकरांच्या दोन्ही सह्या पाठवीत आहे, पाहाव्यात. सहसा सही करताना फक्त सही करणे हा एक प्रकार आहे आणि सोबत काही संदेश किंवा शुभेच्छा देणे हे त्या दिग्गजांच्या मूडवर अवलंबून असते. शब्दश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर आणि स्वरश्रेष्ठ लता मंगेशकर यांच्या सहीसोबतच्या शुभेच्छा वाचताना धन्य झाल्यासारखे वाटते.

आयुष्य म्हणजे नक्की काय असतं यावर विचार करताना मी म्हणते की आयुष्य हा एक यक्षप्रश्न आहे, जो सुटता सुटत नाही आणि आपल्याला सतत चकवत राहातो! त्यात आपल्या अवतीभोवतीच्या व्यक्तींचा अभ्यास करताना मोठा उपयोग ठरणारी गोष्ट म्हणजे त्या व्यक्तीची सही, जी त्या व्यक्तिमत्वाचा अर्क असते! आज माझ्या सुदैवाने माझ्या संग्रही असे शेकडो ख्यातनाम व्यक्तिमत्वाचे अर्क आहेत, जे माझ्या अभ्यासाला चालना देतात! हा संग्रह पाहिला की म्हणावेसे वाटते, सही रे सही!!

*

## व्यंगचित्र



छंद माझा आगळा

# नवनवीन बदलते...

**★ मीनाक्षी देसाई ★**

माझा छंद? बापरे! भलताच कठीण प्रश्न!! काय बरे याचे उत्तर? विचारांच्या लाटा एका पाठोपाठ उसळू लागल्या.

जसा स्वप्ने पहाण्याचा, तसाच छंद जोपासण्याचाही, भारावून टाकणारा एक काळ असतो.

विशिष्ट वयात कथा, कादंबऱ्या, कविता वाचण्याचाच उद्योग होता. पाने उलटतपालटत कविता वाचायच्या. एखादी आवडली की परत परत वाचायची. कधी कधी त्या कवीच्या आणखी कविता मिळवून वाचायच्या. कथा कादंबरीत इतके हरवून जायला व्हायचे की जेवायचीही गरज असते हे विसरूनच जायला व्हायचे. आईने मारलेल्या हाका कानात शिरतच नसत. तिकडे उत्तर देणे वा तिच्या अपेक्षेप्रमाणे वागण्याचा प्रश्नच नसे. मग साहजिकच रागवारागवी, मोठ्यांची लांबच लांब प्रवचने, उपदेशांचा पाऊस पडे. आईला आजच्या दिवसाची आटपाआटपी, दुसऱ्या दिवसाची आखणी करायची असते; गडीमाणसांना सफाई करायची असते, दुसऱ्या दिवसाच्या धावपळीची तयारी करायची असते याचे भान तरी कुठे असायचे!

जरा मोठेपणी थोडी प्रगल्भता आल्यावर कथा किंवा कादंबरी अर्धी पाऊण वाचून झाल्यावर मध्ये थांबायची खोड जडली. त्या कलाकृतीच्या निर्मात्याने आपल्या विचारानुसार शेवट केलेला असेच; आपण ही कथा किंवा कादंबरी कशी पूर्ण करू याचा विचार करण्याची सवय लागली. काही वेळा लेखकाशी एकमत होत असे; काही वेळा माझ्या डोक्यातून काही निराळाच अंत निघे. कधी कधी या प्रक्रियेचा फारच त्रास होऊ लागे, थोडं थांबून श्वास घेण्याची जरूर भासू लागे. मग हळुहळू लक्षात येऊ लागले की आपल्याला भावते म्हणून किंवा आदर्शवादाने प्रभावित होवून कथेचा अंत करता येत नाही. कथेची अन्तर्गत लय तर असतेच. काही विशिष्ट वक्तव्य असते. त्यानुरूपच व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये ठरतात. दिव्याचे बटन ऑन वा ऑफ करण्याइतके व्यक्तिरेखांचे व्यक्तित्व एकाएकी बदलता येत नाही. कथेच्या वळणावळणाप्रमाणेच या व्यक्तिरेखा साकार होतात. म्हणूनच कितीही इच्छा असली, तरी अंत या वळणानुसारच व्हावा लागतो. ही दिशा आपोआपच, स्वत:च आपली वाट, आपले गंतव्य निश्चित करते सुरुवात वा दु:खात!

मात्र काही श्रेष्ठ प्रतिभासंपन्न लेखक कथेचा शेवट इतका अनपेक्षित करतात की एकतर हसून हसून पुरेवाट तरी होते, प्रचंड आनंद तरी मिळतो किंवा आश्चर्याने तोंडात बोट तरी जाते. जीवनातले हे क्षण नवीनच ऊर्जा देऊन जातात. तर असे हे क्षण जमवण्याचा छंद काही काळ जपला.

मग परत एक वळण आले. थोडी स्थिरता आल्यावर कधी काळी मनात तरळलेली स्वप्ने डोके वर काढू लागली. कुठेतरी जाणवू लागले की आपली स्वप्ने छंदात आणि छंद स्वप्नात गुंतू लागली आहेत. हा गुंता सोडविण्यासाठी तंबोरा हातात घेतला; पण व्यवसाय, वाढत्या जबाबदाऱ्या, कधी दृष्टीचा रुसवा तर कधी पाठीचा, कधी कंबरेचा असहकार! त्यामुळे कुठल्याही कष्टसाध्य, साधनासिद्ध छंदाच्या हुलकावण्या व उपहासालाच सामोरे जावे लागले. जॅक ऑफ मेनी ट्रेन्ड्स ॲन्ड मास्टर्स ऑफ नन्! स्वप्न छंदांत बदलू नाही शकले. कुठल्याही शिखरावर पोहोचण्याआधीच उतार सुरू झाला.

तेव्हा नातवंडांच्या जगात लुडबुड केली. काही

काळ बरा जातोसे वाटले आणि कळले की नातवंडांपैकी कुणाचा नृत्याचा क्लास असतो; तर कुणाचा गाण्याचा - भारतीय आणि पाश्चात्यसुद्धा, कुणाचा ड्रॉइंगचा, कुणाचा जिम्नॅस्टिक्सचा, कुणाचा रोबोटिक्सचा आणि कुणाचे तर ह्या सर्वांपैकी कुठलेतरी दोन क्लासेस एका पाठोपाठ असतात; ह्या सर्वांच्या आधी शाळेचे प्रोजेक्ट्स मुलांना आणि त्यांच्या आईबापांना कामाला जुंपायला तयारच असतात. त्यामुळे अस्मादिकांना वेळच वेळ असला तरी नातवंडांना मनासारखे खेळताही जिकडे येत नाही तर माझ्याशी कुठे खेळणार? त्यांना वेळच नसतो त्यामुळे त्यांच्या राज्यातूनही आम्ही हद्दपार!

मागे वळून पाहताना जाणवले की कमलावराने अनंत हस्ते बरीच वरदानं दिली. पण वेळेचे महत्त्व वेळीच ओळखले नाही आणि संधींचे मोती हाताच्या ओंजळीतून केव्हाच गळून गेले. यांत्रिक घड्याळाचे काटे मागे पुढे करता येतात. पण जीवन घड्याळाचे नाही. पण हे शहाणपण सुचेपर्यंत बराच उशीर झाला होता. त्यातच जीवनात आलेल्या व्यक्ती, घडून गेलेले प्रसंग, नकळत झालेल्या चुका, कुणावरती झालेले अन्याय डोळ्यांसमोर, मनात फेर धरू लागले. एक नवीनच मानसिक घालमेल सुरू झाली. ह्यावर काय उपाय? भावनात्मक 'कल्लोळातून गते शोको न कर्तव्यः' असा विचार करून स्वतःला सावरले. विचार-मंथनातून आशेचा किरण दिसला परिमार्जनाचा.


आजवरच्या वाटचालीत माझ्याकडून नकळत दुखावले गेलेल्या माणसांची मनोमन क्षमा मागून त्यांच्याशी मानसिक नाते जोडणे हा मार्ग परिमार्जनासाठी सुचला.

काही व्यक्तींनी तर हा लोकच सोडला होता, काही परदेशात होते, काही इथेच आसपास. पण यांच्यापैकी कुणाशी व कधी पुनर्भेट होईल हे एका ईश्वरालाच माहीत. तेव्हा नाते मनामनांचेच जुळू शकत होते. तीव्र इच्छाशक्तीच हे काम करू शकणार होती. तिचाच आधार घेणे क्रमप्राप्त होते.

पाऱ्याचे कण जसे एकमेकाला चिकटून मोठ्या, अधिक मोठ्या गोलात बदलत जातात, तसेच आपले मन दुसऱ्या मनांशी जोडत, विशाल करत जाऊन विराट मनात परिणत करायचे ठरले. पण हा मार्ग उभ्या चढणीचा, अत्यंत बिकट! तरी 'केल्याने होत आहे रे' असे स्वतःला बजावत आणि प्रयत्न आपल्या हाती असे समजावत ह्या मार्गावर पाऊल तर ठेवले! आता चढण्याचा प्रयत्न हाच ह्या वानप्रस्थाश्रमाचा नवीन छंद!!

*

## व्यंगचित्र



छंद माझा आगळा

# छंद म्हणजे...

**★ प्रणिता प्रभाकर ★**

मला आज सकाळी श्रीमती सुहासिनी कीर्तिकारांचा फोन आला आणि त्या म्हणाल्या की तरूणच्या दिवाळी अंकाकरिता काहीतरी लिखाण पाठवा. विषय आहे माझा छंद.

छंद ह्या विषयावर लिहिण्यासारखे बरेच काही आहे. परंतु मी माझ्या स्वत:च्या छंदाविषयी लिहिण्या पेक्षा सर्वसाधारणपणे 'छंद' म्हणजे काय ? हे लिहिणार आहे. छंद म्हणजे नाद, म्हणजेच Inner Creativity --आंतरिक कलाविष्कार होय.

माणूस म्हटला म्हणजे त्याला कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा छंद असतो. काहींना वाचनाचा छंद असतो ,काहींना लिखाणाचा छंद असतो तर काही लोकांना चित्रकलेचा छंद असतो. काही व्यक्तींना गाण्याचा छंद( काही जण गाणी ऐकतात तर काही गातात), दुर्मीळ चित्र जमवण्याचा ,पोस्टाचे स्टॅम्प जमवण्याचा किंवा विविध कात्रणे गोळा करण्याचा नाद असू शकतो. अशा प्रकारच्या विविध छंदातून माणूस स्वत:चा एक कलाविष्कार साकारण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्या प्रयत्नातूनच एक आत्मिक / आंतरिक समाधान मिळून तीच वाट चोखंदळायचा निश्चय करतो.ह्याच निश्चयाचा महामेरू होऊन स्वत:ला आयुष्यात काय करावयाचे आहे ते स्पष्टपणे समजून घेऊन त्याच वाटेवर चालण्यास सुरवात करतो व त्यात तो यशस्वीही होतो.उदा: सचिन तेंडूलकर. म्हणजेच थोडक्यात सांगावयाचे झाले तर छंद किंवा नादातून माणूस आपले आयुष्य घडवू शकतो.अर्थात त्याला तशी अनुकूल परिस्थितीची साथ मिळणेही तितकेच आवश्यक आहे.त्यात काही टक्के नशीब, काही टक्के संधी व काही टक्के आप्तजनांचा पाठिंबा मिळणे महत्त्वाचे आहे.

काही व्यक्ती अशा असतात की त्यांचे शिक्षण एका क्षेत्रातले असते व छंद किंवा नाद त्यांना गप्प बसू देत नसल्याने व्यवसाय म्हणून वेगळाच मार्ग चोखाळतात /अवलंबतात . उदाहरणच द्यावयाचे झाले तर डॉ. श्रीराम लागू, डॉ. मोहन आगाशे,डॉ. काशिनाथ घाणेकर, डॉ.गिरीश ओक व आजच्या पिढीतील हरहुन्नर कलाकार डॉ. निलेश साबळे होय.

केंव्हा केंव्हा असेही घडू शकते की एखाद्याच्या व्यवसायातून छंद निर्मिती होऊ शकते. सर्वसाधारण-पणे आवड,छंद किंवा नाद उपजतच असतात. आणि ते त्यांना स्वस्थ बसू देत नाहीत. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे आवडीतून व्यवसाय आणि व्यवसायातून छंद निर्माण होतो. उदा: डॉ. आनंद नाडकर्णी , जे मनोविकार तज्ज्ञ आहेत. त्यांच्या व्यवसायातूनच एखादे नाटक लिहिण्याची उर्मी मिळाली व त्यात त्यांना यशही प्राप्त झाले. त्यानंतर कालावधीने दोन, तीन नाटके त्यांनी लिहिली.

त्याच अनुषंगाने मी माझ्या छंदाविषयी थोडे नमूद करू इच्छिते. म्हणजेच व्यवसायातून छंद निर्मिती होणे होय. मी व्यवसायाने समुपदेशक (counselor) असल्याने वेगवेगळ्या व तऱ्हेतऱ्हेच्या माणसांशी माझा संबंध आला. त्यामुळे मी एखाद्या व्यक्तीच्या संभाषणावरून किंवा बोलण्यावरून त्याचे अवलोकन करण्यास सुरवात केली. अर्थातच त्या व्यक्तीचा स्वभाव, विचार करण्याची क्षमता, बोलण्याची पद्धती इत्यादी इत्यादी. परंतु मी त्याचे कधी भांडवल केले नाही किंवा करण्याचा प्रयत्नही केला नाही व करत नाही.हे हेतूपुररस्सर लक्षात असू द्यात.'व्यक्ती तितक्या प्रकृती' खरोखरच आहे हे. व्यक्तीचे स्वभावदर्शन त्याच्या बोलण्या वागण्यातून कळते. हे

**कविता**

## ऐक ना मुंबईकर

**सौ स्वागता प्रियेश विजयकर**
(तन्वी रंजनलाल धुरंधर )

ऐक ना मुंबईकर
व्यथा सांगते माझी ।
थोडा वेळ काढ ना
तुझ्या ह्या मुंबई साठी ।।१।।

खड्यांमध्ये आहेत रस्ते
वाढले अपघाताचे प्रमाण ।
दर वर्षी हमखास निघते
कसे दुरुस्तीचे काम ।।२।।

कचरा सर्वत्र पसरला आहे
स्वच्छता फक्त घरामध्ये ।
आमंत्रण देतो रोगाला ।
डॉक्टरांचे मात्र भरतात खिसे ।।३।।

ट्रॅफिकनेही लावली वाट
वाहनांची रांग वाढते आहे ।
वेळेवर कुठे पोचू
ह्याची खात्री कुणास आहे ।।४।।

प्रदुषणाचे ही वाढले प्रमाण
शुद्ध हवा मिळणार कशी ?।
दम्यासारख्या आजाराशी
गट्टी ही होणार अशी ।।५।।

राजकारण थोडे बाजू सारून
माझा थोडा विचार करा ।
स्थिती माझी सुधारण्यासाठी
काही ठोस योजना करा ।।६।।

मी जर सुखावले
तर तुम्ही राहाल ना आनंदी ।
म्हणू शकाल ना गर्वाने
ही सुंदर मुंबई माझी ।।७।।

स्वाभाविक आहे व हे तर सर्वांना माहीत आहे. मग तुम्ही म्हणाल ह्यात छंद तो काय व कोणता?

सर्व साधारणपणे माणूस संवाद किंवा संभाषण करून निघून जातो. त्याविषयी तो विचार करेलच असे नाही.समजा कधी तो विषय निघाला तरच तो भाष्य करतो  परंतु मनात विचार आणून आपण त्यापासून काय शिकण्यासारखे आहे किंवा आचरणात आणण्यासारखे आहे ह्या विषयी कधीच विचार करीत नाही.जो मी करिते आणि हाच माझा छंद आहे.गेली ३६-३७ वर्षे मी ह्या व्यवसायात असल्याने माणसाचे अनेक पैलू वाचू शकले व अभ्यासू शकले.म्हणून एखाद्याच्या स्वभावावर किंवा वागण्यावर ताशेरे ओढण्यापेक्षा समर्थनच करीत आले व त्यामुळे एक प्रकारचे आत्मिक समाधान मिळत गेलं व अजूनही मिळेल ही अपेक्षा !!!

आमच्या लहानपणी चाकोरीबद्ध जीवन जगण्याची लय होती. त्यात कोणी आपला नाद जोपासायचा प्रयत्न करीत असेल ;तर त्याला 'नादखुळा','वेडा' अशा उपाधी लावून त्याला त्या छंदापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न होई किंवा त्या पासून त्याला परावृत्त केले जाई आणि घरातील वडीलधारी माणसे जे सांगतील ते ऐकावे लागे व तसे करावे लागे.त्या व्यक्तीच्या मनाचा विचार कोणीही करीत नसे. किंबहुना, समोरच्या व्यक्तीच्या मनाचा विचार करणे दुरापास्तच होते.परंतु आता तशी परिस्थिती नाही.आज मुलांना शालेय शिक्षणासोबत त्यांच्यातील आंतरिक कलाविष्काराची जाण ठेवून त्याला शास्त्रशुद्ध पद्धतीने खतपाणी घालून त्या आंतरिक कलाविष्काराची जोपासना करताना दिसण्यात येते.त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. म्हणजेच शाळेव्यतिरिक्त आजची मुले अनेक क्लासेसना जाताना आपण पहातो व सूर लावतो की, आजच्या मुलांना श्वास घेण्यापुरताही अवधी मिळत नाही. परंतु जर का मुले घरात राहिली तर आजच्या विभक्त कुटुंबपद्धतीनुसार शाळे व्यतिरिक्तचा वेळ एकतर टीव्ही समोर किंवा मोबाईलवर खेळत राहणे हाच त्यांचा उद्योग होऊन बसेल व नको त्या गोष्टी नको त्या वयात घडण्याचा संभव असू शकतो.

म्हणून छंद किंवा नाद जोपासणे अति उत्तम.

*

कथा

# खरा तो प्रेमा

**✶ जयमती जयपाल तळपदे ✶**

माहीने आपली कॅबीनबॅग विमानाच्या कॅबीनमध्ये चढवली, आणि हँडबॅग सावरत तिने सहज आपल्या सहप्रवाशाकडे एक नजर टाकली. तिचे डोळे विस्फारले गेले आणि ती अनावधानाने ओरडली, ''पीटर''! हो तो पीटरच होता. गोरा, घारा, दहा वर्षांपूर्वी दिसायचा तसाच मिश्कील डोळ्यांचा! क्षणात तिचा चेहरा रागाने लाल झाला. पण दुसऱ्याच क्षणी त्यावर वेदना दिसू लागली. 'का वागलास तू माझ्याशी असे?'' बसता बसताच ती बरसू लागली.

पीटर, माही, अरमान आणि सुरींदर अशी चौघांची अगदी शाळेच्या बालवाडीपासून मैत्री होती. वय वाढत गेलं, वर्षं सरत गेली तशी ती जास्तच घट्ट होत गेली. माहीच्या घरचे वातावरण अगदी पुरोगामी. त्यामुळे त्या आंतरजातीय, आंतरधर्मीय मैत्रीला कुणीच विरोध केला नाही. तिच्या घरी जातपात मानलीच जात नसे. बारावीपर्यंत एकत्र शिकल्यावर मग मात्र सर्वांच्या दिशा बदलल्या. आपापल्या आवडीप्रमाणे प्रत्येकाने डिग्री घेतली आणि सगळेजण आपआपल्या क्षेत्रात स्थिरावले. प्रत्येकाच्या घरी आता लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या. माहीच्या आईने विषय काढताच माही म्हणाली, ''आई तुम्हाला काही माझ्यासाठी मुलगा शोधायला दूर जायला नको. मी आपल्या पीटरशीच लग्न करायचे ठरवले आहे.'' तिचे वाक्य पूर्ण होताच आईचे डोळे मोठे झाले. ''काय वेडीबिडी आहेस का तू? अगं, तो ख्रिश्चन, आपण हिंदू! मैत्री वेगळी आणि लग्न वेगळे. हा आयुष्याचा प्रश्न असतो. माझे आई, तू ख्रिश्चन आणि मुस्लीम सोडून कुणाशीही लग्न कर. पण कृपा करून हा हट्ट सोडून दे. काय हो, तुम्हाला काय वाटते?'' मात्र यावेळी बाबासुद्धा आईची री ओढत म्हणाले, ''हो बाळा, ह्या लोकांशी निभावणे सोपे नाही. माझ्या ऑफिसमधल्या सोनम आणि मंगलचे काय झाले माहिती आहे ना? दोघींनीही ख्रिश्चन नवरा केला आणि आता शेवटी घटस्फोट घ्यायला लागला.'' ''पीटरची आई कट्टर ख्रिश्चन आहे आपल्याकडे ना ती सत्यनारायणाच्या पूजेला येते ना ती प्रसाद खाते. आणि तू तर रोज देवाला नमस्कार करून उदी लावून घराबाहेर पडतेस. कसं निभावेल तुझं त्या घरात?'' आई म्हणाली.

''आई, पण पीटर तसा नाही ना. तुम्ही त्याला चांगलेच ओळखता. आपल्याकडे तो गणपतीला येतो. येताना प्रसादही आणतो. तो तर पुरोगामी आहे ना?'' माहीने त्याची बाजू मांडली. ''अगं, पीटर चांगलाच मुलगा आहे. पण तुझं नातं फक्त पीटरशीच नाही तर त्याच्या आईबरोबरही जोडलं जाणार आहे आणि पीटर आईच्या शब्दाबाहेर नसतो. ती कुठलीही तडजोड नाही करणार आणि मग तुला मात्र मनस्ताप होत राहील.''

माही धुसफुसत आपल्या खोलीत गेली. संध्याकाळी जेव्हा ती पीटरला भेटली, तेव्हा तिने सारी हकीकत त्याला सांगितली. ''पीटर तू घरी मम्मीशी बोललास का?'' तिने विचारले. ''नाही, आजच बोलतो. पण आपल्या घरच्यांच्या परवानगीशिवाय आपण लग्न नाही करायचं'' असे म्हणून पीटर उठला व त्याने तिला नेहमीसारखे घरी सोडले. नंतरचे दोन दिवस पीटर आणि माही दोघांचेही खूप गडबडीचे गेले. भेटायला बोलायला वेळच नाही मिळाला. आणि नंतर त्याचा फोन स्विच्ड ऑफ मिळायला लागला. शेवटी एकदा वेळ काढून ती रात्री त्याच्या घरी गेली. दाराला मोठ्ठं

With Best Compliments from:

# Panchal Industrial Engineering

6-7, Amar Industrial Estate,
Kurla Andheri Road,
Sakinaka,
Mumbai-400072
Tel. 91 - 22 - 2851 2629

कुलूप होते. आणि नंतर ते नेहमीसाठीच राहिले. ग्रुपमध्येही कुळाला काही माहीत नव्हते.

आणि आज तब्बल दहा वर्षांनी पीटर समोर दिसत होता. तसाच निरागस हसरा आणि चेहऱ्यावर कुठेही अपराधीपणा नसलेला. ''कशी आहेस?'' त्याने विचारले. ''तुला काय त्याचे? मी खूप आनंदात आहे. लग्न झाले आहे माझे आणि नितीनने मला खूप सुखात ठेवले आहे. पण तू का सोडून गेलास मला काहीही न सांगता? माझी काय चुकी होती?'' माही बरसली. ''माही, आपण शेवटचे भेटलो त्याच्या दुसऱ्या दिवशीच मी माझ्या मम्मीशी आणि नंतर तुझ्या बाबांशी बोललो. पण दोघांनाही आपले लग्न पसंत नव्हते. मी खूप विचार केला. आपण एकमेकांबरोबर जमवून घेतले असते. पण मम्मीशी जमवून घेणे तुला जमले नसते. ती फार हट्टी आहे. आणि मी तिलाही सोडू शकत नव्हतो. सगळ्यांशी जमवून घेताना तुझी फक्त तारेवरची कसरत झाली असती. माही, मला तुला सुखात ठेवायचे होते. तुझी फरफट होताना मला पहावले नसते. यासाठी का मला तुझ्याशी लग्न करायचे होते?'' ''पण मग हे सर्व तू मला का नाही सांगितलेस? मला न सांगता का निघून गेलास?'' ''माही मी तुला सांगितले असते तर तू हे आव्हान स्वीकारले असतेस. ते मला नको होते. स्वत:चे मन मारून, पटत नसलेले काहीतरी करून तुझे आयुष्य जगणे मला नको होते. म्हणून मी न सांगता निघून गेलो. मी तुझ्या नजरेसमोर राहिलो असतो तर आपण एकमेकांना कधीही विसरू शकलो नसतो. पण आता तू सुखी आहेस ना, तर मी एकदम खुश आहे. माझंही लग्न झालंय. रोझी येणारच आहे एअरपोर्टवर. तुझी ओळख करून देईन.''

विमान उतरले आणि दोघे एकत्रच चालू लागले. बाहेर येताच पीटरने एका गोड मुलीकडे पाहून लांबूनच हाक मारली. ''रोझी, कम हियर.'' माहीने तिच्याकडे पाहिले आणि तिला एकदम जाणवले की रोझी आंधळी होती. पीटरने जवळ जाऊन तिचा हात धरला आणि म्हटले, ''माही आलीय बघ'' रोझी गोड हसली. तिने हात पुढे केला आणि म्हणाली, '' तुझ्याबद्दल खूप ऐकलंय मी पीटरकडून. बरे झाले आपण भेटलो.'' माहीने रोझीचा हात अलगद हातात घेऊन प्रेमाने दाबला. माहीला जाणवले इथेही पीटरने कुणाला तरी आनंद देण्याचा, सुखात ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

इतक्यात मागून आवाज आला. ''हाय पीटर, कसा आहेस?'' आवाज नितीनचा होता. ''तू ओळखतोस पीटरला?'' माहीने आश्चर्याने विचारले. ''चांगलाच'' नितीन म्हणाला. ''मग मी सर्व सांगितले तेव्हा तर तू काही बोलला नाहीस?'' माहीने विचारले, ''अगं, पीटरनेच मला तुझ्याविषयी सर्व सांगून तुझ्यासाठी पाठवले होते. त्याची इच्छा होती की तू खूप सुखात रहावेस. जे तो तुला देऊ शकला नाही ते सर्व मी द्यावे. कारण तुझी तेवढी योग्यता होतीच.'' माही आश्चर्यचकीत होऊन सर्व ऐकत होती. ज्या पीटरला ती विश्वासघातकी समजत होती, त्याने तिचा किती विचार केला होता. तिला वाऱ्यावर सोडून तिची नाव वादळात हेलकावत बुडू नये म्हणून त्याने नावाड्याचीसुद्धा योजना केली होती. खरंच; खरं प्रेम याशिवाय वेगळं काय असते! तिचे डोळे भरून आले. ती पटकन पुढे झाली आणि पीटरचा हात हातात घेऊन म्हणाली ''थँक्स''!

*

## व्यंगचित्र



With Best Compliments from:

# Ramkrishna Enterprises

Specialists in: CIVIL REPAIRING, CEMENT BASED WATERPROOFING, A. C. SHEETING, G. I. SHEETING, MANGALORE TILING, BITUMEN WATERPROOFING, CHEMICAL WATERPROOFING & MONSOON REPAIRING

**Mr. Laxmanrao Balsanta,**
**B-13, 2nd Floor, Flat No. 29,**
**Geetanjali Nagar, Jasmine Mill Road,**
**Mahim (E), Mumbai-400017.**

# छोटयां-मोठ्यांसाठी

# कल्लाप

**✶ सुमन नवलकर ✶**

''आपण राधिकाला या जवळच्याच शाळेत घालायचं हं का. म्हणजे जाता-येता कोणी तिला सोडेल, आणेल. ती स्कूलबस, तिच्यासाठी वाट पाहणं, 'बरोबर नेऊन सोडेल ना?' म्हणून काळजी करणं नकोच.'' आई म्हणाली.

''पण त्या शाळेची प्रवेश-परीक्षा पास व्हायला हवी ना राधाबाईंनी?'' बाबा म्हणाले. ''सगळं तर येतं तिला. पटापट उत्तर देते. प्रवेशपरीक्षा नक्की पास होईल ती. त्यातून आपण रोज तर घेतोच तयारी करून.'' आई म्हणाली. बोलल्याप्रमाणे प्रवेश-परीक्षेची तारीख येईपर्यंत सगळेजण जाता-येता राधिकाची तयारी घेत होते करून.

''नाव काय?'' ''राकिधा फकडे''. ''आपल्या देशाचं नाव काय?'' ''भातर.'' ''राहतेस कुठे?'' ''दारद'', ''आवडता रंग कुठला?'' ''पिळवा'', ''आवडता सण कुठला?'' ''दिळावी'', ''दिवाळीत काय वाजवतात?'' ''फकाटे'', ''दिवाळीत आई कोणता फराळ बनवते?'' ''आई ना, चिडवा, चलकी...'' बस-बस. आणखीही नावं राधिकेने सांगितली असती. पण बाईंना जेवढं विचारायचं होतं, तेवढं विचारून झालं होतं.

''आम्ही नाही घेऊ शकत तिला आमच्या शाळेत. अहो तिला नावही सांगता येत नाहीये तिचं. उद्या तशीच वेळ आली तर नाव तरी सांगता आलं पाहिजे ना तिला? तरी आजच प्रवेशपरीक्षा सुरू झाल्यात. अजून पंधरा दिवस तरी चालतील. तोपर्यंत तिला तिचं नाव आणि बाकी थोडं नीटपणे सांगता आलं तर फेरविचार करू आम्ही. हा बघा तिचा अर्ज बाजूला ठेवतेय. कारण येतंय तिला सगळं. पण शब्द उलटे-पालटेच बोलतेय ती.''

''काय रे? दोघं अशी तोंडं पाडून का आलात?'' आजीने विचारलं. पण तोंडं पाहूनच तिला समजलं होतं की काय झालं असणार,'' एवढी माझी हुशार नात आणि तिला देत नाहीयेत हे लोक प्रवेश? काय झालंय काय नेमकं?'' आजीच्या प्रश्नावर बाबांनी तिला मोबाईलवर 'टेप' केलेली प्रवेश परीक्षाच ऐकवली. ''उत्तरं तर सगळी बरोबर आहेत की रे!'' ''हो आई, पण तिच्या भाषेत! ऐकणाऱ्याला ती कळायला नकोत का? तीन अक्षरी शब्द आला, की दुसऱ्या आणि तिसऱ्या अक्षराची उलटा-पालट झालीच पाहिजे. तरी त्यांनी अजून पंधरा दिवस दिलेत आपल्याला. आता या पंधरा दिवसात काय जादू होणार आहे?''

मिशीला पीळ देत आजोबा म्हणाले, ''मी सांगतो ते करा. बघा कसं बरोब्बर होतं तें.''

आजोबांच्या युक्तीप्रमाणे सर्वांनी बोलायला सुरुवात केली. अगदी राधिकासारखंच. म्हणजे तिला हाक मारायची ती मुळी 'राकिधा' आजोबांना 'आबोजा' हाक मारायची. 'मिचरी तिटख' लागली का विचारायचं. 'काडकी'ची कोशिंबीर 'खाटर' झालीय का विचारायचं. सामान आणायला जाताना म्हणायचं, ''राकिधा, जरा ती 'पिवशी' दे बघू. 'चणटी, लोचणं, पाडप' - जेवतानाही असंच सगळं बोलायचं. आठवड्याभरातच 'राकिधा'ची 'राधिका' झाली. आजोबांची कॉलर ताठ. ''आता घ्या म्हणावं प्रवेश-परीक्षा''. आई-बाबा राधिकाला घेऊन शाळेत गेले. प्रवेश परीक्षा उत्तम झाली.

बाई म्हणाल्या, ''पालकानाही विचारतो आम्ही थोडं. तुमची दोघांची नावं सांगा आधी.'' ''रावघ फकडे'' बाबा म्हणाले. ''रेकुणा फकडे'' आई म्हणाली. ''कल्लाप' बाई म्हणाल्या.

✳

# A Glass 0f Milk

**✶ Abha Desai ✶**

**III Std.**

Once upon a time there lived a poor boy who used to sell things. But one day he was very hungry and thirsty. He went to a nearby house and knocked the door. A young girl opened the door. He asked for a glass of water. But she was clever and sharp. She was kind too. So she could understand that he was not only thirsty but also hungry. So she gave him a glass of milk.

As time passed, after many years that boy became a doctor and so he was rich also. But that kind girl became poor like the boy was before. Once she fell sick. She was admitted in the same hospital where that boy was working. The amount of treatment was too much and doctor suddenly remembered that she is the one who had given him a glass of milk and was very kind to him.

So he cancelled that bill into zero.

***Moral of the Story:***

If we give little to others they will give us more.

*

## कसे ते बालपण माझे?

**- आरती कोठारे**

(इयत्ता ९वी)

कोरे आहे ते पान तसेच
आयुष्याच्या पुस्तकात
विरून गेले बालपण माझे
सततच्या अभ्यासात
कधी नव्हे ते कळून चुकले
बालपण माझे वहात गेले
आता आठवते मला
मी कधी खेळलेच नाही अंगणात
सगळे म्हणत मला छोटी
कधी आलेच नाही त्यांच्या ध्यानात
स्वप्ने होती मोठी माझी
जमिनीपासून आकाशात
करत राहिले सर्वकाही
दुसऱ्यांची मते घेऊन विचारात
भविष्य घडवायचे होते मला माझे
अर्पिले सर्वस्व त्यात
परंतु मुकले मी त्या टप्प्यात
माझ्या त्या बालपणास
म्हणूनच म्हणावे लागते आता
मी कधीच नव्हते त्या रूपात
कोरे आहे ते पान तसेच
आयुष्याच्या पुस्तकात...

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# RIDDLES

✶ compiled by **Aditi Desai** VII Std. ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

1. What is the easiest way to double your money?
2. What has a thumb and five fingers but is not alive?
3. What has to broken before you can use it?
4. What belongs to you but is used more by others?
5. Everyone has it and no one can lose it, what is it?
6. What has a neck but no head?
7. What goes up and doesn't come back down?
8. It's been around for millions of years, but it's no more that a month old. What is it?
9. I'm light as a feather, yet the strongest man can't hold me for more than five minutes. What am I?
10. I'm tall when I'm young and I'm short when I'm old. What am I?
11. A house has four walls. All of the walls are facing south, and a bear is circling the house. What colour is the bear?
12. What is at the end of a rainbow?
13. A girl is sitting in a house at night that has no lights on at all. There is no lamp, no candle, nothing. Yet she is reading. How?
14. How many months have twenty-eight days?

(उत्तरे शेवटच्या पानावर)

## ओळखा पाहू

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# मराठी म्हणी

### ✶ कल्पना सुभाष कोठारे ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

कुटुंबातील सर्वजण किंवा मित्रमैत्रिणी एकत्र आले असताना, ठराविक वेळ देऊन हा खेळ खेळून पहा. खेळ सोपा आहे. प्रत्येकास, कागदावर शब्दांची पहिली अक्षरे लिहून द्यावीत - शब्द पूर्ण करून - म्हण तयार झालेली उत्तरात लिहायची आहे.

उदाहरणार्थ : - अ ते मा - अती तेथे माती

१) पु ठे मा श - ?

२) व मा घो - ?

३) ले बो सु ला

४) का मा, ता आ

५) ग घ खा

६) ना मी अ

७) भ दि ओ, भ हा प.

८) घ झा थो, व्या धा घो

९) क ना त्या ड क

१०) ज्या गां बो, त्या गा बा

११) अ श त्या बै रि

१२) सु तु पा म

१३) मू ल की म

१४) बो क बो भा

१५) न क वा श

(उत्तरे शेवटच्या पानावर)

# PEACE

**-Aarati Kothare**
IX Std
*(Prize winning poem)*

**Tell me where I can find Peace
Come on and tell me
No you can't, cause peace is not a thing to be found.
It just can't be found, neither in the Himalayas, nor anywhere else**

**Tell me how does Peace look
Tell me what are signs of Peace
can you? It's just not possible!
cause Peace is to be felt and experienced and not to be seen**

**They say, they are in Peace
But how can they be?
That was said just after a family fight**

**You have to gain it yourself
No ones gonna hand it over to you**

**Peace is a holy word
It is a human right
But do we really have it? Have we gained it?
No, not yet
It is still our right, but we are unaware of it
We have to gain it, as soon as possible**

**Peace is not for you and me
It is not for him and her
It is for the whole world
It is for us**

**Peace can stop all wrongs
Peace can show a different path
Peace is the only support
So we have to get up and get it**

*

# मधुरा आणि मयुरा

**✶ सुमन नवलकर ✶**

मधुरा आणि मयुरा रोज आईशी भांडत बसतात. मधुरा म्हणते, 'हे गं काय माझं नाव ठेवलंय? मधुरा! मधाच्या बाटलीवर किंवा साखरेच्या पिशवीवर चांगले दिसेल. पण माझं? मुलीचं नाव मधुरा. मला हसतात सगळे. म्हणतात 'गोडुबाई, गोडुबाई गोड तुम्ही गोड, मुंग्या आणि माशांना तुमची ओढ.' मयुरा म्हणते, ''आणि माझं नाव ठेवलंय मयुरा. मी काय लांडोर आहे? मलाही शाळेत सगळे चिडवतात. म्हणतात, ''लांडोरबाई, लांडोरबाई गळलीत तुमची पिसं, नाचाल तुम्ही सांगा, कसं? कसं? कसं?''

आईला कळत नाही की या मुलींना समजवावं ते कसं. बारश्याला त्यांची नाव ठेवली तेव्हा या बारा दिवसांच्या होत्या. यांना विचारून यांची नाव ठेवणं शक्यच नव्हतं. आपण आपल्या आवडीने त्यांची नाव ठेवली, आता या चांगल्या सात-आठ वर्षांच्या झाल्यावर यांची नावं यांना नकोशी झालीत. बरं शाळेतल्या मुलांना काय? दुसरी नाव ठेवली; तरी त्या नावांनी पण चिडवतील. दोघी आहेत हुषार. शाळेतल्या मुलांना व्यवस्थित उत्तर देऊन चूप का बसवत नाहीत?

मग आईने मुलींना नाच आणि गाणं शिकवायला सुरुवात केली. तिला येत होतं तेवढं तिने शिकवलं. पुढे मग क्लासमध्ये घालून शिकवलं. लवकरच दोघीजणी बऱ्यापैकी नाचू-गाऊ लागल्या. वार्षिक कार्यक्रमात, स्पर्धांमध्ये बाईंना नाचणारी, गाणारी मुलं हवीच असतात. बाईंनी त्यांना कार्यक्रमात घेतलं. दोघीही गायल्या, समूहनृत्यात नाचल्या आणि स्पर्धांमध्येही दोघींनी बक्षिसं मिळवली. मग बाईंनी त्यांना आंतरशालेय स्पर्धांसाठीही निवडलं. दोघी त्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन तिथेही बक्षिसं मिळवून आल्या. शाळेच्या सूचनाफलकावर दोघींची नावं रंगीत खडूंनी लिहून शाळेने त्यांचं कौतुक केलं.

चिडवणाऱ्या मुलांची तोंड आपोआपच बंद झाली. चिडवणारी मुलं दोघींना पाहून माना खाली घालू लागली. एकदा एक बाई आल्या नव्हत्या. मोकळ्या तासाला दुसऱ्या बाई आल्या. म्हणाल्या, ''प्रत्येकाने पुढे यायचं आणि काहीतरी करून दाखवायचं.'' मधुराचं नाव घेतलं तेव्हा मधुराने एक गाणं म्हटलं. बाकावर जाऊन बसण्यापूर्वी म्हणाली ''मधुरा मी मधुरा - आवाज माझा मधुर, गाण्यातून निघतात माझ्या, बासरीचे सूर.'' मयुराचं नाव घेतलं तेव्हा मयुराने एक छोटसं नृत्य केलं आणि जागेवर जाऊन बसण्यापूर्वी म्हणाली, ''लांडोरबाई असले तरी पिसं गळलीत तरी, नाचात मला हरवायला, पडेल खूप भारी.''

मधुरा-मयुरांना त्यांची नावं आवडायला लागलीत आणि मुलांनाही.

✳

---

## The Morning Sun

As the sky blooms with the light of the Sun  
Down goes the moon for the morning to come.  
down the stream goes my paper boat,  
the water lapping gently at it when it floats.  
And when it reaches some land, a dreamland,  
and stops somewhere,  
who knows who will find it there.  
And maybe, just maybe I'll get a  
message in a paper boat!  
on the waves it will float,  
A little scroll,  
all rolled up in one roll.

**- Chaitanya Nitish Kirtikar,**  
Std. IV

✳

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# हात बघणारा डॉक्टर

## ✶ सुरेश नवलकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

पुण्यातील माघाची थंडी. गळ्याला मफलर, लांब हाताचा स्वेटर, अशा उबदार बंदोबस्तात हेमंत आणि विवेक ही जोडगोळी आदिती गार्डनमध्ये मुकाटपणे मॉर्निंग वॉक घेत होती. निवृत्त झाल्यापासून या शाळामित्रांचा हा दैनिक कार्यक्रम. चार राऊंड मुकाटपणे शिस्तीत मारायच्या. मग टपरीवरचा कडक चहा घेऊन पारावर बसून मनसोक्त गप्पा हाणायच्या.

नुकतीच नरेंद्र दाभोळकरांची निघृण हत्या झाली होती. तेव्हा गप्पांचा आजचा विषय होता- अंधश्रद्धा.

''हेम्या, मी तर म्हणतो भविष्यात काय होणार आहे हे जाणण्यासाठी कुंडल्या घेऊन ज्योतिषाकडे जाणे हीसुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे. तुला नाही वाटत?'' विवेकने विषयाची नांदी केली.

''मला नाही वाटत. ज्योतिष हे एक प्राचीन शास्त्र आहे. अरे, परवा टीव्ही शो मध्ये शरद उपाध्येनी हेच सांगितले. नाही का?''

''इंग्रजीत एक म्हण आहे, 'अर्धवट ज्ञान हे भयंकर धोकादायक असते.' असे अर्धवट ज्योतिषी ग्रह दूषित आहे, कालसर्प योग आहे. इ. सांगून भोळ्या जनतेला शांती वगैरे करायला लावून अक्षरशः लुटत असतात. त्यात कळस म्हणजे हे बाबा लोक! नरबळी काय किंवा मुक्या प्रण्याचा बळी काय. यांनी कोणाचं भलं होतं? असेल तर ह्या बाबा लोकांचेच. पण त्यांच्यावर अंधविश्वास ठेवणारी जनता आहे ना?''

''विवेक, पण ज्याने ह्या शास्त्राचा सखोल अभ्यास केला आहे त्याच्यावर विश्वास ठेवायला काय हरकत आहे?''

''हेम्या, ते म्हणजे गवताच्या गंजीत टाचणी शोधण्यासारखे आहे. नाही का?''

''विवेक, जाऊ दे भविष्य वगैरे. पण तांत्रिकांचे काय? त्यावरून एक गोष्ट आठवली. आपला तो सुभाष गुप्ते आठवतो. क्रिकेटर नाही रे. आपल्या वर्गात होता तो. त्याचे आजोबा म्हणे एका विदेशी बँकेत मॅनेजर होते. अचानक आजारी पडले. पोटात अन्न टिकेना. मोठमोठे नामांकीत डॉक्टर झाले. गुण काही येईना. कुणाच्या सांगण्यावरून मांत्रिकाला दाखवले. त्याने निदान केले की आजोबांचा उत्कर्ष बघून त्यांच्या ओळखीच्याच व्यक्तीने त्यांच्यावर करणी केली आहे. पुरावा म्हणून एका दिव्यात त्याने त्या व्यक्तीचे चित्र दाखवले. ती व्यक्ती त्यांच्या शेजारी राहणारीच होती. उपाय म्हणून त्याने काही क्रियाकर्म केले. भली मोठी दक्षिणा घेऊन जाताना त्यांनी आजोबांना ईशारा दिला की ह्यापुढे त्यांनी स्मशानात जाता कामा नये. सुभाष म्हणतो त्यानंतर अजोबांच्या आजारात खूपच सुधारणा झाली व ते कामावरही रुजू झाले. थांब. खरी गंमत पुढेच आहे. काही दिवसांनी त्यांच्या एका आप्तेष्टाचे निधन झाले. घरातील मंडळी नको म्हणत असताना आजोबा स्मशानात गेले. आणि आश्चर्य म्हणजे दुसऱ्याच दिवसापासून आजोबांनी जे अंथरुण धरले ते शेवटचेच! आता सांग विवेक, त्या तांत्रिकाच्या विद्येवर विश्वास ठेवायचा की नाही?''

थोडा वेळ विचार करून विवेक म्हणाला, ''तांत्रिकाच्या क्रियाकर्माने आजोबांना बरे वाटायला लागले हा केवळ योगायोग होता. अरे हेम्या, आजोबा डॉक्टरांची औषधे घेतच होते. त्याचा गुण आला व त्यांना बरे वाटू लागले.''

''अरे, पण मग स्मशानात गेल्यावर ते पुन्हा कसे आजारी पडले आणि स्वर्गवासी झाले?''

''सांगतो ऐक. कामावर जायला लागल्यावर आजोबा निर्धास्त झाले. औषध घेणे थांबविले किंवा त्यात अनियमितपणा आला. त्यामुळे शरीरातील जंतुंची औषधांना प्रतिकार करण्याची शक्ती वाढली.

त्यांनी जोरदार हल्ला केला व डाव साधला. म्हणजे थोडक्यात कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच गाठ पडली.''

''विवेक, तू म्हणतोस ते पटते. तांत्रिकाच्या नावापुढे फुली. बरं, आता मी तुला माझी स्वत:ची आणि एका हात बघणाऱ्या डॉक्टराची गोष्ट सांगतो. मी बीएस्सी झाल्यावर आता पुढे काय करायचे याचा विचार चालू होता. माझ्या मामांनी आईपप्पांना सुचविले की त्यांचा एक वर्गमित्र आहे. तो चांगला हस्तसामुद्रिक असून त्याचा सल्ला घ्यायला काय हरकत आहे? पप्पांची मीलही बंद होणार होती. तेव्हा मी आणि पप्पांनी त्याचेकडे जावे असे ठरले. पप्पांचा अजिबात विश्वास नव्हता. पण मामांनी जेव्हा सांगितले की हा साधासुधा रोडछाप हस्तसामुद्रीक नसून चांगला श्रीमंत आणि गोल्डमेडलिस्ट डॉक्टर (एमबीबीएस) आहे व त्याच्याकडे भेटायला वेटींगलिस्ट असते, तेव्हा ते तयार झाले.''

''एक हुषार मेडिकल डॉक्टर हात बघणारा डॉक्टर कसा झाला बुवा?''

''मी मामांना तोच प्रश्न विचारला. तेव्हा मामा म्हणाले की, गोल्डमेडॅलिस्ट डॉक्टर झाल्यावर डॉ. साने मित्रांसोबत काशीला गेले. तिथे सहज गंमत म्हणून एका रोडछाप हस्तसामुद्रिकाला त्यांनी हात दाखविला. थोड्या वेळाने त्या हस्तसामुद्रिकाने जे उद्‌गार काढले त्याने डॉ. साने उडालेच. तो म्हणाला, ''तुम्ही वैद्यकशास्त्र शिकला आहात. पण त्याचा उपयोग तुम्ही रोग्यांना बरे करण्यासाठी करीत नाही व यापुढेही करणार नाहीत'' ही वस्तुस्थती होती. डॉ. साने खूप श्रीमंत होते. वडिलांची फॅक्टरी होती. मेडिकलची प्रॅक्टीस करण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. केवळ आवड म्हणून त्यांनी एमबीबीएस केले होते.''

''म्हणजे त्या डॉ. सानेंनी मेडीकलची एक सीट फुकट घालवली, असो. पण हा हात बघणारा डॉक्टर कसा झाला?''

''ते उद्गार ऐकताच डॉ. सानेंनी त्या रोडछाप हस्त सामुद्रिकाचे पाय धरले. त्याला हजार रुपये दक्षिणा म्हणून दिले व मला तुमची विद्या शिकवाल का; असे विचारले. त्या वयोवृद्ध हस्तसामुद्रिकाने नकार दिला व काशी विद्यापीठात जावयास सांगितले. मग काय; एकपाठी डॉ. सानेंनी मेडिकलप्रमाणे ह्या शास्त्राचाही सखोल अभ्यास केला व ही विद्या हस्तगत केली.''

''हेम्या, पुढचे लौकर सांग. आज गप्पांत बराच उशीर झाला आहे. तुझी वहिनी काळजी करीत असेल.''

''ठरलेल्या दिवशी व वेळी मी पप्पांसोबत डॉ. सानेंच्या कन्सल्टिंग रूममध्ये गेलो. लय भारी ऑफिस होते. गेल्या गेल्या सुहास्यवदनी सुंदर रिसेप्शनिस्टने आमचे स्वागत केले. आमच्याकडून फॉर्म भरून घेतले. फॉर्मवर प्रत्येकाच्या दोन्ही हातांचे छाप घेतले. हे सर्व झाल्यावर तिने आम्हाला सांगितले की डॉ. साने खूपच व्यस्त असतात; तेव्हा फक्त एकाच प्रश्नाविषयी बोलतील. तो प्रश्न तुम्ही फॉर्ममध्ये लिहा आणि प्रतिक्षाकक्षात बसा. आम्ही फीबद्दल विचारले तेव्हा गोड हसत तिने उत्तर दिले. डॉ. साने पैसे किंवा बक्षिस घेत नाहीत, केवळ आवड आणि अभ्यास म्हणून हे करतात.''

''हेम्या, ऑफिसपुराण बस कर. पुढे जा. आटप लौकर''

''हो सांगतो रे. माझा प्रश्न होता - मी पुढे काय करायचे? त्यांचे उत्तर होते. शिक्षणानिमित्त परदेशी जाशील. शिक्षण खनिज पदार्थासंबंधित असेल. नंतर मात्र मायदेशी येऊन नोकरी व व्यवसाय करशील. एव्हढे बोलून त्यांनी माझा हात दूर सारला व बेल वाजवली.''

''हेम्या हे १०० टक्के खरं झालं. पप्पांना काय सांगितले ते लौकर सांग.''

''पप्पांचा प्रश्न होता. टेक्सटाइल मीलना वाईट दिवस आले आहेत. तेव्हा पुढे काय करावे? डॉ साने म्हणाले, ''लौकरच तुम्ही परदेशी मिलमध्ये मोठ्या हुद्याच्या जागेवर जाल. तुम्ही मायदेशी परतणार नाहीत.'' ''म्हणजे तिथेच मी मरणार आहे का;'' असे पप्पांनी विचारले. पण डॉ. सानेंनी त्यांचा हात दूर सारला व बेल वाजवली. तुला माहीतच आहे की हे सुद्धा १०० टक्के खरे झाले. पप्पा लौकरच श्रीलंकेच्या एका प्रसिद्ध मिलचे जनरल मॅनेजर म्हणून रुजू झाले आणि ३ वर्षांनी मायदेशी परतण्यापूर्वी झोपेत ब्रेन स्ट्रोकनी त्यांची ज्योत मालवली. आता सांग ह्याला तू काय म्हणशील?''

''कुंडली बघून भविष्य वर्तविणे आणि हात बघून भविष्य वर्तविणे हे विश्वसनीय शास्त्र आहे. पण ते येऱ्या गबाळ्याचे काम नाही. चला आता घरी.''

✳

लेख

# DO YOU LOVE YOURSELF?

**✶ Ketaki Rajan Jayakar ✶**

Had somebody asked me this question DO YOU LOVE YOURSELF ? a few years ago I would have been very upset at this impertinent question. How can the woman of the house be selfish and love herself when culturally she is the Anant kaalchi Maata but kshanachi patni!

When I entered my matrimonial home after the wedding reception, my mother-in-law told me that from today I am wedded first to the family and then to my husband! None of my readers will be surprised at this commandment because all of us have gone through these lofty ideals. We have seen our mothers, grandmothers, kakis, Atya, Mavshis, Mami all behaving like the Mother Indias who sacrificed their lives for the entire family and won the love and affection and respect of the family members.

But did anyone stop to think whether they really wanted to sacrifice their needs, their desires for self gratification for the lofty ideals of welfare of the family! I am seeing many women who have sacrificed their lives for their husbands and children and the other family members, but towards the end of their lives they feel that they have neglected themselves. They have lived their lives through their husbands and children, as for their own dreams and aspirations, they were just swept under the carpet of seva! These so called ideal women never said NO to anything, may it be getting up early to wake up the children to study for their exams, or staying up late for the children to come home from their outings, or waiting for the husband to return from meeting his friends and then have dinner after he has eaten! These women have always accommodated the rest of the family members and adjusted with their plans, keeping their own plans on the back burner or just shelving them. They have even neglected their own health, postponing their annual check ups, and just popping some pills or painkillers and continuing doing their jobs. Show has to go on is the bottom line. AAI RETIRE HOTEY? Aai kadhich retire hou shakat nahi!

Loving yourself is a concept which is alien to our Indian Culture. Service before self is our motto. When I first read about Loving yourself, I was shocked. How can a person love her own self? Once I started reading the American author Louise Hay, I gradually understood the concept of Loving oneself. Loving oneself is not being selfish, of always thinking of oneself first. Loving oneself is respecting your own self, your body, your own person, taking care of it, giving it proper rest, focusing on your own wishes, knowing your own boundaries as to how far can your body be stretched and basically doing what you want and knowing when to say NO. Loving yourself does not mean that you neglect your duties to the family or be self centered. I have many friends who are of my age, well past the retirement age, having worked all their lives, earning a handsome pension, free to pack their bags and travel to exotic destinations, however looking after their grandchildren is now their job! Even on weekends the daughters/ daughter-in-law who have a holiday continue to have their own programmes leaving the old woman saddled with their children. Does this woman not need a break just as the daughter/daughter-in-law? In her young age she had the energy to multitask, but as she has grown old, her

## वात्रटिका

### स्मार्ट फोन

स्मार्ट फोन अख्खा वेळ, चश्मा लागला त्याला,

मेसेज नको, बोलूच सरळ, त्याने विचार केला.

खांदा झाला वाकडा, बधीर झाली मान,

डॉक्टर म्हणतात, 'ट्रॅक्शन घ्या, पट्टा लावा छान.''

**डॉ. सुमन नवलकर**

hormones have slowed down, her energy levels have reduced and she is unable to deal with all the daily tasks with the same vigour with which she handled everything formerly. This is where loving yourself comes into play. First you have to accept that you have a right to enjoy your life in the way which you want and desire! Of course living with your children means you too have to help them, but that does not mean that you have to be like a doormat to be used anytime without any thought for your comfort and your needs. Many of my friends complain that their daughters keep their children with them and go for shopping allegedly for two hours and come back only at the end of the day. Because of your serving nature, the others have taken you for granted and think that you are there just for their comfort and convenience.

Today's women are financially stable, well read, exposed to a lot of information on T.V. and are still physically fit to enjoy outings and are capable of having their own programmes and forms of entertainment. In fact if you love yourself you are able to love others fully. If you are happy with yourself, all your own needs are satisfied then you do not grudge others' happiness. If upfront you express your needs and your own requirements, the other persons around you are made to realize that you too have your own needs. Some persons are wise themselves and can feel your needs so they do not have to be told, some are still childish and live in their own world and want to be looked after. Such people have to be told in no uncertain terms of your own requirements. They might find it a bit unacceptable to cater to somebody else's needs, but they have to grow up and realize their own responsibility towards the other members of their families. It is unfortunately our Indian tradition to spoil the male child in the family where the grandson is spoilt by the grandmother, then the mother continues the tradition and finally the wife is expected to carry on this tradition blindly to please the husband and his family which the Indian woman is taught from her childhood to please her husband and his family and live just for them. (Here I refer to the scene for Sahib Bibi aur Ghulam where Meena Kumari is shown taking the dust from her drunkard wayward husbands feet and putting it in her Hair. This is the greatest disservice that our films have done to the cause of Indian women where such nonsense is glorified)

As a person who deals with matrimonial disputes I now come across middle aged women who want to take a Divorce and lead their own lives on their own terms and conditions. Having sufficient finance they can challenge the husband's control and choose to live independent lives. Because of her giving nature and our cultural traditions, women's needs are never taken into consideration. A woman has her physical needs, emotional needs, intellectual needs and many other needs which women were never expected to have. Had the woman loved her self she would not have needed to take the extreme step of divorce. I found a lot of sense in the principle that a woman should have self esteem. She should not consider herself lower than somebody else. If nobody praises you, you can praise your own self. The best way a man can make you his slave and servant is by making you feel small, useless, good –for-nothing, so naturally you want to feel good and useful so you serve him single mindedly. So the man remains the Lord and the Master and the woman feels she is the obedient wife serving the husband in the true

Indian Tradition.

Loving yourself also means supporting yourself. You can always reach out to your friends and allow them to help you. Zhakli mooth sava lakhachi is the ancient adage which is of no use today. I met a fifty year woman who is living in an abusive marriage for the past thirty years. She did her Masters in English literature was a professor before she got married but at the instance of the gold medalist husband gave up her job, brought up two daughters and throughout her married life is being addressed by the husband as literate bhikari, treated as a bhikari, does not get any money in hand and the verbal abuse is unprintable! She is still serving her husband more than any maid servant would ever do. Had she loved herself she would not have taken the abuse for the past thirty years. She is very low on self esteem and feels that she is indeed a bhikari and deserves this drudgery of a life. Being a part of a support group is very essential in such cases. When people come together in such a support group they try to find a way to go beyond, to rise above and grow up in a way, you can learn from others.

By overly playing the sacrificing mother a woman may develop serious illnesses which she in her anxiety to please everyone does not disclose it to the family members who are too busy involved in their own affairs and are satisfied that they get all their meals on time. Loving yourself means taking care of your body. With advancing age the hormones reduce their activity and a woman needs bodily supplements in the form of calcium, vitamins, any blood pressure tablets or any other medication. Timely intake of medicines can keep her body in a condition whereby she feels physically fit, mentally alert to do her share of the household duties and enjoy her life.

By loving yourself I do not advocate just taking care of your self and neglecting the rest of the family. In fact if a woman takes care of herself she feels happy and then happily takes care of the family. There should not be any guilt feeling in loving yourself. Finally your family is going to benefit by having a happier and healthier you in their midst.

So my wishes for all my Maitrinis is that enjoy your Diwali, do just as much as Pharal as you can comfortably do, you have done lots of things when you were young, now chill, sit back and relax.

✳

**कविता**

## अरे संसार संसार

**सौ. सुरेखा सुरेश नवलकर**

दोन नाती घरी आल्या अन् तृप्त केले माझ्या मना
मुलगी जरी नाही मला आनंद देती नाती सुना।
मुले माझे दोन बाहु जणू माझे जय विजय
उत्साहाने साजरा झाला पुत्रजन्माचा समय।
लेक जन्मला व लेक जन्मली
फरक एका वेलांटीचा
मन आनंदाने भरून येई
पाहुनी चेहरा दोन्ही अपत्यांचा।
आनंदाचे भरते लाटा सुखद उर्मींच्या
साजरे करते मन आईबापांचे
क्षण हा अतीव सौख्याचा
मुलगी नाही जन्मली तर
येईल कसा लेक घरी
साठा अमृताचा
वाढेल कसा घरी दारी।
थेंब हे अमृताचे
प्रत्येकाच्या पडावे मुखी
कुठे जन्मती चंद्रकिशोर
आणि कुठे जन्मती चंद्रमुखी।
माझ्या नाती, माझ्या सुना
आणि लेक माझे खेळगडी
रंगला खेळ हा संसारातला
मी भिडू आणि नवरा माझा सवंगडी।।
अरे संसार संसार, देई सुख अपरंपार
आठवणी दाटतात अन् सडा पडे सुखद क्षणांचा
घराच्या अंगणात।।

✳

लेख

# महालक्ष्मी अहं, जगदंबा अहं

## ✶ हेमंत विनायकराव तळपदे ✶

खरे पाहता स्त्री या विषयावर अनेक विद्वान विदुषींनी आपल्या प्रतिभावान लेखणीने रकानेच्या रकाने लिहिले आहेत. तरीही या संवेदनशील शीर्षकावर थोडेफार मत व्यक्त करावे; यासाठी हा प्रपंच.

अनादीकालापासून आजतागायत 'स्त्री' या विषयाकडे अनेकांनी थोडासा पूर्वग्रह ठेवूनच पाहिले. तसे पाहता मनुस्मृतींच्या आधी स्त्रियांचा समाजातील दर्जा आदरणीयच होता. तत्कालीन स्त्रिया समाजात अधिकारवाणीने वावरत असत. त्यांना राजकारणातही आपली मते व्यक्त करण्याचा अधिकार होता. समाजात पुरुषांच्या बरोबरीने त्यांचे स्थान होते. पण मनुस्मृतीनंतर मात्र यात फेरबदल झाले. तत्कालीन समाजाची गरज समजा अथवा समाजधुरीणांचा कावेबाजपणा समजा, स्त्रीचा दर्जा पुरुषांपेक्षा कमी लेखला गेला.

याचे कारण बहुदा स्त्री व पुरुष यांच्या शारीरिक ठेवणीवर असावे; असे वाटतं. खरेतर आजही स्त्रियांकडे आंतरीक मनोबल पुरुषांपेक्षा काकणभर जास्तच असते; तरीही शारीरिक बलाच्या तुलनेत त्या पुरुषांपेक्षा किंचित मागे पडतात. त्यामुळे हा भेदभाव केला असावा असे वाटते. आजही दणकट पुरुष व कणखर स्त्री ही विशेषणे शारीरिक व मानसिक अवस्थांमधील फरक दर्शवितात असे वाटते.

पण वर्षानुवर्षे आपल्या पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांचा उपयोग व उपभोग आपल्या स्वार्थासाठीच अधिक केला असे आजही वाटते. आजही आपल्या प्रगत भारतात गावातील काही प्रथा पाहिल्या तर आपण थक्क होतो. अमुक देवाला स्त्रियांचा स्पर्श चालत नाही. अमुक धार्मिक विधीच्या वेळी स्त्रियांनी जवळपासही फिरकायचे नाही. तर लग्न समारंभास तर विधवा स्त्रीने वरवधूला आशीर्वाद देण्यास बोहल्यावर चढायचेही नाही. ही सर्व उदाहरणे आपली पुरुषी कुपमंडूक वृत्तीच दर्शवितात.

फार पूर्वी तर नवरा वारला तर स्त्री सरळसरळ सती जात असे. त्यास मोठा उत्सव मानून सर्वांदेखत ती गरीब गाय नवऱ्याचे कलेवर मांडीवर घेऊन चितेच्या ज्वालांचे भक्ष्य बनत असे. व ते कार्य बिनभोभाटपणे पार पाडता यावे म्हणून समाजातील तिचे तत्कालीन नातेवाईक, (यात आईवडीलसुद्धा) समाजधुरीण तिचे मन तयार करण्यात पटाईत असत. त्या चितेवरून घाबरून एखादी अबला पळाली, तिने हंबरडा फोडला व मला 'वाचवा वाचवा' असा आकांत केला तरी तिचे ते प्राक्तन हा तर धर्माच्या नावाखाली 'नारीबळी' होता असे आज वाटते. महात्मा फुले, राजा राममोहन रॉय व तत्कालीन इंग्रजी राज्यकर्त्यांनी या प्रथेला विरोध करून मूठमाती दिली हे खरोखरच चांगले झाले.

आपला पुरुषी समाज या स्त्री जातीचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी फारच चतुराईने करून घेतो असे खरोखरच वाटते. आपल्या देवांच्या नावातही आपण या स्त्रीजातीला सर्वप्रथम मान दिला आहे. 'सीताराम', 'राधेश्याम' नावांनी देवांचे उच्चारण करताना सीता व राधा प्रथम पूजनीय आहेत. घरातही नववधू लक्ष्मीच्या रुपाने प्रवेश करते असे आपण मानतो. ही स्त्री कधीकधी पवित्र गंगेप्रमाणे असते तर; कधी कालीमाता, दुर्गा, चंडिका, जगदंबा या विशेषणांनी गौरविली जाते.

पण वास्तव फार निराळे आहे. आजही हा पुरुषी समाज या गोडगोड विशेषणांनी या स्त्रीजातीवर अन्याय करतो. कामाबाबत आपल्या पुरुषप्रधान समाजाने मोठ्या लबाडीने आपला वरचष्मा कायम

## वात्रटिका

### प्रस्तावना

**वीस पानी कवितासंग्रहाला, प्रस्तावना चाळीस पानी,**

**प्रस्तावना वाचता-वाचता वाचक थकले ज्ञानी.**

**कविता मग वाचायच्या राहून गेल्या तशाच,**

**तशा देखील कविताही, होत्या अशा-तशाच**

**डॉ. सुमन नवलकर**

ठेवला आहे. अर्थार्जन पुरुष करणार व घर आणि मूलं स्त्री सांभाळणार ही अलिखीत रेषा काय दाखविते? जास्तीत जास्त कनिष्ठ कामे स्त्रीयांवर सोपवून हा पुरुषप्रधान समाज आरामदायी जीवन जगत आहे. आता मात्र परिस्थिती थोडीफार बदलली आहे. हा स्त्रीवर्ग स्वत: शिक्षण घेऊन चांगले अर्थार्जन करत आहे. परंतु नोकरी व घरकाम, मुलांचे संगोपन याचा अधिकाधिक भार आजही या स्त्रीसमाजावर पडला आहे.

एक प्रसंग गंमत म्हणून सांगतो. एकदा मी व माझे सासरेबुवा श्री विजय बाळाराम राणे भाईंदरमध्ये राहणाऱ्या सासरेबुवांच्या मित्राकडे रविवारी सकाळी १०.३० वाजता गेलो. त्या मित्रानेच दार उघडले व आमचे स्वागत केले. आम्ही सोफ्यावर आसनस्थ झाल्यावर त्याने पत्नीला दोन पेले पाणी आणण्यास सांगितले. ती बिचारी कुटुंबाचे कपडे धुण्यात मग्न होती. तिने 'तुम्ही पाणी द्या' असे त्याला सुचविले. पण त्याने पुन्हा करड्या आवाजात तिला पाणी आणण्यास सांगितले. ती चरफडत उठली व पाण्याचे दोन पेले घेऊन आली. त्यानंतर पती महाशयांनी आमच्यासाठी चहा कर व तो देखील चहा घेईल असे फर्मान सोडले. तिला बिचारीला कपडे धुण्याचे काम अर्धवट टाकून चहा करावा लागला. पती महाशय आम्ही येण्याआधी पलंगावर रेलून पेपर वाचत होते असे त्यानेच आम्हाला सांगितले. नंतर गप्पांच्या ओघात आम्ही वहिनींची विचारपूस केली. तेव्हा ती पत्नीदेखील बँकेत नोकरी करते हे कळले. पण केवळ पुरुषी अहंकारापोटी ती बाई नोकरी, घरकाम, जेवण इ. कर्तव्ये तिचे दायित्व आहे असे वाटून राबराब राबत होती. आणि पती महोदय आपल्या आदर्श पत्नीचे गुणगान करत होते.

कदाचित हे वाचताना तुम्हाला माझा रागही आला असेल. पण मी तर असेही म्हणेन, आपल्या लग्नातही हा भेदाभेद आपण करतोच. लग्नानंतर स्त्रीने मंगळसूत्र घातलेच पाहिजे. कपाळावर कुंकू लावलेच पाहिजे. पण का? पुरुषांना असले कोणतेही बंधन नाही. आपली समाजव्यवस्था कितीही सुधारली तरी हा भेदाभेद निपटणे सोपे नाही असे म्हणावेसे वाटते.

शेवटी आपल्या शालेय अभ्यासक्रमातील असलेला मार्गारेट अल्वांचा एक प्रसंग आठवतो. एकदा हिमाचल प्रदेशात मार्गारेट अल्वा पक्षाच्या कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. एका डोंगराच्या पायथ्याजवळून त्यांची उघडी जीप जाताना त्यांनी एक विचित्र दृश्य पाहिले. त्या डोंगरउतारावर एक स्त्री व एक पुरुष उतरत होते. ती स्त्री पुढे चालत होती. तिच्या कडेवर तिने आपल्या तान्ह्या बाळाला मुटकुळी बांधून घेतले होते व तिच्या डोक्यावर लाकडाची मोळी होती. तिच्या पाठीवरही एक ओझे होते आणि तिचा दादला मात्र काहीही वजन न घेता हातात जाडी काठी घेऊन आरामात उतरत होता. ते पाहून मार्गारेट अल्वांनी आपली जीप थांबविली व त्या जोडप्यास जवळ बोलावले. त्या पुरुषाला त्यांनी 'तू असा निर्लज्जपणे का वागतोस? बायकोकडे एवढे सामान, तान्हे बाळ असताना तू मात्र आरामात काठी घेऊन डोंगर उतरतोस, याचे तुला काहीच वाटत नाही का?'' असे विचारले. तेव्हा तो इसम फिदीफिदी हसत म्हणाला, ''बाई मी पुरुष आहे. या बाईचे रक्षण करता यावे म्हणून मी काठी बाळगतो व तो माझा धर्म आहे.'' झाले. मार्गारेट अल्वांनी आपली गाडी पुढे रेटली.

एकंदरीत एवढा सगळा उहापोह इतक्यासाठीच की स्त्रियांनो, आता तरी सावध व्हा. शासकीय टप्प्यावर तुम्हाला जरी बरोबरीचे अधिकार प्राप्त झाले तरी या संबंधांच्या फसव्या जाळ्यात हा पुरुषी अहंकार तुम्हाला अडकवून ठेवणार नाही याचे खरोखरच भान ठेवा. नाहीतर तुम्ही आजही म्हणाल.

'महालक्ष्मी अहं, जगदंबा अहं.''

*

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# पानगळ

## ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

सकाळची वेळ. कोणतीही प्रवेश फी नसणारी सार्वजनिक बाग. वसंताची चाहूल लागण्याआधीचा शिशीर त्या बागेतील झाडांना कवटाळून आहे. मोठमोठ्ठे अशोक सोडले तर छोटी सगळी झाडे आपला पर्णसंभार उतरून उघडीबोडकी होताहेत. रोजचे पाणी सरावाने घातले जाते. पण पानगळीच्या या दिवसात बागेतल्या पायवाटांवर केव्हढा तरी पाचोळा जमा होतो. सफाई कामगार काढतात म्हणा कचरा! पण तो जरा उशीरा. भल्या सकाळी नव्हे. त्या पानापाचोळ्यातच जरा हिरवाई बघून बायकांचा कट्टा भरतो. तसा तो आजही भरला होता. नित्य नियमानं येणाऱ्या या बायका. वय तसं उताराला लागलेल्या. चालायला किंवा फिरायला म्हणून तशी एखादीच येई. बाकी साऱ्याजणी घरून निघून उगाच आपलं तिथं तासभर रेंगाळणाऱ्या.

पूर्वी कीर्तनबिर्तनं होती तेव्हा सायंकाळच्या बायका देवळात भिंतीला पाठ टेकवून विसावायच्या. हातात वातीचा कापूस. कान अर्धवट कीर्तनकाराकडे. एखादी त्यातली मध्येच पचकायची, ''अग्गो, कानावर आलं का तुमच्या? आठवल्यांची सुमी म्हणे प्रकाश कामतबरोबर पळून गेली...'' मग ऐकणारी आणखी पुस्ती जोडायची-, ''जाईल नायतर काय? सुमीला वळण होतं का?'' एखादी आपली सून कशी चहा वेळेवर देत नाही म्हणून कुरकुरत वेळूला पीळ द्यायची. त्यावर कुणीतरी म्हणायचंच की, 'अहो मालूताई, तुम्हाला चहा मिळतोय तरी! आमच्याकडं म्हंजे सगळाच आनंद. 'ह्यां'ना बरं नाहीय. मी म्हटलं, 'जरा चहात सुंठ घाल गं' तर मांजरीसारखी फिस्कारली. म्हणे, 'बरे चोचले हैत. उद्यापास्नं तुमचा तुम्हीच करत जा चहा.''.... काळ बदलला. कीर्तनं जवळजवळ संपलीच. मग हे 'वाती वळणं' ही संपलं! वळणं बदलली. सुनाबिना सक्काळी सक्काळी नोकरीवर जायला लागल्या. नोकरी नसेल तर जिम, झुम्बा वगैरे. सायंकाळी रोटरी क्लब, नाहीतर शॉपिंग. अगदीच काही नाही तर नाटक सिनेमा, भिशी आहेच. मुलगा, सून, नातवंडं... सगळीच घड्याळाला बांधल्यागत आपापल्या घाईत. '७.५३ला निघायचंय. आई, तू नंतर जा आंघोळीला', 'दहाला पोचायचंय. शूटींग प्लेस इतक्या दूर, ट्रॅफिक बंपर टू बंपर... साडेसहालाच घर सोडलेलं बरं'... अशा धांदल गडबडीत पुढच्या पिढीतल्या रिकामटेकड्या म्हाताऱ्याकोताऱ्या 'मॉर्निंग वॉक' नावाखाली बागेत येऊ लागल्या. कीर्तनाचाच जणू हा नवा 'कीर्तनरंग'! त्यांचा घर सांभाळण्याचा समजूतदारपणाही मोठ्ठाच. ''सगळे ऑफिस-बिफिसला बाहेर पडले कीच मी निवांतपणे घरी जाते. त्यांच्यामध्ये उगाच आपली लुडबुड कश्याला ना?'' म्हणणाऱ्या विचारे आज्जी या कट्ट्यात सामील झाल्या त्या अशाच. मुळ्येकाकी शाळेतून मुख्याध्यापिका म्हणून सन्मानाने रिटायर झालेल्या. मुलगा परदेशी. लेक सासरी. पेन्शनमुळं इतमामानं जगत येतंय. पण वेळ खायला उठतोय. त्याचं काय करायचं? त्या संध्याकाळी नियमित 'कैवल्यधाम'ला जातात म्हणा. पण सकाळी या बागेतल्या रिकामटेकड्या टोळक्यात हातात वर्तमानपत्र घेऊन बसतात. वाचत नाहीत काही. पण ती त्यांची प्रतिष्ठेची खूण आहे. इथं येण्यामागे 'तेवढंच आजूबाजूचं कळतं ना!'... ही त्यांची भूमिका. इतरही अशाच या ना त्या कारणाने कट्ट्यावर जमणाऱ्या. राणेबाईंचा नवरा हल्ली जाम पितो. एकेकाळी लव्हमॅरेज केलेल्या राणेबाई आता पुरत्या गांजल्यात. नवऱ्याचं सारंच करतात त्या मनापासून. पण त्यांचा मुलगा दूर उपनगरात वेगळा

## वात्रटिका

### व्यायाम

डोक्यावरचे केस जाताच, त्याने वाढवली दाढी,
फणीला ना विंचरायची सवय हवी थोडी.
दाढीसोबत मिश्यादेखील त्याने ठेवल्या दाट,
व्यायाम होतो फणीला पण त्याचेच दुखतात हात.

**डॉ. सुमन नवलकर**

रहातोय. तो म्हणतो, ''आई तू चल आमच्याकडं. नीता तुझं सगळं बघेल. पण अण्णा नकोत हं.'' आता हातपाय धड साथ देत नाहीत राणेबाईंचे. पण काहीच धड नाही तिथं त्या तरी नवरा सोडून कुठं अन् कशा जाणार? भाजी, औषधं खरेदीच्या नावानं बाहेर पडतात अन् इथं तासभर टेकतात कट्ट्यावर. रेश्मा कारखानीसचं मात्र जरा वेगळं आहे. ती नीटनेटकी. चेहऱ्याची रंगरंगोटी सकाळीही तजेलदार ठेवणारी. पार्लरला जाऊन फेशियल करणारी. टिपटॉप! तिची मुलंही परदेशी आहेत. तिथं कॅनडाला तीन वर्षांतून एकदा जाऊन येते. मग आली की महिनाभर तेच पुराण. तिथली शिस्त, नातवाचं इंग्लिश बोलणं, सुनेची कर्तबगारी, तिथल्या महाराष्ट्र मंडळात रेश्माचं खास व्याख्यान... असं बरंच काही. इथेच वाढली ती. पण तोरा असा की 'हूं! या इंडियात काय ठेवलंय? इथंच बघा ना. सार्वजनिक बाग आहे. पण जी येते ती आपलीच प्रॉपर्टी असल्यासारखी फुलं तोडते. तिथं असं चालेल का? सगळीकडे सी. सी.टीव्ही असतात बसवलेले. लग्गेच दंङ..!' असं म्हणता म्हणता ती स्वत: आपला चहाचा प्लॅस्टिकचा कप मात्र बसल्याजागी तिथंच ठेवते! रेश्माला कुणी 'आण्टी' म्हटलेलंही आवडत नाही. येते पंजाबी ड्रेसमध्ये. पण 'तिथं मी कध्धीच पंजाबी नाही बाई घालत. माझी आपली ३/४ जीन्स असते.' असं म्हणत रहाते. सुगंधाकाकी एकदा म्हणाल्याच तिला, ''तू कायमचं का नाही रहात तिथे?' मग जरा घुटमळत म्हणाली, 'अहो, इथल्यासारखी तिथं माणसं कुठं दिसतात? सकाळी बाहेर पडावं तर रस्त्यावर नजरेच्या टप्प्यात एक माणूस दिसत नाही. हाय, हॅलो कुणाला करणार?' अशी ही रेश्मा कारखानीस. नाक उडवत आणि मुरडत बोलली तरी इथं येते बागेत ती माणसांसाठी!

तर सकाळच्या त्या बागेतल्या अशा कट्ट्यावर आज रंगीतसंगीत बेत होता. करमरकरबाईंचा आज वाढदिवस. या कट्ट्याची ही खासियत होती. छोटसं प्रासंगिक हळदीकुंकू, छोटीशी 'बर्थ डे पार्टी' रंगायची तिथं. म्हणजे काय; आपला बटाटेवडा, शिरा अन् चहाकॉफी. फार फार तर केकचा तुकडा. करमरकरआज्जी अगदी त्यांच्या पद्धतीनं झोकात आल्या होत्या. जरीची साडी, इवल्याशा अंबाड्यावर घरचं एक अनंताचं मोठ्ठं फूल, ठळक दिसेल असं मंगळसूत्र अन् हातात बांगड्या... चकचकीत. मुख्य म्हणजे रोज त्या हिरमुसल्या असत. आज बोळकं पसरून हसत होत्या सारख्या. वयाची ८१ वर्षे पूर्ण केल्याचा कोण आनंद त्यांना. हातात अर्थातच नेहमीची सखी होतीच. हातातली काठी! मी त्या काठीला गंमतीनं त्यांची नात म्हणे. कारण त्यांना दोन मुलगे, दोन नातू. म्हणजे त्यांना मुलगी नाही, नातही नाही. मग ही सडसडीत साथीदारच त्यांची नात ना! त्यांना हे माझं नात म्हणणं फार आवडायचं. आपल्या वाढदिवसासाठी सुनेला न सांगता त्यांनी नवऱ्याकडून पैसे मागून चाक्या, चिवडा, बिस्किटं आणली होती. करमरकरआज्जी जसं काही ऑबेरायमध्ये पार्टी दिल्यासारखं सगळ्यांना ते देत होत्या. मग आमची धम्माल सुरू झाली. 'तुम जियो हजारो साल' म्हणून झालं. 'हॅपी बर्थ डे'च्या टाळ्या झाल्या. 'डू डाय डू' करत हसून झालं. टाळ्या, टिपऱ्यासारख्या खेळवत डोलून झालं. 'माझी आजची सकाळ छान गेली हं!' त्या मनापासून, कृतज्ञतेनं म्हणाल्या. वयानं लहान असणाऱ्यांनी पायाला हात लावताच बोळक्यानं आशीर्वाद दिले त्यांनी.

मग त्या दिवसापुरता कट्टा 'कट' झाला. 'चला उशीर झाला. नातवाला शाळेत पोचवायचंय' म्हणत एक उठली. 'अगं, पाच दहा मिनिटात घरी नाही पोचले तर घराला कुलूप बघावं लागेल. चावी नाही माझ्याकडं' म्हणत दुसरी उठली. 'अगंबाई! आठ वाजले! 'ह्यांचा' चहा करून द्यायचाय. उशीर झाला तर 'हे'च उकळ्या फुटत चहाच्या रंगाचे होतील.' म्हणत तिसरी उठली. रश्मी 'लायब्ररीत बुक चेंज

## चारोळी

**- आनंद देशमुख**

त्याच्या आईला डॉक्टर म्हणाले
टेस्ट घ्याव्या लागतील काही
तो म्हणाला हे भगवान...
माझी आई तर शिकलेली नाही

करायला जायचंय. गोईंग, करत उठली. 'मला घरी जाऊन बँकेत जायचंय. चला, अच्छा!' करत आणिक एक उठली. 'चला अच्छा! माझा वाढदिवस छान झाला हं!' म्हणत करमरकरबाईही काठी टेकत 'धीरे रे चलो' गतीनं हळुहळू गेल्या.

बागेतली हिरवळ, पक्ष्यांचा किलबिलाट, नेहमीची भेटणारी माणसं... सगळं मागे टाकत एकेक जणी रोजच्या घरगुती जीवनाला भिडल्या. कुणी जाता जाता भाजी घेणार होत्या, कुणी आयता वडापाव, कुणी फुलपुडी, कुणी दूध... म्हंजे फिरण्यातही त्यांचा 'ड्यूटीसेन्स' होताच. त्याशिवाय सकाळी भटकायला घरून कोण सोडणार? निरुद्योगी, निरुपयोगी वस्तूच ही माणसं म्हंजे. माणसं?... अंह. घरातला कोपरा अडवणाऱ्या प्रत्येक घरातल्या म्हाताऱ्याच या.

आज कट्ट्यावर आनंदी आनंद. बातम्यांची देवाणघेवाण. हवा खाताना थोडा विरंगुळा. त्यादिवशी करमरकरआजींच्या वाढदिवसामुळे पानगळ असूनही पाचोळा जणू उडून गेला. बाग जीवंत झाली. हसली.

दुसरा दिवस... बागेत पुन्हा सुरू झाला. करमरकरआजी मात्र नाही आल्या. ''वाढदिवस अंगावर आला बरं का त्यांच्या'' - सुगंधाकाकी बोलल्या. ''घरीही झाला असेल नं थाटात. केकबिक कापून. दमल्या असतील.'' - रेश्मा कारखानीस म्हणाली. ''आमच्या घरी तर बर्थ डे असला की उसंतच नसते मला. दिवसभर फोन्स, एसेमेस. संध्याकाळी जवळचे नातेवाईक येतात. मग काय? बाहेर जेवण. एखादं पिक्चर टाकतो आम्ही. मग दुसऱ्या दिवशी अस्सं अंगावर येतं नं सगळं.'' तिचं पुराण चालूच.

''पण आपण कुणीतरी फोन केला पाहिजे हं त्यांना. एखादेवेळी बरंही नसेल. एक्याऐंशी वय आहे त्यांचं'' - इति मुळ्येकाकी. एकेकाचे तर्क चालूच.

पण करमरकरआजी चांगला आठवडाभर गायब होत्या. शेवटी राणेबाईंनी त्यांना फोन केला. तर कळलं ते कट्ट्याला धक्का देणारंच. हिरमुसलेल्या करमरकर त्यांना म्हणाल्या, ''बरं वाटलं हं तुमचा फोन आल्यावर.''

''बागेत का येत नाही तुम्ही?''

क्षणभर स्तब्ध झाल्या त्या. मग म्हणाल्या, ''सांगू नका हं कुणाला. आत्ता घरात कुणीच नाहीय. म्हणून सांगू तरी शकतेय मी. कट्ट्यावर तुम्ही माझा इतका छान वाढदिवस केलात. पण काय सांगू? घरातल्या एकालाही मला शुभेच्छा द्याव्या वाटल्या नाहीत. मुलांना नाही, नातवांनाही नाही. माझी 'नात' आहे आपली सोबतीला. तिचाच बडगा द्यावा वाटला धाकट्यांच्या पाठीत. पण बसले गप्प.''

''अहो, मग तर यायचं नं बागेत. आम्ही आहोत की. चार लोकांत उलटं बर वाटतं ना. माझ्यावरूनच सांगत्येय.''

''ते खरंय हो. पण पुढचं रामायण ऐका ना जरा.''

''आता काय आणखी?''

एक पॉझ घेऊन आज्जी म्हणाल्या, ''काय आहे की गावी आमचं घर आहे ना; तिथं 'ह्यां'ना पाठवलंय. घर सांभाळायला.''

''मग तुम्हीही जायचं की. ठेवायची एखादी पोळ्यांना बाई. हल्ली काय; गावीही मिळतात बायका.''

''बायका न मिळायला काय झालंय? पण सून म्हणे की मला वयानुसार सगळं झेपायचं नाही ना? मग त्यांना एकट्यालाच पाठवलं.''

''मग तुम्ही या ना उद्यापासून बागेत.''

''कसली येते मी? पुढचं तर आक्रीतच आहे. ऐका ना. त्या दिवशी रात्री नातू आला माझ्याजवळ. म्हटलं चला, आठवण झाली आज्जीची. तर त्यानं कसल्याशा कागदावर माझ्या सह्या घेतल्या. आतून सून म्हणाली, 'वय झालं तुमचं. मग सही बदलते माणसाची. बबड्या म्हणतोय तर करून टाका सह्या. आम्हालाच पुढं निस्तरावं लागणारेय.''

''अरे! सही नाही करायची तुम्ही.''

''मला मेलीला सुचलंच नाही हो राणेबाई. मी केली बावळटासारखी सही. 'हे' गावाला. कावरीबावरी मी. आता हे घर त्यांच्या नावावर झालं. मला आता कल्याणच्या वृद्धाश्रमात पाठवणार आहेत. बेघर ना मी?'' - त्यांच्या गळ्यात हुंदका अगदी दाटून आला होता.

''म्हणजे?'' - राणेबाईंचा विश्वासच बसत नव्हता. एक्याऐंशी वयाची ही बाई. वाढदिवसाला ही अशी भेट?

''म्हंजे तेच. 'ह्यां'ना गावी अन् मला वृद्धाश्रमात अशी पाठवणी आहे. 'ह्यां'ना याची कल्पना आहे की नाही; तेही माहीत नाही.'

राणेबाई सुन्नच झाल्या ऐकून. दोन मुलं, दोन नातवंडं आहेत. पण तरीही हे, हे असं?

दुसऱ्या दिवशी बागेत एकच खळबळ. आपण सगळ्याजणी करमकरआजींचा वाढदिवस करतो काय; अन् घरून त्यांना वाढदिवसाची ही... ही असली भेट! मुळ्येकाकी संतापल्याच. म्हणाल्या, ''आपण भेटू त्या सुनेला.''

''काय होणार भेटून?'' - रेश्मा म्हणाली.

''बरोबर आहे. यांनी तरी सही कशी दिली? आता काहीच नाही करता येणार'' - सुगंधाकाकू म्हणाल्या.

अखेर आपल्या 'नाती'सह करमकरआजी कल्याणला गेल्या त्या गेल्याच. 'कल्याण' झाले त्यांचे!

पुढचे पंधरा दिवस बागेत हाच विषय पुरला मग. चर्चा, शिव्याशाप, तळतळाट, खंत, दुःख... अपरिहार्यता अन् करमरकरआज्जी जागी आपण स्वतः... सगळं सगळं होतं त्यात. आणखीही एक होतं. एकेकजण मनात म्हणत होती - ''आपली सून चहा नाही देत वेळच्यावेळी. पण घराबाहेर नाही काढत.''

''परदेशी आहे आपला मुलगा. पण फोनवरून बोलतो. कधीतरी का होईना; तिथे बोलावतो आपल्याला.''

''आपण स्वतंत्र आहोत. पेन्शन मिळतं आपल्याला. किती बरंय. उगाच दुसऱ्यावर (दुसऱ्यावर? मुलगा म्हंजे कुणी दुसरा?) नको अवलंबून बाबा.'' एकेकीची दुबळी समर्थनं चालू राहिली.

हलके हलके त्या बागेतला ऋतू बदलला. पानगळ जाऊन नवीन पालवी फुटली. हिरवाई वाढली. कट्ट्यामध्येसुद्धा अर्चनाताई, रेगेमॅडम, पाटणकरआज्जी... अशांची भर पडत गेली. करमरकरआजी 'नाती'सह दिगंतरालाच गेल्या जणू. कट्टा रोजच किलबिलू लागला. जीवंत राहिला. राणेबाई मनात म्हणाल्या, 'चला. कट्टा झिंदाबाद! करमरकर अखेर काय; 'डाय डू'च. त्यांच्या नशीबाने गेल्या. शेवटी दारुड्या का होईना; आपला नवरा व्यवहारी तरी आहे. मुलालाच वेगळा ब्लॉक घेऊन दिलान.''

असा 'तरी बरं' चा सूर छेडत कट्टा रोजच जीवंत राहिला. पानगळ असते अधूनमधून. पण या कट्ट्याला कधीच मरण नाही!

*

## व्यंगचित्र



❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# कविता

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## बायका जेवल्या आहेत पुरुषांचं बारसं

**- नलिनी तळपदे**

कुणाच्या लक्षात आलं नसेल फारसं
पण मी सांगते
अगदी बाबा आदमच्या काळापासून
बायका जेवल्या आहेत पुरुषांचं बारसं
पुरुषांनी सांगितलं आणि बायकांनी ऐकलं
असं झालंच नाही -
फार प्राचीन काळी
म्हणजे ॲडम आणि ईव्ह ही दोनच माणसं
या पृथ्वीतलावर होती त्यावेळी,
ईव्हनं चाखलं ज्ञानवृक्षाचं फळ
ॲडम नको नको म्हणत असता
आणि त्यातूनच निर्माण झाला हा
वाढत्या लोकसंख्येचा गुंता
ईव्हनं ऐकलं असतं ॲडमचं त्यावेळी
बरं आज ही आली नसती आपल्यावर
कुटुंब नियोजनाची पाळी
अयोध्येच्या राजा दशरथांनी लाडक्या राणीच्या
कैकयीच्या हट्टापुढे हात टेकले
आणि कांचनमृगाचा हट्ट धरणाऱ्या सीतेपुढे
मर्यादा पुरुषोत्तम रामही तस्सेच वाकले
तिनं तर लक्ष्मणाचंही न ऐकता
ओलांडली सीमारेषा त्यानं आखून दिलेली
आणि घडवलं रामायण
द्रौपदीनं लेखलं कर्णाला यत्किश्चित
आणि केला स्वयंवराच्या मंडपात अपमान
दु:शासनालाही ती हसली मयसभेत झालेली
त्याची फजिती पाहून
आणि घडवलं महाभारत
प्रत्यक्ष महादेवानं नको जाऊ असं सांगूनही
दक्षकन्या सती पितृगृही गेली
कुन्तीनं ऐकलं नाही दुर्वासाचं
म्हणून कौमार्यावस्थेत तिला स्वीकारावं लागलं
मातृपद कर्णाचं
मत्स्यगंधेनं टाकलं जाळं पराशरासारखं शंतनुवरही
आणि केलं भीष्माला प्रतिज्ञाबद्ध
मेनकेनं केला समाधीभंग विश्वामित्राचा
कुणी केला तेजोभंग, कुणी केला मानभंग
आपल्या पुरुषांचा
आणि आनन्दीबाईनं तर
चक्क करून 'ध' चा 'मा'
केला अटकेपार झेंडा लावणाऱ्या
राघोभरारीचा पुरता मामा,
तर सांगायचं म्हणजे,
आम्ही या एकविसाव्या शतकातल्याच नारी
वाटतो पुरुषांच्या डोक्यावर मिरी
असं नाही हं
आमच्यापुढे आहे या ललनांचा आदर्श
अगदी बाबा आदमच्या काळापासून
बायका जेवल्या आहेत पुरुषांचं बारसं

✳

## कसं?

**सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

कशासाठी घ्यायचा हा
चांगुलपणाचा वसा?
कळणार नाही कोण केव्हा
फायदा घेईल कसा।।
मन मोठं करून जर
दुर्लक्षिला अपमान
जन म्हणती ''मुळी सुद्धा
नाहीच का स्वाभिमान?''
पोटात घातले दुसऱ्यांचे
सगळे अपराध आपण
म्हणतात ''अगदीच बावळट आहे
फायदा घेऊं आपण''।।
पापासमोर मौन राखलं
तर सरशी होते पापाची
प्रतिकार जर केला कुणी
तर भीती असते सूडाची।।
अन्यायाला कधीच मग
वाचा नाही फुटत
चांगुलपणा जात नाही
तगमग जाते वाढत।।
एवढं चांगलं वागून कुणी
''संत'' म्हणत नाही
जेव्हा कधी म्हणतात तेव्हा
इहलोकात असत नाही।।
सडेतोड वागूनसुद्धा
चालत नाहीत जगात
दुसऱ्याला दुखवूनही
अपयशच पदरात।।
थट्टा खपवून घेतली तर
थट्टाच होते जीवनाची
प्रत्युत्तर दिलं तरी
टिंगल होते कायमची।।
कसंही वागलं तरी
जगात नेहमीच होतं हसं
आहे कुणास ठाऊक
जगात वागायचं कसं?।।
काहीही केलं तरी
जग फक्त नावंच ठेवतं
मनामधल्या भावनांना
पार नष्ट करून टाकतं।।

*

## जीवन गाणे

**सौ. सुरेखा सुरेश नवलकर**

तुझ्या पायी देवा, सर्व सुख आहे
प्रयत्न केल्यावरी जे सहजप्राप्य आहे।।
माझ्या सभोवताली वास तुझा निरंतर
सातत्याने मला जाणवतो आहे।।
पक्ष्यांचे मधुर कूजन, फुलांचे फुलणे
भाज्यांचे वेल गगनावरी चढणे
फळे, धान्ये, कडधान्यांचे भरगच्च दाणे
सर्वांतूनी जाणवणारे तुझे अस्तित्व आहे।।
पहाटेचा मंद वारा मज आनंद देई
दुपारची वेळ उकाड्याने त्रस्त करी
सायंकाळी घर आवाजाने दणदणून जाणे
जाणवुनी तेव्हाच तुझी लपंडाव खेळी
त्यातच सारे समाधान आहे।।
श्वासात माझ्या तुझे भरून राहणे आहे
देव देवतांच्या खेळी हे तर माझे जीवन आहे
सुचलेली ही कविता माझे जीवन गाणे आहे।।

*

**विडंबन काव्य**

## धनपतवाणी

**- आनंद देशमुख**

धनपत वाणी चालत बोलत
कुरवाळी नुसतीच दाढी
म्हणायचा अन् मनाशीच की
घेईन चार चाकांची गाडी
चष्म्याची ही दैन्यावस्था
तुटकी दांडी भुरक्या काचा
टाकीन भिंगे बेमालूम अशी
उजळीन डोळ्यांच्या मी खाचा
मिटवून टाकीन एकदाची मी
सारी देणी झगडे लफडे
परीटघडी अंगावर लेवून
बदलीन विडी ठिगळांचे कपडे
आज डब्यात जरी शिळी कढी
अन् भात असू द्या रेशनचा
उद्या डब्यात सजेल म्हटला
मेनू नवनव्या फॅशनचा
धनपतशेठ म्हणतील सगळे
आज विचकती दात जरी
नादी लागतील माझ्या तर मग
सुनवून देईन खोटी खरी
ना शेती ना वाडी जरी घर
आज असू द्या भाड्याचे
साडेसाती बघा संपली
मज वेध लागले वाड्याचे
येता वेतन आयोग पुढचा
बदलून जाईल जीवनमान
टकलावरती टोप मजेचा
भ्रमणध्वनी हाती, मुखात पान
धनपतवाणी आयोगाची
वाट बघुनी थकून गेला
निवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी
वेतनआयोग लागू झाला!

*

**कविता**

## सखी

**हेमंत विनायकराव तळपदे**

सखी आज तव प्रियतमेस
वाहतो ही भावनांची कुसुमांजली
गतकालाच्या प्रवाहास वाहिलेल्या
त्या आठवणींची शिदोरी रसीली.
यौवनीच्या सुकोमल क्षणांना
मी आनंदाने अनुभवले
परि मनी कोपरा एक रिता
स्थान तुझे त्यात जपले.
आलीस भार्या म्हणूनी तू
जीवनपर्व नवे सुरू झाले
काळाच्या प्रत्येक विषमतेवर
मात करुनी तू जिंकलेस.
कोण म्हणती तव चतुर
कोण दर्शविती माफक चुका
परि जाणतो मी मनी माझ्या
तव हृदयीच्या त्या संवेदना.
सरळसाधे जीवन जगलो
कृतार्थ झालो या जगी
तृप्त तुझा हा सहवास लाभता
झालो खरोखर संसारी सुखी.
आज माझा पतीधर्म सांगतो
मोल तुझे मी खरे उमजणे
साथ तुझी निरंतर लाभो मजला
प्रार्थितो विधात्यास हे मागणे.

*

# भटकंती

**लेख**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## भारताची आधुनिक तीर्थक्षेत्रे (आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ)

⋆ अपर्णा उदय कीर्तिकर ⋆

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Give them a chance, not charity.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून, अथक प्रयत्नाने भारतरत्न डॉ. बाबा आमटे या महामानवाने नागपूर जवळील वरोरा येथे प्रतिसृष्टी साकारलेली आहे. हे ऐकून, वाचून समजण्यापेक्षा अनुभवातून समजून घेणे अधिक परिणामकारक असते. म्हणूनच 'सदिच्छा परिवार - मुंबई' यांच्यातर्फे आयोजित आनंदवन प्रकल्प भेट या सामाजिक पर्यटनाला जाण्याचा विचार काही नातलग व समविचारी सोबत्यांनी मिळून केला.

पूर्वनियोजनाप्रमाणे ११ ते १५ नोव्हेंबर २०१६ च्या दरम्यान आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ ह्या बाबा आमटे यांच्या प्रकल्पाला भेट देऊन त्यांचे सेवाकार्य जवळून बघण्यासाठी रात्रीच्या सी.एस.टी. नागपूर ह्या दुरांतो एक्सप्रेसने आम्ही एकूण २८ पर्यटक निघालो. सकाळी साधारण ८ च्या सुमारास नागपूरला पोहोचल्यावर चहा घेऊन बसने आनंदवनाकडे जाण्यास सज्ज झालो.

सुरुवात नागपूरदर्शनने केली. नागपूरमधील सुप्रसिद्ध टेकडी गणपतीचे दर्शन घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली त्या 'दीक्षा भूमीकडे' प्रयाण केले. सुमारे २२ एकर जमिनीवर पसरलेल्या ह्या भूमीवर मध्यभागी खूप मोठा स्तूप असून आतमध्ये गौतमबुद्धाची मूर्ती आहे. आतमध्ये बाबासाहेबांचे जीवनचरित्र छायाचित्रांच्या सहाय्याने प्रदर्शित केले आहे. प्रांगणात हिरवळ व फुलझाडे असून बोधीवृक्ष आहे. त्याचे दर्शन घेऊन सुमारे ९.३० वाजता आनंदवनाकडे प्रयाण केले.

एनएच-४४ ह्या जम्मू ते कन्याकुमारी यांना जोडणाऱ्या महामार्गाने निघालो. नागपूर देशाच्या मध्यवर्ती भागात असल्याने आसाम, जबलपूर, वाराणसी तसेच आंध्र, ओडीशा यांना जोडणारे सर्व महामार्ग येथूनच जातात.

सुमारे ११ वाजता 'अशोक वन' ह्या आनंदवनाच्या उप-प्रकल्पाला नाश्त्यासाठी भेट दिली. आनंदवनातील समाजच नव्हे तर; त्यांचे कुटुंबीयही त्यांना स्वीकारीत नाहीत. त्यामुळे येथेच त्यांचे पुनर्वसन करावे लागते. समाजाने त्यांचा स्वीकार केला तर आनंदवनाची गरजच राहणार नाही अशी त्यांची मनोकामना होती.

डॉ. विकास आमटे ह्यांची सुकन्या डॉ. शीतल आमटे - काराजाई यांनी तर देशाच्या निश्चलनीकरणानंतर (डीमोनोटायझेशन) लगेचच

कुष्ठरोग्यांना व इतरांना मदत करण्यासाठी एटीएम लायब्ररी किंवा बँक सुरू केली. ज्यांनी यापूर्वी कधीही बँकेत पाऊलही टाकले नव्हते; अशांची खाती उघडून त्यांना एटीएम कार्डे दिली, ज्यायोगे ते बचत करू शकतील. त्यावरील व्याज त्यांना मिळेल. इन्शुरन्स मिळेल, त्यांना त्यांचा वारसदार (नॉमिनी) नेमता येईल. त्यामुळे त्यांचे सगेसोयरे त्यांच्या स्वकष्टार्जित पैशावर आता डल्ला मारू शकणार नाहीत.

आनंदवनाची सफर झाल्यानंतर आम्ही चंद्रपूरमार्गे त्यांचा दुसरा प्रकल्प भामरागड येथील हेमलकसा येथे जाण्यास निघालो. वाटेत आम्हाला सरकारी नोटा व स्टॅम्पसाठी लागणारा कागद तयार करणारा बल्लारपूर कागद कारखाना, तसेच सरकारी मालकीची लाकडाची वखारही लागली. चंद्रपूर व त्याला लागून असलेल्या गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेली वैनगंगा नदी ओलांडून आम्ही चंपारण्य अभयारण्यातून प्रवास करून 'हेमलकसा'ला पोहोचलो.

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील दुर्गम भागात मडिया, गोंड या आदिवासी जमातींसाठी हेमलकसा हा प्रकल्प चालू करण्यात आला असून त्याची जबाबदारी डॉ. प्रकाश आमटे, त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. मंदाताई व त्यांचा परिवार सांभाळतो. कुपोषित, बाह्य जगाशी संपर्क नसलेल्या आदिवासी समाजाला वैद्यकीय सेवा व निवासी शाळा उभारून शैक्षणिक सेवा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह असून समृद्ध वाचनालय, संगणक प्रशिक्षणवर्ग असून विविध खेळांचे मार्गदर्शन करून त्यात त्यांना प्राविण्य मिळविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

डॉ. प्रकाश आमटे एवढ्यावरच न थांबता त्यांनी विविध प्राण्यांच्या अनाथ अर्भकांसाठी 'प्राण्यांचे अनाथालय' (ॲनिमल पार्क) उभारले आहे. त्यात विविध प्राण्यांचा रहिवास आहे. त्यात चौसिंगी हरीण, उदमांजर, नीलगाय, घोरपड, घुबड, धामण, अजगर, कोब्रा, शेकरू, कोल्हा, चांदी अस्वल, साळींदर, कासव, अस्वल, एवढेच नव्हे; तर बिबट्याचाही समावेश आहे. आपण जसे कुत्र्या मांजराला अंगाखांद्यावर खेळवतो तसे आमटे कुटुंबीय- त्यात त्यांची १०/१२ महिन्यांची नात व ८-९ वर्षांचा नातू - या प्राण्यांना खेळवतात, त्यांच्याशी हितगुज करतात. या प्राण्यांबरोबरच अनेक पक्षीही येथे आढळतात. डॉ. प्रकाश व डॉ. मंदाताई यांच्याशी गप्पा झाल्यानंतर त्यांच्या समवेत ह्या सर्व प्राण्यांना आम्ही भेट दिली.

इतर झाडांबरोबरच हेमलकसा परिसरात मोहाची व तेंदूची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. मोहाची दारू व तेंदूच्या पानांच्या विड्या याखेरीज ही झाडे आर्थिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहेत.

येथे 'गोटुल' हा गावच्या चावडीसारखा प्रकार असून येथे सुसज्ज हॉस्पिटल, शाळा, संगणक विभाग, खेळाचे मोठे मैदान इ. सोयी उपलब्ध आहेत.

आमटे दांपत्याबरोबर गप्पा मारण्यापूर्वी त्यांच्या उपक्रमावर / प्रकल्पावर आधारित एक चित्रफीत दाखविण्यात आली. प्राण्यांच्या भेटीनंतर सर्वांनी गटागटाने आमटे दांपत्याबरोबर फोटोही काढले. (डॉ. विकास आमटेंनी यास नम्रतापूर्वक पण स्पष्ट नकार दिला होता.)

दुपारचे भोजन झाल्यानंतर 'सोमनाथ प्रकल्पाकडे' प्रयाण केले. डॉ. विकास हा सोमनाथचा प्रकल्प सांभाळत असून येथे 'शेतीसाठी जलसंवर्धन' 'कृषी उत्पादन' याबाबत विविध प्रयोग केले जातात. ज्यायोगे कृषी उत्पादनात वाढ होईल.

येथे पाणी अडविण्यासाठी जुन्या टायरचा बंधारा बांधून पाणी अडवून 'वॉटर बँक' तयार केलेली आहेत. त्यासाठी टायरबरोबरच, सिमेंट, खडी व प्लास्टिकचे मिश्रण वापरलेले आहे. पाणी साठविण्यासाठी तलाव खणताना निघालेली माती नजिकच्या सपाट काठावर टाकून 'मानवनिर्मित टेकडी तयार करून त्यावर वृक्षारोपण केले आहे. त्यात विविध औषधी वनस्पती व उपयुक्त वृक्षांची लागवड केलेली आहे. त्यात शिसव, मोह, बेहडा, कुडा, पिंपळ इ. वृक्षांचा समावेश आहे.

१२।। एकराच्या ह्या परिसरात १७ तलाव असून कोल्हापूर बंधाऱ्याचा उपयोग करून त्यांना जोडणारे कालवे तयार केलेले आहेत. या जलसंधारणामुळे शेतीला तर पाणीपुरवठा होतोच, शिवाय आसपासच्या विहिरींनादेखील पाणी पुरवठा होतो. शेतात प्रामुख्याने तूर, तांदूळ, कोथिंबीर व भाजीपाला पिकवला जातो. ज्या महारोग्यांना एकेकाळी झिडकारले गेले होते त्यांच्याच कुटुंबातील व समाजातील तीच माणसे ह्या प्रकल्पात नोकरी करीत आहेत. काळाने समाजावर उगवलेला हा सूड आहे.

डॉ. विकास यांनी टाकाऊ प्लास्टिकपासून मजबूत पण हलक्या विटा तयार करून भूंकपविरोधक घरे तयार केली आहेत. यंत्रांचा वापर न करता अर्धगोलाकृती छप्पर व भिंती असलेली ही घरे त्यांना नेब्युला असे म्हणतात.

'लोक बिरादरी' हा प्रकल्प स्व. बाबा आमटे यांनी २३ डिसेंबर १९७३ रोजी अतिमागास आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी चालू केला.

समाजातील कुष्ठरोगी, अंध, अपंग, कर्णबधीर, आदिवासी, निराधार अशा वंचित आणि दुर्लक्षित घटकांना सामान्य जगणं मिळावं यासाठी बाबा आमटे यांनी आपलं उभं आयुष्य झिजवलं. त्यांना आपल्या स्वत:च्या पायावर उभं रहाण्याचं बळ दिले. दृष्टी दिली आणि संधीही दिली. या अचाट आणि अभूतपूर्व प्रयोगाचं जीवंत आणि चैतन्यमय प्रतिक म्हणजे आनंदवन प्रकल्प.

आनंदवनातर्फे दरवर्षी 'श्रमसंस्कार छावणी' आयोजित केली जाते. दरवर्षी शेकडो तरुण-तरुणी येथे येऊन श्रमसंस्कार आणि नवा विचार घेऊन जातात.

प्रत्येकजण काही योगी, त्यागी, विरागी होऊ शकत नाही. पण निदान केवळ भोगी राहू नये यासाठी अशा ठिकाणांना भेट देणे गरजेचे आहे. इथल्या मानवतेचे कार्य प्रत्यक्ष पाहिल्यावर देण्याची भावना जागृत होते. आपल्या भोवतालचे जग आनंदी करण्यासाठी आपणास केवढा वाव आहे याची जाणीव होते हेही नसे थोडके!

माणसामाणसांमधील हरवलेले माणूसपण बघून अस्वस्थ होत प्रेरणादायी पर्यटनाद्वारे समाजात बदल घडवू पहाणारे 'सदिच्छा परिवार-मुंबईचे डॉ. जयंत टोणगावकर (२८६९६१९१-९८६९९९५७८३) ह्या कर्मक्षेत्रांची किंवा आधुनिक तीर्थक्षेत्रांची वारी घडवून आणतात.

स्व. बाबा आमटे व परिवाराच्या अफाट कार्याबद्दल लिहिण्यास शब्द अपुरे पडतात. किंबहुना ते शब्दबद्ध न करता येणारे आहे. त्याने भारावून जाण्याची अनुभूती आपणास होते.

बाबा आमटेंच्या कार्याचा गौरव केवळ भारत सरकारनेच केला नाही तर; युनायटेड नेशन, रोमन मॅगासेसे फाऊंडेशन, टेंपलटन फाऊंडेशन ह्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीही केलेला आहे. तसेच मोनॅको ह्या युरोपातील चिमुकल्या देशाने तर १९९५ साली डॉ. प्रकाश व डॉ. मंदाताई यांच्या सन्मानार्थ खास टपाल तिकीटही काढले होते.

सबंध प्रकल्पात कोठेही मंदिर अथवा देवाची मूर्ती नाही तर फक्त मानव पूजा. म्हणून म्हणावेसे वाटते.

''दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती.''

*

---

# अभिनंदन

गुरुत्वीय लहरींचा अचूक वेध घेण्यात यश आल्याची बातमी २८-९-२०१७ रोजी ठिकठिकाणी झळकली. तीन शोधकांच्या माध्यमातून असा प्रथमच स्रोत ठरविण्यात आला; ज्यामुळे कृष्णविवरांच्या स्थानांची अचूकता शोधण्याची क्षमता वाढली आहे. प्रमुख तीन संशोधकांना या वर्षीचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले. या शोधात श्री. संजीव धुरंधर या गुरुत्वीय लहरी संशोधनातील ख्यातनाम वैज्ञानिकाचा सहभाग आहे. डॉ. संजीव धुरंधर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

भटकंती

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# स्पिती व्हॅलीचे अनोखे सौंदर्य

✶ पूर्णिमा धैर्यवान ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

लोहाल व स्पिती ही वेगळी ठिकाणे आहेत. ही अनोळखी ठिकाणे बघण्यासाठी फार कमी प्रवासी येथे येतात. स्पितीचा मार्ग सिमल्यातील सरहान या गावापासून सुरू होतो. पूर्ण व्हॅलीचा रस्ता डोंगर फोडून केलेला आहे. खोल दरीतून खळाळत्या सतलजची साथ असते. चारी बाजूला महाकाय पर्वतरांगा व मध्ये गाव अशी व्हॅलीची रचना आहे.

आम्ही सिमल्याहून सरहानसाठी सकाळी निघालो. सिमला ते सरहान १५० कि. मीटरचा रस्ता आहे. वाटेत रामपूर व नारकंडा ही गावे लागतात. नारकंडापासून ६ कि.मी. अंतरावर 'हातू पीक' व हातू देवीचे मंदीर आहे. वाट अरुंद, डोंगरातला रस्ता व दोन्ही बाजूला जंगल आहे. हातू देवीचे मंदीर जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील व्ह्यू पॉईंटवरून डोंगरदऱ्यांचा अनोखा नजारा न्याहाळता येतो. येथे एक मेडीटेशन सेंटरही आहे. नारकुंडा येथे जेवण घेऊन पुढच्या प्रवासासाठी निघालो.

वाटेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला नीलमोहर छान फुलला होता. निळा नीलमोहर प्रथमच पहाण्यात आला. नील मोहराचे गडद निळ्या रंगाच्या फुलांनी बहरलेले झाड स्वच्छ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर मन प्रसन्न करून गेले. सरहान गाव रामपूर पासून १५१ कि.मीटरवर आहे. ज्युरी गावातून सहरानसाठीचा रस्ता ७ कि.मी. आहे. सरहानला पोहोचायला संध्याकाळ झाली. तेथे हिमाचल टुरीझमचे हॉटेल आहे. सरहानचा रस्ता मिलीटरी कॅम्पमधून जातो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सफरचंदाची भरपूर झाडे आहेत. झाडांना मे-जूनच्या सुमारास पांढऱ्या फुलांचा बहर असतो. पुढे ती फुले देठापासून सफरचंद धरतात. रामपूर या गावाला सिमल्याची हद्द संपते. त्यानंतर किन्नूर जिल्ह्याची सुरूवात होते. सरहान गावात भिमकाली देवीचे मंदीर आहे. देवीच्या दर्शनासाठी दोन मजले चढून जावे लागते. देऊळ गोंपा म्हणजे मोनेस्ट्रीसारखे आहे. देवळाला बाहेरच्या बाजूनं लाकडी कोरीवकाम केले आहे. किन्नूर जिल्ह्यात तिबेटीयन लोकांचे वास्तव्य आहे. गावात नटली स्टेडीयम आहे. वरच्या पठारावर श्रीखंड महादेवाचे मंदीर आहे. येथे एक 'पक्षी विहार' गार्डनही आहे. आम्ही तेथे पोहोचलो त्या दिवसात पक्षी अंडी घालत असल्याने, फिरण्यासाठी ते गार्डन बंद होते. रस्त्याने पुढे पुढे जात असताना बर्फाच्छादित पर्वत शिखरे दिसत होती. कधीही न ऐकलेली अशी नवीन नवीन गावांची नावे वाचण्यात येत होती.

सरहानचे वास्तव्य संपवून सांगला या नवीन गावात जाण्यासाठी निघालो. प्रवास ११७ कि. मीटरचा आहे. किन्नूर म्हणजे फळांची घाटी. दूरवर जुने गाव दृष्टीपथात येते. वाटेत करचम डॅम लागतो. सांगलाचे हॉटेल रापो नदीजवळ होते. ही नदी छितकुल गावातून येते. खळाळून वाहणारी नदी, सभोवती बर्फाच्छादित पर्वतशिखरे, पर्वत उतारावरील घनदाट जंगल, सुंदर व शांत निसर्गचित्र मनाला आनंदित, उल्हासित करीत होते. सोबत सफरचंदाची झाडे होतीच. येथे नागमंदिर म्हणजे गोंपा व कामरू किल्ला पाहिला. वर्षातून एकदाच तिबेटी

## ती

**- आनंद देशमुख**

कधी मी व्यापात असतो
कधी काळजीत असतो
अशा भलत्या वेळी
आगंतुकपणे... ती येते
नटून, सवरून
पूर्वी कधी नव्हती
एवढी सुंदर बनून
पण माझ्याकडे नसतो वेळ
तिच्याशी बोलायला
तिचं हे रूप
स्मरणात साठवून ठेवायला
वाट पाहून पाहून ती
तशीच निघून जाते
काम हातावेगळं करून
निवांत झाल्यावर मात्र
तिची आठवण प्रकर्षाने येते
पण आता ती येत नाही
तिचा रुसवा सुटत नाही
मनधरणी करून आली तरी
पूर्वीसारखी खुलत नाही
मग वाटते,
तेव्हाच पाच मिनिटे खर्च करून
कागदावर उतरवून ठेवली असती
तर बरं झालं असतं!

*

---

सणाला ह्या किल्ल्याचे दार उघडले जाते. आतमध्ये सोन्याची बुद्धाची मूर्ती आहे. इथे चढून जाण्यासाठी पायऱ्या आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी सांगला गावापासून २७ कि.मीटरवर छितकुल गाव बघण्यास गेलो. छितकुल गाव चित्रात रेखाटल्याप्रमाणे फार सुंदर आहे. गावाच्या बाजूने रापो नदी वाहते. ही नदी चीनमधून येते. या गावात भारताची हद्द संपते व चीनची हद्द चालू होते. या रस्त्याने म्हणजे हद्द ओलांडून डोंगर पार करून २५ कि.मीटरचा रस्ता ओलांडून तिबेटी लोक भारतात येतात. छितकुल गावात बटाट्याची शेती केली जाते. इथला बटाटा जगामध्ये महाग व एक नंबरचा आहे. तसेच येथे सफरचंदाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. सफरचंदे चांगल्या प्रतीची व रसाळ असतात. ही सफरचंदे परदेशी रवाना होतात. रापो नदीजवळच्या डोंगरावर ट्रेकींग केले. आमची गाईड गीतांजली छान ट्रेकर होती. तिच्या मदतीने ट्रेकचा वेगळा अनुभव मिळाला. वाटेत काही धष्टपुष्ट गाई दिसल्या. त्यांना चारु म्हणतात.

छितकुल गाव बघून परतलो. सांगला गावात जेवण घेतले व पुढे जाण्यासाठी निघालो. पुढील कल्पा गाव ५० कि.मीटरवर आहे. हे गाव पहाताना डलहौसीची आठवण झाली. तेथून कैलास पर्वताचे दर्शन होते. शंकराच्या पिंडीसारखी दोन शिखरे दिसतात. कल्पा गावापासून ७ कि.मीटरवर रोधी गाव आहे. गावात जाण्याचा रस्ता वळणावळणाने डोंगरातून जातो. वाटेत सुईसाईड पॉईंट लागतो. रोधी गावात एक छोटे मंदीर आहे. खाली उतरून जाण्यासाठी १० ते १५ पायऱ्या आहेत. त्यानंतर पुढील नाको ह्या ठिकाणी जाण्यास निघालो. कल्पा ते नाको १२० कि.मीटरचा प्रवास आहे. वाटेत स्पिलो गाव लागते. तेथे जेवण घेतले. नाको रस्त्यावर खाब गाव लागते. तेथे स्पिती व सतलज नद्यांचा संगम आहे. दोन्ही नद्यांचे  पाणी गढूळ आहे. परंतु संगमाजवळ दोन नद्यांच्या दोन दिशा दिसतात म्हणून संगम म्हणायचा. खाबच्या पुढे पूह नावाचे गाव लागते. खाब रस्त्याच्या पर्वतरांगा दऱ्यांना बिलगून आहेत. या डोंगरकडा आपल्या अंगावर आल्यासारख्या वाटतात. मोठे मोठे सुळके व खडक भितीदायक वाटतात. वरच्या डोंगरावरून खालचा वळणावळणाचा रस्ता दिसतो. नाको गाव लहान आहे. गाव उंचावर असल्याने हुडहुडी भरण्याइतकी थंडी होती. सकाळी नाश्ता झाल्यावर गावातील आजुबाजूचा परिसर व नाको तलाव बघितला. तलावाच्या आजुबाजूला मटारची शेती होती. गावात मोनेस्ट्री आहे. नाको खेडेगाव असल्याने लोकसंख्या

अगदी कमी आहे. पुढे काझासाठी प्रयाण केले. काझा हा प्रवासाचा शेवटचा टप्पा होता. काझा रस्त्यावर लडाखसारखे मूनलँड डोंगर लागतात. पुढे चांगो गाव लागते. या गावातदेखील मोनेस्ट्री आहे. एकंदर या सर्व गावांमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक गावात गोंपा म्हणजे मोनेस्ट्री असतात. चांगो गावात छान 'मोमोज' खाण्यास मिळाले. चांगो गावापासून काझा ७४ कि.मीटरवर आहे. तसेच नाकोपासून काझाचे अंतर १५० कि.मीटर आहे. खाबजवळील संगमापासून स्पिती नदी रस्त्याच्या बाजूने सोबतीला असते. २५ कि.मीटरनंतर काझा रस्त्यावर ढंकर मोनेस्ट्री लागते.

मोनेस्ट्री बघून झाल्यावर काझा गावात प्रवेश केला. काझा थोडेसे लेहसारखे आहे, म्हणजे उजाड डोंगरांचे आहे. या गावात तीन दिवसांचे वास्तव्य होते. त्यामुळे प्रवासामध्ये थोडासा आराम मिळाला. दुसऱ्या दिवशी किब्बर गाव पाहिले. काझापासून २४ कि. मीटरवर हे गाव आहे. पुढे १ कि. मी. कि मोनेस्ट्री आहे. किब्बर गाव १२,००० फुटांवर आहे. सर्व गावे फिरताना, चढता उतरताना दम लागतो. श्वास घेण्यास त्रास होतो. की मोनेस्ट्री १००८ वर्षांपूर्वीची आहे. गोंपातील माणसाने संपूर्ण मोनेस्ट्री फिरून दाखवली. मोनेस्ट्रीमध्ये आपल्या मंदिरासारखे प्रसन्न वाटत नाही. काहीतरी गूढ, उदास वाटते. तिबेटी लोकांच्या रहाणीमानामुळे कदाचित तसे असू शकेल. दुसऱ्या दिवशी सकाळी मोकळा वेळ होता. टूर लिडरने त्यामुळे तेथून १०० कि. मीटरवर असलेली पित्त व्हॅली बघावयास जाण्याचे ठरवले. या व्हॅलीबद्दल जास्त माहिती समजली नाही. दोन डोंगरांच्यामध्ये ही व्हॅली पसरली आहे. व्हॅलीत बर्फाच्छादित पर्वतरांगा पहाण्यास मिळाल्या. व्हॅलीत एक छोटे गाव वसले आहे. त्याची लोकसंख्या १०० पेक्षा कमी आहे.

प्रत्येक गावाच्या वाटेवर वेगळा निसर्ग उभा ठाकला आहे. प्रत्येक पर्वतरांग ओलांडताना नवनवीन अनाघ्रात निसर्ग पहावयास मिळतो. निसर्गाची किमया बघून डोळे तृप्त होतात. मन भरून येते. या भागात जास्त थंडी व बर्फ पडतो. त्यामुळे गाई, कुत्रे केसाळ असतात. शेळ्या मेंढ्यांच्या अंगावर देखील भरपूर लोकर असते. थंडीपासून संरक्षणासाठी निसर्गानेच ही शाल पांघरली आहे असे वाटते. स्पिती हे थंड हवेचे वाळवंट आहे. त्यामुळे पाऊस कधीच पडत नाही. चार ते सहा महिने सतत बर्फ पडत असतो. तेथील माणसे सुरकुतलेल्या चेहऱ्याची, बसक्या नाकाची, हसरी, शांत म्हणजे तेथील वातावरणासारखी थंड असतात. डोक्याला ऊन लागू नये म्हणून बायका रुमाल बांधतात. त्याला दूड म्हणतात. काही स्त्रीपुरुष किन्नूर टोपी वापरतात.

दुसऱ्या दिवशी मुंबईसाठी निघालो. काझा ते रामपूर ३०० कि.मीटरचा प्रवास आहे. रामपूरमध्ये एका रात्रीचे वास्तव्य होते. परतीच्या वाटेवर, वेगळा डोंगराळ रस्ता वेगळ्या निसर्गाने नटलेला पाहिला. सोबत सळाळत्या नदीचा प्रवाह होताच. त्यामुळे वेळ कधी संपला; कळलेच नाही. घरी परतायची ओढ होतीच. १२०० ते १५०० कि. मीटरचा प्रवास झाला होता. रामपूरचे वास्तव्य संपवून चंदीगडला निघालो. रामपूर चंदीगड व्हाया सिमला असा २७५ कि. मीटरचा प्रवास आहे. चंदीगडला पोहोचल्यावर आपल्या जगात परत आलो असे वाटले. दुसऱ्या दिवशी चंदीगडमध्ये छान खरेदी केली. दुपारच्या विमानाने मुंबईला परतलो. पोटात धडकी भरविणारे अविस्मरणीय क्षण, निसर्गाचे आगळेवेगळे रंग, रूप मनामध्ये साठवीत मुंबईच्या जमिनीवर पाऊल ठेवले.

*

## वात्रटिका
### केस कोणाच्या हातात?

तो आहे खादाड, सारखं दुखतं पोटात,

डॉक्टर म्हणतात, 'केस नाही राहिली माझ्या हातात.'

ती म्हणते, 'खाणं बनवून दुखतात माझे हात',

डॉक्टर म्हणतात, 'केस आता तुमच्याच फक्त हातात.'

**डॉ. सुमन नवलकर**

लेख

# त्वरित निर्णय कसे घ्यावेत

**★ रसिक विजयकर ★**

आज उठायला थोडा उशीरच झाला होता. ऑफिसमध्ये महत्त्वाची मीटिंग असल्यामुळे मला वेळेवर पोहोचणे गरजेचे होते. माझ्या सर्व सहकाऱ्यांनादेखील सांगितले होते की आज वेळेवर या आणि मलाच उशीर झाला होता. मी कशीबशी तयार होऊन बोरीवली स्टेशनवर पोहोचले. नेमका आज गाड्यांचा गोंधळ होता. अशावेळी काय करावे सुचत नव्हते. मला एकाएकी आठवले की एक गाडी विरारहून येते ती बोरीवलीलादेखील थांबत नाही. पण बहुतेकवेळा प्लाटफॉर्मवरून हळूहळू जाते. मी चटकन निर्णय घेतला. आज चान्स घेऊ या. मी ब्रिज ओलांडून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर आले. खाली उतरताच ती गाडी हळूहळू प्लॅटफॉर्मवर आली व उभी राहिली. जणू काय माझ्याचसाठी थांबली होती. मी पटकन आत शिरली व गाडीने वेग घेतला. मी सर्वप्रथम ऑफिसमध्ये वेळेवर पोहोचू शकले. आता विचार केला तर मी त्या दिवशी पटकन असा धाडसी निर्णय कसा घेतला ह्याचे आश्चर्य वाटते. पण ती एक अंत:प्रेरणा होती हे नक्की. ज्याला इंग्लिशमध्ये 'गट फिलिंग' म्हणतात ती हीच असावी!

त्वरित निर्णय घेण्याची क्षमता असणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आपण पुष्कळ वेळा असे निर्णय नेहमीच्या जीवनात घेत असतो. फक्त आपल्याला त्याची जाणीव नसते, जसे शाळेत जाण्याचा वा ऑफिसला जाण्याचा कोणता मार्ग निवडणे वगैरे. काहीवेळा महत्त्वाचे निर्णय त्वरित घ्यावयाचे असतात. पण आपण फार भांबावलेले असतो. आणि कोठलाही निर्णय घेणे जड जाते. तुम्हाला जर असे वाटत असेल की निर्णय घेण्यास फार वेळ लागतो तर अशा वेळी कोठले पर्याय त्या समस्येला उपलब्ध आहेत त्याचे नेमके मूल्यमापन केले तर विश्वासपूर्वक निर्णय घेऊ शकतो. जलद निर्णय घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी अनेक टप्पे पार पाडावे लागतात. ज्यामुळे जलद निर्णय घेण्याचा आपणास सराव होतो.

पहिले, काय निर्णय घ्यावयाचा आहे तो शोधून काढा. त्यामुळे एका निर्णयावरून दुसरा निर्णय किंवा अनेक निर्णयाची साखळी उभी राहू शकते. समस्या काय आहे ती वेगळी काढा; ज्यामुळे निर्णय घेणे सुलभ जाईल. जर निर्णय घेणे कठीण वाटत असेल तर त्याबाबत अधिक स्पष्टीकरण शोधा. कारण समस्येबाबत अस्पष्टता असेल तर निर्णय घेणे कठीण जाते. उदा. वर्गात गणित सोडवताना जर तुम्हाला गणिताचे मूळ घटक वा निकष काय आहे हे जर माहीत नसेल तर गणित जसे सोडवता येत नाही तसेच हे आहे.

दुसरे म्हणजे या मागची मानसिकता शक्यतो कमी करा. स्वत:ला विचारा की घेतलेल्या निर्णयामुळे कितीसा विपरीत परिणाम होऊ शकतो. थोडक्यात तुमच्यावर असलेला दबाव जर नाहीसा झाला व तुमचे मन साफ असेल तर तुम्ही योग्य तो निर्णय घेऊ शकाल.

निर्णय घेण्यासाठी काय निकष लावायचा ते आधी ठरवा. या निकषामुळे निर्णय घेण्यासाठी काय करावे लागेल हे ठरवता येईल उदा. जर तुम्ही जेवणासाठी काय बनवायचे ह्याचा विचार करीत असाल तर निकष असा लावा की त्या क्षणाला तुमच्या जवळ असलेल्या घटक पदार्थाचा उपयोग करून जी पाककृती झटकन बनवता येईल व जी मुलांना देखील आवडेल ती करणे.

स्वत:शी प्रामाणिक रहा व समोर असलेल्या पर्यायांपैकी जे तुम्हाला आवडणार नाहीत त्याचा विचार करू नका. त्यामुळे अनेक पर्यायांपैकी थोडेच

पर्याय तुमच्यासमोर राहतील व पटकन तुम्ही एका पर्यायाची निवड करू शकाल.

काही परिस्थितीमध्ये कोठलाच निर्णय न घेणे हा पर्याय होऊ शकत नाही. हा चुकीच्या निर्णयापेक्षा देखील वाईट पर्याय होऊ शकतो. जसे की तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या जेवणासाठी काय स्वयंपाक करू याचा विचार करताना त्यांच्यासाठी काहीच न बनविणे हा पर्याय होऊ शकत नाही.

संपूर्ण योग्य असा निर्णय कधीच असू शकत नाही. कारण प्रत्येक पर्यायाला अनेक शक्यता असू शकतात ते लक्षात ठेवा. त्वरित निर्णय घेण्याची युक्ती म्हणजे तुमच्या जवळ असलेल्या माहिती व निकषावर योग्य तो पर्याय निवडणे.

गांभीर्याने विचार करणे ही एक कला आहे. कोठल्याही गोष्टीचा विचार करण्याआधी क्षणभर प्रत्येक पर्यायाचा काय शेवट असू शकेल हे तुमच्या मनाला विचारा. प्रत्येक पर्यायाचा मनात अनेक शक्यतेचा विचार करा. प्रत्येक शक्यता तुमच्या जवळील निकष लावून पहा व सर्वात योग्य त्या पर्यायाची निवड करा.


तुमची अंत:प्रेरणा काय म्हणते हे देखील महत्त्वाचे आहे. संकटकालीन चटकन निर्णय घेणे ही एक उत्स्फूर्त प्रतिक्रिया असते. पुष्कळ वेळा आपण पटकन निर्णय घेतला म्हणून पश्चाताप होतो, जरी तो निर्णय योग्य असला तरी. म्हणजे निर्णय जरी सकारात्मक असला तरी त्याविषयीचा समज नकारात्मक असतो. असा तुमचा कल आहे का ह्याचा शोध घ्या. म्हणजे तुम्हाला तुम्ही घेतलेला निर्णय योग्य होता याचा आनंद मिळेल.

थोडक्यात योग्य निर्णय योग्य त्या वेळी घेणे हे महत्त्वाचे ठरते. वरील विवेचनाचे आपण पारायण केल्यास असे निर्णय अनेक संकट प्रसंगी आपण योग्य तेच घेऊ याचा आत्मविश्वास वाढेल याची खात्री बाळगा.

*

---

## व्यंगचित्र



कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# ती

## ✶ कल्पना सुभाष कोठारे ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

कार्यक्रमाला तिकीट नसले, की गर्दी भरपूर होते. हे ओळखूनच संयोजकांनी भरपूर खुर्च्या प्रांगणात लावलेल्या दिसत होत्या. व्यवस्था पाहून ती मनोमन सुखावली. उत्साहाने तिने स्वत:ला अलगद एका खुर्चीत उतरवले. आवडत्या कवयित्रीचे काव्यवाचन ऐकण्याच्या निमित्ताने ती घराबाहेर पडली होती. घरातल्या खिडकीतून दिसणारा रोजचा आकाशाचा तुकडा, इथे खुल्या प्रांगणात मस्त, विशाल रूपात डोक्यावर ठाकला होता. ते निळेपण चाखता चाखता तिची नजर कोपऱ्यातील रंगीबेरंगी मांडवाकडे गेली. 'ओह! पुस्तक प्रदर्शन!' या विचाराने, जणू आनंदाचे कारंजेच तिच्या मनी उसळले.

खुर्चीचा मोह सोडून ती पुस्तकप्रदर्शनाकडे वळलीच! कित्तीतरी दिवसांनी नव्या कोऱ्या पुस्तकांचा वास तिला सुखवीत होता. एरवी, वाचनालयातील हाताळलेल्या पुस्तकांशीच गाठभेट होत असे. लहान मुलाला खेळण्याच्या दुकानात मोकाट सोडल्यास त्याची जी अवस्था होईल, तशीच हावरट स्थिती ती अनुभवत होती. मलपृष्ठावरील मजकूर चाळत ती पुस्तके हाताळू लागली. वाचलेले, न वाचलेले, कितीतरी साहित्यिक तिला खुणावत होते. काय घ्यावे? पूर्ण वाचून होईल का? पुस्तक चांगले निघेल का?, किंमत जास्त तर नाही? अशा अनेक प्रश्नांच्या माशा घोंघावत होत्या. 'मॅडम हे घ्या! 'असे म्हणत एका स्वयंसेवकाने तिच्या हाती एक प्लास्टिकची बास्केट ठेवली. 'अरे वा! ही तर मॉलची पद्धत!' 'हो! चांगली रीत अनुसरावी नाही का?' तिच्या हातातील ओझे बास्केटमध्ये हलके करीत स्वयंसेवक म्हणाला. ''वॉव! चक्क संभाषण!'' ती मनातच पुटपुटली. मराठी विक्रेत्यांचे तुसडेपण मनात ठसलेले असताना त्या स्वयंसेवकाच्या बोलण्यातील गोडवा तिचा मूड अधिकच चांगला करून गेला. प्रदर्शनाची फेरी संपवून ती पैसे स्वीकारणाऱ्या माणसाजवळ येऊन पोचली. इथे मात्र मॉलप्रमाणे तिचे क्रेडिट कार्ड चालणार नसते. कधी बरे मराठी पुस्तकविक्रेते कार्ड पद्धती स्वीकारतील?' - हा प्रश्न मनातच ठेवून, तिने पर्समधील पैशाचा अंदाज घेत, बास्केटमधील काही पुस्तके कमी करून खरेदी आटोपली.

प्रकाशनसंस्थेची जाहिरात करणारी, ज्यूटची फुकट मिळालेली पिशवी मिरवीत ती मंडपाबाहेर पडली. एव्हाना बऱ्याच खुर्च्या भरल्या होत्या. सुदैवाने तिला रिकामी खुर्ची मिळाली. नवीन दागिना घातलेली स्त्री इतरांचे आपल्याकडे लक्ष जावे म्हणून चुळबुळ करते. तद्वत काहीजण नुकतीच खरेदी केलेली नवीन पुस्तके चाळत होते. तिने मात्र खाऊ राखून ठेवावा तशी स्वत:ची खरेदी पिशवीबाहेर न काढता, घरी गेल्यावरच उघडण्याचे ठरविले.

आता तिचे लक्ष समोरील रंगमंचाकडे होते. ध्वनिक्षेपकाची चाचणी झाली. मान्यवर अध्यक्षांचे आगमन झाल्याची घोषणा झाली. स्वागतगीत, स्वागताध्यक्षांचे भाषण, प्रकाशन संस्थेच्या मालकांचे भाषण, मान्यवरांचा सत्कार, अध्यक्षीय भाषण, अशी स्थानके घेत घेत अखेर कार्यक्रमाची गाडी तिला हवे असणाऱ्या काव्यवाचन या स्थानकावर येऊन पोचली. निसर्ग कवी, दलित कवी, प्रस्थापित कवी, नवोदित कवी, स्थानिक कवी, असे शिक्के मारलेले एकेकजण प्रक्षेपकापाशी येऊन कविता सादर करून जात होते. गुलाबी रंगाच्या सलवार खमीज पोषाखातील एक कोवळी किशोरी स्वत:ची कविता वाचू लागली. व्यवस्थित पिन केलेली ओढणी, क्लिपमध्ये बंदिस्त असलेली केसांची पोनी टेल - ते रूपडे तिला आवडून गेले. ती लक्षपूर्वक कविता ऐकू

## चारोळी

- आनंद देशमुख

देहाकडून देवाकडे जातांना
देश लागायला हवा
पण त्यांना हवा असतो
धार्मिक वितंडवाद रोज नवा

लागली. 'माझ्या कवितेचे नाव आहे 'पहिली भेट'.... तिला आवडलेली कवयित्री पहिल्या भेटीस काव्यात गुंफत असतांना, ती नकळत भावविश्वाच्या पायऱ्या उतरून भूतकाळाच्या तळघरात पोचली. आता ती स्वत:चीच पहिली भेट जणू परत जगू लागली.

रेलगाडी खड्खड् करीत, ठराविक तालात चालली होती. एखाद्या जनावराने उच्छवास सोडावा, तसा 'फुस्सऽऽ' आवाज करीत गाडी कुठेतरी थांबली. अन् ती डुलकीतून जागी झाली. 'कुठलं स्टेशन?' या विचारात ती खिडकीबाहेर बघू लागली. इतक्यात एक गोरटेला हात चहाचा कप धरून तिच्यासमोर आला. 'चहा घेणार?' - प्लेटफॉर्मवरील अनोळखी मुलगा तिलाच विचारीत होता. 'छे! 'छे! मी चहा घेत नाही' 'मग दूध?' 'नको! नको!' अनोळखी मुलाशी आपण बोललो का? कसं बोललो? प्रश्नांनी तिच्या उरी धडधड सुरू झाली. प्रश्नकर्ता अनोळखी मुलगा आता प्लॅटफॉर्मवर पाठमोरा उभा दिसत होता. चहा पीत तो कोणाशीतरी गप्पा करीत होता. मधूनच केसाची झुलपे उडविण्याची त्याची फिल्मी स्टाईल पाहून तिला हसूच आले. 'हा काय स्वत:ला देवानंद, बिवानंद समजतोय की काय?'- हा विचार तिच्या मनी येऊन गेला. मात्र दुसऱ्याच क्षणी आपण त्याचा विचार करतोय - वारंवार-हे लक्षात येऊन, तिला ओशाळवाणे वाटले. त्याच्याकडे नजर जाऊ नये म्हणन ती हातातील मासिक चाळू लागली.

गाडीने स्टेशन सोडले. तो अनोळखी मुलगा तिच्या समोरच्या सीटवर येऊन बसल्याचे तिने डोक्याच्या कोपऱ्यातून बघितलेय! हातातील मासिकावर लक्ष केंद्रित करण्याचा तिचा प्रयत्न फसला. कारण समोरून अचानक प्रश्न आला, 'वाचन-जबरदस्त दिसतंय तुमचं?' 'अं?' त्याची नजर, तिच्या मांडीवरील पुस्तकाकडे होती. ''सामंतांची 'अविरत' कादंबरी! वाचलीय तुम्ही? मी चौथ्यांदा वाचतेय... घ्या हवी तर वाचायला...'' पाण्यात पडल्यावर आपोआप हातपाय हलविले जातात. तसेच काहीसे झाले. 'वाचन' या विषयात पडताच, संभाषण नकळत पोहू लागले. कसल्याश्या नोकरीच्या लेखीपरीक्षेसाठी व मुलाखतीसाठी तो मुंबईस जात होता. व व्ही.टी. जवळील लॉजमध्ये राहून नंतर लगेचच दोन दिवसांनी तो परतणार होता - हे तिला बोलण्याच्या ओघात कळले. तीही एका परीक्षेसाठीच मुंबईला जात होती अन् मुंबईला मामाच्या घरी उतरणार होती. परीक्षेनंतर मामीने तिच्यासाठी 'कांदेपोह्याचा' कार्यक्रमही ठरवून ठेवला होता. सहजगत्या त्या अनोळखी मुलाला तिने हे सांगून टाकले. 'दोन्ही परीक्षांसाठी तुम्हाला वेस्ट ऑफ लक्! 'तो म्हणाला''तुम्हाला पण!'

गप्पा करता करता तिचा रात्री कधीतरी डोळा लागला होता. तो तरूण वरच्या बर्थवर झोपण्यास निघून गेला होता. पहाटे मधमाशांप्रमाणे घोंघावत दादर स्टेशनवर हमाल आत शिरले. न विचारताच, एका हमालाने तिची बँग उचललीही'! वरील बर्थवर गाढ झोपेत असलेल्या त्या अनोळखी मुलास 'बाय, अच्छा!' करण्याचा प्रश्नच आला नाही, प्लॅटफॉर्मवर मामाला पाहताच ती सहप्रवाशाला विसरूनही गेली. नंतरचे दोन दिवस परीक्षेच्या गडबडीत पार पडले.

रविवारी संध्याकाळी, कांदेपोह्याचा कार्यक्रम असल्याने तिने सकाळीच केस शांपूने मस्त धुतले होते. केसाला पंचा बांधून, हातातल्या 'एम् अॅन्ड बीत' ती मश्गुल असताना मामीची हाक तिच्या कानी आली. 'मिनूऽऽ तुला भेटायला कुणीतरी आलंय गं?' 'सकाळी सकाळी मला भेटायला कोण येणार? माझी तर इथे एकही मैत्रीण नाही! नक्कीच कुणाचंतरी पार्सल न्यायचं असेल गावी!' - अशा विचारात, केसाचा पंचा सोडवीत, ती माडीच्या जिन्यावरून खाली उतरली.

'तू? तुम्ही?' प्रवासात भेटलेला तो अनोळखी तरुण पाहून ती आश्चर्याने ओरडलीच! मुलाखतीसाठी मुंबईत आलेल्या त्या मुलाचे नावही तिला ठाऊक

## वात्रटिका

### सोपी गोष्ट

दूध सेंटर घेतलं त्याने, चारला लावायचा गजर,
आंघोळ बिंघोळ करून पाचला सेंटरवर होई हजर
गजर बंद करून कधी, सरळ जायचा झोपी,
दुधाऐवजी पनीर विकायचा, गोष्ट इतकी सोपी

**डॉ. सुमन नवलकर**

नव्हते. आपण इथला पत्ता दिलेला नसूनही केवळ प्रवासातील ओळखीवर घरापर्यंत येऊन पोचलेल्या या मुलाची ओळख मामीशी कशी करून देणार? मामीच्या चेहऱ्यावर मात्र आश्चर्याचा लवलेशही नव्हता. ती नेहमीप्रमाणेच हसतमुख होती. 'आपल्याप्रमाणेच ह्याने मामीवरही गोड बोलून भुरळ घातली की काय?' हा प्रश्न मनातच ठेवून ती मामीला म्हणाली, ''मामी, हे माझ्याच गाडीला होते. ते पण परीक्षेसाठीच मुंबईला आलेत' 'अगं पण दारातच उभं ठेवणार आहेस का त्यांना? आधी घरात तर येऊ दे!' 'अं? हो! हो! या ना आत!' दाराबाहेर उभा असलेला तो अनोळखी आत येऊन, पायातील बूट काढू लागला. तिने हळूच त्याच्याकडे पाहून घेतले. गोरटेला चेहरा, बेताचीच उंची, भावपूर्ण डोळे अन् खट्याळ स्मित! केसांची झुलपे सांवरीत तो मामीशी काहीतरी बोलत होता. अर्ध्या जिन्यावर उभे राहून ती त्या अनोळखी मुलाकडे बघत होती. त्याच्या रेशमी वाटणाऱ्या केसातून हात फिरवावा - असा धाडसी विचार क्षणभर मनी येताच ती चांगलीच थरारली. हातातील पंचावरील पकड घट्ट करीत, तिने पाहुण्याला माडीवर नेले.

'हं! हे घ्या! तुम्ही गाडीत पुस्तक विसरलात नं, तेच द्यायला आलोयं!' 'अहो, विसरले नव्हते काही! तुम्ही वाचावं म्हणून मुद्दामच तुमच्या बॅगेवर ठेवून आले.' 'अनोळखी माणसाकडून आम्ही भेट का स्वीकारावी?' 'अनोळखी?' 'मग? नावसुद्धा आताच कळलं. मामींनी हाक मारली नं तुम्हाला तेव्हा! मिनू! छान आहे नाव! पण किती बावळटासारखं विचारले मी तुमच्या मामींना माहीत आहे? तुमच्याकडे नागपूरहून परवा आल्यात त्यांना भेटायचंय... असं सांगावं लागलं, 'आता मात्र तिला हसू आवरेना! 'हसायला काय झालं? पुस्तकात साधी नावं, पत्याची चिठ्ठी ठेवायला काय झालं होतं?' 'अहो पण मला पुस्तक परत नकोच होतं. मग उगीच कशाला...' 'उगीच! बरं ते जाऊ द्या! मिनू हा कसला शॉर्ट फॉर्म? मीनल, मीनाक्षी, मानसी की आणखी काही?' 'नो वे! ओन्ली मीना!' 'नक्की?' 'हा काय, टेबलवर पसारा पडलायं खात्री करून घ्या हवी तर!' त्याने खरंच टेबलवरील वह्या, पुस्तके बघायला घेतली. 'वॉव! कविता पण करता तुम्ही? वाचू? 'थांबा! थांबा! मीच वाचून दाखवते. नुकतीच केलीय- बघा बरं जमलीय का ते!

मन वाचता, वाचता, गेले असे धुंदावून
क्षण संपता, संपता, आले मेघही दाटुन
होता भाव अंतरीचा, होता नाद सान्निध्याचा
जसे एकावर एक, आले मेघ दाटुन
थेंब टप टप येता, मत्त सुगंध मातीचा
धारा जाहल्या आता, वस्त्र मना बिलगत्या,

'वा! छान! शीर्षक काय या कवितेचं?'

'काय देऊ? 'एकदा' असं चालेलं नं? पण ते जाऊ द्या हो! आधी मला सांगा, तुमची मुलाखत कशी झाली? अन् लेखीपरीक्षा? कुठला निबंध आला होता? सोपा होता पेपर की कठीण?' 'अहो, किती प्रश्न एकदम विचारतायं? एकावेळी एकच उत्तर मिळेल हं!' 'मिनूऽऽ' खालून मामीची हाक आली अन् गप्पांची गाडी थांबली.

मामीच्या हातात गरमागरम भज्यांची बशी पाहून तो म्हणाला, 'हे काय? ओन्ली भजी? नो कांदेपोहे?' त्याच्या या मिश्कील प्रश्नाला, मामीनेच उत्तर दिले. 'जरा लवकर आलात नं तुम्ही! संध्याकाळी आला असतात तर नक्कीच कांदेपोहे मिळाले असते. पण बहुधा आता तेही कॅन्सलच होतील. काय मिनुबाई? नकोच नं आता कांदेपोह्याचा कार्यक्रम? चहा घे रे यशवंता - थंड होईल!' 'यशवंत नाव आहे तुमचं? म्हणजे संध्याकाळी येणारेत ते पण यशवंत... की तोच हा? मामी, तू ओळखतेस ह्यांना?' 'छे गं! प्रथमच भेटतेय मी! ह्यांची अनुमावशी माझी बालमैत्रीण आहे. तिचा मघाशी फोन आला होता की संध्याकाळची कलकत्ता मेल पकडायचीय म्हणून हा सकाळीच येऊन जाईल म्हणून!' 'म्हणजे तुम्ही पण दोन परीक्षा द्यायला मुंबईत आलात? पण मग म्हणजे,


माझं पुस्तक परत करायला आलात - वगैरे सगळं नाटकच?' 'मी पण अनुमावशीला फोन केला, बोलता, बोलता माहिती मिळाली. 'मामाकडे परीक्षा द्यायला मुलगी गेलीयं' असं मावशी म्हणाली म्हणून मग वाटलं, 'यही तो है वो!'

'चहा घेणार?' ओळखीच्या आवाजाने ती वर्तमानात परतली. त्याच गोरटेल्या पण आता सुरकुतलेल्या हातातून समोर आलेला चहाचा कप तिने सहज स्वीकारला, लग्नानंतर चहाबाज झालेली ती, कार्यक्रमाच्या मध्यंतरात आवडीने चहाचे घोट घेऊ लागली.

'अय्या! आबा, तुम्ही पण आलात? आजी, आवडली माझी कविता?' गुलाबी सलवार कमीजमधील तिची नात, सोनल विचारत होती. पण आजीच्या उत्तरासाठी न थांबताच, सोनल मैत्रिणींच्या गराड्यात दिसेनाशी झाली. 'पुढच्या कार्यक्रमासाठी थांबायचंय की परतु या आता घरीच?' शेजारची खुर्ची बोलली. 'जाऊ या घरीच! बसून, बसून पाय आखडलेत माझे - चालतच जाऊ या नं? पण सोना...' 'अगं लहान आहे का मी आता? येईल ती सावकाशीनं मैत्रिणींबरोबर!' 'खरंच! बघता बघता, मोठी झाली नाही ही? तिच्या ममी डॅडींना लवकरच कांदेपोह्यांचा कार्यक्रम करा म्हणून सांगायला हवं नाही?' 'कांदेपोहे की भजी?' राखाडी केसांची झुलपे सावरीत, त्याने मिश्कील प्रश्न केला. 'अहो, संगणक युगात हे सारं डिलीटच झालंय. आता 'शादी डॉट कॉम' आणि अपॉईंटमेंट इन पिझ्झा हाऊस असं होत असणार! नक्की!' 'इथून जवळच आहे ना गं ते 'पिझ्झा हट'? जाऊ या का आपण दोघंच पिझ्झा खायला?' 'वा! आज अगदी वाढदिवस असल्यासारखं वाटतंय. पुस्तकांच्या ट्रीटनंतर आता पिझ्झाची पण ट्रीट?' 'हं चला!' म्हणत त्याने तिला खुर्चीतून उठण्यास हात दिला. 'पिझ्झा हट्'च्या दिशेने जातानाही, पुस्तकांची जड पिशवी अलगद तिच्या हातून त्याच्या हाती सरकली होती.

*

## व्यंगचित्र





श्री. गोविंद भगवंतराव आगासकर
(जन्मः २१ऑगस्ट, १९१७)

सौ. कामिनी गोविंद आगासकर
(जन्मः २८ ऑक्टोबर, १९१७)

# जन्मशताब्दीनिमित्त
# विनम्र अभिवादन



**मृदुला प्रभुराम जोशी**

**उज्ज्वला गोविंद आगासकर**

**अनुपमा जोशी**

**अतुल-पूजा जोशी, विद्यानंद-गौरी जोशी**

**अरुषी जोशी**

कथा

# हे काय भलतेच

## ✶ सौ. सुरेखा सुरेश नवलकर ✶

पहाटेचा मादक गारवा! शेजारीच जीवनसाथी पहुडलेला! नव्या कोऱ्या बंगल्यातला हा क्षण भारीच सुखावणारा! कालच झाली बंगल्याची वास्तुशांती. सोबत सत्यनारायणाची पूजाही! दिवस नुसता धामधुमीत गेला. मोजकीच तरही घरचीच सासर माहेरची मिळून ५०-६० माणसे. आयुष्याच्या मध्यान्हीला - लग्नानंतर २५-२६ वर्षांनी - बांधलेला बंगला जवळच्या नातलगांनी लहानमोठ्या सगे सोयऱ्यांनी गजबजलायला हवा होता गौरीला! माणसांची तिला भारी आवड. लग्नाला उभी राहताना आईला अटच घातली होती तिने मला भरलेलं घर हवं म्हणून देवाने इच्छा पुरी केली. कन्या व पुत्र ओटीत घालून देवाने आनंदात भरच घातली तिच्या.

धूपाचा गंध, उदबत्तीचा सुवास, फुलांचा-फळांचा - प्रसादाचा - मेवामिठाईचा गोड वास अजूनही बंगल्यात दरवळत होता. सर्व काही जाणवत होते. तरीही स्वप्नवत वाटत होते. मूळात बंगला हेच दोघांचे गोड स्वप्न होते. स्वत:लाच चिमटा घेऊन खुशीतच गौरी हळुवारपणे उठली. जिन्याने वरच्या गच्चीत गेली. हात पसरून ताजी प्रसन्न हवा कवेत घेतली. मोठा श्वास घेऊन उरात भरून घेतली. हा ताजेपणा मोकळ्या हवेचा, नव्या जागेचा होता. आसमंत न्याहाळताना तयार होणारे, नव्या बांधणीचे ३-४ बंगले पाहून नवे शेजारी मिळतील ह्या आनंदाने तिच्या खुशीत भरच पडली. नवा उत्साह घेऊन ती खाली आली. सासू-सासरे वयस्क होते तरी मोठ्या जोमाने लेकाच्या बंगल्यात दिसेल ते काम जमेल तसे पार पाडत होते.

''गौरी, हे इथे ठेवू का?'', गौरी, हे कधी आटपायचे गं?''

''अगं, घंटीखालच्या अक्षता वाहिल्याशिवाय पूजा नाही हं उचलायची, महेशची आंघोळ झाली का?

''हो आई, तुम्ही अशाच सर्व आठवणी करा हं! घाई गडबडीत विसरूनच जाईन मी!''

विनयाने बोलणाऱ्या गौरीला पाहून निर्मलाताई खूषच झाल्या. माझी सून अशी लीन आहे, इतरांची मर्जी राखणारी आहे म्हणूनच देवाने दोघांची इच्छा पुरी केली. मीच हिची निवड केली होती सांगून आलेल्या इतर मुलींमधून! माझ्या महेशला साजेशीच गौरी आहे ही.

दोन चार दिवसात सर्व पै-पाहुणे निघून गेले. ४-५ मोठमोठ्या खोल्या, अवाढव्य हॉल, ऐसपैस जागेमुळे सर्व खुशीत राहिले व मनापासून आशीर्वाद देऊन गेले. चांगली आठ दिवसांची रजा म्हणून दोघे निवांत होते. सासू-सासऱ्यांची सोबत तिला नेहमीच आवडायची. जुन्या आठवणी ऐकायला तिला नेहमीच खूप मजा यायची. आजोबा-आजीमुळे लहानपणापासून तिला हा आनंद लुटायला खूप आवडायचा. 'आजीच्या गोष्टी' ह्या विषयावर निबंध लिहून तिने बक्षीसही मिळवले होते. एकूणच मोठ्यांचा आदर करायला तिला आजीने व आईनेही शिकवले होते. आईची वागणूकही दीर, गणंदांशी, सासूशी, प्रेमाचीच होती. लहान मुलेही तिच्या गोड वागण्याने, बोलण्याने, गोष्टी रचून सांगण्याने तिच्यावर खूष असायची.

विचारात रमलेले मन काम मात्र हातांच्या मदतीने भराभर पण आटोपशीरपणे उरकत होते.

'दमलो गं आपण दोघीही! चल जरा आराम करूया'' सासूबाई नेहमीच तिच्या नीटसपणाचे कौतुक करायच्या. सक्तीची विश्रांती घ्यायला लावायच्या.

गौरीला मात्र बागेत आरामखुर्ची टाकून शांतपणे बसायला आवडायचे. फ्लॅटमध्ये बाग कुठली म्हणून बंगल्याच्या आवारात तिने बाग, बागेत फळझाडे, फुलझाडे यांची रोपे नीट आखणी करून लावली होती. मध्यावर हिरवळ, हिरवळीवर छानसा सुबक झोपाळा झुलत होता.

शेजारी महेश येऊन बसल्याचे तिला कळलेच नाही; इतकी ती विचारात गुंग झाली होती.

''काय छान गौरीसारखी सजली होतीस गं काल - नजरच हटत नव्हती तुझ्यावरून... तुझा उत्साह तर नेहमीच वाखाणण्यासारखा असतो. सर्वांशी अदबीने वागणे कसे जमते गं तुला. आय ॲम प्राऊड ऑफ यू! तुझ्या अशा सहकार्यामुळेच तर आपला हा बंगला झाला. काय गं, ऐकतेस ना?''

''खरंच हो, विश्वासच बसत नाही. पण झालं बाई आपलं स्वप्न पुरं! सर्व मोठ्यांचे आशीर्वाद. हो नं!''

''हो तर, तू म्हणशील ते खरंच असते. इतक्या वर्षांचा अनुभव आहे ना?''

मिश्कील महेशचा हा लडिवाळपणा तिला भारी आवडायचा. अगदी मोहरून टाकायचा.

पण रात्री झोपताना मात्र मनात विचार आला... खरंच, एका सामान्य घरातल्या मुलीला ते ही कधीही नोकरी न करता - नुसती बी. एस.सी.ची पदवी घेऊन संसारातच शिरलेल्या मुलीला फक्त घर व संसार सांभाळून हे भाग्य मिळू शकते?

मन म्हणाले - ''अगं, नशीबात असेल तर काहीही होऊ शकते.''

लगेच दुसरे मन विचार करू लागले, मग लग्नाच्या दिवशीच ह्या नशिबाने खोलवर चरा का उमटवला?

''अरे वा, लग्न जमले चटकन पहिल्या फटक्यात''

''चाळीत राहूनही छानच सासर मिळवलंस हो''

''नवराही अगदी फॉरीन रिटर्न्ड!''

''प्रमिलाताई, नशीब काढलन् हो पोरीनं''

ह्या उद्गारांनी खुशीच्या लाटेवर तरंगत होती ती. पण मुळातच समजूतदार असल्याने भान राखून होती गौरी! लग्नाच्या तयारीत गुंतून गेली गौरी! आई बाबा लहान भाऊ छोटंसं कुटुंब तिचं!

सासू-सासरे फारच प्रेमळ पण जबाबदारीची जाणीवही करून देणारे. पण पित्याच्या वत्सल परंतु कडक शिस्तीच्या स्वभावामुळे सर्व काही तिला हवेहवेसे वाटे. त्यातून सासरची मोठी फॅमिली! तिला हवी तशी. तीन चुलत्यांचा स्वैंपाक फक्त वेगळा! एकच आतेसासू लग्न होऊन सासरी.

इतक्या वर्षांत सर्वांची इतकी सवय झालेली की ही मधली वहिनी सर्वांनाच हवीशी! छोट्या दीर, नणंदांबरोबर तर रात्री गप्पांचा कार्यक्रम ठरलेला. अभ्यासातही मदत व्हायची ह्या वहिनीची.

पण,... मनाला बोचलेला एकच क्षण! खरं तर कोसळवणारा! गृहप्रवेशानंतर गोड साखरेबरोबरच मिठाचा खडा हातावर ठेवणारा! अवघ्या २० वर्षांच्या नवरीला ध्यानीमनी नसता धक्का देणारा! पण माहेरची पुण्याई, आई-आजीची आठवण, ह्या सर्वांनी सावरले मनाला आणि गौरीने सावरले स्वत:ला!

लग्न थाटात पार पडले. गौरीची पावले माप उलटून आत आली. अल्लड वयात झालेले लग्न मन मयुरपंखी बनून आपलेच चाललेले कौतुक मजेत एन्जॉय करत होते. 'सूनबाई', 'वहिनी' शब्द ऐकून गंमत वाटत होती.

''चला पाटावर या. सूनबाईंचे नाव ठेवायचे आहे.'' देवघरात भटजींची आज्ञा.

नवा कोरा शालू सांभाळत आवरून पाटावर देवापुढे बसताना पुरेवाट झाली. पण उत्सुकता ताणून अल्लड गौरी तांदळाने भरलेल्या तबकात डोकावत होती. काय बरं नाव ठेवतील महेश?..

माहेरचे तेच असेल की बदलतील?

सर्वच गुंतले होते तबकातल्या तांदळात...

आणि .... अचानक शब्द आले...

''काय हे, शेवटी चाळीतलीच मुलगी केलीत ना? इ. इ.''

सगळेच गप्प! गौरीला तर चक्करल्यासारखे

झाले. पण सासुबाईंचा प्रेमळ हात पाठीवर - त्या स्पर्शाचा आधारच वाटला. तर ''लक्ष देऊ नको' हे महेशचे शब्द! समोरचा देव्हारा, तांदळाचे तबक सर्व अश्रुच्या पडद्याने झाकले गेले.

पण आई आजीच्या शिकवणीने तारले.

चेहऱ्यावरचे हास्य, उत्सुकता कायम ठेवून जणू काही ऐकलेच नाही अशा अविर्भावात तिने तबकात पाहिले तर नाव होते गौरी आणि सोबत महेशचे शब्द......

''महेशची फक्त गौरीच असू शकते ना? चाळीतली असो वा बंगल्यातली... काय?''

सवाल होता सर्वांना....

त्यानंतर दिवसामागून दिवस सरले. संसार बहरू लागला. नावारुपाला आला. कलेच्या विविध प्रांतात तिचीही घोडदौड झाली. मुलांना वाढवणे, त्यांच्यावर योग्य संस्कार, त्यांचे शिक्षण, त्यांच्या आवडी निवडी सर्वच तिने आवडीने केले. कारण विचारपूर्वक तिने स्वत:शीच ठरवले होते की संसार असा निगुतीने करायचा की 'चाळीतली मुलगी' हा किताब वाटला पाहिजे सर्वांना!

चाळीतली माणसं ही संस्कारीत असतात. संबंध जोडून ठेवतात. आणि संसारही सुखाचा करतात. सासू सासऱ्यांनी केलेली निवड आज सार्थ झाली ह्या समाधानात व आनंदात ती निद्रेच्या स्वाधीन झाली.

*

---

**व्यंगचित्र**



With Best Compliments from:

# Sysitech Engrs. & Mfrs. Pvt. Ltd.

1003/1004, Lodha Supremus III,
I Think Techno Campus, off. JVLR,
Kanjurmarg (E),
Mumbai-400042
Tel. 91 - 22 - 25750000

Best Wishes from:

# Ashish Hiramanek

Best Wishes from:

# Siddarth and Minal Bhargava

With Best Compliments from:

# A WELL WISHER

With Best Compliments from:

# MICROTROL

## STERLISATION SERVICES PVT. LTD.

Kripalani Estate, Saki Vihar Road, Mumbai-400072

Tel. 91-22-2857 0097 / 2857 0098 / 4057 9600

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीम. सुहासिनी सुहास कोठारे | १००१/- |
| २ | श्री. विजय ग. प्रधानकडून (सौ. सुनेत्रा वि. प्रधान स्मरणार्थ) | १०००/- |
| ३ | सौ. उत्का सुरेश विजयकर | १०००/- |
| ४ | प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर | ५००/- |
| ५ | सौ. अनुराधा सीमित देसाई | ५००/- |
| ६ | सौ. वैजयंती जयेश सक्सेना | ५००/- |
| ७ | सौ. प्रतिमा विनोद प्रधान | ५००/- |
| ८ | श्रीम. माधुरी विहंग नायक | ५००/- |
| ९ | सौ. मयुरा गुंजारव नायक | ५००/- |
| १० | सौ. हर्षा नीलेश कोठारे | ५००/- |
| ११ | श्री. विहान श्रीनल कोठारे | ५००/- |
| १२ | सौ. ज्योत्स्ना रामकृष्ण तळपदे | २५१/- |
| १३ | सौ. धनश्री विनेश तळपदे | २५१/- |
| १४ | श्रीम. यशोदिनी युदवीर राणे | २५१/- |
| १५ | सौ. भारती रसिक विजयकर | २५१/- |
| १६ | सौ. आशा जयबाल विजयकर | १५१/- |
| १७ | सौ. शोभा रंजन विजयकर | १५१/- |
| १८ | सौ. सुहास नंदकुमार विजयकर | १०१/- |
| १९ | सौ. आश्विनी दीप विजयकर | १०१/- |
| २० | श्रीम. उर्मिला विजय धैर्यवान | १०१/- |

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| २१ | सौ. रोनिका सचिन विजयकर | १००/- |
| २२ | सौ. भावना मोनित विजयकर | १००/- |
| २३ | श्रीम. लुबीना समित विजयकर | १००/- |
| २४ | सौ. मीनल हेमंत जयकर | १००/- |
| २५ | सौ. रश्मी प्रमोद जयकर | १००/- |
| २६ | सौ. श्रुतिका विपुल जयकर | १००/- |
| २७ | श्रीम. वृंदा श्याम जयकर | १००/- |
| २८ | सौ. कुंदा प्रताप वेलकर | १००/- |
| २९ | सौ. ऐश्वर्या तेज वेलकर | १००/- |
| ३० | सौ. मेनका जयपाल तळपदे | १००/- |
| ३१ | सौ. श्रुता आनंद तळपदे | १००/- |
| ३२ | सौ. आश्विनी यश तळपदे | १००/- |
| ३३ | श्रीम. शिल्पा रसिक तळपदे | १००/- |
| ३४ | श्रीम. मीनल विजय कोठारे | १००/- |
| ३५ | सौ. पूजा मंदार कोठारे | १००/- |
| ३६ | सौ. नंदा दीपक नवलकर | १००/- |
| ३७ | श्रीम. यशाली दीपक नवलकर | १००/- |
| ३८ | सौ. निकेता प्रशांत राणे | १००/- |
| ३९ | सौ. ऐशाना अलोक प्रधान | १००/- |

# प्रभुतरुणाची डायरी

**नारळ साखर दिला**

३०-०९-१७ श्री. प्रनोज मनोज नवलकर, कु. कृतिका सुधांशु व्यवहारकर

**नांदा सौख्यभरे**

२-१०-१७ श्री. अक्षय राजेश देसाई कु. श्वेता शिरीष कोठारे

७-१०-१७ कु. कामाक्षी माधव धराधर श्री. अक्षय शाम पाटकर (आं.ज्ञा.)

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| २०-०९-१७ | श्री. नरेश शंकर मानकर | वय ६९ | चेंबूर |
| २५-०९-१७ | श्रीम. ज्योत्स्ना पुष्पसेन तळपदे | वय | दादर |

## प्रभुतरुणास देणगी

✳ कै. श्रीमती शीला भोलानाथ कोठारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. आणि सौ. सुदीप भोलानाथ कोठारे आणि श्री. व सौ. रूपक भोलानाथ कोठारे यांजकडून रु. १०००/-

✳ सौ. जयश्री आणि माधव गजानन जयकरकडून दीपावलीनिमित्त प्रभुतरुणास रु. ५०१/-

✳ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान यांजकडून त्यांचा नातू आतीष याच्या यशाप्रीत्यर्थ रु. ५००/-

✳ सौ. निशा आणि श्री. प्रदीप शामराव मानकरकडून त्यांची कन्या सौ. भक्ती धनंजय अजिंक्य 'चार्टर्ड फायनान्शियल ॲनेलिस्ट' परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. ५००/-

### Answer of RIDDLES

1 Put it in front of the mirror of course!
2 A glove
3 An Egg
4 Your name
5 A shadow
6 A Bottle
7 Your Age
8 The moon.
9 Breath
10 A Candle
11 The house is on the north pole, so the bear is white.
12 The Letter W.
13 The woman is blind and is reading braille.
14 All twelve months

## परीक्षेतील सुयश

**बी. इ. (केमिकल इंजिनिअरींग)**

श्री. आतीष अलोक प्रधान

**बी. इ. (कॉम्प्युटर इंजिनिअरींग), मुंबई विद्यापीठ**

श्री. प्रतिक प्रकाश विजयकर

**बी. इ. (इंस्ट्रुमेंशन इंजिनिअरींग),** CBSGS

कु. प्रांजली अनिल व्यवहारकर

## मराठी म्हणी ओळखा

खेळाची उत्तरे

१) पुढच्यास ठेच, मागचा शहाणा
२) वराती मागून घोडे
३) लेकी बोले, सुने लागे
४) कामापुरता मामा, ताकापुरती आजी
५) गर्वाचे घर खाली
६) नावडतीचे मीठ अळणी
७) भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी
८) घरचे झाले थोडे, व्याह्याने धाडले घोडे
९) कर नाही त्याला डर कशाला?
१०) ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी
११) अती शहाणा त्याला बैल रिकामा
१२) सुसरबाई तुझी पाठ मऊ
१३) मूर्ती लहान कीर्ति महान
१४) बोलाची कढी बोलाचाच भात
१५) न कर्त्याचा वार शनिवार

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीतराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८ ०० ४४